म. ग्रं. स. ठाण
विषय
सं. क. ७८५५

# …चें

# …जकारण

…न काल्लेलकर

…ष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे

REFBK-0006729

१७८.
७३३८४
२५।२।७१
१८५५.

[illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धि योजना

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ३६ वें

# हिंदूंचें समाजकारण

( गुजराती ' जीवन-संस्कृति ' आणि मराठी ' हिंडलग्याचा प्रसाद '
या दोन ग्रंथांतील निवडक निबंधांचा संग्रह )

मराठी ... संग्रहालय
ग्रं. क्र. ६७२९
(स्थळ प्रत)

लेखक
आचार्य काकासाहेब कालेलकर

REFBK-0006729

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३३५८ दि: विविध
क्र. १८५५ नों. दि: २५-२-७९

एप्रिल १९४६ ] [ मूल्य २। रुपये

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या
विश्वस्त मंडळाकरितां.
१२ टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

मुद्रक
गंगाधर शंकर दाते
कलागृह छापखाना
६६६ सदाशिव पेठ, पुणें २

# समन्वय-संस्कृति

मनुष्याच्या ज्ञानोपासनेचीं मुख्य मुख्य क्षेत्रें काय आहेत, तें नेहमीं ध्यानांत असणें उपयोगी आहे. मनुष्य आपल्या आसपासचें सगळें जग कसें काय आहे हें समजून घेण्याचा आणि त्याचा काय उपयोग करून घेतां येअील हें शोधून काढण्याचा प्रयत्न करीत असतो. आपण जगावें, आपलें जीवन सुखी, समृद्ध, समर्थ आणि कृतार्थ व्हावें, अशी तळमळ मनुष्याला नेहमीं लागलेली असते. यासाठीं तो प्रथम आपल्या आसपासचें, आधीं संकुचित आणि नंतर विशाल विश्व तपासून पहात असतो. यानंतर त्याला आपल्या सामाजिक जीवनाची ओळख होते आणि मग तो समाजशास्त्राकडे वळतो. या अेका शास्त्राच्या त्यानें असंख्य शाखा पाडल्या आहेत. समाजशास्त्राची चिकित्सा करतां करतां त्याला स्वतःच्या स्वकीयांच्या आणि परकीयांच्या मनोव्यापाराचा ठाव पहावा लागतो. यांतून मनुष्याचें मानसशास्त्र निर्माण होतें.

मानसशास्त्राच्या मीमांसेंतून मनुष्याला अध्यात्म लाभतें आणि या अध्यात्माच्या जोरावर जेव्हां तो बाह्य जगत् देखील तपासूं लागतो, तेव्हां त्याला दर्शनशास्त्राचें दर्शन होऊं लागतें. विश्वाच्या रहस्यांतून परमात्म्याचें आकलन झालें आणि अन्तर्मुख वृत्तीनें आत्म्याचा शोध लागला, म्हणजे मनुष्य अध्यात्मशास्त्राच्या अध्ययनाला योग्य होतो. हें अध्यात्मशास्त्र मनुष्याच्या तिन्ही प्रकारच्या ज्ञानोपासनेला—भौतिकशास्त्र, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र या त्रिपुटीला—प्रकाशित करतें आणि नवा अर्थ देतें.

अशा तऱ्हेनें आपल्या पूर्वजांनीं अध्यात्मशास्त्राच्या प्रेरणेला वश होऊन जी त्रिविध ज्ञानोपासना केली आणि त्यांतून जे पुरुषार्थाचे आदर्श ठरविले, जीवनवीर बनून जे प्रयोग केले, आणि समाजाला जें स्वास्थ्य मिळवून दिलें ती सर्व आपली भारतीय संस्कृति होय. या आध्यात्मिक आणि जीवननिष्ठ

संस्कृतीच्या स्वरूपाची मीमांसा करीत असतांना जें कांहीं नजरेस आलें, त्यापैकीं सामाजिक भाग या निबंधसंग्रहांत चर्चिला गेला आहे.

हिंदूंच्या या समाजकारणांत संस्कार, वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था आणि पुरुषार्थांचा क्रम या सर्व गोष्टींचा अन्तर्भाव होतो.

या बाबतींतील आपले प्रयोग संकुचित असतील, किंवा विशाल असतील. कल्पना पहावी तर भव्य, आणि अंमलबजावणी मात्र बावळटपणाची, असेंहि केव्हां केव्हां झालें असेल; कोठें कोठें त्या त्या काळीं आपले प्रयोग अत्यंत यशस्वी आणि कल्याणकारी झाले असतील. आज ते प्रकार कालग्रस्त झाल्यामुळें निःसत्व झाले असतील, आणि कित्येक प्रकार आपल्याला वाटतात तसे खरोखर टाकाऊ नसून भविष्यकाळच्या विशाल आणि मजबूत पायावर तें नवीन रूपें धारण करणार असतील आणि नवीन कृतार्थता पटवून देणार असतील.

या सर्व गोष्टींचें डोळसपणें पण आस्थेवाईकपणानें, श्रद्धायुक्त बुद्धिशक्तीनें निरीक्षण आणि चिंतन करणें आवश्यक आहे. या चिंतनाच्या जोरावर जर आपण पुन्हां आपल्या पूर्वजांप्रमाणें प्रयोगपरायण झालों, आणि ग्रंथप्रामाण्य व रूढिप्रामाण्य यांचा आंधळेपणा सोडून दिला, तर आपल्याला नवे नवे प्रयोग करून कालोचित समाजरचना करण्याचें साहस सिद्ध होईल.

चातुर्वर्ण्याचें रहस्य जेव्हां आपण विसरून गेलों, त्याचकाळीं लोकांमध्यें त्या संस्थेसंबंधानें अत्यंत आग्रह आणि आंधळी श्रद्धा उत्पन्न झाली. चातुर्वर्ण्य कशासाठीं आहे हें ध्यानांत न घेतांच लोक चातुर्वर्ण्याचा अभिमान बाळगूं लागले! याचा परिणाम असा झाला कीं वर्णव्यवस्थेचा लाभ तर आपल्याला मिळाला नाहींच; पण उलट, आपलें रूढिदास्य मात्र वाढलें.

यामुळें प्रथम हें सांगावें लागलें कीं, जाति म्हणजे वर्ण नव्हे. वर्णव्यवस्था रोटीबेटीव्यवहार बंद करण्यासाठीं स्थापन झालेली नसून समाजसेवेचीं क्षेत्रें

आजीविकेपुरतीं मर्यादित करण्यासाठीं होती. वर्ण-व्यवस्थेनें परंपरागत कौशल्याचा संग्रह केला, स्वधर्माचें तत्त्व लोकांना शिकविलें, निरर्गल चढाओढीला आळा घातला आणि समाजव्यवस्थेंतील सर्व घटक हे समाजशरीराचे अवयव असल्यासारखे आहेत याची जाणीव लोकांना करून दिली. वर्णव्यवस्थेचें हें खरें स्वरूप समजल्यानंतरच रोटीबेटीव्यवहारांतील समाजाचा संकुचितपणा ढिला झाला आणि वर्णव्यवस्थेंतहि फेरफार करण्याचा आपल्याला अधिकार आहे, या गोष्टीची जाणीव झाली.

आतां आपण शुद्ध शास्त्रीय पद्धतीनें आणि ऐतिहासिक दृष्टीनें आपल्या समाजकारणाचा विचार केला पाहिजे. चातुर्वर्ण्याच्या ऐवजीं सातवर्ण्य असावें आणि त्यांतहि निराळा क्षत्रियवर्ण असूं नये, ही जशी एक कल्पना समाजापुढें मांडण्यांत आली आहे, त्याचप्रमाणें सध्यांचें युग वर्णव्यवस्था—मग ती चाराची असो, साताची असो किंवा सातशेंचा असो—आटवून टाकण्याचें युग आहे, ही गोष्ट जनतेपुढें प्रामुख्यानें मांडली पाहिजे.

आज प्रचलित असलेल्या जातिव्यवस्थेमधून नवी वर्णव्यवस्था उत्पन्न करतां येईल अशी उमेद पुष्कळांनीं बाळगली. आतां आपण पहावयाचें तें हें कीं, जुनी वर्णव्यवस्था पुन्हां सुरू करून हिंन्दूंचें संघटण करतां येईल, कीं हिंन्दूंतूनच उत्पन्न झालेल्या मुसलमान, ख्रिस्ती आदि समाजाशीं आणि आपल्याबरोबर शेजारधर्मानें शेकडों वर्षें राहून येथीलच कायमचे झालेल्या पारशांसारख्या समाजांशीं आपण प्रथम एकरूप व्हावयाचें ? अर्थात् सर्व वर्णांच्या भिन्नभिन्न मनोरचनांचा आणि आदर्शांचा मिलाफ करून एकच वर्ण स्थापावयाचा आणि जगामध्यें हिंदुस्थानला मानाचें स्वतंत्र स्थान मिळाल्यानंतर भविष्यकाळाला अनुरूप अशी हवी ती समाजरचना करण्याची तयारी करावयाची ?

आपला आजवरचा इतिहास, आजची जागतिक परिस्थिति आणि

भविष्यकाळासाठीं आपण तयार करीत असलेला आदर्श यांचा विचार करतां आपल्याला आजवर कल्पनेंतहि आली नसेल अशी अेक विशाल संस्कृति निर्माण करावयाची आहे.

शिवाजी महाराजांच्या पूर्वी जुन्याचा उद्धार करण्याचा प्रयत्न विजयनगर साम्राज्यानें करून पाहिला. परन्तु भूतकाळ कधीं परत येत नसतो. शिवाजी महाराजांनीं जुन्याला नवें वळण लावलें. आज देखील आर्यसमाजानें वैदिक काळ परत आणण्याची कल्पना करून पाहिली. सनातनी हिंदूंनीं हिंदुसंघटण करून पाहिलें. पण जुन्याला नवें वळण लावल्यावांचून भविष्यकाळाचें आवाहनच होऊं शकत नाहीं, त्याला कोण काय करणार ? त्यातां अितिहास-क्रमानें हिंदुस्थानांत येऊन स्थायी झालेल्या सर्व धर्मांचा समन्वय करणें अपरिहार्य होऊन बसलें आहे. स्वकीयांनीं ज्या ज्या धर्मांचा स्वीकार केला आणि जे जे धर्म आपल्या येथें आज शेकडों वर्षें नांदत आले आहेत, त्यांना आपण परके म्हणून किती दिवस वागवणार ? हे धर्म परकीयांनीं आपल्या येथें आणले असतील, पण त्यांचा स्वीकार करणारे स्वकीयच आहेत. या स्वकीयांना या सर्व धर्मांसंबंधानें आत्मीयता वाटते, हें सिद्ध झाल्यानंतर आपल्यापुढें दोनच मार्ग राहतात : अेक म्हणजे स्वकीयांनीं हे धर्म स्वीकारले म्हणून या धर्मांना स्वकीय समजावयाचें, आणि दुसरा म्हणजे स्वकीयांनीं परकीय धर्म स्वीकारले म्हणून स्वकीयांनाच परकीय बनवावयाचें. हा दुसरा प्रकार हिन्दु संस्कृतीच्या स्वभावाच्या विरुद्ध असूनहि आपण आज-वर अजमावून पाहिला. पण भारतीय स्वधर्माच्या विरुद्ध वागून आपली प्रगति कशी होणार ? चूक लक्षांत येतांच ती सुधारली पाहिजे. स्वकीयांना मान्य असलेले सगळेच धर्म स्वकीय आहेत असें धरून आपण आपलें नवें समाजकारण यापुढें सुरू केलें पाहिजे. त्यांतूनच आपल्याला आपल्या संस्कृती-ची कृतार्थता लाभणार आहे.

हा विचार भारतीय परंपरेला धरून असला, तरी गेल्या पन्नास वर्षांच्या हिंदूंच्या प्रवृत्तीला धरून नाहीं. याच्या स्वागतासाठीं हिन्दुमानस तयार

करावयास केवढें तरी मोठें साहित्य तयार झालें पाहिजे आणि केवढी तरी प्रचंड सामाजिक सांस्कृतिक चळवळ झाली पाहिजे. आज या पुस्तकांत तें करणें शक्य नाहीं. आज त्याचें फक्त सूचन करूनच सन्तोष मानावा लागत आहे. केवळ सनातनी तार्किक कोट्या करून या विषयाची आतां वासलात लावतां यावयाची नाहीं. महाराष्ट्रानें गेल्या दोन पिढ्यांत उद्धारक वृत्ति धारण करून सुधारकांची हबेलंडी उडविली; पण शेवटीं ते उद्धारकच हळुहळू नव्या सुधारणांच्या प्रवाहांत वाहून गेले ! याहि बाबतींत आपले पुढारी त्याच वळणा-वर गेल्यास आश्चर्य वाटावयास नको.

यापुढेंहि सर्वसमन्वयकारी नव्या सुधारणेच्या बाबतींत जुना खेळ खेळणें अशक्य नाहीं. त्या तंत्रांत आपण तरबेजहि आहोंत ! पण जग झपाट्यानें पुढें जात आहे; जुने खेळ आंगवळणीं पडले असले म्हणून कांहीं ते कमी महाग ठरत नाहींत. समाजद्रोह करूनच खऱ्या सुधारणेचा विरोध करणें शक्य आहे, हें ज्यांच्या लक्षांत येईल त्यांचाच भविष्यकाळ आहे.

* * *

‘ जीवन–संस्कृति ’ या नांवानें प्रसिद्ध झालेल्या माझ्या गुजराती लेख-संग्रहाला मराठींत येतां येतां दोनतीन नांवें धारण करावीं लागलीं.× आणि त्यासाठीं तीनचार वर्षांची तपश्चर्या करावी लागली. सनातन दृष्टीनें पाहतां हा काळ कांहीं फार नव्हे. पण विचार–विकासाच्या दृष्टीनें पाहतां मात्र मी बराच पुढें गेलों आहे. म्हणूनच मला वरील प्रस्तावना लिहावी लागली.

आजवर प्रसिद्ध झालेल्या चार पुस्तकांइतकाच भाग अजून प्रकाशित व्हावयाचा राहिला आहे. तें सर्व विवेचन जर कालग्रस्त होऊन गेलें असतें, तर तें रद्द करण्याला माझी कोणतीच हरकत नव्हती. पण संस्कृतीचें अध्ययन करणाऱ्या आधुनिकांना अजूनहि निदान सातआठ वर्षें त्याचा उपयोग आहे.

---

× १ जीवन आणि समाज. २ समाज आणि समाजव्यवस्था. ३ जीवन-संस्कृति.

कोणताहि विचार पचविल्यावांचून किंवा तपासून त्याज्य ठरविल्यावांचून समाजाला तो टाकून देतां येत नाहीं.

मी जेलमध्यें असतांना श्रीपाद जोशींनीं या सर्व लिखाणाचा अनुवाद केला. तेहि त्यावेळीं जेलमध्येंच होते. यामुळें लिखाणाचे विभाग पाडणें, प्रकाशनाचा क्रम ठरविणें हें सर्व त्यांनींच केलें आहे. मी जरी बाहेर असतों, तरी क्रम वगैरे ठरविण्याच्या बाबतींत मीं लक्ष घातलें असतें असें नाहीं. 'हिंडलग्याचा प्रसाद' नांवाच्या लोकजीवनविषयक माझ्या मूळ मराठी पुस्तकांतील बरींच प्रकरणें समाजकारणविषयकच असल्यामुळें या संग्रहांत घेण्याचें श्रीपादनीं ठरवलें आणि मीं त्याला सम्मति दिली. अशीं जीं प्रकरणें मुळांतच मराठींत लिहिलीं गेलीं होतीं, त्यांचें भाषान्तर करण्याचा अर्थातच प्रश्न नव्हता. अमुक प्रकरणें भाषांतरित आणि अमुक मूळ मराठी, असा भेद अनुक्रमणिकेंत दाखविला आहेच. या संग्रहांत कोणकोणचीं प्रकरणें घ्यावयाचीं हें श्रीपादनींच ठरविलें असल्यामुळें संग्राहक म्हणून सर्व जबाबदारी त्यांचीच आहे. जेव्हां शक्य असतें, तेव्हां मी भाषांतरें तपासल्यावांचून रहात नाहीं. पण हल्लींच्या छपाअीच्या अडचणीच्या काळांत प्रकाशकांना लेखकाचे अितके लाड पुरवितां येत नाहींत.

आणखी अेका बाबतींत मला माझा आग्रह सोडावा लागला आहे. साक्षरताप्रसाराच्या दृष्टीनें आपल्या स्वरांचीं व जोडाक्षरांचीं जुनीं रूपें सोडून देऊन नवीं लोकसुलभरूपें प्रचलित झालींच पाहिजेत, असा माझा आग्रह आहे. टाइपाच्या अडचणीमुळें नवे उ ऊ तर वापरतां येणें अशक्यच होतें. अेवढेंच अेक वैगुण्य स्वीकारून अितर स्वर नवीन पद्धतीनें देणें शक्य असूनहि प्रकाशकांनीं थोडी चालढकल केली आणि सर्वत्र अराजक राहूं दिलें. सोय होतांच आग्रह पुनः ताजा होअील, अेवढेंच आश्वासन वाचकांना देणें शक्य आहे.

वर्धा, फाल्गुनी पौर्णिमा
ता. १७-३-४६

—काका कालेलकर

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १ | धर्मसंस्करण | ( मूळ मराठी ) | १ |
| २ | समाजरचना | ( भाषांतरित ) | ८ |
| ३ | वर्णधर्म | ( ,, ) | १६ |
| ४ | क्षात्रधर्म | ( ,, ) | २४ |
| ५ | सावर्ण्य | ( मूळ मराठी ) | २५ |
| ६ | देशधर्म | ( भाषांतरित ) | ४४ |
| ७ | वर्ण आणि ज्ञाति | ( ,, ) | ४९ |
| ८ | वर्णव्यवस्था | ( मूळ मराठी ) | ५२ |
| ९ | जातिधर्म व कुलधर्म | ( ,, ) | ५८ |
| १० | सामाजिक जबाबदारी | ( भाषांतरित ) | ६२ |
| ११ | नवा जन्म | ( ,, ) | ६६ |
| १२ | जातीजातींतील संबंध | ( मूळ मराठी ) | ६७ |
| १३ | शूद्रवर्णाचें ओझें | ( भाषांतरित ) | ७७ |
| १४ | तीन वर्ग | ( ,, ) | ७९ |
| १५ | नव्या जाती | ( ,, ) | ८२ |
| १६ | अठरा आणि ऐंशी | ( ,, ) | ८५ |
| १७ | ज्ञातिपरिषदा | ( ,, ) | ९१ |
| १८ | जातिभेदाचा प्रश्न | ( ,, ) | ९५ |
| १९ | पंक्तिभेद | ( ,, ) | १०६ |
| २० | अस्पृश्यतानिवारण | ( मूळ मराठी ) | १०८ |
| २१ | पंक्तिप्रपंच | ( भाषांतरित ) | ११४ |
| २२ | बेजबाबदारी | ( ,, ) | ११९ |
| २३ | जातीची कसोटी | ( ,, ) | १२३ |
| २४ | सामाजिक बहिष्कार | ( ,, ) | १२७ |
| २५ | ज्ञातिचर्चेतील गोडी | ( ,, ) | १२८ |
| २६ | गौरक्षा | ( मूळ मराठी ) | १३० |
| २७ | जीवनदृष्टीचीं तीन प्रस्थानें | ( भाषांतरित ) | १३६ |

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | १९ | संरक्षण | संस्करण |
| ६४ | ४ | तें असेल तें | जें असेल तें |
| ७३ | २५ | पाणी कोणाच्याहि | कोणाच्याहि |
| ९१ | ७ | उद्धराच्या | उद्धाराच्या |

( मूळ ग्रंथांत कोठें कोठें ‘ अन्नाहारी ’ असा प्रयोग आलेला आहे. त्याचा अर्थ ‘ शाकाहारी ’ असा आहे. )

# अर्पण पत्रिका

'जीवन-संस्कृति' हा विचारप्रेरक ग्रंथ वाचतांना आणि त्याचा अनुवाद करतांना ज्यानें मला अखंड प्रकाश देऊन उपकृत केलें, तो माझा येरवडा कृष्ण-मंदिरांतील बहुमूल्य साथी विद्युत्‌दीपच या अर्पणपत्रिकेचा खरा हक्कदार आहे.

—श्री—

६०२२

# धर्मसंस्करण

## १

मानवी जीवनाचा साकल्यानें विचार करणारा जर कोणी असेल तर तो धर्म आहे. जीवनाचें स्थायी अथवा अस्थायी असें एकहि अंग नाहीं कीं ज्याचा धर्माला विचारकर्तव्य नाहीं.

म्हणून धर्म हा मनुष्याच्या सनातन जीवनाइतकाच अथवा त्याहून अधिक व्यापक असला पाहिजे. आणि अशेष जीवन हें त्याचें क्षेत्र असल्यानें तो अत्यंत उत्कटपणें आणि परमार्थतया जिवंत असला पाहिजे.

आज जगामध्यें जे प्रख्यात धर्म आहेत ते सर्व बऱ्याच अंशानें असे व्यापक आहेत. स्थापनाकाळीं तर ते जिवंत होतेच. पण वेळोवेळीं धार्मिक पुरुषांनीं धर्मांचा जिवंतपणा पुनः पुनः साधलेला आहे. शेगडींतील विस्तव जसा स्वभावें-करून पुनः पुनः मंद होतो आणि म्हणून वारंवार कोळसे पुरवून आणि वेळो-वेळीं फुंकर घालून त्याचें संस्करण करावें लागतें, त्याला जागृत ठेवावें लागतें, त्याचप्रमाणें धर्मतेज समाजांत जागृत ठेविण्यासाठीं धर्मपरायण समाजपुरुषांना पोषण आणि फुंकर घालण्याचें काम करावें लागतें. हें काम जर वेळोवेळीं न झालें तर धर्मजीवन क्षीण व विकृत होतें; आणि धर्माचें क्षीण व विकृत स्वरूप अधर्माइतकेंच बाधक असतें. धर्मतेज जिवंत व प्रज्वलित राखण्याचें काम धर्मैकपरायण व्यक्तींच्या हातूनच होत असतें. ही शक्ति धर्मग्रंथांमध्यें नाहीं, धार्मिक रिवाज किंवा संस्कारांमध्यें नाहीं, धार्मिक संस्थांमध्यें नाहीं आणि धर्माला टेका देणाऱ्या राज्यव्यवस्थेंतहि नाहीं. शास्त्रग्रंथ, संस्कार, रिवाज आणि त्याचप्रमाणें धार्मिक व राजकीय संस्था यांचा धार्मिक जीवनाला

कमीअधिक प्रमाणानें उपयोग आहे. धार्मिक वातावरण स्थिर करण्याच्या कामीं यांची सेवा बहुमोल आहे. पण मूळ शक्ति धर्मप्राण अशा ऋषींची व संतांची आणि महात्म्यांचीच होय. धर्माचा अंतिम आधार मनुष्यहृदय आहे. 'धर्मशास्त्रं महर्षीणां अंतःकरणसंभृतम्' असें जें उपनिषदांत म्हटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे.

धर्मजिज्ञासा आणि धर्माचार हा मनुष्याचा स्वभावच आहे व म्हणून सर्वकाळीं व सर्वदेशीं उन्नतीच्या पायरीप्रमाणें मनुष्यहृदयांत धर्माचा आविर्भाव झालाच आहे. हा हृदयधर्म कितीहि कलुषित असला, मलिन असला, तरी मूळ वस्तु शुद्ध आहे. अशुद्ध सोनें म्हणजे कांहीं पितळ नव्हे आणि पितळ कितीहि शुद्ध, लखलखीत आणि घोटीव असलें तरी त्याला सोनें म्हणतां येत नाहीं. केवळ बुद्धीच्या जोरावर जमवलेला, लोकांमधील रागद्वेषांचा फायदा घेऊन चालू केलेला आणि थोड्या अथवा अधिक सामर्थ्यशाली लोकांच्या स्वार्थाला पोषण देणारा धर्म तो धर्म नव्हे. असंस्कारी हृदयांतील क्षुद्र वासना आणि दंभामुळें उत्पन्न होणारी विकृति यांवर झांकण घालणारा शिष्टाचार आणि चातुर्याच्या तर्कानें केलेला त्याचा बचाव हाहि धर्म नव्हे. अज्ञान म्हणजे अल्पज्ञान, भोळसटपणा आणि अंधश्रद्धा यामुळें कलुषित झालेला धर्म अधर्माच्या कोटीला पोहोंचला असला तरी ती वस्तु निराळी; आणि मुळांतच जो धर्म नव्हे पण केवळ शिताफीनें धर्माचें रूप धारण करणारी वस्तु ती निराळी. मानवी अितिहासांत वरील दोन्ही प्रकार मुबलकपणानें सांपडण्याइतका मनुष्यसमाज परिणत झाला आहे; पण या दोन्ही वस्तूंचें पृथक्करण करून त्यांचें यथार्थ स्वरूप ओळखण्याची तसदी मनुष्यानें अजून घेतली नाहीं.

हृदयधर्म जेव्हां बुद्धिप्रधान लोकांत आपलें कार्य करूं लागतो, शिष्टमान्य होतो आणि त्यामुळें जेव्हां धर्माचें संस्थीभवन होतें, तेव्हां शास्त्रें निर्माण होतात; शास्त्राचा अर्थ लावणारी मीमांसा उत्पन्न होते; आणि अंतिम निर्णय देणारा शास्त्रज्ञांचा वर्ग तयार होतो, अथवा अधिकारारूढ व्यक्ति स्वीकारण्यांत येते.

धर्माचें शास्त्रग्रथन आणि संस्थीभवन हें व्यवहारज्ञ आणि बुद्धिप्रधान अशा लोकांकडून होत असल्यानें त्यायोगें धर्माची स्वाभाविक भविष्योन्मुख दृष्टि

क्षीण होते आणि तीवर भूतकालाचींच पुटें चढतात. भूतकालामध्यें अग्नीपेक्षां राख अधिक असल्यानें धर्मतेज गुदमरून जातें हें निराळें सांगावयास नको. आणि म्हणूनच दरेक धर्माला संस्करणाची आवश्यकता असते.

तुकारामबोवा बाजारांत जाऊं लागले म्हणजे गांवच्या अनेक लोकांनीं त्यांच्या सज्जनतेचा फायदा घेण्यासाठीं आपापलीं तेलाचीं नळकांडीं तेल आणण्यासाठीं त्यांच्याकडे सोपवावीं, व त्यांनींहि संतोषानें अशा नळकांड्यांची वजनदार माळ गळ्यांत घालून सांगितलेलें काम नियमित करावें. जनस्वभाव हा असाच आहे. मुलें अथवा लोक अेकाद्याचें मुकाट्यानें अैकतात असें पाहिलें कीं, त्याच्या मार्फतच मन वळवण्याचें काम करून घेण्यास अैतोबांचा जनसमाज प्रवृत्त होतो. एकादें जहाज नियमितपणें आणि वेगानें अिष्ट मुक्कामीं जात असलें तर त्याचा वेग क्षीण होअीतोंपर्यंत आणि तें बुडण्याची पाळी येअी तोंपर्यंत त्यांतच आपला माल भरण्याचा आग्रह लोकांमध्यें दिसून येतो. धर्माची सार्वभौम शक्ति पाहून दरेक लोभ्यानें आपापल्या लोभाचें कार्य कोणत्या ना कोणत्या रूपानें धर्माच्या गळ्यांत बांधलेंच आहे. या कारणामुळें देखील धर्मतेज वारंवार क्षीण होतें.

एकादें चालतें दुकान आपली भरभराट कायम टिकावी आणि वाढावी यासाठीं ज्याप्रमाणें वेळोवेळीं जुना व कुचकामाचा होऊं पाहणारा माल काढून टाकतें आणि चांगला माल जर पडून पडून बिघडला असेल तर तो उजळून काढतें, त्याप्रमाणें धर्मांनीं वेळोवेळीं स्वतःचें संरक्षण केलें पाहिजे. मात्र हें संस्करण खरें सोनें कोणत्याहि रूपांत पारखण्याची आणि संभाळून ठेवण्याची शक्ति ज्यांच्यामध्यें आहे अशा कुशल, धर्मज्ञ समाजसेवकांच्या हातूनच झालें पाहिजे. जगांत माजलेल्या बऱ्याचशा नास्तिकतेचें कारण धर्मसंस्करणाचा अभाव हेंच होय.

## २

कोणताहि समाज म्हातारा किंवा क्षीणवीर्य होतो त्याचीं कारणें दोन : विलासिता आणि धर्मजडता.

समाज विलासी झाला म्हणजे असलेली साधनसंपत्ति त्याला पुरेनाशी होते;

पुरुषार्थ आपोआप कमी होतो; यांत काय आहे, त्यांत काय आहे, कशांत कांहींच नाहीं, अशा प्रकारचें नैष्कर्म्य व अेक प्रकारचा झोपाळूपणा समाजांत येतो. आणि मग नवा नवा अनुभव घेण्याच्या अैवजीं जुन्या विषयींचा कृत्रिम आदर आणि आग्रह वाढून तो ढाल म्हणून पुढें केला जातो.

दुसऱ्या बाजूनें मनुष्यामध्यें जेव्हां बौद्धिक जागृति मंद पडते, प्रयोगापेक्षां प्रामाण्यावरच भिस्त ठेवण्याची वृत्ति वाढते, तेव्हां समाजांत अेक प्रकारचें धर्मजाड्य उत्पन्न होतें. हें धर्मजाड्य दिसण्यांत धर्माभिमानासारखें दिसतें; पण वस्तुतः ती अेक प्रकारची नास्तिकताच असते. अभिमान आणि आग्रह यांच्या मुळाशीं खरा आदर किंवा खरी श्रद्धा असतेच असा अनुभव नाहीं.

आज हिंदुस्थानांत खेडेगांवांतील समाजाची असाधारण दुर्दशा आहे. शहरांतून परदेशी माल व चैनीच्या वस्तू खेडेगांवांत पोंचतात. पण उद्योग-धंदे खेडेगांवांत पोहोंचत नाहींत. शहरी उधळपट्टी, असंस्कारिता व अितर समाजविनाशक दुर्गुण खेडेगांवांत झपाट्यानें पसरूं लागले आहेत. पण शहरांत जी धर्मविचाराची जागृति, राजकीय प्रगति आणि समाजसुधारणा थोड्याफार अंशानें दिसतात, त्यांचें लोण खेडेगांवांत फारच थोड्या प्रमाणानें पोंहोंचतें. ज्या हिंदुधर्मानें व आर्य तत्त्वज्ञानानें आपण जगाचे डोळे आज दिपवीत आहोंत, तो धर्म व तें तत्त्वज्ञान कोणत्या रूपानें आजच्या खेड्यांतील समाजांत नांदत आहे हें पाहिलें असतां 'नेदं यदिदमुपासते' असेंच म्हणावें लागेल. खेडेगांवांमध्यें खरीखुरी धर्मनिष्ठा, पवित्र आस्तिकता, व उच्च चारित्र्य-संपत्ति अगदीं परवां परवांपर्यंत होत्या, आजहि त्यांचे अवशेष दिसून येतात; पण अबुद्धि, जडता आणि नास्तिकता यांचें साम्राज्य खेडेगांवांतून सार्वत्रिक होऊं पहात आहे. यामुळें शहराच्या मानानें खेडेगांवच्या समाजांत वार्धक्य अधिक दिसून येतें. खेडेगांवांत अज्ञान आहे, अनारोग्य आहे आणि दारिद्र्य आहे. हीं तीन दूर न केलीं तर खेडेगांवांतील समाज आतां जगणेंच शक्य नाहीं. पण ज्ञान, आरोग्य आणि उद्योग हीं लोकांवर बाहेरून कितपत लादतां येणार ? लादण्याच्या उपायाला स्वाभाविक मर्यादा आहे. या गोष्टी लोकांनीं स्वेच्छेनेंच स्वीकारल्या पाहिजेत. आणि स्वेच्छेनें स्वीकारण्यास समाजाचें वार्धक्य प्रथम गेलें पाहिजे. समाजांत उत्साह व उत्थान हीं आलीं पाहिजेत.

धर्मसंस्करणावांचून ही गोष्ट होणें नाहीं. म्हणून इतर सर्व गोष्टींच्या आधीं खेडेगांवांतून धर्मसंस्करणाचा यथायोग्य प्रयत्न झाला पाहिजे.

खेडेगांवांतून जो धर्म मानला जातो त्यामध्यें भीति, लांच, दैववाद आणि जादूवजा कर्मकांड हेंच मुख्य असतें. मग तो धर्म हिंदूंमध्यें असो, मुसलमानांत असो अथवा ख्रिस्ती लोकांत असो. खेडेगावांतील लोकांना स्वतःच्या दुर्बळतेची, अज्ञानाची, भोळसटपणाची, आणि अनाथ स्थितीची अितकी कांहीं कटु–अनुभवमूलक जाणीव असते कीं स्वभावतः ते शक्तिउपासक होतात–मग ते जैन असोत कीं लिंगायतहि असोत. या अज्ञानमूलक शक्तिपूजेनेंच जादूवर विश्वास बसतो आणि जादूला धर्माची प्रतिष्ठा मिळते. धर्म म्हणजे जबरदस्तांची आराधना अथवा विकत घेतलेली राखण असा अर्थ सामान्य जनतेमध्यें असतो. धर्माच्या योगानें मांगल्यावरील श्रद्धा वाढवावयाची असते; चारित्र्याची तेजस्विता स्वाभाविक करावयाची असते; अैहिक अनुभवांत पदोपदीं जो विषाद प्राप्त होतो तो दूर करणारें दैवी आश्वासन मिळवावयाचें असतें; आणि जीवनांतर्गत प्रत्येक तत्त्वाचें नवीन दृष्टीनें नवीनच मूल्य करावयाचें असतें. सफळतेची व निष्फळतेची कल्पनाच बदलून या भौतिक जगांत आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवावयाचें असतें.

तात्त्विक विवेचनाच्या दृष्टीनें हें दृष्टयंतर फारच अवघड वाटतें. पण हृदय हृदयाशीं बोलूं लागलें म्हणजे उन्नत भूमिकेचें आमंत्रण तेथें सरळ जाऊन पोहोंचतें अथवा भिडतें आणि अेकदां हृदयांत परिवर्तन झालें म्हणजे कांहीं केल्या त्यानें माघार घेणें शक्य नसतें. हें आमंत्रण देणाऱ्या व्यक्तीच्या हृदयांत कोणाच्या संबंधानें तुच्छ भाव नसावा. आपलें आमंत्रण अमोघ आहे अशी अमर आस्तिकता असली पाहिजे. आणि मनुष्यमात्राच्या हृदयाविषयीं प्रेम आणि आदर असला पाहिजे.

[ धर्मज्ञान देतां घेतांना ग्रहण करणाऱ्याच्या अधिकाराविषयीं आजवर बेसुमार चर्चा झाली आहे. धर्मज्ञानाचें दान करणाऱ्याच्या अधिकाराचा ऊहापोह करण्याचे दिवस आतां आले आहेत. वर वर्णिलेली आस्तिकता असेल त्यानेंच धर्मबोधाचें व धर्मसंस्करणाचें काम हातीं घ्यावें. ]

धर्मांधतेच्या रूपानें खेडेगांवांतून आज नास्तिकता किती पसरली आहे याची बरोबर कल्पना झाल्यास मनाला आघातच पोहोंचावा.

प्रत्येक धर्मांत मुबलक काव्य सांठविलेलें असतें. खेरं पाहूं जातां धर्म-ज्ञानाचें वाहन युक्ति आणि तर्क नसून काव्यच आहे. आणि म्हणून काव्य-विहीन धर्म असूंच शकत नाहीं. पण जेथें समाजांत अज्ञान आणि जडता यांचें साम्राज्य असतें तेथें धार्मिक काव्यांचा शब्दार्थ खरा मानला जातो. आणि स्वतःच्या अज्ञानामुळें नाहीं तेथेंहि गूढतेचें व जादूचें आरोपण केलें जातें. या वृत्तीहून धर्मविघातक दुसरी अेकादी वृत्ति असेल कीं काय याविषयीं शंकाच आहे. उलटपक्षीं धर्मवेडानें चिडून गेलेले लोक अशा प्रसंगीं धर्मांत असलेलें काव्य पुसून टाकण्याचा निरर्थक आणि निष्फळ प्रयत्न करितात. खरा उपाय म्हणजे लोकांची बुद्धि तीव्र करून आणि लोकांमधील काव्यरसिकता जाणती करून काव्य वाढविलें पाहिजे. लोकांची काव्यशक्ति वाढविली म्हणजे त्यांना धर्म समजणें सोपें जातें आणि धार्मिक वहीम (भोळ्या समजुती Superstitions) सहज ओळखतां येतात.

पण हें सर्व करण्यास जाणत्या लोकांनीं खेडेगांवांतील लोकांच्या श्रमपूत व निसर्गमधुर अशा दैनिक जीवनामध्यें ओतप्रोत झालें पाहिजे. 'स्वामी गोसावी' होऊन चालावयाचें नाहीं.

कोणताहि समाज युगकल्पनेच्या दृष्टीनें मागें राहून कधींहि निभावयाचा नाहीं. आजचें युग केवळ मानवी समानतेचें नाहीं. स्त्री-पुरुषांची समानता, जातीजातींची समानता आज कबूल केलीच पाहिजे; अेवढेंच नव्हे, तर सर्व धर्मांना समान दर्जा मिळाला पाहिजे. सर्वच धर्मांविषयीं सारखा अनादर अथवा सारखी अनास्था, अथवा सारखेंच अज्ञान हा एक समानतेचा मार्ग मानला जातो, पण तो घातक आहे. आजच्या युगांत समाजांत रहाणाऱ्या प्रत्येक मनुष्यास जगांतील प्रमुख प्रमुख धर्मांची सामान्य माहिती असली पाहिजे. मात्र ही माहिती देतां घेतांना तार्किक, चिकित्सक अथवा केवळ अैतिहासिक दृष्टि असतां कामा नये. प्रेम, आदर, आणि सहानुभूति यांसहित डोळस जिज्ञासा-बुद्धीनें सर्व धर्मांचा परिचय झालेला असावा. खेडेगांवांतील धर्मज्ञान बरेंच मागासलेलें असतें; दृष्टि सकुंचित असते; आणि जीवनाचा आशय

फारसा उन्नत नसतो. अशा वेळीं विशेष प्रेमानें जगांतील निरनिराळ्या धर्मांतील सत्पुरुषांनीं आणि चारित्र्यपरायण संतांनीं चालविलेल्या प्रयत्नांची माहिती करून दिली पाहिजे. मात्र येथें उद्देश धर्मजागृति हा असावा. केवळ बहुश्रुतता हा नसावा.

आजच्या समाजांतील एक महान् दोष म्हणजे वर्ग–विग्रह हा होय. लोकांना ईर्ष्या, द्वेष, मत्सर करावयास एकादी ध्यानमूर्ति हवी असते. स्त्रियांनीं पुरुषांविरुद्ध तक्रार करावी, युवकांनीं वृद्धांविरुद्ध, गरीबांनीं संपन्नांविरुद्ध, हिंदू-मुसलमानांनीं परस्परांविरुद्ध, गोऱ्या लोकांनीं काळ्या व पिवळ्या लोकांविरुद्ध, सर्वत्र विग्रहाचेंच वातावरण आहे. थोड्याअधिक लोकांचें संघटन करून त्यांचा पुढाकार मिळवावयाचा असल्यास त्या सगळ्यांची द्वेषबुद्धि केंद्रित करून त्यांना एक ध्यानमूर्ति देऊन टाकावी आणि संशयाचें वातावरण उत्पन्न करावें.

हा रोग धर्मामध्यें फार लवकर शिरूं शकतो. या दिशेनें प्रयत्नहि जोरकस चालू आहेत. यांचा परिणाम परस्परहत्त्या व अंतीं आत्महत्त्या हाच होणार! आपण ज्या धर्मसंस्करणाचा विचार करीत आहोंत त्यामध्यें वरील रोगांपासून मुक्त रहाण्याची पुरी पुरी खबरदारी घेतली पाहिजे.

वाईट गोष्टी काढून टाकतांना एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं त्या जागीं चांगल्या सात्त्विक भरीव गोष्टी उभ्या केल्या पाहिजेत. केवळ शून्य पोकळी ही भयानक आहे.

व्यवहारकुशल लोक म्हणतील कीं हें सर्व विवेचन सुंदर आहे, उद्बोधक आहे, पण येथें योजना अशी मुळींच दिसत नाहीं.

राजसभेंत कायदे करतांना प्रथम कायद्याचा उद्देश मानला जातो व मग कायद्याचीं कलमें येतात. पण व्यवहारांत हातांत कायद्याचीं कलमें आल्याबरोबर हेतु आणि उद्देश गौण होऊन विसरून जातात. समाजाला कलमबंदी योजनेची संवय झाली आहे. पण त्यायोगें जीवन यांत्रिक होतें. भावनेची जागा योजनेनें कशी भरून निघणार? भावनेचें क्षेत्र शिक्षणानें खुलतें. योजना सरतेशेवटीं राज्यव्यवस्थेचें रूप धारण करते. येथें नमूद केलेलें परिवर्तन

कोणत्याहि सत्तेच्या जोरावर व्हावयाचें नसून तें शिक्षणद्वारा आणि प्रत्यक्ष उदाहरणद्वारा हृदयपरिवर्तन केल्यानें व्हावयाचें आहे. यासाठीं सार्वत्रिक योजना करून चालावयाचें नाहीं. भावना शुद्ध, सुरक्षित व जिवंत राहिली, तर ती आवश्यकतेनुसार स्वतःची योजना उत्पन्न करील आणि बदलत राहील.

# समाजरचना*

## वर्णव्यवस्था

आपण कुठेंहि गेलों तरी समाजामध्यें वेगवेगळे धंदे करणारे वेगवेगळे लोक आढळतात. आणि सामान्यपणें अेकादा मनुष्य अेकाद्या धंद्यांत चांगला यशस्वी झाला कीं त्याचे मुलगे देखील शक्यतोंवर बापाचाच धंदा करणें पसंत करतात. अेकाच धंद्यांतील लोकांनीं आपापसांत जास्त मिसळणें हें देखील तितकेंच स्वाभाविक आहे; कारण त्यांची राहणी समान असते. हिन्दु-धर्मानें या परिस्थितीस निश्चित स्वरूपांत मांडून तिचे नियम घडविले आहेत. या व्यवस्थेला वर्णव्यवस्था म्हणतात. वर्णव्यवस्थेचें आजचें स्वरूप म्हणजे आपल्या वेगवेगळ्या जाती. मनुष्य ज्या जातींत जन्मला असेल त्याच जातीच्या राहणी-प्रमाणें त्यानें रहावें, आपली जात बदलूं नये. अशा मूळ जाती किंवा वर्ण चार आहेत. धर्मशास्त्र व सर्व विद्या शिकणारा नि शिकविणारा आणि दानावर आपलें जीवन चालविणारा तो ब्राह्मण. क्षत्रियाचें काम प्रजेचें रक्षण आणि पालन करणें हें होय. वैश्यानें धन मिळवावें, व्यापार करावा, दान द्यावें आणि शूद्रांनीं सेवा करावी. पहिल्या तीन वर्णांना आपल्या धंद्यांसाठीं खास कौश-ल्याची आवश्यकता असल्यामुळें त्यांच्यासाठीं विद्याभ्यासाची व संस्कारांची जरुरी समजली गेली आहे. त्यांची मुंज करून गुरूनें त्यांना आवश्यक तेवढी

---

* या लेखांत चार वर्ण आणि चार आश्रम यांच्या व्यवस्थेविषयींचे परंपरागत विचार काय आहेत हेंच सांगितलें आहे. वर्णाश्रमांविषयीं किंवा जातीसंबंधीं माझे खास विचार काय आहेत हें अितर लेखांत पहावें.

—का. का.

सर्व विद्या शिकवावी. ब्राह्मणानें शक्यतोंवर दानावरच आपली उपजीविका चालवावी. जर तें जुळलें नाहीं तर अेकादा धंदा करावा. पण 'कुत्र्याप्रमाणें' त्यानें कधींहि कोणाचा आश्रित म्हणून राहूं नये असें जुन्या शास्त्रांत लिहिलें आहे. क्षत्रियानें प्रजेचें रक्षण करीत असतां स्वतःच्या प्राणांचीहि पर्वा करतां कामा नये. स्वतः नष्ट होऊन जावें, पण पाठ फिरवूं नये. वैश्यानें शहाण-पणानें संपत्तीचा उपयोग करावा, तींत भर टाकावी; ब्राह्मणानें आपल्या आचारापासून भ्रष्ट होणें–तपोभ्रष्ट होणें, क्षत्रियानें रणांगणांतून भिऊन पळ काढणें, आणि वैश्यानें दिवाळें काढणें या गोष्टी त्या त्या वर्णाच्या दृष्टीनें मरणापेक्षांहि जास्त वाअीट समजल्या गेल्या आहेत.

या चार वर्णांमधून आचारभेदामुळें, धंद्यानुसार, व भिन्न भिन्न देशांत राहिल्यामुळें अनेक जाती उत्पन्न झाल्या आहेत. आतां तर आपापसांतील यादवीमुळें देखील पोटजाती आणि पक्षउपपक्ष उत्पन्न होत आहेत. धर्मशास्त्रा-मध्यें अशा प्रकारच्या अनेक जातींना व पोटजातींना स्थान नाहीं.

जंगलें वाटेल तशीं उगवतात आणि नद्या वाटेल तशा वाहतात. पण मनुष्य जेव्हां अेकादी बाग किंवा उपवन तयार करतो अथवा कालवा बांधतो तेव्हां तो अमुक अेक योजना आणि व्यवस्था यांचें सौंदर्य आणि सोय प्राप्त करून घेतो. निसर्गाहून कांहींतरी विशेष करण्याचा माणसांत आग्रह असतो.

समाजांत राहणें हा मनुष्याचा स्वभाव आहे. वाळवी, मुंग्या, हरणें, लांडगे, टोळ, मधमाशा आणि पक्षी टोळ्या करून राहतात. मनुष्यदेखील समाजरचना करूनच राहात असतो. पण त्याच्यांत तऱ्हेतऱ्हेचे प्रयोग कर-ण्याची वृत्ति असते. यामुळें तो आपलें ज्ञान, आपली परिस्थिति आणि आपले आदर्श यांचा विचार करून समाजरचनेला निश्चित स्वरूप देतो. आर्य लोकांनीं जवळजवळ सुरवातीपासूनच आपली अेक खास समाजरचना बनवून ठेवली आहे. तिचें नांव वर्णव्यवस्था !

कर्माच्या व पुनर्जन्माच्या कल्पनेवर वर्णव्यवस्था उभारलेली आहे. मनुष्य जसें कर्म करतो आणि जशा वासना अंगीं बाणवितो, तसें फळ भोगण्यासाठीं आणि त्या वासना तृप्त करण्यासाठीं मनुष्याला अनुकूल परिस्थितींत जन्म

मिळतो—ही यांत मूलभूत कल्पना आहे. मनुष्याची परिस्थिति कारणाशिवाय म्हणजे यदृच्छेनें उत्पन्न होते असें नाहीं. नदीचा प्रवाह किंवा डोंगराची रचना ही जशी निसर्गाच्या नियमानेंच निश्चित होते तसा माणसाचा जन्म हा त्याची पूर्वकर्में आणि वासना यांच्या अनुसारच होतो. म्हणून तीच परिस्थिति आपल्याला योग्य आहे असें मान्य करून तेथून वर चढण्याचा आपला धर्म माणसानें स्वीकारावा. त्यानें वाटेल तसले अशास्त्रीय प्रयोग करूं नयेत; तर प्राप्त झालेल्या परिस्थितीचा श्रद्धा आणि समाधानपूर्वक उपयोग करीत करीत वर चढत जावें याचें नांव वर्णव्यवस्था !

दुसऱ्या प्रकारें पाहिल्यास मनुष्य ज्या परिस्थितींत जन्मतो त्या परिस्थितीच्या सुखसोयी आणि मर्यादा याच त्याला सगळ्यांत पहिलें शिक्षण देतात. परिस्थितीमुळेंच माणसाचा स्वभाव बनतो आणि अपरिहार्य परिस्थितीचा स्वीकार करूनच मनुष्य तिच्यावर ताबा मिळवूं शकतो. म्हणून माणसाला त्याच्या सामाजिक परिस्थित्यनुरूप शिक्षण मिळालें पाहिजे. परिस्थितीप्रमाणें त्याचे आदर्श बनले पाहिजेत. म्हणूनच वर्णव्यवस्थेमध्यें संस्कार नक्की केले गेले आहेत.

आतां सामाजिक दृष्टीनें तपासूं. वाटेल तो मनुष्य जर वाटेल तो धंदा करूं लागला, वाटेल तसली राहणी पसंत करूं लागला, समाजांत जर नेहमीं अव्यवस्थित स्पर्धा चालूं लागली, तर समाजाची उन्नति होणार नाहीं; समाजांत शांति राहणार नाहीं; नेहमींच कलहाची परिस्थिति आणि तिच्यामुळें उत्पन्न होणारी हीन संस्कृति नांदूं लागेल. या गोष्टी तेव्हांच थांबवितां येतील, जेव्हां माणसानें आधींपासूनच समाजाचा उद्देश आणि तो पार पाडण्याची समाजव्यवस्था नक्की केलेली असेल, प्रत्येकाचा धंदा त्याच्या परिस्थितीवरूनच नक्की झालेला असेल, कोटलीहि स्पर्धा ही द्रव्याच्या राशी कमाविण्यासाठीं नसून आपल्या कामांत पूर्णता प्राप्त करण्यासाठीं असेल, आणि सर्वांनाच शांततेनें व निश्चिततापूर्वक जगण्याची खात्री असेल. हें सर्व कांहीं वर्णव्यवस्था आपल्या पद्धतीनें करूं इच्छिते. माणसाच्या अमर्याद उन्नतीच्या आड वर्णव्यवस्था येत नाहीं. कारण कसल्याहि परिस्थितींत मनुष्य खरी उन्नति अवश्य साधूं शकतो; आणि परिस्थितीला विरोध करण्यापेक्षां तिच्यापासून फायदा घेऊन जर मनुष्य

प्रयत्न करील, तर त्याची उन्नति सोपी व भरीव होईल. यास अपवाद असण्याचा संभव आहे. पण अपवादांना तर नेहमीं जगाशीं लढूनच आपली उन्नति साधावी लागते. नुसते अपवादच ध्यानांत घेऊन समाजव्यवस्थेचे नियम घडवितां येणार नाहींत.

आर्य लोकांनीं समाजाच्या उन्नतीचीं प्रमुख अशीं चार अंगें नक्की केलीं आहेत. अेक म्हणजे आहारविहाराचीं साधनें उत्पन्न करणें, दुसरें काम समाजरक्षणाचें आणि तिसरें म्हणजे अैहिक व पारलौकिक ज्ञान मिळविण्याचें, सांभाळण्याचें व पसरविण्याचें काम. हे तीन उद्देश पार पाडण्यासाठींच मनुष्यामध्यें विशेष प्रकारचें शिक्षण, योजनाशक्ति आणि संयम हीं असलीं पाहिजेत. ज्यांच्यांत हीं नसतील त्यांनीं हीं तीन कामें करणाऱ्यांना मदत करावी. अशा मदतनिसांशिवाय समाजाचें काम एक क्षणभरहि चालणार नाहीं; आणि अशा मदतनिसांची संख्या देखील समाजामध्यें कित्येक पिढ्यांपर्यंत मोठीच रहावयाची. अशा प्रकारें वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण हे तिघे संस्कारी अथवा द्विज आणि बाकीचे सगळे सामान्य शूद्र असे चार भेद पडले. ब्राह्मणानें आपल्या उपजीविकेचा भार समाजावर टाकावा आणि मोफत शिकवावें. राजाचा अंकुश ब्राह्मणावर कमींत कमी रहावा. त्याचबरोबर ब्राह्मणानेंहि धनाचा संग्रह करूं नये, अत्यंत गरिबींत व साधेपणानें रहावें, चैन व विलास करूं नयेत; तर उलट कष्ट झेलण्यांतच आनंद मानावा. क्षत्रियानें स्वतःच्या जिवाची पर्वा न करतां समाजाचें रक्षण करावें; ज्यांत अधर्म नाहीं असे सगळे सुखोपभोग तो भोगूं शकतो; पण प्रजेकडून नियमापेक्षां जास्त कर घेऊं नये, स्वतः व्यापार करूं नये, ब्राह्मणांना चिंतामुक्त ठेवावें आणि जर कोणी आततायी बनून वर्णव्यवस्था मोडूं लागला, तर त्याला शिक्षा करावी. राजानें समाजाचें रक्षण करावें, पालन करावें, पण सामाजिक आदर्शांत फेरफार करण्याचा प्रयत्न त्यानें करूं नये. वैश्यांनीं शेती करावी, गुरें पाळावींत, पैशाची देवाणघेवाण करावी, व्यापार करावा, समाजाला हव्या असलेल्या वस्तूंचा पुरवठा करावा. वैश्य धनदौलत कमावीत असतो यामुळें तो धनाचा उपयोग स्वेच्छापूर्वक करूं शकतो. दान करण्याची सर्वांत मोठी जबाबदारी त्याच्यावर टाकण्यांत आलेली असते. शूद्राचें मुख्य कर्तव्य या तीन वर्णांना मदत करणें

हें आहे. तिन्ही वर्ण आपापल्या योग्यतेप्रमाणें जे हक्क उपभोगतात त्यांविषयीं त्याच्या मनांत अीर्ष्या किंवा हेवा नसला म्हणजे झालें. शूद्राला वाटेल तेथें राहण्याची खास मोकळीक असते. पण तो जेथें राहील तेथें त्यानें उद्यमी व नम्र जीवन व्यतीत केलें पाहिजे. ब्राह्मणाला त्याच्या विद्वत्तेप्रमाणें आणि तपाप्रमाणें मान मिळतो, क्षत्रियाची कीर्ति त्याचा पराक्रम आणि न्यायप्रियता यांवर अवलंबून असते, वैश्याची प्रतिष्ठा त्याचें धन आणि दानवृत्ति यांवरून नक्की होते आणि शूद्राची कदर त्याची सेवा आणि त्याचें वय यांवरून होते.

या धंद्याव्यतिरिक्त जे धंदे समाजांत चालू असतात पण ज्यांची समाजाला विशेष जरूर नसते, अशा धंद्यांना वर्णव्यवस्थेंत त्या मानानें कमी लेखलें गेलें आहे.

## आश्रमव्यवस्था

ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य या तिन्हीं वर्णांचें जीवन संस्कारी असलें पाहिजे, अेवढें नक्की झाल्यानंतर त्यांच्या सबंध आयुष्याची कांहीं ना कांहीं व्यवस्था ही केलीच पाहिजे. आपल्या शास्त्रकारांनीं मनुष्याच्या आयुष्याचे चार भाग पाडले आहेत. यांना चार आश्रम असें म्हणतात. शिकण्याची व जीवनासाठीं तयारी करण्याची अवस्था म्हणजे ब्रह्मचर्याश्रम; संसारांत राहून धर्माप्रमाणें आपला व्यवहार चालविण्याची अवस्था म्हणजे गृहस्थाश्रम; यांतून थकल्याभागल्यानंतर तें सर्व सोडून देऊन, सगळी प्रवृत्ति आवरून घेऊन किंवा आपल्या मुलांबाळांवर सोपवून धर्मचिंतनासाठीं रिकामें होणें म्हणजे वानप्रस्थाश्रम; आणि संसाराचा त्याग करून, भगवीं वस्त्रें धारण करून परमात्म्याचें ज्ञान मिळविण्यासाठीं—भगवत्प्राप्तीसाठीं—प्रयत्न करीत हिंडणें हा संन्यासाश्रम. जुन्या काळीं ब्रह्मचारी गुरूच्या घरीं राही, त्याची गुरें राखी, किंवा भिक्षा मागून आपलें पोट भरी आणि विद्याभ्यास पूर्ण करून गुरूला दक्षिणा देऊन, त्याचा आशीर्वाद घेअी व यात्रेस निघे. शिक्षणामध्यें जर कांहीं उणीव राहून गेली असेल, तर ती भरून काढण्याची संधि त्याला यात्रेंत मिळे. देशाविषयीं पुष्कळच गोष्टी माहीत होत आणि आपल्या धंद्यांत यश कसें मिळेल हेंहि पहावयास मिळे. त्यानंतर माणसानें लग्न करून घरदार

थाटावें आणि आपला धंदा चालवून समाजांतील आपलें स्थान स्वीकारावें. अशा गृहस्थाश्रमी माणसानें आपल्या स्वार्थाबाहेर समाजसेवेचा देखील विचार करावा. तो म्हातारा झाला, त्याच्या मुलाला मुलगा झाला कीं मग वानप्रस्थ होऊन त्यानें सर्व जंजाळ सोडून द्यावेत, जंगलांत किंवा अेकांतांत जाऊन रहावें, साधें जीवन घालवावें व धर्माच्या कामांत जास्त लक्ष घालावें. आणि जर त्याच्या मनांत संसाराविषयीं वैराग्य उत्पन्न झालें, सर्व जग ही माया आहे असा विचार उत्पन्न झाला, तर जातपात, जानवें, शेंडी आणि बायकापोरें या सर्वांचा त्याग करून भगवीं वस्त्रें धारण करावींत, आणि मरे-पर्यंत संन्यासधर्माचें पालन करावें, अशी धर्माची आज्ञा आहे. अर्थात् अशा प्रकारें प्रत्येक माणसानें या चारी अवस्थांतून पार पडलेंच पाहिजे असें नाहीं. ज्याक्षणीं माणसाच्या मनांत असा विचार उत्पन्न होईल कीं हें आयुष्य अीश्वरप्राप्तीसाठींच आहे, व संसार ही केवळ माया आहे, त्याच क्षणीं तो सर्व कांहीं सोडून देऊन संन्यास घेऊं शकतो. मग तो ब्रह्मचारी असो कीं गृहस्थ असो. सध्यां मुंजीव्यतिरिक्त ब्रह्मचर्याश्रमाचें दुसरें स्वरूप बाकी राहि-लेलें नाहीं. वानप्रस्थहि फारसे दिसत नाहींत. कांहींजण सन्यास घेतात खरे; पण खऱ्या संन्याशाप्रमाणें वागणारे थोडे असतात. गृहस्थाश्रमहि जसा चाला-वयास हवा तसा तो चालत आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. या चारी आश्रमांचा जर पुनरुद्धार होअील तर समाज उत्तम प्रकारें सुधरूं शकेल.

ज्याप्रमाणें समाजाचे वेगवेगळे विभाग पाडून वर्णव्यवस्था रचली गेली आहे, त्याप्रमाणें व्यक्तीचें जीवन संस्कारी व्हावें यासाठीं प्रत्येक व्यक्तीचें वय व त्या वयांतील कार्य यांच्यानुसार आश्रम किंवा अवस्था नक्की केल्या पाहि-जेत. वयाच्या सातव्या आठव्या वर्षापर्यंत मुलानें खेळत रहावें आणि नैसर्गिक रीत्या आपल्या शक्ती विकसित कराव्यात. त्यानंतर त्यानें व्यवस्थितपणें आपल्या आंतरिक शक्तींचा विकास केला पाहिजे. यासाठीं बारा वर्षें ठेवलीं गेलीं आहेत. या बारा वर्षांत मुलानें विद्याभ्यास करावा, धर्माचें ज्ञान मिळवावें, शरीर, मन व वृत्ती यांना उत्तम प्रकारें कमविण्यासाठीं तप आचरावें, विलासामुळें जीवन करपून जाऊं नये म्हणून ब्रह्मचर्याचें पालन करावें, साधें व कठिण जीवन पसंत करावें, चैनीपासून अलिप्त रहावें आणि वीर्यवान् बनावें. या

काळांत त्यानें घरांतील लाडाच्या, चिंतेच्या किंवा व्यवहारी वातावरणांत राहण्याऐवजीं गुरूच्या घरीं जाऊन रहावें. तेथें शेती करावी, गुरें राखावींत, सूत कांतावें, गुरूची सेवा करावी आणि ज्ञान मिळवावें. आजीविकेसाठीं समाजावर अवलंबून राहण्याचा पहिला हक्क ब्रह्मचाऱ्याचा. ब्रह्मचाऱ्यानें स्वतःसाठीं व गुरूसाठीं भिक्षा देखील मागावी. गुरूकडून मिळालेली विद्या तेजस्वी आहे हें सिद्ध करण्यासाठीं अध्ययन पुरें होतांच धन मिळवून गुरूला दक्षिणा द्यावी आणि मग गृहस्थाश्रमांत प्रवेश करावा.

गुरूकडे स्वाश्रयी, व्यावहारिक व तात्त्विक सुन्दर असें शिक्षण मिळत असूनहि तें पुरेसें समजलें जात नसे. अध्ययनानंतर पृथ्वीपर्यटन किंवा तीर्थयात्रा करणें हें शिक्षणाचें 'अेक आवश्यक अंग समजलें जाअी.' तीर्थयात्रेच्या द्वारें विद्यार्थ्याला देशाचें नि समाजाचें प्रत्यक्ष दर्शन घडे. अनेक साधुसंतांचा नि कर्मवीरांचा समागम होअी. स्वतःच्या विद्येंत जी कांहीं उणीव राहून गेलीं असेल ती पूर्ण करण्याची संधि मिळे; आपल्या पुरुषार्थास विकसित करण्याचें उत्तम क्षेत्र कोणतें आणि तें कोठें आहे हें तपासावयास मिळे. अनेक प्रकारचे चित्रविचित्र प्रसंग यात्रेमध्यें अनुभवास येत, यामुळें मनुष्य पैलूदार हिऱ्यासारखा बनून जाअी; व यात्रा पुरी झाल्यानंतर लग्न करून धंद्यांत पडे.

ब्रह्मचर्याश्रम हा साधनरूप आहे. गृहस्थाश्रमांत जीवनाचा मोठा भाग जातो. गृहस्थाश्रमांत नीतीप्रमाणें चालून धन मिळविणें, धर्माच्या आज्ञेनुसार जितकी मोकळीक असेल तितके उपभोग घेणें आणि शेवटीं सर्व प्रवृत्तींतून मुक्त होऊन अीश्वरचिंतनांत वेळ घालविण्याची तयारी करणें हें मुख्य कर्तव्य असते. यालाच चतुर्विध पुरुषार्थ असें म्हणतात. गृहस्थाश्रमांत मनुष्य आपलें स्वतःचें कल्याण साधून शिवाय आपल्या नातेवाअीकांना आश्रितांना आणि आसपासच्या पशुपक्ष्यांना सुखी ठेवण्यास बांधिलेला असतो. वाडवडिलांकडून जो वारसा मिळालेला असेल त्याचा सदुपयोग करून शक्य झाल्यास त्यांत भर घालून आपल्या कुलपरंपरेचें योग्य प्रकारें रक्षण करून तें सर्व आपल्या मुलांबाळांवर सोपवून देणें हा गृहस्थाचा मुख्य धर्म होय. गृहस्थाश्रमी मनुष्य अितर तिन्ही आश्रमांच्या लोकांना पोसण्यास बांधलेला असतो. आपली जीवनयात्रा चालविण्यासाठीं अनेक जीवांची हिंसा करावी लागते. गाय,

बैल, म्हैस, घोडा वगैरे प्राण्यांकडून सेवा करून घ्यावी लागते. त्याचा मोबदला म्हणून गृहस्थानें पशुपक्ष्यांना कांहीं अन्नदान करावें. तो समाजाकडून सर्व प्रकारचें ज्ञान आणि सुखसोयी उपभोगीत असतो. त्याचा मोबदला म्हणून विद्यार्थ्यांना, अध्यापकांना आणि धर्मोपदेशकांना त्यानें यथाशक्ति दान द्यावें, अतिथींचा सत्कार करावा, अपंगांचें पालन करावें—हें सर्व गृहस्थाश्रमी व्यक्तीला करावयाचें असतें. कुलपरंपरा टिकविण्यासाठीं पितरांचें स्मरण करणें आणि आपल्या मुलांनाहि अशा प्रकारें स्मरण व तर्पण करावयास शिकविणें हें देखील त्याचेंच काम. या धर्माला पंचमहायज्ञ असें म्हणतात. भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ, पितृयज्ञ, ऋषियज्ञ आणि देवयज्ञ.

आज मनुष्य गृहस्थाश्रमांतच मरणाची वाट पहात असतो; पण आर्य-जीवनांत ही गोष्ट लाजिरवाणी समजली जाअी. मनुष्याची शक्ति क्षीण झाली कीं तो बाह्यप्रवृत्ती आणि भोग सोडून देऊन समाजावर भाररूप न होतां जंगलांत किंवा अेकान्तांत जाऊन राहणें पसंत करी. ज्या धान्यांची किंवा अितर वस्तूंची समाजाला फारशी फिकीर नसे तें गोळा करून त्यावर तो जगे आणि अिंद्रियनिग्रह साधून धर्माचें ज्ञान व आचरण यांत पारंगत होअी. हा वानप्रस्थ आश्रम आजच्या पेन्शनरांच्या जीवनाप्रमाणें असे; मात्र त्यांत जीवनाचा कडकपणा आणि वृत्तींची स्वतंत्रता हीं विशेष असत.

माणसानें कितीहि प्रवृत्ति केली तरी शेवटीं तो त्या प्रवृत्तीला कंटाळावयाचाच. कांहीं लोकांना प्रथमपासूनच सर्वच्या सर्व प्रवृत्ति चुकीची आणि अीश्वरापासून दूर घेऊन जाणारी वाटते. या लोकांचा असा आग्रह असतो कीं सांसारिक प्रवृत्ति सोडून देऊन अेकदम अिंद्रियनिग्रह करून अीश्वर-प्राप्तीचाच मार्ग धरावा.

अशा प्रकारें संन्यासाश्रम उत्पन्न झाला आहे. यांत परिपक्व झालेल्या वानप्रस्थांचा आणि पहिल्यापासूनच गृहस्थजीवनास कंटाळलेल्या अितर लोकांचा समावेश होतो. संन्याशानें कांहींहि काम करूं नये असें नाहीं. अीश्वराकडे घेऊन जाणाऱ्या सर्व प्रवृत्ती आचारण्यांत त्याचा उत्साह विशेष असतो. ब्राह्मणांप्रमाणें संन्यासीहि समाजाचे स्वाभाविक गुरू आहेत. आद्य शंकराचार्यांनंतर हळुहळू ब्राह्मणांकडे पुजारीपण आणि संन्याशांकडे गुरूपण गेलेलें

दिसते. ही चतुर्विध आश्रमांची व्यवस्था पहिल्यापासून तिन्ही वर्णांसाठीं होती. चौथा वर्णहि जर आश्रमव्यवस्था स्वीकारील तर हिन्दुधर्माचा स्वभाव त्याला विरोध करणार नाहीं.

# वर्णधर्म

## ( आजच्या दृष्टीनें )

हिन्दुधर्मानें चार वर्णांची व्यवस्था नक्की करून प्रत्येक वर्णाचा व्यवसाय किंवा धंदा ठरवून दिला. आज तो तो वर्ण तोच धंदा करीत आहे किंवा नाहीं हा प्रश्न बाजूस ठेवूं. प्रत्येक वर्ण जर आपल्याच धंद्याला चिकटून राहूं अिच्छील तर तें शक्य आहे किंवा कसें हा सवालहि दूर ठेवूं. तें शक्य आहे असें मानलें, तरी तसें करणें अिष्ट आहे किंवा नाहीं हा प्रश्न राहूनच जातो. त्याचाहि विचार सध्यां करावयाचा नाहीं. समाजाचें धारण, पोषण आणि विकास यांसाठीं आजच्या परिस्थितींत हे चार धंदे पुरेसे आहेत कीं नाहीं हा प्रश्न उपस्थित केल्यास त्याचें उत्तर देणें कठिण जाअील. आज जे असंख्य धंदे समाजांत प्रचलित आहेत त्या सर्वांना चार वर्णांच्या चार विभागांत वांटून देणें आणि मग त्या त्या धंद्यांतील माणसाचें आचरण त्याच्या वर्णा-प्रमाणें रहावें अशी अपेक्षा करणें, हें देखील कुठवर शक्य होअील ही अेक समस्याच आहे.

आपल्या स्मृतींमध्यें चार वर्णांच्या मुख्य व्यवसायाव्यतिरिक्त दुसरे अनेक धंदे सांगितले आहेत. ते धंदे संकर जातींचे आहेत असेंहि तेथें नमूद कर-ण्यांत आलें आहे. कमींतकमी साठपासष्ठ जातींचा उल्लेख स्मृतींत येतो. मग काय या सर्व धंद्यांसाठीं संकर जाती नेहमीं टिकून रहाव्यात अशी अपेक्षा बाळगावयाची ? आणि संकर हें तर नरकाचें कारण आहे; म्हणून जर संकर जाती नाहींशा केल्या ( आणि त्यांना चार वर्णांत मिसळून घेतलें ) तर मग त्यांचे धंदे कोणी करावयाचे ? शुद्ध वर्णांनीं तर ते करावयाचेच नाहींत. शिवाय ते धंदे महत्त्वाचे नाहींत असेंहि म्हणतां येणार नाहीं; मग काय हे धंदे परधर्मीयांवर सोंपवून द्यावयाचे ? जर असें झालें तर मग हिन्दुधर्म स्वयंपूर्ण आहे असें म्हणतां येअील काय ?

या सर्व प्रश्नांचें 'शास्त्रीय' उत्तर सहज देतां येअील. पण व्यवहार्य, आचरणांत येऊं शकेल, असें कांहीं सुचवितां येअीलसें दिसत नाहीं.

प्रत्येक माणसानें आपल्या वर्णाचेंच काम करावें, दुसऱ्या वर्णाचें काम करण्याच्या भानगडींत पडूं नये, अशी सनातन धर्माची मर्यादा आहे असें समजण्यांत येतें.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥

या वचनाचा असा अर्थ करण्यांत येतो कीं 'माणसानें परंपरेनें चालत आलेला, वाडवडिलांनीं चालविलेला स्ववर्णोचित व्यवसायच करावा. दुसऱ्या वर्णाचा व्यवसाय केल्यानें समाजाचा द्रोह होतो; समाजाचें नुकसान होतें आणि व्यक्ति पापांत पडते.' सगळे सनातनी लोक या सिद्धान्ताची तत्त्वतः बाजू घेत असतात. त्याचें पालन मात्र उच्च समजल्या जाणाऱ्या जाती मुळींच करीत नाहींत. ज्यांची सामाजिक प्रतिष्ठा उच्च प्रतीची नाहीं, ज्यांच्यामध्यें नवे संस्कार ग्रहण करून श्रीमंत होण्याची किंवा जितकें उंच चढतां येअील तितकें चढण्याची अभिलाषा किंवा योग्यता अजून स्फुरलेली नाहीं, असे लोक मात्र या नियमाचें कांहीं अंशीं पालन करतात !

'स्वधर्म' या शब्दाचा अितका संकुचित आणि विचित्र अर्थ केल्यामुळें परिणाम किती भयंकर झाला आहे हें पाहण्यासारखें आहे. विद्या शिकणें, शिकविणें आणि ती अंगीं बाणविणें हें ब्राह्मणाचेंच काम आहे, असें गृहीत धरून आपल्या देशांत अिंग्रजी विद्या येअीपर्यंत आपल्या स्वतःच्या विद्येच्या बाबतींत समाजाचा मोठा भाग बेदरकारच राहिला. यामुळें सबंध हिन्दुसमाज विद्येच्या बाबतींत मागासलेला आणि संस्कारांच्या बाबतींत जवळजवळ सुप्त असाच राहिला. परंपरेचे संस्कार कितीहि कायम राखले गेले असले, तरी त्यां मागील विचारजागृति कमी होत गेली. साधुसंतांनीं ब्राह्मणांची आणि त्यांच्या कर्मकांडांची अविरोधी उपेक्षा केली आणि लोकांमध्यें धर्मज्ञान–मोक्षधर्म जागृत ठेवला यामुळें मात्र समाज कांहींसा वांचला.

प्रजेच्या रक्षणाचें काम फक्त क्षत्रियांचें आहे असें समजून बाकीच्या तीन वर्णांनीं आपल्या स्वतःच्या हातांनीं हत्यारबंदीचा कायदा–अिंग्रज सरकारनें

लागू करण्यापूर्वीच—आपल्यावर लादून घेतला. आपल्यावर कोणाचें राज्य चालत आहे याविषयीं प्रजा अगदींच बेदरकार होती; आणि राज्यकारभार हा तर जणुं काय कांहीं विशिष्ट लटपट्या व खटपट्या कुटुंबांचा वारसा हक्कच होता. प्रजेच्या नशिबीं फक्त अेवढेंच होतें : चोरांना व पोलिसांना घाबरावयाचें, परराज्यांच्या हल्ल्यांस व स्वदेशी अंमलदारांना भ्यावयाचें आणि कसेंहि करून स्वतःला वांचवावयाचें! हीच स्थिति जगांत सर्वत्र नांदत आलेली असली तरी आपल्या येथें मात्र तिनें विशेष रूप धारण केलें होतें.

शूद्र म्हणजे तर काय दोन पायांचे मनुष्यदेहधारी पशूच! ते तप करूं शकत नाहींत; करूं लागले तर ब्राह्मणांचीं मुलें अकालीं मरून जातात! ते शस्त्रग्रहण करूं शकत नाहींत. त्यांची कोणी मुंज करणार नाहीं. आणि ज्याची मुंज झालेली नाहीं त्याला धनुर्वेद कोण शिकविणार? स्वतःच्या हिंमतीवर शिकायला जावें तर आपला अंगठा कापून द्यावा लागे! शूद्रांनीं व्यापार-धंदाहि करावयाचा नाहीं. शूद्र श्रीमंत झाले तर समाजावर ती एक मोठी आपत्तीच समजली जावयाची. आणि अतिशूद्रांनीं तर मातीच्या भांड्यांतच जेवावयाचें. त्यांचें दर्शन देखील अमंगळ! ते शहराच्या किंवा गांवच्या वेशी-बाहेरच राहूं शकतात. या सर्व गोष्टींमुळें अतिशूद्रांचा अेक फायदा मात्र अवश्य झाला. त्या जाती मागासलेल्या राहिल्या खऱ्या, पण त्यांचें सत्त्व टिकून राहिलें. प्राप्त परिस्थितींत स्वतःचें रक्षण कसें करावयाचें हें त्या शिकल्या. व्यावहारिक चातुर्यहि त्या जातींत आज जास्त दिसून येतें. त्यांच्यांतील संस्कार आणि उन्नति यांची अभिलाषा मरून गेली नसती, तर आज देशांत याच जाती अग्रेसर झाल्या असत्या. पण शास्त्रांनीं असें ठरवून टाकलें कीं, शूद्रांनीं असूया म्हणजे कोणत्याहि प्रकारची महत्त्वाकांक्षा न बाळगतां तीन वर्णांचे काबाडकष्ट (परिचर्या) करूनच जगलें पाहिजे.

धर्मशास्त्राचा अभ्यास तर 'विदुषा ब्राह्मणेन' च करावयाचा; 'न अन्येन केनचित्!' अज्ञान व असंस्कारिता टिकविण्यासाटीं अितकी शास्त्र-शुद्ध व्यवस्था दुसऱ्या अेकाद्या समाजानें क्वचितच केली असेल! सक्तीचें व सार्वत्रिक अज्ञान आणि अेकांगीपणा हे दुर्गुण आपण उत्तम प्रकारें साधले आहेत असें म्हणतां येअील. याचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला.

वैश्याचा धर्म कांहींसा सोपा म्हणतां येअील. पण ब्राह्मणांप्रमाणें तेहि स्वसंरक्षणाच्या कामीं असमर्थ झाल्यावर त्यांचा पुरुषार्थ कितीसा टिकणार? अहिंसाधर्मास शेतींत दोष दिसला. शास्त्रकारांनीं व्यापारांत सत्य आणि असत्य यांचें मिश्रण होऊं शकेल अशी मोकळीक दिली. हुन्नर आणि कारागिरी यांत ज्यांची स्वाभाविक बुद्धि चालत होती अशा जाती अस्पृश्य गणल्या गेल्या आणि अशा प्रकारें वैश्य–पुरुषार्थहि सशास्त्र मारला गेला. समाजांत सर्वतोमुखीं नालायकी पसरविण्याची याहून जास्त सुंदर पद्धति शोधूनहि सांपडावयाची नाहीं!

आणि स्त्रिया? तो तर अर्धाअधिक मानवसमाज समजला जातो ना? त्याला ताब्यांत ठेवलेंच पाहिजे. न स्त्री स्वातंत्र्यमर्हति! आणि स्वातंत्र्य द्यावयाचें नसेल, तर ज्ञान आणि संस्कार कसे द्यावयाचे? स्त्रियांवर नम्रता, आज्ञाधारकपणा आणि अेकनिष्ठा यांचे कल्पनेस शक्य होते तेवढे सगळे आदर्श लादले गेले. पण त्या आदर्शांची पूर्ति करण्यासाठीं ज्या तेजस्वितेची आवश्यकता असते तिच्यापासून मात्र त्यांना वंचित ठेवण्यांत आलें. विधवांचें काय करावें हें न समजणाऱ्या समाजानें मंत्रघोषणा आणि वाद्यें यांच्या कडकडाटांत समाजाच्या हृदयावर सतीचा आदर्श ठसविला. रेड्यांचा कांहीं उपयोग करतां येत नाहीं असें पाहून त्याला देवीस बळी देण्याची युक्ति ज्या समाजानें शोधून काढली, त्याच समाजानें सतीची प्रथा चालू केली. भारतवर्षांत पातिव्रत्याच्या भावनेनें ज्या साध्वी स्त्रिया सती गेल्या असतील, त्यांना कोटि कोटि प्रणाम असोत. त्यांनीं आर्यजातीचें मुख उज्ज्वल केलें आहे. पण ज्या लोकांनीं सहगमनाचा आदर्श समाजासमोर ठेवला त्यांच्यापुढें मस्तक नमविण्यास मात्र मन धजत नाहीं.

आपल्या समाजांत सर्व कांहीं वाअीटच होतें असें सिद्ध करण्याचा आमचा आशय नाहीं. आर्यांची विचारशीलता, धार्मिक शोध, तत्त्वनिष्ठा आणि चतुर्विध पुरुषार्थ हे जगांतील कुठल्याहि जातीहून कमी दर्जाचे नाहींत असें आपण निःशंकपणें म्हणूं शकतों. पण त्याबरोबर ही दुःखाची गोष्टहि सांगावी लागत आहे कीं सिद्धान्त आचरणांत आणतांना आपण तितकाच पढतमूर्खपणाहि केला आहे. शास्त्रवचनांविषयींची आपली श्रद्धा येथपर्यंत गेली कीं

त्यांचा अर्थ करण्यासाठीं सामान्य अक्कल वापरण्याचीहि हिम्मत आम्हांला झाली नाहीं. स्मृतिग्रंथांच्या टीकाकारांनीं कित्येक ठिकाणीं शंका उपस्थित करून त्यांचें जें निरसन केलें आहे, तें वाचल्यावर अशी शंका उत्पन्न होते कीं, समाजामध्यें सामान्य अक्कल असत नाहीं असें समजूनच ते चालत असले पाहिजेत.

* * *

समाज म्हणजे परस्परावलंबन, व्यवस्था आणि कार्यविभाग—अेवढें सर्वांना माहीत असतें. पण याचा अर्थ असा मुळींच नव्हे कीं, जरी गाडें अडून राहिलें तरी अेकाचें काम दुसऱ्याकडून होतां कामा नये. अेकदां अेका पोलिसा-नें अेका चोराचा पाठलाग करण्यास सुरवात केली. चोर पळतां पळतां कलेक्टराच्या कांपाऊंडांत शिरला. कांपाऊंडाच्या फाटकावर असा सरकारी हुकूम लिहिलेला होता कीं, ‘ परवानगीशिवाय आंत येण्याची सक्त मनाअी आहे. ’ चोर कायद्याला कसचा जुमानणार ! तो परवानगीशिवाय आंत घुसला. पण कायद्याचा आधारस्तंभ, कायदा पाळणारा आणि कायदा पाळविणारा असा जो पोलिस, त्याच्यानें कायद्याचा भंग कसा होणार ? तो आपला आंतून कोणी तरी बाहेर येअील व मग आपण साहेबाची परवानगी घेऊन आंत जाऊं असा संकल्प करून फाटकाशींच उभा राहिला ! धर्मपालनाच्या बाबतींत आपल्या लोकांनीं पुष्कळ वेळां अशा प्रकारची पोलिसी निष्ठा दाखविली आहे.

प्रत्येक वर्णाच्या धर्माचे दोन विभाग असतात. अेक त्याचा खास धर्म आणि दुसरा सर्वांना लागू पडेल असा सामान्य धर्म. ब्राह्मणांसाठीं षट्कर्में सांगितलीं आहेत. अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान आणि प्रतिग्रह. आजच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे विद्या मिळविणें व विद्या देणें; समाजहिताचीं कामें करणें व दुसऱ्यांकडून करविणें आणि समाजहितकारक वर्गाचें पोषण करणें अथवा समाजसेवेची दीक्षा घेऊन समाजाकडून पोषण मिळविणें हीं तीं कर्में होत. स्मृतींतच लिहिलें आहे कीं यांतील तीन कार्यें—अध्ययन, यजन आणि दान—सर्व संस्कारी लोकांसाठीं आहेत. अध्यापन, याजन आणि प्रतिग्रह हीं कामें जितक्या अंशीं आजीविकेचें साधन म्हणून असतील, तितक्या अंशीं तीं

ब्राह्मणांनींच करावींत. त्यांच्याशीं चढाओढ करण्यासाठीं अितर कोणीहि तीं करूं नयेत.

पण लोक असें समजून बसले कीं हीं सहाहीं कर्मे करावयाचीं असतील, तर तीं ब्राह्मणानें खुशाल करावींत; आपलें तें काम नव्हे. हां, दान करण्याचा अधिकार सर्वांना होता खरा. कोणालाहि संस्कारपतित ठरवून त्याच्याकडून त्याचा दान करण्याचा हक्क हिरावून घेण्यांत आलेला नव्हता. उलट, कलियुगांत दानाचें महत्त्व जास्तच सांगितलें आहे !

अशाच प्रकारें जर प्रत्येकाच्या शिरावर धार्मिक नि व्यावहारिक विद्या शिकण्याची जरूरी व जबाबदारी कृपाळूपणानें राहूं दिली असती तर किती चांगलं झालें असतें ! पण बिचाऱ्या समाजव्यवस्थापकांनीं काय करावें ? लोक जर संस्कारहीन होअून विद्या शिकतील तर ते विद्येचा दुरुपयोग करतील; त्यापेक्षां जर ते विद्याच शिकले नाहींत, तर काय वाअीट ? विद्या आपली 'अबधि' आहे. समाज न कां वांचेना, पण विद्येला वांचविलेंच पाहिजे, असा विचार त्यांनीं केला असावा ! पण त्यांच्या या व्यवस्थेमुळें विद्या कितीशी वांचली हें आपल्याला माहीत आहे. विद्येनें आम्हांला वांचवावयाचें, कीं आम्हीं विद्येला वांचवावयाचें ? विद्येचा अनर्थ होअूं देतां कामा नये हें खरें; पण म्हणून विद्येलाच गुदमरून टाकावयाचें काय ? असंस्कारी लोक जर गूढ शास्त्रांचा अर्थ समजत नसतील, उलटाच अर्थ करीत असतील, तर शास्त्रें सोप्या व सरळ भाषेंत लिहा. शास्त्रांना पिनलकोडाचीं कलमें न समजतां शास्त्रवचनांमागील सामाजिक व धार्मिक तत्त्वज्ञान लोकांना समजावून द्या. जर आपण समाजाविषयीं नास्तिक बनूं, तर धर्माच्या बाबतींतील आस्तिकता फारशी उपयोगी पडणार नाहीं.

प्रजेचें रक्षण करणें हा क्षत्रियाचा धर्म आहे खरा, पण म्हणून प्रत्येक माणसास स्वतःचा बचाव देखील करतां येअूं नये काय ? दुसऱ्याचें संकट पाहून तें दूर करण्यासाठीं स्वतःचें बलिदान देण्यास तत्पर राहणें हा मनुष्यमात्राचा धर्म असला पाहिजे. जर अेकाद्या अबलेवर बलात्कार होत असेल तर अशा वेळीं ब्राह्मणांनीं व वैश्यांनीं 'अरे क्षत्रिया धांव रे !' अशी किंकाळी फोडून स्वस्थ बसावें काय ? समजा, अेकाद्या गांवावर किंवा सगळ्या देशावर

परदेशी लोकांनीं चढाअी केली आहे. अशा वेळीं देशाला वांचविण्याचें कर्तव्य हें क्षत्रियाचें आहे. पण म्हणून आपलें, आपल्या नातलगांचें, किंवा आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचें संरक्षण करण्यासाठीं आपली सगळी शक्ति वापरण्यास प्रत्येक मनुष्य बांधला गेलेला नाहीं काय ? वर्णव्यवस्थेनें क्षत्रियाकडे क्षात्रधर्म सोंपविला याचा अर्थ अितरांच्या वांट्यास 'अबला धर्म' आला, असा तर होत नाहीं ना ? मनुष्यमात्रानें प्रसंग पडल्यास स्ववीर्यानेंच आपलें गोपन म्हणजे रक्षण केलें पाहिजे. 'स्ववीर्यगोप्ता हि मनोः प्रसूतिः' हें वचन फक्त सूर्यवंशीय राजांपुरतेंच होतें असें मानण्याची कांहीं जरुर नाहीं. 'युद्धे चाप्यपलायनम्' हें वचन ज्या अर्थानें क्षत्रियांना लागू पडतें, त्याच अर्थानें तें अितरांनाहि लागू करावयाचें नाहीं काय ?

आपण निदान अेवढा तरीं धर्म समजावून घेतला पाहिजे कीं, अेकूण समाजाचा विचार करून ज्या ज्या वर्णाकडे सोंपविलेलें काम त्या त्या वर्णानें खुशाल करावें. पण स्वतःपुरतें प्रत्येक काम करण्यास कोणाहि व्यक्तीला हरकत वाटतां कामा नये. तसें करणारा परधर्मांत जात आहे असें मुळींच मानलें जाऊं नये. मनुष्यानें जर आपल्या घरांतील संडास साफ केला व मग आंघोळ केली तर त्याला प्रायश्चित्त घेण्याची जरूर असूं नये. ब्राह्मणानें जर आपल्या हातानें स्वतःची हजामत—दाढी—केली किंवा स्वतःचे कपडे किंवा जोडे स्वतःच शिवले तर काय तो ब्राह्मण्यापासून पतित झाला म्हणावयाचा ? जर त्यानें स्वतःचे कपडे स्वतः धुतले तर तो रजक झाला असें समजावयाचें काय ? त्यामुळें त्याचें ब्राह्मण्य नाहीसें होअील काय ? प्रत्येक माणसानें शेतीचें काम शिकलें पाहिजे, त्याला कांतता—विणतां आलें पाहिजे, स्वयंपाक करतां आला पाहिजे, गाअीची धार काढतां आली पाहिजे; स्वतःच्या घरांत व घराच्या आसपास स्वच्छता राखतां आली पाहिजे; प्रसंग पडल्यास आपला आणि आपल्या आसपासच्या लोकांचा बचाव करतां आला पाहिजे, त्याला धर्मरहस्याचें ज्ञान असलें पाहिजे; समाजव्यवस्था आणि कायदा यांची माहिती असली पाहिजे. या सर्व गोष्टी असणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे; तें त्याचें कर्तव्य आहे. मनुष्य हा मनुष्यत्व सोडून चातुर्वर्ण्य चालवूं शकणार नाहीं.

सगळ्या धंद्यांत अमुक धंदे ब्राह्मणवृत्तीस अनुकूल आहेत, अमुक धंदे

क्षत्रिय लोकच उत्तम प्रकारें करूं शकतात ही गोष्ट आपण मान्य केलीच पाहिजे. आणि त्याप्रमाणें धंद्यांचें चातुर्वर्ण्य स्थूलपणें नक्की झाल्यास कांहीं हरकत नाहीं. पण आजच्या काळांत जेव्हां सर्व वर्ण सर्वच धंदे करूं लागले आहेत—व ते ते सोडतील हें शक्य दिसत नाहीं, तसें आपण अिच्छीतहि नाहीं—अशा वेळीं चातुर्वर्ण्याच्या धंद्यांचा अर्थ कांहींसा वेगळ्या प्रकारें लाविला पाहिजे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार प्रमुख सामाजिक वृत्ती आहेत. ब्राह्मण जो धंदा हातीं घेअील तो त्यानें ब्राह्मणवृत्तीनें करावा. उदाहरणार्थ, ब्राह्मण जर शिंप्याचा धंदा करूं लागला तर त्यानें त्या धंद्यांत नवीन नवीन संशोधन करून त्याचें शास्त्र रचलें पाहिजे. आणि प्राचीन आचार्यांप्रमाणें तें अितरांना शिकविलें पाहिजे. त्या धंद्यांतून त्यानें आजीविकेव्यतिरिक्त जास्त नफा मिळविण्याची अिच्छा ठेवतां कामा नये. कपड्यांच्या बाबतींत समाजांतील फॅशनचें त्यानें मार्गदर्शन करावें. ज्यांच्यायोगें समाजाची नीति बिघडेल अशा फॅशनचे कपडे त्यानें तयार करूं नयेत. शक्य असेल तेव्हां गरिबांना कपडे फुकट शिवून द्यावेत आणि शिवणकला—विद्यालयें उघडावींत. जर क्षत्रियानें शिवणकाम हातीं घेतलें तर त्यानें शिंपीवर्गास संघटित केलें पाहिजे. जेथें अयोग्य स्पर्धा चालत असेल किंवा अन्याय होत असेल, तेथें संप घडवून आणण्यांत किंवा संघटन करण्यांत त्यानें पुढाकार घेतला पाहिजे. जर वैश्य शिंपीकाम करूं लागले तर त्यांनीं लोकांना कपडे वेळेवर कसे मिळतील, त्यांत कापडाची बचत कशी होअील, शिलाअी कमी कशी करतां येअील आणि तरीदेखील आपल्या धंद्याची आवक व्यवस्थित कशी राहील या सर्व गोष्टी पाहिल्या पाहिजेत. ज्यांची बुद्धि विशेष चालत नाहीं, असे शूद्र जर या धंद्यांत गेले तर त्यांनीं मन लावून जास्तींत जास्त वेळ देऊन दिलेलें काम केलें पाहिजे. आणि योग्य मजुरी घेऊन संतोष मानला पाहिजे. शिवणकाम कितीहि उपयोगी असलें तरी शेती किंवा विणकाम यांच्याअितका प्रमुख धंदा तो खास नाहीं. प्रमुख धंद्यांत चारी वर्ण वरील चार प्रकारच्या वृत्तींच्या योगें हातीं घेतलेल्या कोणत्याहि कामाचा विकास करूं शकतात.

वेदाच्या अेका सूक्तांत अेकाच कुटुंबांतील व्यक्ती वेगवेगळे व पुष्कळ अंतर असलेले धंदे करीत असल्याचा उल्लेख येतो. तेव्हां चातुर्वर्ण्यासंबंधीं

वरीलप्रमाणें कल्पना करण्यांत आपण परंपरेचा उच्छेद करीत आहोंत असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. आणि परंपरेंत फेरफार करण्याचा व तिचा विकास करण्याचा आपल्याला अधिकार नाहीं असें थोडेंच आहे ? सनातन धर्म पहिल्यापासूनच वेळोवेळीं फेरफार करीत आला आहे. म्हणूनच तो टिकला आहे व ताजा राहिला आहे. दुसऱ्या धर्मांतहि आपण हेंच पहात नाहीं काय, कीं जे लोक शास्त्रांच्या अक्षरार्थाला जडतेनें चिकटून राहिले आहेत ते प्रगतीपासून वंचित होऊन दिवसेंदिवस दुर्बल होत चालले आहेत ?

## क्षात्रधर्म

'ज्याला दुसऱ्यावर प्रहार करतां येत असेल, किंवा युद्धामध्यें उत्साहपूर्वक चढाअी करतां येत असेल, तो क्षत्रिय' असें शास्त्रांत कोठेंहि लिहिलेलें नाहीं. 'युद्धे चाप्यपलायनम्' अथवा 'क्षतात्किल त्रायते' हें क्षत्रियाचें लक्षण होय.

'मी कोणाला मारीत नाहीं, मी अहिंसक आहें' असें म्हणणाऱ्या प्रत्येक माणसाच्या शब्दांची किंमत सारखीच असत नाहीं. त्यांचा प्रभाव देखील सारखाच पडत नाहीं. ज्या माणसाला मरतांहि येतें आणि मारतांहि येतें असा वीर पुरुष जेव्हां सत्याग्रही होऊन विरोध करण्यास उभा राहतो, तेव्हां त्याचा परिणाम विरुद्ध पक्षाच्या व्यक्तीवर काय होतो, किती होतो, याचा विचारच लोक करीत नाहींत. ज्याच्या ज्याच्या हृदयांत आत्मा आहे, त्याच्या त्याच्यावर अहिंसक प्रेमधर्मी वीराच्या विरोधानें अद्‌भुत आणि अचूक परिणाम होतो. अनुभवाशिवाय ही गोष्ट गळीं उतरावयाची नाहीं. अशा प्रकारची उदाहरणें कमी आहेत, म्हणूनच सत्याग्रहाविषयीं लोकांना अितकी नास्तिकता आहे.

क्षात्रधर्माचें द्योतक म्हणून नेहमीं ढालतरवार चित्रित केली जाते हें मला आवडत नाहीं. ढालतरवार ही अेकाद्या डाकूजवळहि असूं शकते आणि अेकाद्या भ्याडाजवळहि असूं शकते. जेव्हां क्षत्रियाजवळ ढालतरवार नसते, तेव्हां त्याचें क्षत्रियत्व कमी होतें काय ? क्षत्रियांना जर मुद्रा किंवा खास चिह्न

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकीय
अनुक्रम ७३३९८ वि: निबंध
क्रमांक १९५५ नों. दि: २५-२-७९


पसंत करावयाचेंच असेल, तर ख्रिस्ती लोकांनीं चालविलेलें अेक चिह्न निवडण्यासारखें आहे. बदामाच्या आकाराचें हृदय आणि त्यांत खुपसलेला खंजीर! स्वतःच्या छातींत खंजीर धारण करूनच क्षत्रिय जन्म घेतो. उदारता आणि निर्भयता हे क्षत्रिय-हृदयाचे मुख्य गुण होत. संपूर्ण अिमानदारी आणि ज्या वस्तूचा अेकदां स्वीकार केला असेल, जिला आश्रय दिला असेल, तिला कधींहि दगा न देणें, तिच्यासाठीं नेहमीं मरावयास तयार होणें,—ही मृत्यु-तत्परता—हाच क्षात्रधर्माचा सुवास होय. हृदयांतील खंजीरच तो व्यक्त करूं शकतो.

# सातवर्ण्य

वर्ण म्हणजे रंग. जुन्या काळीं पांढरा, तांबडा, पिवळा आणि काळा असे चार वर्णांचे चार रंग कल्पिले होते. गायनविद्येंत रागरागिणींचीं रूपें, रंग आणि नातींगोतीं ज्याप्रमाणें कृत्रिम कल्पनेनें बसविलीं गेलीं, त्याचप्रमाणें ब्राह्मणादि वर्णांचे चार रंग कल्पिले गेले. स्वतःच्या गोऱ्या कातडीचा अभिमान बाळगणाऱ्या पाश्चात्य संशोधकांना भारतवर्षीय आर्यलोकांमध्यें देखील वर्णाभिमान होता, असें म्हणण्याला, यामुळें चांगलीच सोय झाली आहे. तीन वर्ण एकाच आर्य जातीचे होते आणि शूद्र मात्र आर्येतर अेतद्देशीय मूळ रहिवासी होते, असेंहि म्हणतात. तें कसेंहि असो; जर सूर्यप्रकाशाचे रंग अथवा वर्ण सात आहेत, तर आर्यकल्पनेप्रमाणें संपूर्ण समाजव्यवस्थेंत देखील सात वर्ण कां असूं नयेत, अशी एक कल्पना प्रथम मनांत आली. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत सर्वच प्रकारचीं कामें एकाच व्यक्तीनें करणें साहजिक आहे. समाज जसजसा विकसित होतो तसतसे कार्यभेद—कर्तव्यभेद—स्थिर होऊन वर्ग अथवा वर्ण नक्की होतात. या दृष्टीनें पाहतां श्रुति—स्मृति—पुराणकाळीं आर्यसमाजशास्त्रानें प्रथम तीन व नंतर चार वर्णांची कल्पना केली, हें यथायोग्य झालें. पण आतां समाज अधिक जटिल झालेला आहे, जीवनक्षेत्राचा विस्तार वाढला आहे, तेव्हां त्यांत तीन वर्णांची भर टाकून अिंद्रधनुष्याच्या सात रंगांप्रमाणें वर्णव्यवस्था संपूर्ण आणि सुंदर कां करूं नये अशी मूळ कल्पना.

प्राचीन ग्रंथांत लिहिलें आहे कीं, प्रथम अेकच वर्ण होता. पुढें त्याचे तीन व चार वर्ण झाले. पण हें विधान विकासवादाच्या दृष्टीनें केलेलें नसून युगऱ्हासाच्या दृष्टीनें केलेलें असावें असें वाटतें. प्रथम अेकच देव होता, अेकच वेद होता आणि वर्णहि अेकच होता असें तें विधान आहे ( म. भा. ). अेक वर्ण अर्थात् ब्राह्मणवर्ण. धर्म ज्यावेळीं समाजांत संपूर्णपणें जागृत असतो, आणि सर्वच लोक अत्यंत पवित्र, सत्यनिष्ठ आणि दीर्घायू असतात, त्यावेळीं अेक वर्ण असणेंच स्वाभाविक आहे, अशा कल्पनेनें तें विधान केलेलें असलें पाहिजे. सर्वच लोक सुशिक्षित, संस्कारसंपन्न, स्वावलंबी, संतोषी, सत्याग्रही आणि मोक्षपरायण झाल्यानंतर समाजांत अेकच [illegible] उरेल असें आजहि आपणांस वाटतें. बौद्ध, जैन, ब्राह्मसमाजी वगैरे आ[illegible]संप्रदायांत देखील चातुर्वर्ण्याच्या कल्पनेस उत्तेजन नाहीं. केवळ हिंदूंनीं अ[illegible]णे केवळ हिंदूंसाठीं चालविलेल्या शिक्षणसंस्थांतूनहि चातुर्वर्ण्याला आज उत्तेजन नाहीं. जुन्या आचारांचें थोडेंसें स्तोम सांभाळण्यासाठीं बाह्य व्यवहारांत थोडासा दिखाऊ वर्णभेद कांहीं संस्थांतून पाळला जातो हें खरें; पण शिक्षणपद्धति आणि विद्यार्थ्यांचें व्यापक जीवन निर्वर्ण्य अथवा अेकवर्णीच असतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. हा अेक वर्ण कोणता हें ठरविणेंहि मुष्कील आहे. मध्यम स्थितींतील तरुणांना पांढरपेशी शिक्षण देणें अेवढाच मतलब साधण्याचा यांत उद्देश असतो. वैश्य आणि शूद्र वर्णांचीं लक्षणें ज्यांत सम्मीलित झालेलीं दिसतात, त्यांत ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्णांचीं लक्षणें दिसत असलीं, तरी तीं केवळ शोभारूपच होत. जीवनामध्यें, शिक्षणामध्यें आणि संस्कारामध्यें जेथें वर्णांचा लोप होत आहे, तेथें चाराच्या ठिकाणीं सात वर्णांची कल्पना समाजापुढें मांडणें व्यवहारास कितपत धरून आहे हा अेक मोठाच प्रश्न राहतो. चाराच्या ठिकाणीं सात वर्ण करून समाजसंघटन आपण अधिक दुर्घट तर करणार नाहीं ना अशीहि शंका डोकावते. पण जर वर्णव्यवस्था शास्त्रशुद्ध आहे आणि मानवजातीच्या उत्कर्षाभ्युदयास कारणीभूत आहे हा विश्वास खराखुरा आणि दृढमूल असेल, आणि खरोखरच समाजशास्त्रदृष्ट्या वर्णव्यवस्था शास्त्रीय व्हावयाची असेल, तर वर्ण अधिक किंवा उणे झाल्याची क्षिति बाळगतां कामा नये.

सामाजिक जीवनांत धंदे किंवा पेशे अगणित आहेत. पण समाजाच्या

अस्तित्वास, स्थैर्यास आणि अभ्युदयास अत्यंत आवश्यक असे सामाजिक वर्ग कोणते पडतात हें आपण प्रथम पाहिलें पाहिजे; आणि मग रहाणी-करणी-विचारसरणी या दृष्टीनें त्यांचे किती गट पडतात, हें ठरविलें पाहिजे. कांहीं धंद्यांना विशिष्ट काळीं असाधारण महत्त्व येतें आणि कांहीं धंदे निष्कारण हीन गणले जातात. हुन्नरी आणि कलाधर लोकांना प्राचीन समाजांत यथा-योग्य प्रतिष्ठा नव्हती. अेके काळीं त्यांना राज्यव्यवस्थेकडून सविशेष रक्षण आणि आश्रय मिळे. पण त्याबरोबर त्यांचें स्वाभाविक स्वातंत्र्य बरेंच संपुष्टांत येअी. केव्हां केव्हां त्यांची स्थिति अगदीं गुलामाप्रमाणें होऊन जाअी. उलटपक्षीं, आज पाश्चात्य देशांत या वर्गांना त्यांच्या योग्यतेहूनहि अधिक असें समाज-धुरीणांचें अथवा समाजगुरूंचें पद प्राप्त होऊं पहात आहे. या भेदाला अैति-हासिक कारणें पुरतीं आणि सबळ आहेत हें खरें; पण आपण वर्णव्यवस्थेचा विचार करितांना शक्य तितकी शास्त्रीय तटस्थता बाळगली पाहिजे.

सैन्य पोटावर चालत असतें अशी जी म्हण आहे ती अखिल समाजालाहि पूर्णपणें लागू पडते. मनुष्य हा अन्नमय आहे; अन्नवस्त्रप्राप्ति हा जीवनाचा मुख्य आधार आहे हें आपण कधींहि विसरतां कामा नये. यांपैकीं वस्त्रास लागणारा कच्चा माल मुख्यत्वें वनस्पतिजन्य असल्यानें अन्नवस्त्राचा विचार अेकत्रच करावा लागतो; तरी वस्त्रें निर्माण करण्याची कला जटिल आणि दीर्घकालीन असल्यानें वस्त्रें तयार करणें हा स्वतंत्र धंदाहि होऊं शकतो. शेतकी आणि विणकरीचा धंदा हे अेकत्र गणावेत किंवा भिन्न गणावेत ? हे धंदे भिन्न असले, तरी त्यांचा वर्ण अेकच ठरविणें कदाचित् योग्य होअील. पण याचाहि खोलवर विचार केला पाहिजे. कारण, शेतकीच्या धंद्यांत जी विविधता असते, भूमीशीं, पशुपक्ष्यांशीं, पर्जन्यादि प्राकृतिक शक्तींशीं आणि विविध मनुष्यजीवनाशीं जितका शेतकऱ्याच्या संबंध येतो, तितका विणकऱ्याचा येत नाहीं. विणकऱ्याचा धंदा क्रयविक्रयरूपी बाजार या संस्थेशीं जितका संबद्ध आहे, तितका शेतकीचा धंदा कदाचित् नसेल. शेतकीच्या धंद्यांत ऋतुपरत्वें जी विविधता असते तीहि विणकामांत नसते. या दोन्ही धंद्यांत मुख्य साम्य हें आहे कीं, दोन्ही धंदे मनुष्यजीवनास अत्यावश्यक आहेत आणि दोन्ही धंद्यांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेणें शक्य आणि आवश्यक असतें. हुषार,

मेहनती आणि उत्साही शेतकऱ्यांस विणकामाचा धंदा फावल्या दिवसांत घरींच करणें शक्य आहे हेंहि विसरतां कामा नये.

या दोन धंद्यांनंतर तितक्याच महत्त्वाचा पण कमी लोकांना गुंतवणारा धंदा सुतारी आणि लोहारी करणाऱ्या कारागिरांचा अथवा कारूंचा आहे. शेतकींचीं औतें, विणकरांचीं अवजारें, घरामध्यें लागणारीं तऱ्हतऱ्हेचीं उपकरणीं आणि प्रत्यक्ष घर या सर्व कामांसाठीं सुतार, लोहार, गवंडी, कुंभार अित्यादी कारागिरांची आवश्यकता आहे.

अन्न, वस्त्र, घर आणि माणुसकीचें मुख्य लक्षण जीं उपकरणीं यांची सोय झाल्यानंतर मनुष्याला जर कोणाची अतिशय जरूर भासत असेल, तर समाजांतील शहाण्या पुरुषांची. या शहाण्याला नवीन नवीन कल्पना सुचत असतात, मनुष्यस्वभाव माहीत असतो, जुन्या प्रसंगांचें स्मरण असतें, त्याचा स्वभाव बराचसा प्रयोगपरायण असतो, दुसऱ्याची अडचण ती आपलीच अडचण असें समजून ती दूर करण्यास झटण्याअितका त्याच्या हृदयाचा विकास झालेला असतो. या सर्व गुणांमुळें सर्वांस तो हवासा वाटतो. सर्व पशू ज्याप्रमाणें पाणी पिण्याच्या स्थानाकडे प्रत्यहीं जातात, त्याप्रमाणें समाजांतील सर्व लोक अडल्यावेळीं त्याच्याकडेच धांव घेतात. कालांतरानें लोकांना प्रसंगविशेषीं आज्ञा करण्याची योग्यता त्याच्यांत येते. या योग्यतेमुळेंच सर्वांची बाजू पाहून सर्वांचा न्याय करण्याचें काम त्याचेकडे येतें. सर्वांकडे समदृष्टीनें पहाण्याची योग्यता वाढविणें त्याला अपरिहार्य होतें.

त्याची बुद्धि, त्याची भावनाशक्ति, कल्पकता, सामर्थ्य आणि वेळ समाजसेवेकडे अधिकाधिक जाऊं लागल्यानें त्याच्या व्यक्तिगत सुखसमाधानाकडे लक्ष देण्याची काळजी, समाजाला वाटूं लागते. अग्रत्वाचा मान त्याच्याकडे येतो. अशा रीतीनें प्रतिष्ठेबरोबर त्याचें वैभवहि वाढतें.

अेवढ्यावरच जर या शहाण्याची प्रगति खुंटली नाहीं तर त्याच्यामध्यें औदार्य, निःस्पृहता, आणि स्वसुखनिराभिलापवृत्ति या गोष्टी वाढल्याच पाहिजेत. त्यागानें आणि वैराग्यानेंच प्रतिष्ठा आणि वैभव हीं शोभतात, स्थिर होतात आणि वाढतात हें समजावयास फार वेळ लागूं नये. निष्कामसेवा हेंच परम तप आहे. अनाहूत अैश्वर्य हें त्याचें फळ आहे.

'न सर्वः सर्वं वेत्ति' या न्यायानें या शहाण्याचे अनेक प्रकार किंवा अवतार होतात. हा शहाणा ( हिंदीमध्यें याला 'सयाना' म्हणतात ) कोठें वैद्य होईल, कोठें हुन्नरी लोकांचा शास्त्रज्ञ-आचार्य होईल, कोठें न्यायाधीश होईल, कोठें राष्ट्राचा शाहीर होईल, कोठें राजा होईल, कोठें कुशल सेनानी होईल, समाजव्यवस्थापक धर्मकार होईल, नावाडी अथवा सार्थवाह होईल, ताऱ्यांवरून भविष्य सांगणारा ज्योतिषि होईल, लोकांच्या ठेवी ठेवणारा व्यापारी-सावकार होईल, साहित्याचार्य अथवा अध्यापक होईल अथवा लोकहिताचीं मोटमोठीं कामें करणारा स्थपति ( अिन्जीनियर ) होईल.

चारित्र्याची उदात्तता याच्या खालोखाल जर अेकाद्या गुणाची समाजांत अत्यंत चहा असेल तर ती सुचणुकीची आहे. सुचणूक, 'सूझ', प्रत्युत्पन्न-मति या अेका गुणानेंच जगाची असाधारण प्रगति झालेली आहे. सुचणूक हें मनुष्यसमाजरूपी मोटारीचें पेट्रोल आहे. चारित्र्याची आर्यता हें त्याचें सुकाणू आहे. ( आजच्या मनुष्यसंस्कृतींत सुकाणूंची प्रतिष्ठा कमी झाली आहे. सर्व लोक पेट्रोलचीच कदर करितात. यामुळें मानवी दुःखांचा ढीग वाढूं लागला आहे. )

समाजांतील या शहाण्याच्या वर ज्या अनेक विभूती सांगितल्या त्या वरवर पाहतां कितीहि भिन्न असल्या, तरी मुळांत त्यांचें लक्षण अेकच आहे. भिन्न-भिन्न काळीं आणि भिन्नभिन्न समाजांत निरनिराळ्या विभूतींना प्राधान्य येतें. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, मुळांत अेकच कोटी असूनहि या भिन्न विभूती अेकमेकांचा मत्सर आणि तिरस्कार करीत असलेल्या दिसून येतात. पण त्यांत आश्चर्य कसलें ? वृत्तिसाम्य अथवा क्षेत्रसाम्य असल्याखेरीज मत्सर अथवा तिरस्कार संभवतच नाहीं.

समाजांत ज्याप्रमाणें हा अेक शहाण्यांचा वर्ग आपोआप उत्पन्न होतो आणि सामान्य व्यवसायापासून तो मुक्त राहतो, त्याचप्रमाणें बुद्धिमांद्यामुळें आणि महत्त्वाकांक्षेच्या अभावामुळें सांगितलेलें काम करून असण्यांतच संतोष मानणारा अेक वर्ग समाजांत असतो. आजवर सामाजिक अन्यायामुळें आणि शहाण्या वर्गाच्या नृशंस्यामुळें हा वर्ग बेसुमार वाढला आहे. बुद्धि असून विकासाला अवकाश नाहीं आणि महत्त्वाला पोहोंचण्याची योग्यता असून

महत्त्वाकांक्षा ही वस्तूच आपल्यासाठीं नाहीं, अशा तऱ्हेची वृत्ति होण्याजोगी परिस्थितीच सर्वत्र दिसून येत आहे. जगामधील थोर पुरुषांची यादी आपण अभिमानानें तयार करितों; पण मनुष्यसंख्येच्या मानानें आणि मानवी शक्तीच्या मानानें ही यादी अितकी लहान आहे कीं, संकुचित दृष्टीचा स्वार्थ आणि अन्याय यामुळें मानवकोटीचें अनंत रीतीनें अकल्याण करणाऱ्या लोकांनीं लज्जेनें मान खालींच घातली पाहिजे. कोट्यवधि दुर्दैवी लोकांना जर आपण योग्य संधि मिळूं दिली असती, तर जगाच्या थोर कर्तबगार पुरुषांची यादी किमानपक्षीं हजारपट वाढली असती.

चातुर्वर्ण्याच्या पुनर्घटनेचा विचार करितांना आजवर झालेल्या या जगद्व्यापी अन्यायाचें परिमार्जन कसें करितां येअील, याचा मुख्य विचार झाला पाहिजे. आजवर ज्यांनीं सामाजिक भाराचें वहन केलें, पण सामाजिक पुरुषार्थापासून कांहींच फायदा मिळविला नाहीं, अशांना विकासाची विशेष संधि मिळवून दिली पाहिजे. अन्यायाचें बीं पेरून त्याचा विशाल वृक्ष झाला आणि त्याच्या पाळेंमुळें कोट्यवधि लोकांना जखडून बसलीं. अशी स्थिति असतां आजवर झालें तें झालें; आहे ती स्थिति स्वीकारून यापुढें सर्वांनीं गुण्यागोविंदानें वागावें असा शांतिमंत्र 'तुष्टिरस्तु पुष्टिरस्तु' म्हणून गाणें, म्हणजे गिळून टाकलेला पशु पचविण्यासाठीं अजगरानें फुरसत मागण्यासारखेंच आहे.

जुन्या शास्त्रांतून सांगितलें आहे कीं, आनुवंशिक संस्कार सात पिढ्यापर्यंत पोहोंचतात. त्यावेळीं हें खरें असेल. पण शिक्षण, अनुकूल परिस्थिति, जबाबदारी, समान दर्जा, महत्त्वाकांक्षा, सत्संग आणि विकासास लागणारा अवकाश किंवा संधि या गोष्टींच्या जोरावर अेकाच पिढींत वाटेल तितकी प्रगति करून दाखविणें शक्य आहे. या बाबतींत जुन्या शास्त्रकारांच्या वचनाला जेवढें प्रामाण्य आहे, त्यापेक्षां आजच्या समाजसेवकांच्या अनुभवाला अधिक प्रामाण्य असलें पाहिजे.

१ परिचर्येची मजुरी, २ उद्योगधंद्यांतील किंवा सार्वजनिक कामांतील मजुरी, ३ काबाडकष्ट करून दिवसाच्या शेवटीं रोजी मिळविण्याचा धंदा, ४ महिन्याच्या महिन्याला पगार मिळणारी नोकरी, ५ हुन्नर—उद्योग करून

पोट भरण्याचा व्यवसाय, ६ कारागीर लोकांना पदरीं बाळगून लहानमोठे कारखाने चालविण्याचा धंदा, ७ धंद्याच्या अब्रूचा ज्यांत विशेष विचार असतो असे पेशे ( Professions ), ८ पगार घेऊन समाजसेवेचीं लहान-मोठीं कामें करण्याचा धंदा, ९ समाज देईल तें घेऊन अथवा तेंहि न घेतां निरपेक्षपणें सेवा करण्याचें पवित्र जीवन, आणि शेवटीं १० अयाचित वृत्तीनें तपस्वीपणें राहून समाजकल्याणाचें ध्यान करीत कर्तव्यातीत होऊन राहणें, हे जीवनाचे उत्तरोत्तर महत्त्वाचे प्रकार आहेत. पेन्शन खाऊन किंवा नुसत्या व्याजावर राहून किंवा भिक्षा मागून आयतोबासारखें राहणें हाहि अेक जीवन-क्रम आहे, पण त्याला वरील यादींत स्थान दिलें नाहीं. आजीविकेची श्रम-शून्य व जबाबदारीविरहित अशी कायमची सोय लागणें ही अेक व्यक्तीच्या दृष्टीनें आपत्तीच आहे. आणि समाजाच्या दृष्टीनें अनेक नैतिक रोगांचें तें मूळ आहे. जो स्वतःच्या आणि स्वाभाविकपणें जे स्वतःचे आश्रित आहेत त्यांच्या पोटांसाठीं श्रम करीत नाहीं, समाजाला अिष्ट अशी कोणतीच सेवाहि करीत नाहीं, त्याचें जीवन भूमीला म्हणजे समाजाला भारभूत आहे; अेवढेंच नव्हे, पण त्याच्या योगानें समाज आणि समाजतंत्र दोन्ही संकटांत येऊन पडलीं आहेत असें निश्चित समजावें. अशा मनुष्याला जगण्याचा किंवा खाण्याचा अधिकारच नाहीं. विगलितसामर्थ्य असे वृद्ध, अर्भक, रुग्ण आणि वेड्यांत जमा असे मंद अथवा भ्रमिष्ट अेवढ्यांचेंच ओझें समाजाला पुरेसें आहे. स्वतःच्या आळसानें आणि बेजबाबदारीनें समाजावर आपलें ओझें टाकणें हा सर्वांत मोठा समाजद्रोह आणि आत्मद्रोह आहे.

जीवनक्रमाची जी अेक शिडी वर दिली आहे, तिच्या पायऱ्या समजून घेतल्या पाहिजेत. उपजीविका, जीवनक्रम आणि समाजसेवा हीं अधिकाधिक निष्पाप असलीं पाहिजेत. त्यामध्यें स्वार्थापेक्षां समाजहिताची दृष्टि वर्धमान असली पाहिजे. जबाबदारीचें भान आणि त्यागवृत्ति हीहि अधिकाधिक विक-सित झाली पाहिजे आणि सरतेशेवटीं समाजकल्याणासाठीं स्वतःला संपूर्णपणें विसरून जाऊन जीवन म्हणजे अेक महान् आत्मयज्ञ झाला पाहिजे. या दृष्टीनें वरील पायऱ्या लाविल्या पाहिजेत.

शूद्र हा वर्ण होतां होईल तों कमी करावा हें तर आपण ठरविलें आहेच.

पण तो अजिबात नष्ट होणें दुरापास्त दिसतें. क्षत्रिय हा वर्ण मात्र निराळा वर्ण म्हणून राहतां कामा नये. आत्मरक्षण करणें म्हणजे दुसऱ्याला ठार करण्यास तयार असणें अशी जी लोकांची समजूत झाली आहे, ती काढून टाकिली पाहिजे. आत्मरक्षण असो किंवा समाजरक्षण असो, त्यासाठीं दुसऱ्याचा घात किंवा वध करण्याची आवश्यकता सिद्ध झालेली नाहीं. रक्षणच जर अिष्ट असलें तर सर्वांचेंच रक्षण झालें पाहिजे. हें रक्षण आत्मबलिदानानें करणें हाच क्षत्रियाचा प्रधान धर्म होय. आज मारेकरी आणि खाटीक यांची वृत्ति आणि रक्षणार्थ स्वतःचें बलिदान देण्याची वृत्ति या दोहोंचा विचित्र संयोग करून क्षत्रियाचा आदर्श घडविलेला दृष्टीस पडतो.

प्रसंगविशेषीं दुसऱ्याला मारणें आवश्यक असणें, अपरिहार्य असणें, निराळें; आणि मारण्याच्या कलेंत निष्णात असे लोक तयार करून जय्यत ठेवणें, मनुष्यवध किंवा कत्तल करण्याची कठोर आणि कपटी कला पूर्णत्वास पोहोंचविणें हें निराळें.

खरें पाहतां आत्मरक्षणाची कला, मग ती आत्मिक सामर्थ्याची असो, बौद्धिक कुशलतेची असो अथवा शारीरिक सामर्थ्याची असो, प्राणिमात्रास आवश्यक आहे. प्रत्येक मनुष्यानें ही कला अवगत करून घेतली पाहिजे. ही कला जाणणारा स्वतंत्र वर्ण तयार करून बाकीच्यांना त्या वर्णाचे आश्रित करणें म्हणजे सामान्य समाजाची खची करण्यासारखें आहे. रघुकुळांतील राजानें मनूच्या वंशजांविषयीं जें म्हटलें आहे तें सबंध मनुष्यसमाजास लागू आहे. ‘स्ववीर्यगुता हि मनोः प्रसूतिः।’ मनुष्यमात्र स्वतःच्या वीर्यानेंच रक्षित असला पाहिजे. समाजरक्षणाच्या कामीं समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा उपयोग झाला पाहिजे. पुरुष, बायका, युवान्, वृद्ध, सर्वांनाच आत्मरक्षणांत अथवा समाजरक्षणांत भाग घेतां यावा अशी ही रक्षणकला असली पाहिजे.

मनुष्याचा सामाजिक स्वभाव पाहतां युद्ध, हिंसा आणि कत्तल यांची गोडी, शक्यता आणि ज्ञान सर्वांनाच असणें शक्य नाहीं. सर्वांना साधण्याजोगें असें सामर्थ्य म्हणजे संघटन, सत्याग्रह, बहिष्कार, असहकार आणि हृदयपरिवर्तन हेंच होय. शारीरिक दंड, धाक, जरब, दरारा अथवा कत्तल हीं आवश्यक आहेत असें मानलें, व त्यांचें शास्त्र तयार करून त्यांचा प्रचार करणें

अिष्ट ठरलें तरी या शास्त्राचे निराळे तज्ज्ञ उत्पन्न करून चालावयाचें नाहीं. कारण, असा वर्ग बाकीच्या समाजाला जरबेंत ठेऊन त्यावर कुरघोडी करावयाचा. यापेक्षां या मार्गाचें ज्ञान व शिक्षण सर्वसुलभ करून देणें हाच खरा मार्ग आहे. अेवंच, क्षात्रगुण प्रत्येकांत असावा, क्षात्रवर्ग निराळा नसावा, अेवढें सिद्ध होतें. आपल्या चातुर्वर्ण्यांत हा अेक मोठाच दोष राहिला होता कीं त्यानें युद्धकला, तिला लागणारे जीवनाचे सद्गुण, आणि तद्विषयक जबाबदारी मूटभर लोकांच्या हातीं ठेवून दिली. यायोगें समाज सुदृढ, संघटित आणि सुश्लिष्ट होऊं शकला नाहीं, हा आपला हजारों वर्षांचा अनुभव आहे. शिवाजी महाराजांच्या लक्षांत ही गोष्ट कांहीं अंशीं आली होती असें मानण्यास जागा आहे. कारण, त्यांनीं पूर्वपरंपरेंत जे महत्त्वाचे दोनतीन फेरफार केले, त्यांत ही गोष्ट दिसून येते. कोणालाहि जमीन-जहागीर न देणें, राजसत्तेचा उपयोग परदेशांशीं व्यापार वाढविण्यासाठीं करणें, या दोन गोष्टी जशा त्यांच्या स्वतंत्र आहेत, त्याप्रमाणें आपल्या अष्टप्रधानांपैकीं प्रत्येकास सेनाधिपत्य हें सामान्य असलेंच पाहिजे असा त्यांचा नियमहि आहे. याचा अर्थ असा कीं, अष्टप्रधानांपैकीं प्रत्येकजण उत्तम सेनापति असून त्याखेरीज त्यानें आपल्या खात्याचें तज्ज्ञ असलें पाहिजे.

क्षत्रिय हा वर्ण निराळा न करितां मनुष्यमात्र क्षत्रिय असला पाहिजे, असा सिद्धांत यापुढें तरी आपण स्वीकारलाच पाहिजे.

शेतकरी हा जात्याच क्षत्रिय असतो. जो क्षेत्राचा मालक झाला त्यानें त्याच्या रक्षणासाठीं आपले प्राण खर्ची घालण्यास तयार झालेंच पाहिजे, हें स्वभाविक आहे. जो कुटुंबवत्सल झाला, गृहस्थाश्रमी झाला, त्यानें आपल्या कुटुंबाचें रक्षण करण्यासाठीं प्राण खर्ची घालण्यास तयार झालेंच पाहिजे. पशुपक्ष्यांत देखील हा नियम आपण पाहतों कीं, नर-मादी आणि विशेषतः मादी, आपल्या अर्भकाच्या रक्षणासाठीं क्षात्रतेजानें जपत असते आणि प्रसंगीं स्वतःचे प्राण खर्ची घालण्यास मागेंपुढें पहात नाहीं. ज्यानें म्हणून संपत्ति बाळगली त्यानें क्षात्रधर्म स्वीकारल्यावांचून चालावयाचें नाहीं. जो समाजाची सेवा घेतो अथवा कोणत्याहि रीतीनें समाजाची सेवा करतो, त्याला समाजाचें रक्षण करण्याची जबाबदारी टाळतां येतच नाहीं. तेव्हां सत्याग्रह असो किंवा

सत्याग्रह असो, शस्त्रयुद्ध असो किंवा अहिंसक युद्ध असो, त्याचें शास्त्र व त्याची कला विश्वजनीन असली पाहिजे.

येथवर शूद्र आणि क्षत्रिय या दोन वर्णांचा विचार झाला. आतां ब्राह्मण-वर्णाचा विचार करूं. येथें आपण प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, कर्म-कांडी धर्माचा मनु आतां राहिला नाहीं. पुरोहिताची जरूर आतां फारशी उरणार नाहीं. आणि थोडीफार उरलीच तर पुरोहिताचा पेशा परिचर्यात्मक असल्यानें शूद्रांत गणला जाअील. दुसऱ्यासाठीं देवपूजा करणें, दुसऱ्यासाठीं मंत्र म्हणणें आणि विधी चालविणें, दुसऱ्याकडून संस्कारांत भाग घेणें, दुसरे सांगतील त्याप्रमाणें धार्मिक ग्रंथांचें पठन-श्रावण करणें आणि या रीतीनें स्वतःची आजीविका मिळविणें हें शूद्रकर्मच होय. आचारी, मालिश करणारे, मेणा उचलणारे भोअी यांच्याबरोबरच वरील वर्गाचा दर्जा गणला जाअील.

शास्त्रग्रंथांचें पठन-पाठनद्वारा रक्षण हाहि आतां ब्राह्मणाचा धर्म राहिला नाहीं. कर्मकांडी शास्त्रें मागें पडणार आणि समाजव्यवस्थेचीं आणि चारित्र्य-संघटनेचीं शास्त्रें पुढें येणार. स्वर्गनरकादि परलोकांचा इतिहास–भूगोल लोकांना आतां खरा वाटत नाहीं. अीश्वराची भक्ति करावी, आचरण पवित्र ठेवावें, गोरगरिबांची सेवा करावी, प्रामाणिकपणें समाजाची सेवा करावी, साधेपणानें आणि कडकपणानें रहावें आणि अंतीं सर्व गोष्टींतील मन काढून घेऊन विरक्तपणें जीवन पुरें करावें हाच खरा धर्म आहे, हें जाणत्यांना समजूं लागलें आहे. या प्रकारच्या धर्माचा विचार असलेले ग्रंथ केवळ ब्राह्मणांनींच वाचावेत किंवा संभाळावेत असें म्हणतां यावयाचें नाहीं. आत्मिक कल्याण आणि समाजहित यांची जबाबदारी सर्वांवर सारखीच आहे. तपश्चर्या आणि त्यापासून मिळणारें सामर्थ्य सर्वांनाच आवश्यक आहे. ज्ञानाचा प्रचार सर्वत्र अधिकाधिक जोरानें झाला पाहिजे. तेव्हां या कामासाठीं देखील निराळा वर्ण नको.

निराळा वर्ण हवा आहे तो आचार्यांचा. शिक्षक, धर्मोपदेशक, धर्मशोधक आणि दिशादर्शक गुरु असा अेक वर्ग हवा आहे. याला आचार्य असें नांव देणें योग्य होईल. आचिनोति हि शास्त्रार्थं आचारे स्थापयत्युत । स्वयमा-चरते यस्तु स आचार्यः प्रचक्षते ॥ अशी आचार्याची व्याख्या आहे. समाजा-

तील ज्ञानी, कुशल आणि पवित्र पुरूष कसे काय वागतात, कशा प्रकारचें जीवन पसंत करितात, हें सर्व पाहून जीवनशास्त्र रचावयाचें असतें. अशा जीवनशास्त्राची परंपरा समजून घेऊन त्यांतील उद्देश व व्यवस्था नक्की करून प्रजेपुढें मांडणें हें आचार्यांचें प्रथम कर्तव्य पहिल्या ओळींत सांगितलें आहे. शास्त्राची ही दिशा चालू परिस्थितींत आचरणांत कशी आणावयाची हें नक्की करून त्याचा बोध व प्रचार करणें आणि नेहमीं जागरूक राहून समाज सदाचारी होईल, त्याची आर्यवृत्ति वृद्धिंगत होईल, अशी काळजी वाहणें व सतत प्रयत्न करणें हें त्याचें दुसरें कर्तव्य नंतर सांगितलें आहे. हें सर्व करण्यासाठीं स्वतःचें जीवन सर्वोच्च असलें पाहिजे. आत्मोन्नतीच्या दृष्टीनें, नवीन नवीन अनुभव वाढविण्याच्या दृष्टीनें आणि समाजाला धडा घालून देण्याच्या दृष्टीनें यांचा स्वतःचा आचार अत्यंत निर्मळ, उज्ज्वल, कडक, प्रसन्न आणि अखंड अशा खोल विचारानें जागरूक असा असला पाहिजे. ही मर्यादा तिसऱ्या चरणांत सांगितली आहे.

अशा आचार्यांनें जगांत चाललेले जीवनक्षेत्रांतील निरनिराळे प्रयोग तपासले पाहिजेत; जबाबदारपणें स्वतः अनेक प्रयोग चालविले पाहिजेत; जीवनशास्त्र वृद्धिंगत होईल, मागें पडणार नाहीं, याची खबरदारी घेतली पाहिजे; आणि निरलसपणें समाजाचें निरीक्षण व समाजाची सेवा चालविली पाहिजे.

अेवढी महत्त्वाची जबाबदारी ज्याच्या डोक्यावर आहे, त्याच्या हातीं इतर कामें व इतर अधिकार आपोआप येऊं लागणार. हीं नवीं कामें व हे नवे अधिकार मूळच्या पवित्र जबाबदारीला पोषक आहेत किंवा बाधक आहेत याचा सूक्ष्म विचार झाला पाहिजे. असा विचार करितां लवकरच नजरेस येईल कीं, हा आचार्यवर्ग जितका तटस्थ आणि अलिप्त राहील आणि अेकाग्रपणें स्वकर्तव्यरत राहील तितकाच तो कृतार्थ होणार आहे. या वर्गाच्या हातांत व्यावहारिक सत्ता होतां होईल तों नसावी. लोकांना दंड करणें, लोकांपासून कर वसूल करणें, अित्यादि राजत्वाचे अधिकार या वर्गाकडे नसावेत. नाहीं तर तो भ्रष्ट होईल हा वर्ग स्वतःच्या चारित्र्यानें, तपानें व दानानें, निःस्पृहतेनें व सर्वकारुणिकतेनें सर्वमान्य, श्रेद्धेय आणि अनुसरणीय असा

असेल. या वर्गाची सत्ता आध्यात्मिक असावयाची. लोकांची बुद्धि, हृदय आणि लोकांचें संघटन यांवर जी स्वाभाविक छाप पडेल तीच यांची शक्ति.

असा वर्ग लोकांच्या दानबुद्धीवर अवलंबून राहील आणि राजनियमनापासून बराचसा मुक्त राहील. सर्व समाजांत जी धर्मबुद्धि आहे तिच्या कसोटीवर हे लोक कसले जाणार, हाच काय तो यांच्यावरचा मुख्य अंकुश. हे लोक समाजावर राज्य करणार नाहींत आणि समाज यांच्यावर राज्य करणार नाहीं, अशी स्वाभाविक स्थिति असली पाहिजे. साधेपणा, गरिबी आणि संयम आणि निरलस अखंड उद्योग, त्याचप्रमाणें निःपक्षपातिता, कारुण्य आणि अखंड सेवा या गुणांनींच हा वर्ग टिकणार आहे.

ब्राह्मणाच्या कर्तव्याची अशी छाननी करून भविष्यकाळीं आवश्यक अशा गुणकर्मवृत्तींचा निश्चय केल्यानंतर व त्याला जाणूनबुजून नवें नांव दिल्यावर वैश्य वर्णाचाच विचार करावयाचें राहतें.

कृषि-गोरक्ष हीं अेकत्र असूं शकतात. वाणिज्य हें निराळें पडतें. कृषि ही स्वभावतःच स्थावर वृत्ति आहे. वाणिज्य हें प्रवासमूलक असल्यानें तें निराळें पडतें.

[ शेतकऱ्यांनीं आपली जमीन सोडून कोठें जाऊं नये असें म्हणण्याचा येथें आशय नाहीं. शेतकऱ्याला आपल्या शेतांतील, बागेंतील आणि कुरणांतील सर्व प्रकारचें उत्पन्न–धान्य, गवत, फळें, तेलें, पशुपक्षी, मध, अंडीं वगैरे पदार्थ–जेथें किफायतीचा भाव मिळेल तेथें जाऊन विकण्याची सोय आणि संवय असली पाहिजे. शेतकी करावयाची म्हणजे बैल हा बाळगलाच पाहिजे. शेतकऱ्याला ज्याप्रमाणें रिकाम्या दिवसांसाठीं दुय्यम धंदा हवा आहे, त्याप्रमाणें बैलालाहि स्वतःचें पोट सर्वस्वीं शेतीवर टाकणें शक्य नसल्यानें दुय्यम धंदा असला पाहिजे. हे धंदे दोन : अेक वाहतुकीचा व दुसरा घाण्याचा. शेतीचा माल आणि अितर माल रिकाम्या दिवसांत आसपासच्या पेठांना पोंचविणें हें शेतकऱ्याचेंच काम आहे. बैलाला रिकामा ठेवून मोटारींतून असा माल नेणें हें राष्ट्रघातक आहे; हें आपण समजलेंच पाहिजे व प्रजाकीय सरकारांनीं बैलाच्या या जोडधंद्याला रक्षण दिलेंच पाहिजे.

तेलाला लागणाऱ्या बिया अथवा शेंगा अथवा धान्यें शेतकऱ्यांकडेच मिळतात. तेलाबरोबर तयार होणारी पेंड, गुराढोरांचा खुराक म्हणून अथवा शेताचें खत म्हणून, मुख्यतः शेतकरीच वापरतो. यामुळें हा तेलाचा धंदा शेतकऱ्यांनीं केल्यास सगळा नफा त्यांच्याच घरीं राहूं शकेल. ]

शेतकऱ्याबरोबर बागवान हा आलाच. हिंदुस्थानांत फळझाडांची लागवड पुष्कळच वाढविली पाहिजे; आणि सुकलेलीं किंवा ताजीं फळें व त्यांतील काजू, बदाम, गोडंब्या वगैरे बिया अथवा 'बदाम' यांचा उपयोग आहारांत जास्ती केला पाहिजे. जमीन वारंवार नांगरून तींत धान्य पेरण्यापेक्षां जमिनीची चांगली मशागत ठेवून तींत उत्कृष्ट फळझाडांची लागवड करणें हें आहाराच्या दृष्टीनें व नफ्याच्या दृष्टीनें अधिक फायदेशीर होण्याचा संभव आहे. अहिंसेच्या दृष्टीनें तर अिष्ट आहेच.

धनगर आणि गवळी यांचे धंदे देखील शेतकऱ्यांच्या धंद्यांतून फार दूर जातां कामा नयेत. लोकरीची पैदास करणें व ती कांतून-विणून तिचीं वस्त्रें करणें हें काम देखील शेतकीशीं संबद्ध आहे. आज धनगराजवळ जमिनी नाहींत. त्यांना भटकत हिंडावें लागतें. यामुळें या गरीब जातीला किती कष्ट पडतात याची कल्पना जिज्ञाळ्यानें त्यांच्या जीवनाचा तपास केला तरच येअील; नाहीं तर त्यांच्या वंशांत गेल्यानेंच कळेल. उलट बाजूनें शेतकऱ्याजवळ शेळयामेंढया नसल्यानें त्याला खतापायीं बराच खर्च करावा लागतो. लोकरीचे कपडे जे घरींच तयार करणें शक्य आहे ते विकत घ्यावे लागतात आणि जे अन्नाहारी नाहींत त्यांचा आहाराचा खर्च देखील वाढतो. ही सर्व आपत्ति टाळण्यासाठीं क्षेत्रपाल आणि मेषपाल हे अेकच असावेत हें चांगलें. [ अहिंसेच्या दृष्टीनें, अन्नाहाराच्या दृष्टीनें विचार करितां येथें अेवढें नमूद करून ठेविलें पाहिजे कीं, पशूंचें पालन आपण स्वार्थासाठीं करीत असल्यानें त्यांचा वंशविस्तार आपण आपल्या गरजेहून अधिक होऊं न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. ] दोऱ्या वगैरे वनस्पतिजन्य पदार्थ तयार करण्याचें कामहि शेतकऱ्यांच्या बायकामुलांनींच करण्याचें असतें.

हें सर्व धंदे अेकत्र केल्यानंतर या वर्णाला कांहीं नवीन नांव दिलें पाहिजे. हा वर्ण सर्व समाजाचें भरण-पोषण करीत असल्यानें त्याला जुन्या पद्धतीनें

'स्वामी–गोसावी' असें म्हटलें पाहिजे. आपण त्याला 'भर्ता' किंवा 'पूषा' असें म्हणूं.

विणकऱ्याचा धंदा निराळा ठेवावा किंवा शेतकऱ्याच्या बरोबरच ठेवावा हें नक्की करणें जरा कठिण आहे. कापूस किंवा इतर तंतू तयार करण्याचें काम शेतकरीच करितो. हे तंतू पिंजून-कांतून सूत किंवा धागा तयार करणें हेंहि मुख्यत्वें शेतकरी कुटुंबाचेंच काम आहे. खरें पाहतां मनुष्यमात्रानें हात-चाळा म्हणून हें काम केलें पाहिजे.

मनुष्य जर शीतनिवारणाचा आणि लाज झांकण्याचा अेवढाच उद्देश धरून वस्त्र वापरील, तर विणण्याचें कामहि शेतकऱ्यानें फावल्या वेळीं करून चालेल. पण शोभा आणि प्रतिष्ठा यांचें साधन म्हणून वस्त्र अधिक वापरलें जातें. यामुळें विणकरांचा धंदा स्वतंत्रपणें नित्य चालू लागला, त्यांतील कौशल्य वाढलें व त्याला कारागिरीचें स्वरूप आलें.

आपण कारागिरांचा कल्पक म्हणून एक स्वतंत्र धंदा अथवा वर्ण बन-विणार आहोंत. तेव्हां विणकरांनीं वाटल्यास शेतकरी आदि पोषक-वर्गांत रहावें किंवा सुतार, लोहार आदि कल्पक-वर्गांत रहावें.

पोषक-वर्ग मुख्यत्वें कच्चा माल तयार करितो, आणि कल्पक कच्च्या मालावर आपलें कौशल्य चालवून पक्का माल तयार करितो.

दगडाच्या व धातूच्या खाणींमध्यें काम करण्याचा धंदा हाहि विणकरांच्या धंद्याप्रमाणेंच सरहद्दीवरचा धंदा आहे. पोषक आणि कल्पक दोहोंची वृत्ति त्यांत समान आहे. असे सरहद्दीवरचे धंदे वर्णव्यवस्थेला अेकजीव करण्याला अतिशय उपयोगी पडतात. सात वर्ण निरनिराळ्या तळ्यांप्रमाणें अगदीं पर-स्पर अस्पृश्य न राहतां अिंद्रधनुष्याच्या रंगाप्रमाणें अेकमेकांत मिसळलेले चांगले. अेकाद्या मोठ्या देशांत अनेक भाषा चालू असल्या म्हणजे भाषांच्या सरहद्दीवर भाषांची जी भेसळ होते ती अपरिहार्य आहे. अशी भेसळ कांहीं अंशीं कर्णकटु असली, तरी उभय भाषांना विनिमयाचें साधन होऊन त्यांना परिपुष्ट करण्यास कारणीभूत होते. त्याचप्रमाणें सरहद्दीच्या वर्णांचें समजावें.

आतां आपण कारागीर लोकांच्या कल्पक वर्णाचा विचार करूं या. आपला

आचार्यांचा प्रथम वर्ण हा शोधक व कल्पक आहे खरा. पण निरानिराळ्या कल्पनांचा कौशल्याकडे उपयोग करून तरतऱ्हेचीं उपकरणीं समाजाला पुरीं पाडणें हें काम त्याच्या हातून होणार नाहीं. आचार्यवर्णांतील कांहीं लोक कल्पक कारागिरांत प्रवेश करतील, आणि कांहीं कल्पक कारागीर निवृत्तवृत्तीनें राहून आचार्यवर्णांत प्रवेश करतील. पण दोहोंचें कार्यक्षेत्र आणि जीवननिष्ठा ( attitude towards Life ) अितक्या कांहीं भिन्न असणार कीं, हे अपवाद अपवादच रहावयाचे.

कल्पक अथवा हुन्नरी लोकांचा वर्ण बहुतकरून स्वभावानें अेकलकोंडा असतो. तो समाजसेवक असला तरी आपल्या कामांत तो अितका चूर असतो कीं, बहुतेक काम तो आपल्या हौसेसाठींच करीत असतो. म्हणून स्वतःच्या धंद्याचा विशिष्ट धर्म नक्की करून आग्रहपूर्वक त्याचें पालन करण्याकडे त्याची वृत्ति विशेष. अशा कारागिराला जेव्हां पैशाचा लोभ सुटतो तेव्हां तो अेकाद्या कारखानदाराचा आश्रित होऊन तज्ज्ञ मजूर म्हणून यथेच्छ पैसे मिळवितो व अशा रीतीनें ठराविक सांचाच्या मालाचे ढीगच्या ढीग तयार होतात. आणि गिऱ्हाअिकी जिंकण्यासाठीं पुढें राष्ट्राराष्ट्रांमध्यें बाजार-युद्धें सुरू होतात. कल्पकवर्ण आणि आचार्यवर्ण स्वधर्मभ्रष्ट झाले म्हणजे सामाजिक व्यवस्था बिघडते, आंतरराष्ट्रीय स्वास्थ्य नष्ट होतें आणि कलेची मौलिकताहि लयाला जाते.

कल्पक वर्णांत सुतार, लोहार, गवंडी, रस्ते तयार करणारे पथिक, वैद्य, शिंपी, चांभार, लेखक ( सुंदर अक्षरानें लिहून देणारे ) अित्यादि अनेक धंदे समाविष्ट होतात. या सर्वांचा मिळून अेकच वर्ण करणें कांहींसें कठिण आहे. सगळ्यांची राहणी–करणी सारखी नसणार. तरी यांचा अेकच वर्ण करण्याकडे समाजानें आपली सगळी शक्ति वापरली पाहिजे. चांभार, शस्त्रवैद्य आणि सोनार यांचें कौशल्य जवळजवळ सारखेंच. चांभाराचा धंदा जर जुगुप्सित, तर शस्त्रवैद्याचा धंदा कांहीं कमी जुगुप्सित नाहीं. आणि शस्त्रवैद्याची रहाणी जर शुचिर्भूत ठेवितां येते, तर चांभाराची तशी ठेवितां कां येऊं नये ?

यानंतरचा वर्ण तो मालाच्या विनिमयास स्वतःला वाहून घेतलेला सार्थवाहांचा वणिक्वर्ग. यांतच दुकानदार, कारखानदार आणि सराफ अित्यादि

लोक येतात. आजचे दुकानदार घरबसल्या दुकान चालविण्यास सोकावले आहेत. बैलांचा तांडा, गाड्यांची रांग अथवा जहाजांचा काफला घेऊन हिंडणारा वर्ग आणि दुकानदार यांची फारकत झालेली आहे, हें अनेक रीतीनें अनिष्ट आहे. या योगें सार्थवाहांचा वर्ग अगदीं असंस्कारी आणि गरीब होऊन गेला आहे, आणि दुकानदार वर्ग निदान आपल्या देशांत तरी बराच-सा आंधळा आणि साहसशून्य असा झाला आहे. सार्थवाह, दुकानदार व कारखानदार या तिन्ही बाजू जर अेकाच कुटुंबांत राहिल्या, तर कुटुंबें संघटित, समर्थ व समृद्ध होतील. मात्र कारखानदारी कल्पकवर्गाच्या नाशास कारणीभूत होऊं नये; याविषयीं खोलवर विचार करून व्यवस्था करावी लागेल. आज येथें त्याची अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं.

या वणिक्‌वर्गाकडे स्वाभाविकपणें समाजाची बरीचशी संपत्ति राहते. पण ती त्यानें स्वतःची आहे असें समजतां कामा नये. संपत्तीचा प्रवाह जसा सहजासहजीं या वर्णाच्या हातीं येतो, त्याचप्रमाणें सहजासहजीं सार्वजनिक हितासाठीं त्याच्या हातून संपत्ति सुटली पाहिजे. हें काम स्वेच्छेनें, धर्मबुद्धीनें आणि हौसेनें न झालें, तर याविषयीं सामाजिक नियमन कायद्याच्या द्वारा करावें लागेल. पण समाजांत धर्माचें साम्राज्य संपुष्टांत आणून कायद्याचें साम्राज्य वाढविणें हें सोपें भासत असलें, तरी संस्कृतीला हीनता आणणारें आहे हें विसरतां कामा नये.

भर्ता, कुशल [ कल्पक ] आणि वणिक् अर्थात् शेतकरी, कारागीर आणि दुकानदार या तीन वर्णांना प्रेरणा देणारा, त्यांना रस्ता दाखविणारा, आत्मोन्नति आणि सामाजिक कल्याण या उभय दृष्टीनें त्यांचा धर्म त्यांना लावून देणारा असा आचार्य, अितक्यांचा आपण विचार केला. आतां वर सांगितलेल्या त्रैवर्णिकांना संघटित करणारा, त्यांचें सामर्थ्य वाढविणारा, त्यांचा म्होरक्या—संचालक—धुरीण—या वर्गाचा अथवा वर्णाचा विचार करणें प्राप्त होतें. धुरीण म्हणजे समाजाची धुरा वहन करणारा जबाबदार आणि समाजाला अिष्ट दिशेनें खेंचून नेणारा पुढारी होय. याला योजक असेंहि म्हणतां येअील. द्रव्यबळ, बुद्धिबळ आणि संख्याबळ [ मनुष्यबळ ] तिन्ही याला वश असल्यानें याची शक्ति असाधारण आहे. धर्मबळ आणि तपोबळ असलेल्या दीर्घदर्शी

आचार्यांच्या खालोखाल याचेंच महत्त्व आहे. हा जर स्वधर्मभ्रष्ट झाला, तर समाजाला रसातळास नेअील. आज पाश्चात्यांकडे हा वर्ग सामान्यपणें स्वार्थी झालेला आहे. संख्याबळाची सेवा करण्याच्या अैवजीं स्वार्थासाठीं संख्याबळाचा तो उपयोग करितो. यानें द्रव्यबळ आपल्याच ताब्यांत घेतलें आहे व बुद्धिबळाला वाटेल तेव्हां विकत घेऊन तो भ्रष्ट करूं शकतो. यामुळें द्रव्यबळ आणि मनुष्यबळ यांचा परस्पर घोर विद्रोह तेथें माजला आहे. प्राचीन काळीं राजेलोकांवर धर्माचा जो अंकुश असे, तसा अंकुश या वर्णावर असला पाहिजे; पण तो नाहीं. मनुष्यस्वभाव जसा षड्रिपूंना वश आहे तसा तो धर्मालाहि वश आहे, ही श्रद्धा तेथील समाजानें सोडून दिली आहे. धर्माचें स्थान कायदा-कानू आणि राजकीय नियमन यांनीं घेतलें आहे. यामुळें खरी प्रगति कुंठित झाली आहे. लोकशिक्षणानें जें कांहीं थोडेंफार धर्मजागृतीचें कार्य चालविलें आहे तें जर नसतें, तर तथील समाजाचा नाश व्हावयास मुळींच वेळ लागला नसता. Noblesse oblige म्हणजे खानदानीचा धर्म—समाजांत ज्याचें वर्चस्व, महत्त्व आणि प्राधान्य, त्याचा धर्महि अतिशय उग्र आणि कठिण, हें तत्त्व—जेथें क्षीण झाला तेथें नरक जवळ आलाच म्हणावयाचा. नरक म्हणजे समाजबंधनें शिथिल होऊन समाजाचा होणारा विच्छेद.

या धुरीण वर्गांत सर्व प्रकारचीं महान् कार्यें करणारे, आणि लोकांची संघटित शक्ति वापरणारे संचालक, व्यवस्थापक, योजक आणि पुढारी आले. राज्यकर्ते लोक जर स्वतःला लोकसेवक समजून वागूं लागतील तर तेहि याच कोटींत येतील. प्रजाहितार्थ अंशतः प्रजापीडन करणें आवश्यक आणि अिष्ट आहे, अशी मनुष्यसमाजाचा उपमर्द करणारी बुद्धि ज्यांच्यामध्यें आहे, त्यांना धुरीण असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. धाकदराऱ्याच्या योगानें व दंडेली करणाऱ्या लोकांचें भय पुढें करून सामान्य लोकांवर स्वतःच व्यवस्थित दंडेली करणें ही कांहीं खरी समाजसेवा नव्हे. थोडी जबरदस्ती पुरवली, थोडा स्वातंत्र्यनाश पुरवला, पण अनर्थकारी अव्यवस्था नको, अशी कृपण बुद्धि जनसमाजांत वावरत आहे तोंवर हें असेंच चालावयाचें. आणि अितकें करूनहि चोर—लुटारू अित्यादिकांच्या भयापासून परिपूर्ण रक्षण मिळत नाहीं तें नाहींच.

प्रथम आपण हें ओळखलें पाहिजे कीं, सुस्निग्ध व्यवस्था ही जशी मनुष्याच्या

लोक येतात. आजचे दुकानदार घरबसल्या दुकान चालविण्यास सोकावले आहेत. बैलांचा तांडा, गाड्यांची रांग अथवा जहाजांचा काफला घेऊन हिंडणारा वर्ग आणि दुकानदार यांची फारकत झालेली आहे, हें अनेक रीतीनें अनिष्ट आहे. या योगें सार्थवाहांचा वर्ग अगदीं असंस्कारी आणि गरीब होऊन गेला आहे, आणि दुकानदार वर्ग निदान आपल्या देशांत तरी बराच-सा आंधळा आणि साहसशून्य असा झाला आहे. सार्थवाह, दुकानदार व कारखानदार या तिन्ही बाजू जर अेकाच कुटुंबांत राहिल्या, तर कुटुंबें संघटित, समर्थ व समृद्ध होतील. मात्र कारखानदारी कल्पकवर्गाच्या नाशास कारणीभूत होऊं नये; याविषयीं खोलवर विचार करून व्यवस्था करावी लागेल. आज येथें त्याची अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं.

या वणिक्‌वर्गाकडे स्वाभाविकपणें समाजाची बरीचशी संपत्ति राहते. पण ती त्यानें स्वतःची आहे असें समजतां कामा नये. संपत्तीचा प्रवाह जसा सहजासहजीं या वर्णाच्या हातीं येतो, त्याचप्रमाणें सहजासहजीं सार्वजनिक हितासाठीं त्याच्या हातून संपत्ति सुटली पाहिजे. हें काम स्वेच्छेनें, धर्मबुद्धीनें आणि हौसेनें न झालें, तर याविषयीं सामाजिक नियमन कायद्याच्या द्वारा करावें लागेल. पण समाजांत धर्माचें साम्राज्य संपुष्टांत आणून कायद्याचें साम्राज्य वाढविणें हें सोपें भासत असलें, तरी संस्कृतीला हीनता आणणारें आहे हें विसरतां कामा नये.

भर्ता, कुशल [ कल्पक ] आणि वणिक् अर्थात् शेतकरी, कारागीर आणि दुकानदार या तीन वर्णांना प्रेरणा देणारा, त्यांना रस्ता दाखविणारा, आत्मोन्नति आणि सामाजिक कल्याण या उभय दृष्टीनें त्यांचा धर्म त्यांना लवून देणारा असा आचार्य, अितक्यांचा आपण विचार केला. आतां वर सांगितलेल्या त्रैवर्णिकांना संघटित करणारा, त्यांचें सामर्थ्य वाढविणारा, त्यांचा म्होरक्या—संचालक—धुरीण—या वर्गाचा अथवा वर्णाचा विचार करणें प्राप्त होतें. धुरीण म्हणजे समाजाची धुरा वहन करणारा जबाबदार आणि समाजाला अिष्ट दिशेनें खेंचून नेणारा पुढारी होय. याला योजक असेंहि म्हणतां येअील. द्रव्यबळ, बुद्धिबळ आणि संख्याबळ [ मनुष्यबळ ] तिन्ही याला वश असल्यानें याची शक्ति असाधारण आहे. धर्मबळ आणि तपोबळ असलेल्या दीर्घदर्शी

आचार्यांच्या खालोखाल यांचंच महत्त्व आहे. हा जेर स्वधर्मभ्रष्ट झाला, तर समाजाला रसातळास नेअील. आज पाश्चात्यांकडे हा वर्ग सामान्यपणें स्वार्थी झालेला आहे. संख्याबळाची सेवा करण्याच्या अैवजीं स्वार्थासाठीं संख्याबळाचा तो उपयोग करितो. यानें द्रव्यबळ आपल्याच ताब्यांत घेतलें आहे व बुद्धि-बळाला वाटेल तेव्हां विकत घेऊन तो भ्रष्ट करूं शकतो. यामुळें द्रव्यबळ आणि मनुष्यबळ यांचा परस्पर घोर विद्रोह तेथें माजला आहे. प्राचीन काळीं राजे-लोकांवर धर्माचा जो अंकुश असे, तसा अंकुश या वर्णावर असला पाहिजे; पण तो नाहीं. मनुष्यस्वभाव जसा षड्रिपूंना वश आहे तसा तो धर्मालाहि वश आहे, ही श्रद्धा तेथील समाजानें सोडून दिली आहे. धर्माचें स्थान कायदा-कानू आणि राजकीय नियमन यांनीं घेतलें आहे. यामुळें खरी प्रगति कुंठित झाली आहे. लोकशिक्षणानें जें कांहीं थोडेंफार धर्मजागृतीचें कार्य चालविलें आहे तें जर नसतें, तर तेथील समाजाचा नाश व्हावयास मुळींच वेळ लागला नसता. Noblesse oblige म्हणजे खानदानीचा धर्म—समाजांत ज्याचें वर्चस्व, महत्त्व आणि प्राधान्य, त्याचा धर्महि अतिशय उग्र आणि कठिण, हें तत्त्व—जेथें क्षीण झाला तेथें नरक जवळ आलाच म्हणावयाचा. नरक म्हणजे समाजबंधनें शिथिल होऊन समाजाचा होणारा विच्छेद.

या धुरीण वर्गांत सर्व प्रकारचीं महान् कार्यें करणारे, आणि लोकांची संघटित शक्ति वापरणारे संचालक, व्यवस्थापक, योजक आणि पुढारी आले. राज्यकर्ते लोक जर स्वतःला लोकसेवक समजून वागूं लागतील तर तेहि याच कोटींत येतील. प्रजाहितार्थ अंशतः प्रजापीडन करणें आवश्यक आणि अिष्ट आहे, अशी मनुष्यसमाजाचा उपमर्द करणारी बुद्धि ज्यांच्यामध्यें आहे, त्यांना धुरीण असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. धाकदराऱ्याच्या योगानें व दंडेली करणाऱ्या लोकांचें भय पुढें करून सामान्य लोकांवर स्वतःच व्यवस्थित दंडेली करणें ही कांहीं खरी समाजसेवा नव्हे. थोडी जबरदस्ती पुरवली, थोडा स्वातंत्र्यनाश पुरवला, पण अनर्थकारी अव्यवस्था नको, अशी कृपण बुद्धि जन-समाजांत वावरत आहे तोंवर हें असेंच चालावयाचें. आणि अितकें करूनहि चोर—लुटारू अित्यादिकांच्या भयापासून परिपूर्ण रक्षण मिळत नाहीं तें नाहींच.

प्रथम आपण हें ओळखलें पाहिजे कीं, सुस्निग्ध व्यवस्था ही जशी मनुष्याच्या

हाडींमासीं उतरलेली नाहीं, त्याचप्रमाणें अव्यवस्था आणि अंदाधुंदी हीहि मनुष्याच्या हाडींमासीं खिळलेली नाहीं. सत्तातंत्र असो वा नसो, व्यवस्था आणि अव्यवस्था दोन्ही समाजांत आहेत तितक्याच असणार. केवळ अव्यवस्थेच्या भयानें आपण अपमानास्पद आणि खर्चाळ असें व्यवस्थातंत्र विकत घेतों.

यापुढचा वर्ण तो प्रजारंजकांचा. गायन, चित्रकला, नटनाट्य, साहित्य-सेवा व शिल्प अित्यादि कलांच्या द्वारा लोकांना त्रिगुणात्मक आनंद देण्याचें काम हा वर्ण करतो. कलाद्वारा हृदयाची उन्नति किंवा अवनति होते, व म्हणून या वर्गाचें समाजावर प्रभुत्व असाधारण असतें. अेका काळीं या वर्गाला फावल्या वेळीं मनोरंजन करणाऱ्या विदूषकाचें किंवा खिदमतगाराचें स्थान असे. पण पूर्वकाळीं ऋषि, आचार्य किंवा धर्मकार यांच्या बरोबरीची याची योग्यता असे. हृदयांतील गूढ भावांना जागृत करून हृदयांतील कोमल, आर्य आणि ओजस्वी अशा भावांना हा पाणी चढवितो, ओप काढतो आणि अशा रीतीनें धर्म आणि नीतीचें काम सोप्या रीतीनें करतो. हा अिंद्रियगम्य वस्तु-द्वारा अिंद्रियातीत वस्तूंना मूर्त स्वरूप देतो; अतएव, हा अपरब्रह्म आहे. अशी या वर्णाची योग्यता आज लोक समजूं लागले आहेत. स्वास्थ्यप्रिय युगांत आणि भोगैश्वर्योंनीं कंटाळून गेलेल्या जीवनांत रंजकवर्णाचें महत्त्व वाढणें स्वाभाविक आहे.

अेवढें खरें कीं, जर आचार्यवर्णांतील अथवा धुरीणवर्णांतील व्यक्तींमध्यें कलाधर रंजकाची शक्ति असेल, तर त्यांचें कार्य अद्भुत सामर्थ्यानें सिद्ध होअील. त्याचप्रमाणें रंजकवर्णांतील संस्कारी पुरुषांत जर आचार्यांची ज्ञान-दृष्टि आणि प्रेरक शक्ति—त्याचप्रमाणें धुरीणांचें योजनासामर्थ्य आणि लोक-नायकत्व वसत असेल, तर त्यांच्या कलेस दैवी स्वरूप प्राप्त होअील. पण अेवढ्या मिलाफावरून रंजकवर्गाला समाजशिरोमणींचें स्थान देणें चुकीचें होअील. तीन वर्णांचे गुण अेकत्र वसणें अशक्य नाहीं. पण त्या त्या गुणान्वयें अनुरूप वर्णांचेंच माहात्म्य स्वीकारलें पाहिजे.

आतां राहतां राहिला समाजाच्या दयेला पात्र असा भृत्यवर्ण. अन्य वर्णांत ज्याला म्हणून कांहीं स्थान मिळविणें शक्य आहे, त्यानें भृत्यवर्णाची आ-जीविका कधींहि पसंत करूं नये. समाजसेवा म्हणून परोकारबुद्धीनें भृत्यकर्म

प्रत्येकानें केलेंच पाहिजे. तो प्राप्तधर्म होय. पण परिचारकाचा पेशा पत्करून आजीविका मिळवीत रहाणें हें होतां होओील तों टाळावें. या वर्णामध्यें सर्व प्रकारचे परिचारक, पाकसिद्धि करणारे, मंदिरांत पुजारी होऊन रहाणारे, पालखी-मेणा उचलून भोओीकाम करणारे, सर्व प्रकारचे खिदमतगार, कल्पकांच्या हाताखालीं केवळ सांगकामे होऊन राहणारे मजूर, हे सर्व येतात. या वर्णाकडून होणारी समाजसेवा लहानसहान नाहीं. समाजपोषक भर्त्यांहून यांची योग्यता जराहि कमी नाहीं. मोक्षदृष्ट्या यांची संतोषमूलक सेवा त्यांना उन्नतकरच आहे. पण भृत्यसेवा वाढल्यानें समाज पंगू होतो व हीच आजीविका करीत रहाणारा वर्ग कालेंकरून संस्कारशून्य होतो. म्हणून या वर्णाची संख्या वाढणार नाहीं अितकें समाजानें आत्मरक्षणार्थ पाहिलें पाहिजे.

अशा रीतीनें सात वर्णांचें सुस्निग्ध संघटन झाल्यास समाज संस्कारी, सामर्थ्यवान्, समृद्ध आणि सुखी होओील.

## साप्तवर्ण्य-विचार : सारांश

१ आचार्यः—ज्ञानशोधक, धर्मोपदेशक, अध्यापक, जीवनप्रेरक.

२ भर्ताः—समाजपोषक, शेतकरी, बागवान, विणकर, खाणीवाले, धनगर, गवळी.

३ कल्पकः—कौशल्ययुक्त-उपकरणवान-कारागीर, हुन्नरी तज्ज्ञ, सुतार, लोहार, गवंडी, पथिक, वैद्य, शिंपी, लेखक, चांभार.

४ वणिक्ः—सार्थवाह, दुकानदार, कारखानदार, सराफ.

५ धुरीणः—संचालक, व्यवस्थापक, राज्यकर्ता, पुढारी, योजक.

६ रंजकः—कलाधर, गायक, चित्रकार, शिल्पी, साहित्यसेवी, नट.

७ भृत्यः—परिचारक, आचारी, पुजारी, भोओी, मजूर, खिदमतगार.

# देशधर्म

देशधर्मान् जातिधर्मान् कुलधर्मांश्च शाश्वतान् ।
पाषण्डगणधर्मांश्च शास्त्रेऽस्मिन् उक्तवान्मनुः ॥

हिन्दुसमाजाचा प्राचीन व्यवस्थापक भगवान् मनु आपल्या स्मृतीच्या सुरवातीसच देशधर्म, जातिधर्म, कुलधर्म, पाखंडधर्म, गणधर्म वगैरे अनेक धर्मांचा उल्लेख करतो. मनुस्मृतीमध्यें हे सर्व धर्म सांगितले आहेत असें पहिल्या अध्यायाच्या शेवटीं लिहिलें आहे. सगळी मनुस्मृति तपासल्यास आज माल हे विविध धर्म तेथें आढळत नाहींत. मनुस्मृतीमध्यें फक्त वर्णाश्रमधर्म आणि संकरजातींचा धर्मच सांपडतो.

प्रत्येक व्यक्तीचा स्वतःचा जीवनधर्म असतो. तो वैयक्तिक असल्यामुळें त्याची अंमलबजावणी त्या व्यक्तीपुरतीच होत असते. अशा अनेक व्यक्तींचें अेक कुटुंब बनते. कुटुंबांमध्यें कुलधर्माचें प्राधान्य असतें. कुलधर्म हा व्यापक असल्यामुळें व्यक्तिधर्मानें त्याच्यापुढें नमतें घेतलें पाहिजे. कुलधर्म सांभाळूनच व्यक्ति आपला विकास साधूं शकते. जर व्यक्ति मोहान्ध होऊन कुलधर्म मोडील तर अेक क्षणभर त्या व्यक्तीला असें वाटेल कीं, आपण जास्त स्वतंत्र झालों, आतां आपला विकास होअील. पण शेवटीं व्यक्तीच्या असें अनुभवास येतें कीं, आपला विकास कुळांत राहूनच होऊं शकतो. कुळाचीं बंधनें तोडून तो होणार नाहीं. शरीररक्षण, बलसंवर्धन, ज्ञानप्राप्ति, कर्मकौशल्य, दीर्घायुष्य आणि यांच्याद्वारें मिळणारी तृप्ति, हे सर्व व्यक्तिधर्म म्हटले पाहिजेत. जोंपर्यंत श्रेष्ठधर्म आड येत नाहीं, तोंपर्यंत या आणि असल्या दुसऱ्या वस्तूंच्या प्राप्ती-साठीं सतत प्रयत्न करणें हें व्यक्तिधर्माचें कर्तव्य होय. पण कुलधर्मावर पाणी सोडून या गोष्टीमागें लागतां यावयाचें नाहीं. कुलधर्माशीं अविरोधी राहूनच व्यक्तिधर्माचें सेवन करणें विहित आहे. कुलधर्म असें सांगतो कीं, संततीसाठीं आअीबापांनीं आपलें सुख व फुरसत यांचा त्याग केला पाहिजे. कुटुंबांत जे लहान, अपंग, असहाय, असमर्थ असतील, त्यांच्या आवश्यकतांकडे लक्ष असलें पाहिजे. समर्थांनीं स्वतःवर जास्त अंकुश ठेवला पाहिजे. स्वतःची

शक्ति निर्बळ किंवा दुर्बळ अशा लोकांचें रक्षण करण्यांत खर्च केली पाहिजे. सामान्यपणें व्यक्ति ही व्यक्तीशीं न्यायानें बांधलेली असते असें म्हणतां येअील. पण कुटुंबांत प्रेम, सहिष्णुता आणि क्षमा यांचाच नियम चालू असतो. व्यक्तिधर्म हा केवळ व्यक्तीचा विकास पहात असतो. कुळधर्म हा व्यक्तीची सोय आणि सुख यांचा बळी देऊन देखील कुळाचा विकास अिच्छीत असतो. कारण, त्याची अशी श्रद्धा असते कीं, कुलबाह्य व्यक्ति-विकासापेक्षां कुळांत राहून कुलधर्माचा अंकुश स्वीकारून व्यक्ति आपला जो विकास साधते, तोच विकास श्रेष्ठ आणि स्थायी असतो.

कुटुंब हीच अेक अीश्वरकृत महान् आणि सनातन अशी संस्था आहे. तिचा कुलधर्म ही अत्यंत गंभीर वस्तु आहे. तिचें संस्करण करतां येअील, विकास करतां येअील, पण तिचा उच्छेद मात्र मुळींच करतां येणार नाहीं. अर्जुनानें देखील परंपरेनें असें अैकलें होतें कीं जो कुळधर्माचा उच्छेद करतो, त्याच्यासाठीं नरकवासच तयार करून ठेवलेला असतो. अशा कुलधर्माचे अथवा कुलपरंपरेचे तपशील शास्त्रग्रंथांत असणार नाहींत. कुटुंबसंस्था ही जवळजवळ अमर असल्यामुळें कुलधर्माचें स्मरण, पालन आणि विकास हीं कुटुंबीजनांच्या हातीं सुरक्षित असतात.

पण अशा कुळाचा महिमा मर्यादेंतच समाप्त होत नाहीं—त्यांतच सामावून जात नाहीं. कुळाला देखील त्याग हा करावा लागतोच. त्यागाशिवाय कोठेंहि कृतार्थता नाहीं. वर्णाश्रमधर्माचा आदर्श स्वीकारणाऱ्याच्या वांट्यास कुळानंतर जाति येते. जाति हा वर्णाचा पोटविभाग मानला जातो. आपल्या येथें वर्ण चारच आहेत. जाती मात्र किती आहेत कोण जाणें! वर्णाअितकी विशालता जेव्हां मनुष्य अंगीं बाणवीत नाहीं, तेव्हां त्याला जातीच्या आंतच रहावें लागतें. जसजसे संस्कार बाणले जातील तसतशी जातींची संख्या कमी झाली पाहिजे. पण आपल्या येथें तर जाती वाढतच आहेत. आणि कां वाढूं नयेत? समाजधर्म जेव्हां ढिला पडतो, संस्कारिता जेव्हां निस्तेज होऊं लागते, तेव्हां वर्ण आणि जाती छिन्नभिन्न न होतील, तट न पडतील, तर दुसरें काय होणार? वर्णांचा आधार समान आदर्श आणि समान राहणी यांवर आहे. जाति ही आपल्या धात्वर्थाप्रमाणेंच रक्ताचा संबंध दर्शविते. जातिधर्म प्राकृतिक आहे,

संस्कारांविषयीं तो पुष्कळ वेळां उदासीन असतो. यामुळेंच त्याच्यांत संकुचितता वाढण्याचा खूप संभव असतो. प्रेमवेडी आआी ज्याप्रमाणें आपल्या मुलाच्या गुणदोषांचा विचार करीत नाहीं, आपलें तेवढें सुंदर, आपलें तेवढें चांगलें, या मोहास चिकटून राहते, त्याप्रमाणें जातिधर्म हा सजातीयांकडून आपलेपणाचीच अिच्छा करतो. अेकमेकांना ओळखलें, अेकमेकांचा मान ठेवला, अेकमेकांना मदत केली म्हणजे झालें. मग आचरणाच्या बाबतींत फारशी चिकित्सा करण्याचें कारण नाहीं. हा झाला जातिस्वभाव. जातीयवाद ही देखील जातीस्वभावाचीच मोठी आवृत्ति आहे.

अशा प्रकारच्या जातिधर्मावर खरा अंकुश वर्णधर्माचा असला पाहिजे. जातीनें वर्णाचा आदर्श, वर्णाचीं कर्में, वर्णाचें ब्रीद, यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. जात जर वर्णविमुख होअील, तर ती निर्बल व निष्प्रभ झालीच म्हणून समजावें.

जात जन्मावरून नक्की होत असल्यामुळें सर्वसाधारणपणें तिच्यांतून बाहेर पडण्याचें कारण असत नाहीं. जो संघार्शी प्रामाणिक असेल तो जातीमध्यें नेहमीं सुरक्षित असतो. पण वर्णधर्म हा आचारमूलक असतो. माणूस जर आचार, संस्कार आणि ब्रीद सोडून देअील, तर तो वर्णच्युत व्हावयाचाच. यामुळेंच वर्णाचा आचार निश्चित करण्याची आवश्यकता असते. या आवश्यकतेंतूनच स्मृतींची रचना होते. जसजसा काळ बदलत जातो, तसतसे स्मृतिकार तो आचारधर्म कठिण किंवा सोपा करीत जातात. प्रत्येक काळांतील शीलसंपन्न जिवंत समाजपुरुष हे त्या त्या काळचे स्मृतिकारच होत. आतां ते आपला हा अधिकार वापरतील किंवा नाहीं ही गोष्ट वेगळी.

वर्णाश्रमधर्माबरोबर पाषंडधर्म आणि गणधर्म हे असलेच पाहिजेत. प्रत्येक समाजांत शास्त्रप्रामाण्य न स्वीकारणारा असा अेक वर्ग असतोच. अशा वर्गाला 'पाषंड' असें म्हणतात. मुळांत 'पाषंड' ही शिवी नव्हती. बौद्धधर्मी अशोकानें 'सर्वे पाषंडा वसेयुः' असें म्हणून सर्वांना अभयदान दिलें होतें. अर्थात् त्याच्या मनांत धर्म म्हणचे बौद्धधर्मच होता हें उघड आहे. पाषंड हे जरी अमुक अेका शास्त्राचें प्रामाण्य मानीत नसले, तरी तेवढ्यावरून

ते धर्मबाह्य किंवा धर्मशून्य होत नाहींत. त्यांना देखील आपला असा धर्म असतोच.

हिन्दुसमाजाच्या भरभराटीच्या शेवटच्या दिवसांत वर्णाश्रमधर्मानें राजशासनाला सर्वोत्कृष्ट आणि अपरिहार्य मानलें होतें. पण हिन्दुसमाजानें लोकशाहीचा कांहीं कमी अनुभव घेतलेला नाहीं. जेथें लोकसत्ता चालत असेल तेथें राजधर्म काय कामाचा? तेथें गणधर्मच हवा.

अशा प्रकारें व्यक्तिधर्म, कुलधर्म, जातिधर्म, वर्णाश्रमधर्म, पाषंडधर्म आणि गणधर्म हे सर्व मिळून समाजधर्म संपूर्ण होतो. म्हणून प्रत्येक धर्म आपापल्या परीनें संपूर्ण असतो. पण आपण जेव्हां परदेशांत जातों किंवा परदेशी लोक आपल्या देशांत येऊन राहतात, तेव्हां त्यांना हिन्दुधर्म, पारशीधर्म, मुसलमानीधर्म, ख्रिस्तीधर्म, वगैरे स्वतंत्र महाधर्मांव्यतिरिक्त अेक देशधर्महि पहावा लागतो.

देशधर्माकडे मनुष्यसमाजानें—आणि विशेषतः हिन्दुस्थाननें—कांहीं कमी लक्ष दिलेलें नाहीं. अनेक धर्म जेव्हां अेकत्र राहूं अिच्छितात, तेव्हां त्यांनीं अेक तर हिंस्र श्वापदांप्रमाणें परस्परविनाश करणाऱ्या शिकारधर्माचा आश्रय केला पाहिजे, किंवा प्रत्येक धर्माचें महत्त्व जाणून त्या त्या धर्माच्या जन्मस्थानानुसार व संस्कृत्यनुरूप त्याची प्रतिष्ठा निश्चित करून देशधर्म ठरविला पाहिजे. अरबस्ताननें आपला देशधर्म—मग तो कसा कां असेना—निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. जो मुसलमान नाहीं त्यानें अरबस्तानांत राहतां कामा नये असा आग्रह तेथील लोकांनीं आतांपर्यंत बाळगला आहे. अमेरिका देखील अेक व्यवहारी देशधर्म—मग तो कसा कां असेना—नक्की करीत आहे. तुम्ही वाटेल त्या धर्माचे असा; जर तुम्ही गोऱ्या कातडीचे असाल, तरच तुम्हांला अमेरिकेंतील नागरिकाचे हक्क मिळूं शकतील. तुम्ही कोणत्याहि धर्माचे असलात तरी तुम्हांला अमेरिकेंत बहुपत्नीकत्वाची प्रथा चालू ठेवतां येणार नाहीं. अशा प्रकारचे देशधर्माचे नियम अमेरिकावासीयांनीं नक्की केले आहेत, आणि अजूनहि करतील. जो कायद्याच्या जोरावर चालवितां येअील असा अेक देशधर्म—मग तो कसाहि असो—दक्षिण आफ्रिकेंतील गोरे लोक प्रस्थापित करूं अिच्छीत आहेत. दक्षिण आफ्रिकेंत अमुक लोकच येऊं शकतात

आणि अमक्या अटींवरच राहूं शकतात अशा तऱ्हेचे कडक नियम ते लोकांकडून पाळविण्याची कोशिस करीत आहेत.

सहज ध्यानांत यावें म्हणून हीं तीन उदाहरणें दिलीं. पण त्यांच्या देशधर्मांत संपूर्ण मानवजातीच्या विकासाचा योग्य प्रकारें विचार केला आहे असें मात्र मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. युरोप–अमेरिकेंतील लोक जेव्हां परदेशांत जाऊन राहतात तेव्हां तेथील मूळ रहिवाशांच्या विकासाचा जणुं ते विचारच करीत नाहींत.

आपल्या येथें ओश्वरी संकेताप्रमाणें जगांतील सर्वच धर्मांचें अेक मोठें कुटुंब बनत आहे; म्हणून आपला देशधर्म विशाल, सर्वग्राही, सर्वसहिष्णु आणि सर्वोदयसाधक असला पाहिजे. जेव्हां विचारे पारशी लोक या देशांत आले व त्यांनीं धर्मस्वातंत्र्याची मागणी केली, तेव्हां त्या वेळच्या सत्ताधीशांनीं त्यांच्याकडून देशधर्म–पालनाचें वचन घेतलें. पारशांनीं येथील देशधर्म स्वीकारला; ते येथें सुखानें राहिले, व येथलेच झाले. जर हिन्दुसमाज नेहमींच समर्थ राहिला असता, हिन्दुधर्मानें नेहमीं आपल्या तेजाचें रक्षण केलें असतें, तर आतांपर्यंत त्यानें जगासमोर आदर्श देशधर्म ठेवला असता. कुळधर्म जितका सनातन आहे तितकाच देशधर्महि सनातन होऊं शकतो. कारण त्यांत विस्तारभेद आणि विकास करण्याची पूर्ण मोकळीक ठेवून मुख्य जीवनतत्त्वांच्याच बाबतींत आग्रह राखणें शक्य असतें. सत्य आणि अहिंसा हाच देशधर्माचा पाया होऊं शकतो.

> सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
> सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात्॥

अथवा—

> सर्वस्तरतु दुर्गाणि सर्वो भद्राणि पश्यतु।
> सर्वः सद्बुद्धिमाप्नोतु सर्वः सर्वत्र नन्दतु॥

हा त्याचा आशय असेल.

# वर्ण आणि ज्ञाति

अेकदोन मित्रांनीं मला मुद्दाम विचारलें आहे, "वर्णव्यवस्थेविषयींचे तुमचे विचार बदलले आहेत काय ? पूर्वी तुम्ही जात मानीत होतां, ज्ञाति-संस्थेची नेहमीं तरफदारी करीत होतां; पण आजकाल तुम्हांला ज्ञातिसंस्थेंत दोषच दिसतात. तरी तुमच्या विचारांत तत्त्वतः कांहीं फरक पडला आहे किंवा कसें हें कळवाल काय ? आणि जर तो तसा पडला असेल, तर कशामुळें ?"

याचें उत्तर 'होय' किंवा 'नाहीं' या सडेतोड शब्दांत देतां यावयाचें नाहीं. कांहीं फेरफार असे असतात कीं ज्यांना तात्त्विक म्हणतां येणार नाहीं; पण तरीहि जे महत्त्वाचे व कायमचेहि असतील.

वर्णव्यवस्थेवरील माझा विश्वास पूर्वीअितकाच दृढ आहे. त्याचें स्वरूप जास्त जास्त स्पष्ट होत जात आहे. वर्ण आणि जात यांच्यांत कांहींसें साम्य आहे; पण या दोन्ही गोष्टी अगदींच वेगवेगळ्या आहेत. जातीचा आधार जन्मावर आहे. वर्णाचाहि आधार जर जन्मावरच राहील, तर तें अिष्ट आहे काय ? वर्ण ज्याप्रमाणें बहुतांशानें आजीविकेच्या अनुसार असतो, त्याप्रमाणें जात नसते. हिंदुस्थानांतील असंख्य जातींपैकीं कांहीं थोडया कारागीर जाती आणि श्रमजीवी जाती धंद्यांनुसार बनलेल्या आहेत. आणि खेड्यामध्यें त्या त्या धंद्याच्या विशिष्ट धर्मपालनाचा आग्रह बाळगण्यांत येतो. या बाबतींत धर्माचें ज्ञान जर शुद्ध असेल, अद्यतन असेल, आणि संपूर्ण असेल, तर अशी जात वर्णाचाच अेक पोटविभाग गणली जाअील.

प्रथम मी जातीला वर्णाचा अेक पोटविभाग मानीत असें. पण ब्राह्मण, वैश्य वगैरे बुद्धिजीवी लोकांच्या ज्ञातिव्यवस्थेंत रोटी-व्यवहार, बेटी-व्यवहार आणि विशेषतः सामुदायिक स्वार्थाचें संघटन अेवढ्याच उद्देशानें जातीचा आश्रय घेतला गेलेला पाहून मी या निर्णयावर आलों आहे कीं, जात आणि वर्ण या दोन परस्परभिन्न गोष्टी तर आहेतच, पण शिवाय त्या परस्परविरोधीहि असतील. वर्ण हा समस्त समाजाचा–विराट् समाजाचा–अेक अंश आहे, अेक घटक

आहे, सामाजिक कलेवराचें अेक गात्र आहे, याची जाणीव वर्ण विसरूं शकत नाहीं. सामाजिक धर्मांत अमुक भाग सर्व वर्णांना समान असतो, त्याचें पालन सर्व वर्णांनीं सारख्या प्रकारें आग्रहपूर्वक करावयाचें असतें. शिवाय, प्रत्येक वर्णाचा स्वधर्महि असतो. वर्णाच्या स्वधर्माचें स्वरूपच असें असावें कीं, स्वतःचें हित साधतांना त्याच्या हातून सगळ्या समाजाचें म्हणजे सर्वच वर्णांचें व वर्णबाह्य लोकांचें देखील जास्तींत जास्त हित व्हावें; कोणाचेंहि अहित होऊं नये. प्रत्येक वर्णानें हें मान्य करावें कीं, दुसऱ्या वर्णांच्या बाबतींत त्याचीं अमुक कर्तव्यें नक्की आहेतच. सर्वांची सेवा हेंच प्रत्येक वर्णाच्या अस्तित्वाचें कारण आणि समर्थन आहे. अितर वर्ण टिकतील तरच मी टिकेन, हें प्रत्येक वर्णानें समजून राहिलें पाहिजे. वर्णांमध्यें योग्य परस्परावलंबन, परस्परसहकार्य आणि समस्त सामाजिक जबाबदारींचीं तत्त्वें असतात. ज्याप्रमाणें शरीरापासून वेगळे झाल्यानंतर हातापायांना स्वतंत्र अस्तित्व असत नाहीं, त्याप्रमाणेंच वर्णांचेंहि आहे. हात जर आपलीच सेवा करूं लागला, सगळ्या शरीराची सेवा करण्याचें त्यानें सोडून दिलें, तर त्या हाताचें जीवन व्यर्थ आणि अशक्य आहे. वर्णांचेंहि असेंच आहे.

जातीच्या बाबतींत मात्र असें दिसून येत नाहीं. जात ही स्वयंपूर्ण समाजाची रचना करण्याचा प्रयत्न करीत असते. अितर जातींशीं सहकार्य केल्याशिवाय तिला गत्यंतर नसतें ही गोष्ट वेगळी. पण जातीनें या गोष्टीचा स्वीकार केला असल्याचें दिसून येत नाहीं. अितर लोकांपासून वेगळें होऊन आपली टोळी मजबूत बनविणें, आपला वेगळेपणा वंशपरंपरा चालू ठेवणें, अेवढाच आग्रह आतां उरलेला आहे. आपल्या जातीच्या सबंध टोळीशीं प्रत्येक माणसानें अेकनिष्ठ रहावें अेवढेंच आजची जात अिच्छिते. जातींत जर कोणी जबरदस्त माणूस असेल, तर त्याच्याकडून अेवढ्याहि गोष्टीची मागणी करण्याची हिम्मत जातीला होत नाहीं. केवळ टोळीधर्मी होऊन ती त्या जबरदस्त व्यक्तीच्या मागोमाग ओढली जाते. सर्व समाजाच्या हिताचा विचार करणें, आपल्या स्वधर्माप्रमाणें सगळ्या समाजाच्या सेवेंत तल्लीन होऊन जाणें, याला आपल्या धर्मांत यज्ञ असें म्हटलें आहे. जो हा यज्ञ करणार नाहीं आणि फक्त आपल्या स्वार्थाचाच विचार करील, तो यज्ञविमुख माणूस किंवा समूह पाप

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ७३३६० वि: निबंध
क्रमांक १६५५ नोंद दि: २५-२-७९


ग्रात असतो असें गीतेनें स्पष्ट सांगितलें आहे. जी जात सर्व समाजाचा द्रोह करते, जो समाज सर्व राष्ट्राचा द्रोह करतो, तो पापी आहे. आणि ती जात समाजाचा नाश करून शिवाय स्वतःहि निश्चित विनाशाच्या संकटांत जाऊन पडते. जेथें अशी जात आहे तेथें व्यापक सामाजिक जबाबदारीची जाणीव मरून गेलेली दिसून येते.

ज्यावेळीं मी जातीचें समर्थन करीत होतों, त्यावेळीं देखील मीं असें सांगितलें होतें कीं, जातीची कसोटी अजून चालू आहे. राष्ट्रीय संकटें ओळखून त्यांच्याविरुद्ध धर्मभावनेनें लढण्याची तयारी जर जातींत नसेल, तसें करण्याच्या जबाबदारीचा स्वीकार किंवा जाणीवहि नसेल, तर ती जात नापास झाली आहे, निर्जीव झाली आहे, असें समजलें पाहिजे. मागील दोन चार पिढ्यांत आपलें राष्ट्र जागृत झालें आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक, साहित्यिक वगैरे अनेक क्षेत्रांत समाज पुरुषार्थ करीत आहे. नवीन नवीन प्रयोग आणि पराक्रम चालू आहेत. यांत आपल्या जातींनीं जात या नात्यानें कितीशी कामगिरी बजाविली आहे हें तपासण्याची वेळ आतां आलेली आहे. चांगलीं चांगलीं माणसें देखील अेकदां कां जमातींत बसलीं, कीं मग तीं अेकतर संकुचित बनतात किंवा अपंग बनून जातात. जातीबाहेरील लोकांना किंवा प्राण्यांना सहजासहजीं जी कांहीं मदत होत असेल ती होवो, पण तेवढ्यानें कांहीं दारिद्र्य फिटणार नाहीं. कांहीं प्राण्यांना खावयास घालण्याचा व वांचविण्याचा धर्म स्वीकारून जात असें समजते कीं, जणुं कांहीं तेवढ्यानेंच गंगेंत घोडे न्हाले. सामाजिक जबाबदारी पत्करून सगळ्या समाजाची सेवा करण्याचा संघटित प्रयत्न अेकाद्या जातीनें केल्याचें दिसून येत नाहीं. युरोपांतील राष्ट्रांप्रमाणें आपल्या जाती बेशरम स्वार्थावर आपला कार्यभाग उरकूं पहात आहेत; आणि त्यामुळें त्या विराट् समाजाच्या दृष्टीनें शापरूप सिद्ध होत आहेत.

आणि जातींची शक्ति तपासल्यास काय अनुभव येतो? जातींतील मुलांच्या आणि कधीं कधीं मुलींच्या शिक्षणासाठीं शिष्यवृत्त्या देणें, छात्रालयें काढणें, त्यासाठीं फंड गोळा करणें, जातीचा जुना अितिहास आणि तिच्यासंबंधींच्या पौराणिक कथा कशाबशा संग्रहित करणें आणि जात्यभिमानांत मग्न होणें,

६५२१

अेवढेंच काम जातींच्या हातून होऊं शकलें आहे. सामाजिक आर्थिक, कलाविषयक आणि अशाच दुसऱ्या क्षेत्रांत आपल्या विशिष्ट आवश्यकता योग्य प्रकारें तपासून पाहून त्यांना योग्य अशी स्वतंत्र शिक्षणपद्धति नक्की करून ती चालविण्याअितका पुरुषार्थहि अेकाद्या जातीनें अजून पूर्णपणें करून दाखविलेला नाहीं. उलट, जातीनें पुष्कळ वेळां आपली शक्ति प्रगतीच्या मार्गांत कांटे पसरविण्याच्या कामींच खर्च केली आहे. जणुं आपलें अस्तित्वच धर्मपालनामध्यें विघ्नरूप असावें, अशी स्थिति तिनें करून टाकली आहे.

आज समाजांत वर्णव्यवस्था मुळीं नाहींच. वर्णांची वृत्ति जगांत सगळीकडेच असूं शकते; पण तिची ओळख करून घेऊन तिला निश्चित आणि शास्त्रीय रूप देणें हें वर्णव्यवस्थेचें कर्तव्य आहे. तें आज होत नाहीं. वर्णव्यवस्थेचा जो लोप झाला त्यास अनेक कारणें आहेत; पण त्यांत जातहि कांहीं कमी जबाबदार नाहीं. आपण जसजसा वर्णव्यवस्थेच्या पुनर्रचनेचा प्रयत्न करूं, तसतसा आपल्याला हा अनुभव येअील कीं, ज्ञातिव्यवस्था ही वर्णव्यवस्थेच्या कितीतरी विरुद्ध आहे !

## वर्णव्यवस्था

वर्णव्यवस्था गुणकर्मविभागशः आहे. यांपैकीं गुण बऱ्याच अंशीं आनुवंशिक असल्याकारणानें आणि कर्म म्हणजे उपजीविकेचा उद्योग किंवा धंदा यांत देखील कुळपरंपरेचें महत्त्व अधिक असल्यानें वर्णव्यवस्था मनुष्याच्या जन्मानुरूप ठरविली गेल्यास त्यांत अशास्त्रीय किंवा अन्यायाचें असें कांहींच नाहीं. According to Birth or according to Worth असा काल्पनिक विरोध उत्पन्न करून चातुर्वर्ण्याचा विरोध करण्यांत कांहींच अर्थ नाहीं गुणकर्मविभाग बहुतांशीं जन्माप्रमाणेंच पडत असल्याकारणानें चातुर्वर्ण्य अीश्वरकृत ( मया सृष्टं ) मानलें गेलें आहे. पण चातुर्वर्ण्याचें तत्त्व गुण आणि कर्म आहे यांत शंका नाहीं. गीतेमध्यें जेथें ब्राह्मणांचें कर्म म्हणून सांगितलें आहे तेथें ते गुणच आहेत. क्षात्रकर्माविषयीं पण असेंच म्हणतां येअील. वैश्य शूद्रांच्या बाबतींत मात्र जीं स्वाभाविक कर्में म्हणून सांगितलीं आहेत तीं कर्मेंच आहेत.

ब्राह्मण आणि क्षत्रिय हे दोन्ही वर्ण प्रत्यक्ष रीतीनें समाजसेवेला वाहिलेले असल्यानें त्यांची आजीविका समाज चालवितो. वैश्य आणि शूद्रांना मात्र आजीविकाप्राप्त्यर्थ विशिष्ट कर्में करावीं लागतात. यामुळेंच असा भेद केला असावा. मनुस्मृतीनें मात्र ब्राह्मणांसाठीं सहा कर्में सांगून त्यांपैकीं तीन ( अध्यापन, याजन व प्रतिग्रह ) आजीविकेसाठीं, आणि तीन ( यजन, दान व अध्ययन ) धर्मासाठीं अर्थात् समाजसेवेसाठीं करावींत असें सांगितलें आहे. यांपैकीं अध्यापनद्वारा आजीविका मिळत असली, तरी त्याचा प्रधान उद्देश समाजसेवा हाच आहे. आजीविकेसाठीं अध्यापन करणारा उपाध्याय ब्राह्मण-वर्गांत देखील विशेष प्रतिष्ठा पावत नाहीं.

कोणत्याहि धंद्यांत मनुष्य वर्णाप्रमाणें भिन्नवृत्तीनें राहूं शकेल. शिंप्याच्या मोठ्या दुकानांत रोजची मजुरी घेऊन टाके मारणें, बटनें शिवणें वगैरे फालतू कामें करणारा शूद्र-शिंपी होय. शिवणकामाचें मोठें दुकान चालविणारा शिंपी वैश्यवर्णाचा शिंपी म्हणतां येईल. शहरांतील सर्व शिंप्यांना संघटित करून समाज आणि सरकार यांच्याविरुद्ध प्रसंगविशेषीं संप करून शिंपी जातीच्या हक्कांचें संरक्षण करणारा क्षत्रिय-शिंपी असें म्हणतां येईल; आणि शिवण-कामाचा वर्ग चालवून नवीन नवीन लोकांना त्या कलेचें सांगोपांग ज्ञान न चोरतां देणारास ब्राह्मण-शिंपी असें म्हणतां येईल. ( 'यतिधर्मसंग्रह' या ग्रंथांत दहा प्रकारच्या ब्राह्मणांचें वर्णन अत्रिस्मृतींतून उद्धृत केलें आहे तें अवश्य पहावें. त्यांत क्षत्रिय-ब्राह्मण, वैश्य-ब्राह्मण, म्लेच्छ-ब्राह्मण अित्यादि वर्ग पाडून त्यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. जाती आणि वर्ग या दोन तत्त्वांच्या मिश्रणानें असल्या प्रकारचें वर्गीकरण उत्पन्न होतें. )

येथवर गुणशः या बाजूचा विचार केला. पण वर्णव्यवस्था ही मुख्यतः समाजांत चालू असलेले सर्व अिष्ट धंदे आनुवंशिक परंपरेनें चालून समाज-द्रोही चढाओढ बंद करण्यासाठींच रचली गेली आहे.

समाजसेवेसाठीं परोपकारवृत्तीनें वाटेल त्यानें स्वतःला साधेल असें वाटेल तें काम करावें. कारण, यांत आजीविकेची चढाओढ नाहीं. आजीविका पत्करावयाची ती मात्र वंशपरंपरेनें जी प्राप्त असेल ती, अथवा तत्सदृशच अेकादी पत्करावी हा वर्णव्यवस्थेचा आग्रह आहे. आणि म्हणून सर्व वर्ण

समाजाच्या दृष्टीनें समान गणले गेले आहेत. प्रत्येक वर्ण आपल्या ठायीं श्रेष्ठ आहे असा कल्याणकारी सिद्धांत नसला, तर चढाओढ थांबावयाची नाहीं; आणि जगांतील द्रोह, विग्रह आणि असूया हीं बंद पडावयाचीं नाहींत. आनुवंशिक संस्कारांमुळें स्वकर्म व स्वधर्म यांचें अनुशीलन करण्यांत असाधारण कौशल्य कमावलें जातें. सामाजिक दृष्टीनें हा फारच मोठा लाभ आहे. वकिलाच्या मुलाला बाळपणापासून वकिली धंद्याचें बाळकडू मिळतें. मोठेपणीं ठरलेलीं अशीलेंहि प्रथमपासून कायमचीं मिळतात. आणि अशा रीतीनें अशील–वकील यांच्यामध्यें घरोब्याचा संबंध दृढावतो. कोणताहि धंदा पैसा उकळण्यासाठीं करूं नये असा आर्यसमाजशास्त्राचा नियम असल्यानें आणि दरेक धंद्याचे प्रतीचे दर 'सर्वभूतहिते रताः' अशा निःपक्ष व निःस्पृह समाजसेवक ऋषींनीं नक्की केले असल्याकारणानें भिन्न धंद्यांमध्यें मत्सर असण्याचें कारण नाहीं.

एकाद्या अपवादात्मक व्यक्तीला स्वतःच्या पिढीजाद धंद्याची गोडी नसेल आणि दुसराच एकादा धंदा विशेष अनुकूल दिसत असेल; पण अशा अपवादावरून समाजव्यवस्था व्यवस्थाशून्य किंवा तंत्रशून्य करणें हें बुद्धि-शून्यतेचें लक्षण आहे. उपजीविकेची व्यवस्था केवळ समाजाच्या हिताच्या दृष्टीनेंच करण्यांत व्यक्तीचा विकास कुंठित होतो असें मानण्याचें कांहींच कारण नाहीं. शाली विणून पोट भरणारा कबीर आणि तंबू तयार करून स्वतःचें व स्वतःच्या शिष्यांचें पोषण करणारा सेंट पॉल यांचा कोणत्या बाजूचा विकास कुंठित झाला होता?

स्त्रिया मुख्यत्वें शिशुसंगोपनांत गुंतल्या असल्यानें त्यांना आजीविकेसाठीं स्वतंत्र धंदा करण्याची आवश्यकता नसावी. पतीच्या धंद्यांत तिनें हातभार लावला म्हणजे त्यांतच सर्व कांहीं आलें. वस्तुस्थिति अशी असल्याकारणानें गोत्राप्रमाणें वर्णाच्या बाबतींतहि निश्चय करितां येईल कीं, पतीचा जो वर्ण तोच पत्नीचा वर्ण. जेथें रहाणी, करणी आणि विचारसरणी परस्परानुकूल आहेत आणि दुसरी कोणचीहि आक्षेपार्ह गोष्ट आड येत नाहीं, अशा ठिकाणीं वर्णांतर विवाह झाले, तरी त्यांत समाजद्रोह अथवा धर्महानि कसलीच नाहीं.

असले वर्णांतर विवाह करण्याचा आपण आग्रह धरून बसलों तरी ते फारसे होणार नाहींत. आणि समाजहितैषी लोक योग्य अपवादांना विरोध न करितां आशीर्वादच देतील, तर सामाजिक वातावरण निरोगी आणि जिवंत राहील.

धर्माचें अध्ययन आणि आचरण, तसेंच कालानुरूप संस्करण, यांना प्राधान्य देऊन समाजांतील संस्कार, ज्ञान, कौशल्य आणि पराक्रम हीं वाढविण्यासाठीं जे लोक समाजसेवेच्या कामास स्वतःला वाहून घेतील ते ब्राह्मण.

धर्मशास्त्राचें ( अर्थात् यामध्यें समाजशास्त्र पूर्णपणें आलें ) संपूर्ण अध्ययन करून आणि समाजाच्या सर्व व्यवहाराची आवश्यक तितकी माहिती करून घेऊन समाजांतील सर्वच वर्गांच्या आणि घटकांच्या रक्षण-पालनाची जबाबदारी निःपक्षपातपणें आणि निरलसपणें जो पार पाडतो तो क्षत्रिय.

समाजाच्या नित्य वर्धमान अशा निरनिराळ्या अंगांना उपयोगी अशा वस्तू तयार करून लोकांना विकणारे अथवा समाजोपयोगी अनेक प्रकारचें ज्ञान आणि कौशल्य कमावून समाजाला तें विकत देणारे, आणि वस्तू किंवा कौशल्य प्राप्त करण्यांत, विकण्यांत आणि स्वतःच्या जीवनांत, जे लोक धर्माचे म्हणजे समाजहिताचें उल्लंघन करीत नाहींत ते वैश्य.

परिचर्या म्हणजे अंगसेवा देणें किंवा घेणें ही समाजहिताच्या दृष्टीनें फारशी हितावह नाहीं. जीं कामें प्रत्येकानें स्वतःच केलीं पाहिजेत तीं दुसऱ्याकडून करून घेण्यांत उभयपक्षीं व्यक्तीचें व समाजाचें अनहितच आहे. परिचर्या देणारे-घेणारे परस्पर-आश्रितच होत. वृद्धजन, रुग्णजन, दुर्बळ अथवा मूर्खजन आणि बालक हेच स्वभावतः परिचर्येचे अधिकारी आहेत. अशांची परिचर्या समाजांतील कुटुंबांतील लोकांनीं वेळांत वेळ काढून आद्य धर्म समजून केली पाहिजे. परिचर्या हा आजीविकेचा धंदा होतां कामा नये. समाज जेव्हां हीन होतो, तेव्हां समाजसेवेच्या क्षेत्रांत धंदेवाईक लोक घुसतात आणि सेवेचीं कामें धंद्याचीं होऊन बसतात.

परिचर्या समाजहितदृष्ट्या भयावह आहे ही दृष्टि प्राचीन आर्यांत जितकी जागृत असावयास पाहिजे होती, तितकी ती नव्हती. प्राचीन काळचे आर्यसदृश ग्रीक, यवन लोक तर मानीत कीं, ‘परिचारक गुलाम हे समाजाचें

स्वाभाविक अंगच होत.' परिचर्यादोषामुळें आर्यसंस्कृति आणि ग्रीकसंस्कृति दोन्ही फारच खालावल्या असें आपण आज स्पष्ट पाहूं शकतों. यासाठीं गुलाम, शूद्र आणि अंत्यज अित्यादि वर्गांचा आपण नव्यानें विचार केला पाहिजे.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तिन्ही वर्ण संस्कारप्रधान आहेत. हे संस्कार घेण्याची ज्यांची पात्रताच नाहीं अथवा ज्यांना संस्कार देण्यांत समाज अयशस्वी झाला, अशा लोकांना जी आजीविका राहाते ती परिचर्येचीच. परिचर्या करणाऱ्यानें अेकच गुण दाखवावयाचा असतो. तो म्हणजे नम्रता, संतोष अर्थात् असूयेचा अभाव.

अेका बाजूनें परिचर्येचें क्षेत्रच कमी कमी करून टाकणें आणि दुसऱ्या बाजूनें शिक्षणशास्त्रांत नवीन नवीन प्रयोग करून संस्कारदानांतील निष्फळतेचें क्षेत्र अगदीं संपुष्टांत आणणें हें समाजाच्या उत्कर्षाचें लक्षण आहे. असें केलें असतां शूद्र हा वर्ण नाहींसाच झाला पाहिजे. ज्या समाजांत शूद्रवर्ण मोठा आहे, तो समाज गळ्यांत मोठा धोंडा बांधून पोहूं पहात आहे, असें म्हटलें पाहिजे. असा समाज पराधीनच व्हावयाचा.

शिक्षण आणि स्वावलंबन यांच्या विकासानें शूद्रवर्णाचें स्थान नाहींसें झाल्यावर बाकीच्या तीन वर्णांचा विचार करूं. आळस आणि विलास हे दोन दोष जर कमी झाले, तर लोभ आणि मत्सरहि कमी होतील. संतोष आणि पराक्रम या दोन गोष्टी जर पूर्ण प्रमाणांत वाढल्या, तर कोणी कोणास लुटणार नाहींत. कोणी कोणाचा अन्याय करणार नाहींत. असें झाल्यास प्रजारक्षणाकडेच स्वतःचें आयुष्य वाहून घेणाऱ्या क्षत्रियांची संख्या आपोआप कमी होअील. समाजांत रोगराअी वाढूं देत आणि डॉक्टर लोकांचा धंदा जोरानें चालू दे असें ज्याप्रमाणें आपण अिच्छीत नाहीं, त्याचप्रमाणें समाजामध्यें लूटफाट, अन्याय, जबरदस्ती वाढावी व शेजारचीं राष्ट्रें वाघालांडग्यांसारखीं असावींत आणि त्यांच्यापासून प्रजेचें रक्षण करण्याची संधि क्षत्रियांना मिळून त्यांची प्रतिष्ठा आणि भरभराट वाढावी, अशी अिच्छा करणेंहि अयोग्यच होअील. आगीचा बंब, दुष्काळाचीं कामें आणि दवाखाने कामावांचून बेकार पडावेत अशी ज्याप्रमाणें आपण अिच्छा करितों, आणि तरीहि या गोष्टी जय्यत तयार ठेवितों, त्याप्रमाणें क्षत्रियवर्ण रक्षणपरायण, निकरानें लढणारा, जिवाची

पर्वा न राखणारा आणि पक्षपातरहित, त्याचप्रमाणें व्यसनरहित असावा. अशी तयारी ठेवूनहि समाजामध्यें आदर्श माणुसकी नांदू दे आणि क्षत्रिय-वर्णाची जरूरच उरणार नाहीं असें होऊं दे अशीच अिच्छा केली पाहिजे.

जोंपर्यंत जन्मतःच मनुष्यप्राणी शिक्षणसंपन्न आणि संस्कारसंपन्न असणार नाहीं, तोंपर्यंत ज्ञानदान करणारा वर्ग आवश्यक असणारच. या वर्गाच्या हातीं सत्ता आणि मत्ता दोन्ही नसाव्यात. सत्य आणि सेवा, स्वावलंबन आणि गरिबी यांच्या जोरावरच त्यांनीं संतोषसमाधानानें असावें; अशी व्यवस्था झाल्यानें हा वर्ग वाढल्याचें कधींच दुःख किंवा अरिष्ट वाटणार नाहीं. पण याची संख्या नेहमीं परिमितच असणार. ब्राह्मणाचा आदर्श कडक असल्यानें आनुवंशिक संस्कार असतील तरच त्याचें पालन सोपें होणार. तरीहि स्वतःच्या उज्ज्वल जीवनक्रमानें वाटेल त्या वर्णाच्या मनुष्याला ब्राह्मणवर्ण स्वीकारून सेवाकार्य करणें शक्य आहे व असलें पाहिजे. असा मनुष्य निर-हंकारी असल्यानें आणि सर्व वर्ण समान आहेत अशी सामाजिक बुद्धि दृढ झाल्यानें जो ब्राह्मणवर्णांत जन्मला नाहीं, तो स्वतःला ब्राह्मण म्हणवून घेण्याचा मुळींच आग्रह धरणार नाहीं. उलटपक्षीं, समाजहि त्याचा जीवनक्रम पाहून त्याला ब्राह्मण म्हटल्यावांचून आणि ब्राह्मणाप्रमाणें वागविल्यावांचून मुळींच राहणार नाहीं हेंहि खरें आहे. अशाचे वंशज ब्राह्मण कुळांत मिसळून जाणें अगदीं स्वाभाविक आहे.

राहतां राहिला वैश्यवर्ण. वेदांमध्यें विट् अथवा विश् याचा अर्थ 'वैश्य' असाहि होतो, आणि सामान्यपणें 'मनुष्य' असाहि होतो; आणि तें यथा योग्य आहे. कारण विराट् मनुष्यसमाज केव्हांहि वैश्यच असणार. या वैश्य समाजांत सर्व प्रकारच्या धंद्यांचे लोक येतात. पुस्तकें लिहून पोट भरणारा, दिवाणगिरी करून राज्य चालविणारा, पगार घेऊन सरकारी न्यायाधिशाचें काम करणारा आणि चामडीं कमावून त्याचे जोडे करणारा, हे—शेतकरी, गवळी, साळी, विणकर आणि लमाणी (सार्थवाह) लोकांसारखे वैश्यच आहेत. अेका वैश्यवर्णांत असंख्य जातींच्या जमातींचा अंतर्भाव होतो. या सर्व जमातींमध्यें परस्पर-विवाह होतीलच असें नाहीं. पण वर्णव्यवस्थेप्रमाणें प्रतिबंध नसावा. अशा रीतीनें विवाहव्यवस्थेचें निबंधन बरेंच स्वाभाविक

झाल्यास समाज अधिक सुसंघटित आणि जोमदार होईल आणि स्त्रियांची स्थिति तर पुष्कळच सुधारेल.

# जातिधर्म व कुलधर्म

कुल आणि जाति या दोन संस्था प्रकृतिगत असल्यानें स्वयंभू, स्वयं-प्रेरित आणि सनातन आहेत, अर्थात् शाश्वत आहेत, दोहोंमध्यें रक्ताचा संबंधहि येतो. ज्यांचीं रक्तें अेक आहेत, तें अेक कुल. ज्यांचीं रक्तें अेक होऊं शकतात ( विवाहसंबंधानें ), ते अेकजाति. ( जन्मना जातिः )

कामविकाराची प्रेरणा, अपत्येपणा, अपत्यवात्सल्य हीं या दोन्ही संस्थांच्या मुळाशीं आहेत. समूह करून रहाणें आणि समूहशक्तीच्या जोरावर जगणें, वाढणें आणि विजय मिळविणें ( निसर्गावर अथवा परकीयांवर विजय मिळविणें ) ही वृत्तीहि या दोन्ही संस्थांच्या मुळाशीं आहे. या सर्व वृत्ती प्राणिसहज ( Biological ) आहेत. आणि म्हणूनच त्यांचें जतन करण्याचा फारसा प्रयत्न करावा लागत नाहीं. या वृत्ती आंधळया, जबरदस्त आणि स्वाभाविक आहेत. या जीवनाला पोषक आहेत, पण त्यांना जीवनसाफल्याची कल्पना नाहीं. जीवनसाफल्याचा जेथें विचार सुरू होतो, तेथेंच जीवनसंसृतीमध्यें संस्कृति (culture) उत्पन्न होते. या संस्कृतीच्या परिपोषासाठीं आश्रमव्यवस्थे-प्रमाणें वर्णव्यवस्थाहि निर्माण झाली आहे. वर्ण आणि जाति अेक नव्हेत. वर्णाचा जाति पोटभेद आहे असेंहि नव्हे. या दोन्ही संस्था परस्परसंमिश्र असल्या तरी तत्त्वतः आणि स्वरूपतः परस्परविभिन्न आहेत. कांहीं अंशीं परस्परविरोधी आहेत. जातिसंकर आणि वर्णसंकर हेहि अेक नव्हेत. वर्ण हे संस्कृतिप्रधान आहेत.

आनुवंशिक संस्कार, कौटुंबिक जीवनांतील संस्कार, कुलधर्मांमध्यें आणि जातिधर्मांमध्यें उत्पन्न झालेलें बीजरूपी सांस्कृतिक तत्त्व, या सर्वांचा विचार करितां वर्णव्यवस्थेंत देखील जातीचें तत्त्व प्रादुर्भूत होणें अयोग्य नाहीं. पण केवळ जातितत्त्वाला प्राधान्य मिळतां कामा नये. वर सांगितलेल्या कारणांनीं जातितत्त्व संस्कारपरंपरेला व विकासाला पोषक असल्यानें जाति आणि वर्ण

दोहोंना अेका प्रवाहांत नेऊन सोडणें शक्य आणि शास्त्रशुद्ध आहे. पण या बाबतींत कडक नियम केल्यानें मूळ उद्देश मारला जातो.

संकर हा नरकाला कारणीभूत आहे हा सिद्धांत निरपवाद किंवा त्रिकाला-बाधित नाहीं. ( चोरटेपणा, लोकनिंदित संबंध, आणि शिष्टांनीं नापसंत केलेला संबंध हे मात्र निरपवाद नरकगामी आहेत. ज्यांचा धार्मिक आदर्श परस्पर विभिन्न आहे, ज्यांच्या संस्कृतीची भूमिकाच निराळी आहे, अथवा ज्यांच्या रहाणी–करणी–विचारसरणी अित्यादींमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे, अशांमधील विवाह जीवनशास्त्रदृष्ट्या आणि संस्कृतिदृष्ट्या शुभपरिणामी होत नाहींत, आणि त्यांमध्यें अपत्यद्रोह होतो. म्हणून या दोन कारणांसाठीं असे विवाह अनिष्ट गणले पाहिजेत.)

समान भूमिकेवरील भिन्नभिन्न समाजांमध्यें मिश्रविवाहानें उत्तेजन देण्याचा केव्हां केव्हां काळ येतो. आणि केव्हां केव्हां होतां होअील तों मिश्रण टाळून पार्थक्य टिकवणेंच अिष्ट वाटूं लागतें. जेव्हां दोन समाज समकक्ष आणि तुल्य-बल असतात आणि दोघांनीं मिळून नवीन पुरुषार्थ करावयाचा असतो अथवा नवीन संस्कृतीला जन्म द्यावयाचा असतो, तेव्हां समान आदर्श, समान विचार-सरणी आणि समान पुरुषार्थ पाहून संमिश्रणाला उत्तेजन देणें हेंच योग्य आहे. उलटपक्षीं, जेव्हां परस्पर–परिचय नसतो अथवा फार थोडा असतो, दोन्ही पक्ष तुल्यबल नसतात, आणि अेक पक्ष दुसऱ्याच्या आहारीं पडण्याची भीति असते, तेव्हां तेजोवधकारी संमिश्रण टाळणें हेंच अिष्ट असतें. अशा वेळीं पार्थक्याला महत्त्व दिलें पाहिजे. नेपोलियनचें लष्करी वाक्य येथें निराळ्या अर्थानें लागू पडतें : We unite to strike; and separate to live. हल्ला करण्याकरितां आपण अेकत्रित होतों; आणि जिवंत राहण्यासाठीं वेग-वेगळे होतों.

जगांतील विवाहसंस्थेचा अितिहास पहातां सर्व प्रकारच्या समाजांमध्यें जर महत्त्वाचें विचारसाम्य कोठें दिसून येत असेल तर तें या बाबतींत कीं, सख्ख्या बाप–कन्येचा किंवा आअी–पुत्राचा किंवा भावा–बहिणीचा विवाहसंबंध सर्वत्र निरतिशय निंद्य मानला गेला आहे. प्राचीन काळीं अिराणांत, उत्तर हिंदुस्थानांत आणि अन्यत्र भावा–बहिणींचे विवाह होत असत; पण सर्वत्र

असे विवाह लौकरच त्याज्य ठरले, आणि मनुष्यहृदयांत अशा विवाहासंबंधानें अतोनात घृणा कमावली गेली.

यापुढें जवळच्या नात्यांत विवाह करणें घातुक आणि निंद्य आहे हा विचार कमीअधिक प्रमाणानें सर्वत्र पसरला. या अभिप्रायाच्या मुळाशीं अलिखित असा जबरदस्त आणि कटु अनुभव सार्वत्रिक असला पाहिजे. जवळच्या संबंधांत वैवाहिक प्रेम उत्पन्न होऊं शकत नाहीं, टिकूं शकत नाहीं, उन्माद असला तर तो क्षणिक ठरतो, असें अनुभवास आलें आहे. मानसदृष्ट्या ही स्थिति झाली.

वैद्यकीयदृष्ट्या अति जवळच्या विवाहाची प्रजा निःसत्त्व, भेकड, संयमशून्य, कुष्ठरोगी आणि मंदबुद्धि अशी तयार होते. आणि पुढं पुढें संतानवृद्धीहि क्षीण होते असा अनुभव आला.

संस्कारांच्या दृष्टीनें भिन्न कुळांतील संस्कारांचा जो अिष्ट संयोग अपत्यांना लाभला पाहिजे तो लाभत नाहीं. यामुळें कूपमंडूकवृत्ति अथवा सांचलेल्या तळ्यांतील कुजक्या पाण्याची स्थिति त्या कुटुंबाची होते.

आरोग्यदृष्ट्या भिन्न कुटुंबांतील विवाहापासून झालेली प्रजा आनुवंशिक रोगांशीं झगडण्यास जशी समर्थ असते, तशी अेककुटुंबीय विवाहाची प्रजा समर्थ नसते.

समाजिकदृष्ट्या अेक कुटुंब आंतल्याआंत विवाह करूं लागलें, तर समाज म्हणून तयार होणें कठिण होअील. समाज म्हणजे परस्परावलंबन. हें योग्य मर्यादेंत जितकें व्यापक आणि विविध असेल तितका समाज जोमदार होणार. 'स्वात्मनि अेव समाप्ति—व्याप्ति' अशा अेककुटुंबी समाजाची स्थिति समाजशास्त्राला असह्य झाली पाहिजे.

शास्त्रधर्माच्या बाहेर असलेले, मागासलेले किंवा रानटी गणले जाणारे लोक देखील जवळच्या संबंधाचीं लग्नें निषिद्ध मानतात. अेकाच गांवांतील मुलेंमुलीं भावाबहिणींप्रमाणें समजलीं पाहिजेत अशी समजूत पुष्कळ ठिकाणीं आहे. सामाजिक व्यवहार निर्धास्त आणि निश्चित चालण्यास देखील नजीकच्या

विवाह निषिद्ध असले पाहिजेत. जेथें दिवसरात्र मोकळा व्यवहार असणें अिष्ट आहे, तेथें जर घोटाळे होंऊं लागले, आणि त्याला विवाहाची मान्यता द्यावी लागली, तर सामाजिक व्यवहार संकुचित आणि शंका–कलुषित होअील. अेका गुरूच्या हाताखालीं संस्कार प्राप्त करणारे युवक आणि युवतीमध्यें भावा–बहिणींचेंच नातें समजलें पाहिजे, हा नियमहि या दृष्टीनें अिष्टच आहे.

अेका गोत्रांत लग्नें होऊं नयेत; सपिंड, सगोत्र, सप्रवर यांचा विचार केल्यावांचून लग्नें करूं नयेत, ही धर्माची मर्यादा येथवर वर्णिलेल्या धार्मिक मीमांसेमधूनच निघाली आहे.

धर्माची ही दृष्टि आणि ही मर्यादा आतां थोडीशी वाढविण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे. जातिबहुल हिंदुसमाजांत पोटजातींचें प्रस्थ फार माजलें आहे. हजार हजार कुटुंबांच्याच लहान लहान जाती पडणें हें सर्वथैव अनिष्ट आहे. आणि आज तर शंभर सव्वाशें कुटुंबांच्या जातीहि दृग्गोचर होतात. गुजरातमध्यें ही स्थिति अत्यंत शोचनीय आहे. ज्याप्रमाणें शेतामध्यें वरचें पाणी खालीं वाहून जाऊं नये म्हणून लहान लहान वाफे वा गादे तयार करितात, त्याप्रमाणें गरिबांच्या मुली श्रीमंत घरांत वाहून जाऊं नयेत म्हणून लहान लहान पोटजाती नव्यानें निर्माण करण्याकडेहि तेथें प्रवृत्ति आहे. मोठ-मोठीं ज्ञातिभोजनें करण्याचा खर्च पडूं नये यासाठीं देखील लहानग्या आटप-शीर जाती करण्याची प्रवृत्ति तिकडे आहे. वरील विवाहमीमांसेंत जवळच्या संबंधांतील विवाहाचे जे दोष दाखविले आहेत, ते सर्व या पोटजातींतील विवाहांत दृग्गोचर होऊं लागले आहेत, तेव्हां धर्माची दृष्टि, समाजशास्त्राचा अनुभव आणि भावी प्रजेचें कल्याण यांचा विचार करून आतां कडक नियम केला पाहिजे कीं, स्वतःच्या पोटजातींत विवाह करणें हें अेका कुटुंबांत किंवा अेकाच गोत्रांत लग्न करण्याअितकें, सख्ख्या भावा–बहिणीच्या लग्नासारखें निंद्य आणि महापातक आहे.

आजकाल ज्या सामाजिक सुधारणा सुचविल्या जातात त्यांहून ही सुधारणा निराळी आहे. अितर सुधारणा धर्ममर्यादा शिथिल करण्याच्या दृष्टीनें सुच-विल्या जात असतील. ही सुधारणा धर्मदृष्टि अधिक जागृत करण्याच्या दृष्टीनें सुचविली आहे.

कोणी म्हणतील तुम्ही जातिभेद मोडूं पहात आहां. जातिभेद मोडणें इष्ट आहे किंवा नाहीं हा प्रश्न बाजूस ठेवून उत्तर देतां येईल कीं, सगोत्राबाहेर लग्नें करण्यानें जर गोत्रें बुडत नाहींत, भिन्न कुटुंबियांच्या विवाहांमुळें जर कुटुंबें तुटत नाहींत, तर पोटजातींच्या बाहेरच विवाह झाला पाहिजे असा नियम केल्यानें पोटजाती तरी कशा तुटतील ? आणि पोटजाती तुटल्याच तरी त्या जातींचें काय अनिष्ट आहे ? वर्णव्यवस्थेला तर कोणत्याहि रीतीनें धोका नाहीं. संघटनप्रिय काळानें तरी या सुधारणेस विरोध करतां कामा नये.

येथें सुचविलेली सुधारणा व त्याच्या मुळाशीं असलेली विचारसरणी अत्यंत महत्त्वाची आहे; तिचा खोलवर विचार झाला पाहिजे.

# सामाजिक जबाबदारी

अनेक व्यक्ती मिळून कुटुंब होतें. या व्यक्ती कायम एकत्र राहण्याचा निश्चय करून एकरूप होतात आणि जीवनव्यापी सहकार्यानें कुटुंबाची स्थापना करतात. ' जें कांहीं आहे तें कुटुंब आहे, व्यक्तींना स्वतंत्र अस्तित्वच नाहीं ' या वृत्तीनें सर्वजण चालतात. आणि म्हणूनच कुटुंब ही एक पवित्र संस्था बनते. कुटुंबांत राहणाऱ्या व्यक्तीला कुटुंबाहून वेगळा असा आपला स्वतःचा स्वार्थ असत नाहीं. ज्याक्षणीं अशा प्रकारचा स्वार्थ व्यक्तीमध्यें घुसतो, त्या क्षणापासूनच कुटुंबाचा अधःपात सुरू होतो. कुटुंबांतील लोकांच्या परिश्रमानें जी कांहीं आवक होते आणि प्रतिष्ठा मिळते, ती जरी एका कर्त्यासवरत्या पुरुषाच्या नांवावर जमा झाली, तरी तें सगळें कांहीं त्याचें एकट्याचें नसतें. आपल्या मर्जीप्रमाणें तें सर्व वापरण्याची त्याला मालकीक असते खरी, पण याचें कारण सगळ्या कुटुंबाच्या हितापुढें तो आपलें वैयक्तिक सुख-समाधानच काय, पण आपली तहानभूक देखील विसरून गेलेला असतो. ज्याक्षणीं कुटुंबांतील सामुदायिक हित विसरून तो आपल्या ऐषआरामाचा, आपल्या प्रतिष्ठेचा आणि आपल्या अधिकाराचाच विचार करूं लागतो, त्याक्षणींच त्याचें जीवन शापरूप होतें. तो जें खातो तें पाप असतें, जें उपभोगितो तें पाप असतें, आणि क्षणोक्षणीं तो आपल्या चारित्र्याचें भांडवल गमावीत असतो.

जेव्हां कुटुंबांतील कर्ता पुरुष कुटुंबांतील सगळ्या सुखसोयी आपल्या ताब्यांत घेऊन कुटुंबापासून वेगळा होतो आणि मग म्हणतो कीं 'मी आपलें स्वतः-चेंच सांभाळीत आहे, मी यांत कोठें कोणावर अन्याय करीत आहे?' तेव्हां त्याचें तें बोलणें न्यायाचें नसतें. तो निव्वळ कुटुंबद्रोह करीत असतो. जेथें जेथें मनुष्य फायद्याला चिकटतो आणि धर्माला विसरतो, तेथें तेथें तो निव्वळ द्रोह करीत असतो. त्याचें जीवन शुद्ध नसतें. तो आपला जगण्याचा हक्कहि गमावून बसतो. जो मनुष्य कुटुंबांतून फुटून निघेल, त्यानें कुटुंबाचे सगळे फायदे सोडून दिलेच पाहिजेत. तसेंच कुटुंबांत राहून मिळविलेल्या प्रतिष्ठेचा उपयोगहि त्यानें आपल्या स्वार्थासाठीं करतां कामा नये. जो सर्व-संगपरित्याग करून विरक्तपणें राहण्यास तयार झाला असेल, साधेपणाचें—अितकेंच नव्हे, तर तपस्येचें जीवन घालविण्यास तयार झाला असेल, त्यालाच कुटुंबाबाहेर जाण्याचा अधिकार मिळावा.

जो नियम कुटुंबासाठीं तोच नियम प्रत्येक जीवनव्यापी सहकार्यासाठीं आहे. समाजसेवेच्या दृष्टीनें स्थापन केलेल्या संस्थेस हाच नियम लागू पडतो. राजा आणि प्रजा यांच्यांतील संबंध स्थायी असल्यामुळें तेथें देखील हाच धर्म स्वीकारलेला असला पाहिजे. वर्णव्यवस्था हें देखील अशाच प्रकारचें जीवनव्यापी धर्मप्रधान सहकार्य आहे. वर्णव्यवस्थेमध्यें प्रत्येक वर्णाला जें स्थान आहे तें सगळ्या समाजामुळें आहे.

कोणत्याहि देशांतील वैश्यवर्गाचा आपण विचार करूं. सामाजिक पुरुषार्थानें म्हणजे समाजांतील सर्व लोकांच्या परिश्रमानें जें कांहीं धन अेकत्र होतें तें वैश्यांच्या हातीं जमा होतें. ती जरी वैश्यांची संपत्ति समजली जात असली, आणि ती कशी खर्च करावयाची या विषयींची सत्ता जरी वैश्यांच्याच हातीं असली, तरी धर्म असें सांगतो कीं, ही संपत्ति सगळ्या समाजाची आहे; समाजाच्या हितासाठींच ती वापरली गेली पाहिजे. समाज जर वैश्यांवर बहिष्कार टाकील, तर समाजहि टिकूं शकणार नाहीं आणि वैश्यहि टिकूं शकणार नाहीं. म्हणजे दोघांचा संबंध अविभाज्य आहे. अशा स्थितींत वैश्य असें कसें समजू शकेल, कीं माझ्याजवळील धन माझेंच आहे, त्याच्यावर अितर कुणाचाहि अधिकार नाहीं? ज्याप्रमाणें रक्षणासाठीं राजा हा वैश्यांकडून

त्यांच्या पैशांतील अमुक भाग कराच्या रूपानें घेऊं शकतो, त्याचप्रमाणें समाज वैश्याला जो आश्रय देतो व त्याच्यांशीं जें सहकार्य करतो, त्याच्या मोबदल्यांत सबंध समाजहि वैश्याकडून संविभागाची अपेक्षा अवश्य बाळगूं शकतो. स्वत:जवळ तें असेल तें सर्व आपण सगळ्यांनीं वांटून घ्यावें अशी धर्माची स्पष्ट आज्ञा आहे.

ब्राह्मणवर्ग देखील समाजापासून वेगळा, स्वतंत्र नि अलग राहूं शकत नाहीं! ब्राह्मणाजवळ धनाचा संग्रह मुळीं असतांच कामा नये. ज्याप्रमाणें भ्याड मनुष्य स्वत:ला क्षत्रिय म्हणवून घेऊं शकणार नाहीं, त्याप्रमाणें स्वत:जवळ धनदौलत बाळगणारा ब्राह्मण स्वत:ला ब्राह्मण म्हणवूं शकणार नाहीं. जो केवळ ब्राह्मणकुळांत जन्मल्यामुळें ब्राह्मणाला मिळणाऱ्या सर्व प्रतिष्ठेचा लोभ बाळगतो आणि ब्राह्मण-आदर्शाचें रक्षण करीत नाहीं, तो मनुष्य समाजद्रोही आहे. ब्राह्मणाजवळ जें धन असलें पाहिजे तें म्हणजे विद्याधन, तपोधन आणि चारित्र्यधन! ब्राह्मण जर सर्व समाजाला-अगदीं वरपासून खालपर्यंतच्या सर्व जातींना-कोणत्याहि प्रकारचा पक्षपात न करतां विद्या देणार नाहीं, तर तो चोर आहे असें म्हणावें लागेल. पक्षपात करावयाचाच असेल तर तो दीन, दु:खी, पददलित अशा अनाथ लोकांच्या बाबतींतच केला पाहिजे. कारण त्यामुळें त्याला संपूर्ण प्रकारें धर्मानें पालन केल्याचें समाधान मिळेल. ज्याप्रमाणें देशांत पारतंत्र्य असणें ही सर्वप्रथम क्षत्रियाला नामुष्की आणणारी गोष्ट आहे, देशांतील उद्योगधंदे रसातळाला गेले असतील तर ती सर्वांआधीं वैश्याला नामुष्की आणणारी गोष्ट आहे, त्याचप्रमाणें जर देशांत भयंकर अज्ञान व्यापून राहिलेलें असेल, एकहि जात संस्कारविहीन राहिलेली असेल, तर ती गोष्ट ब्राह्मणाला नामुष्की आणणारी आहे. तें पाप ब्राह्मणाच्या शिरावर बसतें!

असें सांगतात कीं चीन देशांत असा रिवाज होता कीं, राजा आजारी पडतांच राजवैद्याचा तनखा बंद होत असे. याच न्यायानें जर समाजांतील मोठमोठे वर्ग, सबंध जमातींच्या जमाती असंस्कारी राहतील, शिक्षणापासून वंचित राहतील, तर त्याबद्दल ब्राह्मणवर्गाला शासन केलें पाहिजे. ब्राह्मण हा धर्मासाठीं जन्मलेला आहे, तो सर्व वर्णांचा गुरु आहे. तो जर आपल्या

धर्मांचें पालन न करील तर तो सगळ्या समाजाचा द्रोह करीत आहे असें म्हणावें लागेल. ' या पृथ्वीवर जितकें धन आहे तें सर्व ब्राह्मणाचेंच आहे, ब्राह्मण जें खातो तें त्याचें स्वतःचेंच असतें, ' अशा प्रकारची जी प्रतिष्ठा शास्त्रांनीं ब्राह्मणाला दिली, ती कांहीं तितक्याच मोठ्या जबाबदारीशिवाय दिली गेली नाहीं. ही जबाबदारी नाकारून ब्राह्मण जर आतांपर्यंत मिळविलेल्या प्रतिष्ठेलाच चिकटून राहील, तर तो समाजद्रोही ठरेल. त्यानें तपश्चर्या करून, अध्ययन करून आणि यात्रा करून जें कांहीं मिळविलें असेल, तें सर्व त्यानें आधीं सगळ्या समाजाला दिलें पाहिजे. आज शिक्षणामध्यें सर्वांत मागासलेला वर्ग जर कोणता असेल, तर तो हरिजनांचा होय. त्याला शिक्षण देण्याचें काम ब्राह्मणानें आधीं केलें पाहिजे. हें शिक्षण फक्त धार्मिक उपदेशाचें किंवा कर्मकांडाचें नसावें. त्यांच्या धंद्यांचें शिक्षण देण्याचें कर्तव्यहि ब्राह्मणाचेंच आहे.

सर्वेषां ब्राह्मणो विद्यात् वृत्त्युपायान् यथाविधि ।
प्रब्रूयात् अितरेभ्यश्च स्वयं चैव तथा भवेत् ॥

ब्राह्मणानें सर्व वर्णांच्या आजीविकेच्या मार्गांचें म्हणजे धंद्यांचें ज्ञान योग्य प्रकारें प्राप्त करून घेतलें पाहिजे; तें ज्ञान अितरांना शिकविलें पाहिजे आणि स्वतः देखील त्याचप्रमाणें चाललें पाहिजे.

आज पुष्कळसे ब्राह्मण असें म्हणतात कीं ' आम्ही कुठें कोणावर अन्याय करीत आहोंत ? आम्ही फक्त स्वतःचें सांभाळून बसलों आहोंत. ' त्यांना हें माहीत नसतें, कीं समाजामध्यें फक्त स्वतःचेंच सांभाळून बसणें हाच मोठा अधर्म आहे, हाच अन्याय आहे. आपल्याजवळ जें कांहीं असेल—मग तें ज्ञान असो, कला असो, धन असो, कीं बळ असो, त्याचा फायदा सर्वांना दिलाच पाहिजे. आपण समाजहितासाठीं आहोंत ही गोष्ट समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें मान्य केलीच पाहिजे.

# नवा जन्म

जातीबाहेरील अेकादा मनुष्य जेव्हां अेकाद्या जातीची निंदा करतो, तेव्हां त्या जातींतील लोक कसे खवळून उठतात! त्यांच्या त्या खवळण्यावरून अेवढें तरी सिद्ध होतें कीं, त्या लोकांच्या दृष्टीनें जात ही अेक जिवंत वस्तु आहे. ज्या वेळीं देशाची निंदाच नव्हे, तर अगदीं सत्यानाश होत असतो, त्या-वेळीं हा सत्यानाश करणाऱ्या जुलमी परकीय सत्तेविरुद्ध जितके लोक खवळून उठतात, तेवढ्याच लोकांपुरतां देश जिवंत असतो आणि तेवढेच लोक देशाच्या दृष्टीनें जिवंत असतात.

अेकेकाळीं ज्ञातिजीवनांतून लोकांना पोषण मिळत असे. वैयक्तिक जीवन आणि कुटुंबजीवन यांच्यापेक्षां ज्ञातिजीवनाच्या मार्फत मनुष्य आपला उच्च आदर्श लवकर प्राप्त करुन घेऊं शकत असे. यामुळें व्यक्ती आणि कुटुंबें जातीसाठीं मरावयास तयार होत असत. आजची कृतार्थता देशजीवनांत आहे, राष्ट्रजीवनांत आहे. या जीवनाला जे ओळखतात आणि जे हें जीवन जगतात त्यांच्यांतच पौरुष, तेजस्विता, आणि शुद्ध दृष्टि येऊं शकते. अितर सर्वजण पामर–जीवन घालवीत असतात. ते जरी पैसा कमावीत असले, उच्च स्थानावर विराजमान झालेले असले, खुशामतीच्या खुराकावर जगत असले, तरी देखील त्यांना आंतरिक समाधान मिळूं शकत नाहीं. आपण मागासलेले आहोंत, पामर आहोंत, आजच्या काळांतील सामान्य माणसानें देखील जेथ-पर्यंत चढलें पाहिजे तेथपर्यंत आपण चढलों नाहीं, आपण हलक्या दर्जाचे आहोंत, अशा प्रकारची हीनतेची जाणीव त्यांना चिकटून राहिलेलीच असते. याहून जास्त तेजोहानि करणारें असें दुसरें काय असूं शकेल! आपल्यासारखे अितर पुष्कळजण आहेत, अशा प्रकारचा सन्तोष मिळविण्याचा ते कितीहि प्रयत्न करीत असले तरी, व तशा प्रकारचा कितीहि पुरावा त्यांना मिळत असला तरी, त्यांचें असमाधानच वाढत असतें. जे आपल्यासारखे नाहींत, जे देशाला ओळखतात, देशासाठीं जगतात, ते शहाणपणा करीत नाहींत, त्यांना आपलें हित समजत नाहीं; वेळ आली कीं ते पश्चात्ताप करूं लागतील असें

माजण्याचा या लोकांनीं कितीहि प्रयत्न केला, तरी पदोपदीं ते देशसेवकांना वंदनच करीत असतात; आपण स्वतः उंच चढूं शकत नाहीं, याबद्दल ते स्वतःवर आंतल्या आंत चिडलेले असतात आणि या चिडीपासून शान्ति मिळावी म्हणून ते देशसेवकांवर चिडण्यासाठीं कारणें शोधीत असतात !

ही सगळी अस्वस्थता दूर करण्याचा अेकच मार्ग आहे आणि तो म्हणजे देशाला ओळखणें, देशाची सेवा ही देखील जीवनांतील अेक आवश्यक गोष्ट आहे हें मान्य करणें, आणि ज्याप्रमाणें आपण आपल्या बायकापोरांसाठीं रात्रंदिवस काबाडकष्ट करीत असतों, त्याग करीत असतों, त्यांच्या सुखांत आपलें सुख पाहतों, त्याचप्रमाणें आपल्या हृदयांत आपल्या देशाला स्थान देऊन देशाच्या सुखानें सुखी व दुःखानें दुःखी होण्याची वृत्ति अंगीं बाणविणें हा होय. यांत कांहीं मोठीशी बहादुरी करावयाची नसते. यांत कांहीं मोठीशी हानीहि करून घ्यावयाची नसते. फक्त आपल्या सुखदुःखांचें, आपल्या प्रतिष्ठेचें आणि आपल्या प्रेमाचें स्थान व्यापक करावयाचें असतें. जुने संबंध तुटतात तर नवे बांधले जातात, जुनें आश्वासन सोडावें लागतें तर नवीन आश्वासनें मिळत असतात, जुनी संकुचित दृष्टि टाकली जाते तर उंच उंच डोंगरावर उभे राहून विशाल प्रदेश पाहण्याचा आनंद मिळतो. फक्त भावनांमध्यें फेरफार करण्याचाच प्रश्न असतो. यांत गमावण्यासारखें असें कांहींच नसतें. सर्व कांहीं मिळवावयाचेंच असतें.

# जातीजातींतील संबंध

लॅओत्झे अशा अिंग्रजी उच्चारानें ओळखला जाणारा अेक चिनी तत्त्वज्ञ व धर्मज्ञ मध्यचीनमध्यें होऊन गेला. त्याचें वचन म्हणून असें सांगतात कीं, त्याला लोकांमध्यें संतोष अथवा तृप्ति हाच मोठा गुण वाटत होता. रिकामटेकडी जिज्ञासा हा अेक मोठा रोगच आहे असें त्याला वाटे. खेडेगांवाविषयींचा त्याचा आदर्श असा कीं, 'खेडेगांवांतील लोकांनीं आपलें गांव सोडून कोठेंहि जाऊं नये. आसपासच्या खेडेगांवांतील वेशीवर असणारीं कुत्रीं भुंकलेलीं या खेडेगांवांत अेकूं यावींत, पण तें कसलें खेडेगांव आहे हें पाहण्यासाठीं देखील येथून तेथें कोणीं जाऊं नये.' कोलंबसापूर्वीं युरोप आणि अमेरिकेला

अेकमेकांविषयीं जेवढी माहिती होती, त्याहून अधिक माहिती अितक्या जवळ-च्या दोन खेड्यांमधून नसणें शक्य आहे किंवा कसें, याचा विचार न करितां आपण हिंदुस्थानची स्थिति तपासूं. हिंदुस्थानांतील खेडवळ लोक जिज्ञासेसाठीं फारसे प्रख्यात नाहींत. अितर प्रांतांत काय चाललें आहे याची माहिती त्यांना बहुतेक नसतेच. अितर धर्मांचीं तत्त्वें काय, आदर्श काय, याची स्पष्ट माहिती कोणालाच नसते. प्रवाहांत पडलेल्या ओंडक्याप्रमाणें समाज मुकाट्यानें चालत आहे. सामाजिक परिस्थितींत होणाऱ्या स्थित्यंतराची जबाबदारी कोणाचीहि असो, खेडेगांवांतील जनतेची ती खास नव्हे. ' हरि ठेवील तैसें रहावें ' हा जडतत्त्वाचा वेदान्त लोकांना उत्तम पटला आहे. कोणालाहि विचारा, जबाब अेकच मिळावयाचा : ' अहं करोमीति वृथाभिमानः'

हिंदुस्थानांतील सामाजिक जीवनांत फरक होत नाहींत असें नाहीं; पण ते सर्व फरक परवश अशा जड तत्त्वांत होणारे फरक होत. पाणी विस्तवानें गरम होतें; वाऱ्यानें थंड होतें; पण त्यांत त्याचा स्वतःचा असा आग्रह नसतो. पाणी कधीं रागानें लाल झालें नाहीं अथवा कधीं तो राग विवेकपूर्वक गिळून तें थंड झालें नाहीं. स्वतःच्या पुरुषार्थानें अिरादापूर्वक फेरफार करणें आणि पूर्वी योजून ठेविलेल्या दिशेकडे प्रयाण करणें हा चैतन्याचा गुण आहे. पण वेदान्तानें सांगितलें कीं, मुक्त पुरुषानें ' जडवल्लोक आचरेत्. ' आपण मुक्त होण्याच्या पूर्वींच तो बोध स्वीकारला, आणि वत् प्रत्यय अगदींच विसरून गेलों !

हिंदुस्थानांतील अर्थात् हिंदुस्थानांतल्या खेडेगांवांतील जातीजातींचा प्रश्न हा असाच अेक जडतेचा प्रश्न होऊन बसला आहे, व तो सबंध जनतेनें सोडवावयाचा आहे. जनता ज्ञानमय, चैतन्यमय आणि यौवनमय झाली म्हणजे तो आपोआप सुटेल. जनता रूढीला चिकटून रहाते, यामध्यें समाजाचें स्थैर्य आहे, संतोष-समाधान आहे. अमुक माणूस अमुक तऱ्हेनेंच वागेल किंवा न वागेल याची खात्री आहे. रूढीचे असे कितीतरी गुण आहेत. कारण ते सर्व जडाचे गुण आहेत. पुलाचे धोंडे ठेवल्या जागींच असतात, पक्ष्यांप्रमाणें उडून चरावयास जात नाहींत, म्हणूनच पुलावर विश्वास ठेवून आपणाला गाडी हांकतां येते. गाडीला भिऊन पूल वांकत नाहीं हाहि कांहीं थोडाथोडका लाभ नाहीं. पण समाजामध्यें केवळ जडाचे स्थैर्यादि गुण असणें यांत उत्कर्ष

नाहीं, कृतार्थता नाहीं. थोडासा धूर लावून मधमाशांना पिटाळून ज्याप्रमाणें मध लुटण्याचा धंदा पाश्चात्य लोक अहर्निश करीत असतात, त्याप्रमाणें आपल्या येथील जड समाजाला न कळत त्याच्याकडून वाटेल तें काम करून घेतां येतें; त्याला वाटेल त्या स्थितीप्रत पोहोंचवितां येतें. मधमाशांप्रमाणेंच हा समाज बुजणार नाहीं अेवढी काळजी घेतली म्हणजे बस.

हिंदुस्थानांत जातीजातींमध्यें वैमनस्य नाहीं, तेढ नाहीं; सापामुंगसांत हितसंबंध विरुद्ध असल्याकारणानें जसें हाडवैर असतें तसें हाडवैरहि नाहीं; जर कांहीं असेल, तर तें परस्परांविषयींचें गाढ आणि भयानक असें अज्ञान आहे. आणि जेथें अज्ञान नाहीं तेथें विषारी कुज्ञान आहे. वाटेल तसल्या भ्रामक कल्पना अेकमेकांनीं अेकमेकांविषयीं चालू केल्या आहेत, आणि त्या रूढीच्या जडतेनें जगत आल्या आहेत. ब्राह्मण आणि साप सारखा, मारवाडी चामडी देअील पण दमडी देणार नाहीं, मुसलमान बडे बेअिमान, अशा प्रकारच्या म्हणी या कुज्ञानाच्या द्योतक आहेत. याचा अेक पुरावा हा आहे कीं, असल्या बहुतेक सर्व म्हणी निंदामूलकच असतात. हिंदुस्थानांत अशी अेकहि जात, धर्म किंवा पंथ नाहीं, कीं ज्याच्याविषयीं अशी अेकादी अनुदार वृत्तीची म्हण सांपडणार नाहीं. आणि या म्हणी जबाबदार लोक देखील वापरतांना आढळतात.

जातीजातींचा प्रश्न सोडविण्याचा सर्वांत पहिला आणि महत्त्वाचा मार्ग म्हटला म्हणजे जातींचा अेकमेकांविषयीं हा जो अज्ञानमूलक किंवा कुज्ञानमूलक अभिप्राय दृढमूल झाला आहे, त्याच्यावर घाव घालावयाचा. चार मंडळी जमली असतांना ज्या जातीचे लोक हजर नाहींत त्यांची निंदा ही चालावयाचीच. तो येथवर कीं, आयांच्या पोटीं जन्मलेल्या पुरुषांनीं सरसहा सर्व बायकांची यथेच्छ निंदा करावी, आणि ‘ अनृतं साहसं माया ’ अित्यादि अधार्मिक वचनें धर्म म्हणून चालू ठेवावींत ! कोणीहि कोणाची जातीवरून निंदा केली, तर शहाण्यांनीं तात्काळ त्याचा तेथेंच विरोध केला पाहिजे. गैरहजर जातींविषयीं वाटेल तसे अनुदार उद्गार काढणें यांत नामर्दाअी आहे, पिशुनता आहे, असंस्कारिता आहे, हें समाजाच्या हाडींमासीं खिळलें पाहिजे. परस्पर—चांगुलपणाच्या जितक्या खऱ्या गोष्टी उपलब्ध होतील त्या सर्व चलनी

नाण्याप्रमाणें समाजांत चालू केल्या पाहिजेत. मि. अँड्र्यूज अिंग्रज असूनहि चांगला आहे, डॉ० अन्सारी मुसलमान असूनहि न्यायनिष्ठ आहेत, अमुक गृहस्थ मारवाडी असूनहि उदार आहे, फलाणा गृहस्थ कोकणस्थ असूनहि खरा साधु आहे, वगैरे वगैरे वचनें आपण अैकतों, यांचा उद्देश मूळ गैरसमज तोडणारा अनुभव आला तरी गैरसमज टिकवावा असाच आहे. कारण, लक्षावधि अपवाद अेकाच वेळीं आपल्यासमोर येत नसतात. आलेल्या अपवादांची तेव्हांच वासलात लावली, म्हणजे खराखुरा अनुभव मृतप्राय होतो आणि दुर्जनतेचा काल्पनिक गैरसमज जगत राहतो.

लोकमानसाच्या या सर्व खुब्या ध्यानांत घेऊन प्रत्येक ज्ञात्यानें जातीजातींविषयींच्या सर्व अनुदार उद्गारांना मूठमाती देण्यासाठीं अेक होऊन कमर कसली पाहिजे.

हें काम पॉलिसी म्हणून कधींहि साधावयाचें नाहीं. युरोपमध्यें भौतिकशास्त्रांची आणि औद्योगिक कारखान्यांची अभूतपूर्व प्रगति झाल्यामुळें लोकांना धर्मावांचून समाज टिकूं शकेल असें वाटूं लागलें. गेल्या पन्नास–पाऊणशें वर्षांतील प्रगतीचे बहुतेक सर्व प्रयत्न मानवी स्वभाव सुधारण्याचे सर्व प्राचीन मार्ग सोडून केवळ बाह्य परिस्थिति सुधारण्याच्या दिशेनेंच झालेले आहेत. सामाजिक रचना बदलावी, कायदे बदलावेत, ते अधिक व्यापक करावेत, सार्वजनिक पैशांतून सुखासमाधानाच्या सोयी वाढवाव्यात, शिक्षणद्वारा बहुजनसमाजाच्या डोक्यांतील माहिती वाढवावी आणि निरनिराळ्या रोगांवर निरनिराळीं औषधें तयार करावींत हीच काय ती आजकालची प्रगति ! मनुष्यस्वभाव आहे तसाच राहणार, तो बदलणें फारसें शक्य नाहीं, आणि शक्य असो वा नसो तो बदलण्याचें फारसें कारणहि नाहीं, अशा प्रकारची वृत्ति गेल्या दोन पिढ्यांनीं दाखविली आहे.

याचा परिणाम असा झाला आहे कीं, भांडणें मिटवावयाचीं तीं मन मोठें करण्याच्या उच्च भूमिकेवर जाऊन न मिटवितां, परस्पर–स्वार्थांचा मेळ घालून तात्पुरती तडजोड करण्याच्या तत्त्वानेंच तीं मिटविण्याचे प्रयत्न होतात. यामुळें हीन वृत्ति बळावते. भांडणें चालू ठेविलीं तरच आपणांस कांहीं तरी

मिळणार असें ब-याच लोकांना वाटूं लागतें; निर्लज्जपणा वाढतो, आणि नैतिक आदर्श आपल्या डोळ्यांदेखत नाश पावतात.

धर्माधर्मांचीं आणि जातीजातींचीं भांडणें हिंदुस्थानांत तरी पॉलिसीच्या जोरावर मिटावयाचीं नाहींत. सर्व भांडणांच्या मुळाशीं अज्ञान आणि अनुदारता आहे. अेक दोष बौद्धिक आहे आणि दुसरा नैतिक; दोन्ही दूर केले पाहिजेत. भांडणें मिटविण्यासाठीं प्रतिपक्षाला समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां प्रतिपक्षाला समजण्याचा अधिक प्रयत्न झाला पाहिजे; आणि उदारतेचा उपदेश दरेक पक्षानें स्वकीयांनाच केला पाहिजे. क्षुद्रतेचा आणि अविश्वासाचा खड्डा भरून निघाल्यानंतर परस्पर–उदारतेची चढाओढ लागेल, आणि ती कल्याणकारक होईल.

केवळ उच्च स्वार्थाच्या दृष्टीनें पहाणाराला अेवढी श्रद्धा आली पाहिजे कीं, कोणीहि कोणाचें खरें सामर्थ्य लुटून घेऊं शकत नाहीं. जो उदारतेनें कांहीं देऊं करतो त्याचें सामर्थ्य कमी न होतां वाढतें. आणि दुर्बळाला, त्याचप्रमाणें अज्ञान्याला सर्व कांहीं देऊन टाकलें, तरी तो आपल्या सामर्थ्यांअितकेंच ठेवून घेऊं शकणार अथवा वापरूं शकणार यांत शंका नाहीं. **सामर्थ्य वाढण्यास लोभ आणि हांव न वाढवितां जबाबदारीचें क्षेत्र वाढविलें पाहिजे;** उच्च वातावरणांत वावरलें पाहिजे; आळस आणि विलासिता कमी केलीं पाहिजेत. अखंड उद्योग, डोळ्यांत तेल घालून केलेली काटकसर आणि विशाल हृदय यांतच सर्व प्रकारचें सामर्थ्य आहे.

खेडेगांवांत या बाबतींत शहराअितकें हीन वातावरण नसतें हा अेक मोठा लाभ आहे. शेतक-यांमध्यें सहकार विशेष असतो; व्यापा-यांमध्यें चढाओढ विशेष असते; आणि सरकारी नोकरांमध्यें अेकमेकांचे पाय ओढून हीन स्वार्थ साधण्याचें नीतिबाह्य वर्तन अधिक दिसून येतें. खेडेगांवांतून नोकरीचा प्रश्न फारसा नसतो, व्यापार बेताचाच असतो, आणि मुख्य व्यवसाय शेती व मजुरीचा, व गौण व्यवसाय मुमूर्षदशेला येऊन पोहोंचलेल्या अशा उद्योगधंद्यांचा. अशी स्थिति असल्यानें खेडेगांवांतून जातीजातींच्या भांडणांना फारसा अवकाश नसतो.

पण खेडेगांवांतील जनता जितकी अज्ञानी, तितकीच विकारवश असते. धर्माच्या नांवानें, जातीच्या नांवानें, कोणत्याहि विकाराच्या नांवानें लोकांच्या मनोविकारांना पेट लावून देणें फारसें कठिण नसतें. तरीहि असला दावानल शहराच्या मानानें खेडेगांवांत कमी पेट घेतो. कारण, खेडेगांवांतून जीवनसह-काराचा ओलावा अधिक असल्यानें सर्व जाती व धर्म अधिक ओतप्रोत असतात.

सामान्यपणें भांडणास तोंड लागलें म्हणजे तोंडीस तोंड करतां करतां प्रत्येक बाजूला आपला धर्म दुसऱ्या इतकाच हीन, संकुचित, भांडखोर, आणि आंधळा बनवावा लागतो आणि मग परस्परांच्या उखाळ्या पाखाळ्या काढण्याचें दोघांनांहि सुचतें. दुसऱ्यास काळा ठरविण्यासाठीं त्याच्या तोंडास काजळ फांसण्यापेक्षां आपण आपलें तोंड जर धुऊन पुसून उज्ज्वळ ठेविलें, तर दुसरा आपोआप काळा ठरेल, व दुसऱ्यालाहि तोंड धुण्याची आवश्यकता भासूं लागेल. दोन मुलें पाटीवर वर्तुळ काढीत असतां एकाचें वर्तुळ वांकडें आलें, आणि दुसऱ्याचें अगदीं बरोबर आलें, तर ज्याचें बिघडलें असेल तो आपलें सुधारण्याचा प्रयत्न करणारच; निदान आपलें वर्तुळ कमी दर्जाचें आहे एवढें तरी तो मनांत समजणारच. आणि त्यानें मनांत समजावें एवढेंच समाधान सर्वांना बस असावें. त्याच्याकडून कबुलीजबाब घेण्याचा कधींहि प्रयत्न करूं नये.

जीवनाचे औद्योगिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, शिक्षणविषयक असे विभाग आपण विचाराच्या आणि चर्चेच्या सोयीसाठीं पाडतों. मुळांत जीवन एकरूपच आहे. त्याचे तुकडे पाडून त्याला जिवंत ठेवणें शक्य नाहीं. तुम्हांला काय वाटेल ते औद्योगिक किंवा राजकीय फेरफार करावयाचे असतील ते करा, धर्मांत आणि सामाजिक व्यवस्थेंत हात घालूं नका, असें म्हण-णारे कित्येक लोक असतात. जणु काय, सामाजिक आणि धार्मिक चुका अथवा दोष प्रजाकीय प्रगतीला बाधतच नाहींत! अथवा धर्म आणि समाज-व्यवस्था कधीं सदोष असतच नाहींत! खेडेगांवांतून धार्मिक सुधारणा होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. खाण्यापिण्याच्या बाबतींत शुचिर्भूतपणा ठेवणें आणि उच्च आदर्शांचा आग्रह ठेवणें, हें संस्कारिता आणि सामर्थ्य

यांच्या दृष्टीनें आवश्यक आहे. पण आज आपल्या समाजांत जे सोंवळ्या-ओंवळ्याचें, खरकट्या–निर्लेपाचें व शिवाशिवीचें बंड बोकाळलें आहे, तें प्रजा-कीय कल्याणाच्या दृष्टीनें मोडलेंच पाहिजे. कारण त्यांत शुचिर्भूतपणाचें अंग असल्यास तें अत्यंत अल्प आहे; केवळ मोठेपणाची प्रतिष्ठा आणि आढ्य-ताच त्यांत अधिक आहे. आणि हिंदुस्वभावांत अज्ञानमूलक आग्रहानें प्रत्येक गोष्टीचा अतिरेक करण्याचा दोष प्रथमपासून आहे. खेडेगांवांतून असलीं बंडें मोडण्याचा प्रयत्न खऱ्याखुऱ्या धार्मिक लोकांनींच केला पाहिजे; आणि तो भीतभीत न करितां झपाट्यानें, दृढतेनें आणि लोकांची समजूत घालून केला पाहिजे. हिंदु देवळांच्या व्यवस्थेंत आणि राहणींत महत्त्वाचा फरफार केला पाहिजे. पण याविषयींचें स्वतंत्र विवेचन करणेंच अधिक इष्ट होईल.

मनुष्य कोणत्याहि जातीचा अथवा धर्माचा असो, तो अत्यंत अमंगळ नसेल अशा वेळीं, त्याला शिवाशिवीस कोणताच प्रत्यवाय नसावा. त्याचप्रमाणें जर स्वयंपाक योग्य लोकांच्या हातून शुचिर्भूतपणें झाला असेल आणि तोच पंक्तींत वाढला जात असेल आणि वाढणारे वाढण्याचे नियम पाळीत असतील, तर पंक्तीला बसणारे लोक कोणत्या जातीचे अथवा धर्माचे आहेत, याची शहानिशा करण्याचें कांहींच कारण नसावें. दुसऱ्याची ठेव बुडविणारे, खोट्या साक्षी देणारे, व्यभिचार करणारे, नातेवाईकांना देखील दगा देणारे आणि चोरून मारून अभक्ष्यभक्षण व अपेयपान करणारे असे सजातीय लोक आज अेका पंक्तीला बसतातच. तेव्हां पंक्तिव्यवहाराच्या नियमांत पवित्र आचरण किंवा सदाचार यांचें तत्त्व राखलेलें दिसत नाहीं. सरकारी दरबारांत ज्याप्रमाणें मानाचा उच्चनीच भाव असतो, त्याचप्रमाणें सामाजिक जीवनांत दरबारी उच्चनीच भाव उत्पन्न करून प्रपंचाचे नियम रचलेले दिसतात! निदान आज तरी निष्प्राण झालेल्या कलेवराप्रमाणें पंक्तिभेदाचे नियम दुर्गंधी पसरवीत आहेत.

पाण्याचीं भांडीं उष्टीं खरकटीं नसलीं म्हणजे पाणी कोणाच्याहि हातचें पाणी चाललें पाहिजे. यांत जात किंवा धर्म आड येऊं नये. अेवढी प्रगति झाली म्हणजे विहिरींचा प्रश्न आपोआप सुटेल. आपली बाटण्याची कल्पना आपण अर्थविहीन नाजूक करून ठेविली आहे. आणि गोऱ्या लोकांच्या मिजासीप्रमाणें

ब्राह्मणशाहीचे मिजासखोर नियम आपण आजहि चालवूं पहात आहेंत! आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं, मिजासखोरपणा सुटूनहि मिजासखोरीचे नियम मात्र धर्माच्या नांवानें चिकटून राहिले आहेत! आणि ज्यांनीं हे नियम सोडले आहेत, त्यांनीं धार्मिक शुद्धीच्या दृष्टीनें तसें केलें असेल तर उत्तम; पण बरेच लोक, शहरांत जो कांहींसा धर्मलंडपणा आलेला आहे त्यामुळें केवळ सोयीच्या दृष्टीनेंहि कांहीं अिष्ट सुधारणा अनिष्ट रीतीनें घडवून आणीत आहेत!

धार्मिक जीवनाचा अत्यंत आग्रह बाळगणाऱ्या समाजसेवकांनीं ठिक-ठिकाणीं आश्रम स्थापून तेथील जीवनांत या सुधारणा केल्या पाहिजेत. म्हणजे समाजांत धर्मनिष्ठाहि वाढेल आणि सामाजिक जीवनाचें संस्करणहि होअील. असें केल्यावांचून आपला समाज सुदृढ होणार नाहीं. पांढरपेशा हिंदु जातींना आपण अितर जातींचा किती अपमान करतों, किती पाणउतारा करतों, किती हृदयवध करतों, आणि त्यांना किती दूर लोटतों याची कल्पनाच येत नाहीं व म्हणून त्यांना प्रामाणिकपणें वाटतें कीं, आपण अगदीं निर्दोष असून आपल्या दुरवस्थेचा फायदा घेऊन अितर लोक शिरजोरपणें आपल्यावर हल्ला करीत आहेत.

अशा प्रकारें जीवनशुद्धि केल्यानंतर जातीजातींमधील वैमनस्य दूर करणें कांहीं अंशीं सोपें जाअील. मुख्य भर प्रेमाची उदारता या तत्त्वावरच नेहमीं असला पाहिजे.

रवींद्रनाथ ठाकुर म्हणतात कीं, 'जात हा शब्दच जन्मवाची आहे, आणि जोंवर जातीजातींमध्यें आणि भिन्नधर्मीयांमध्यें देखील मोकळेपणानें लग्नें होणार नाहींत, तोंवर जातिवैमनस्याचें घोंगडें भिजतच रहाणार!'

भिन्नधर्मीयांमध्यें विवाह होणें केव्हांहि अनिष्टच. दोघांनाहि धर्माविषयीं सारखीच अनास्था असेल, तर त्यांना भिन्नधर्मी म्हणतांच यावयाचें नाहीं. धर्म म्हणजे व्यापकतम अशी जीवनव्यवस्था. ही व्याख्या जर खरी असेल, तर भिन्न तत्त्वांवर रचलेल्या जीवनव्यवस्थांमध्यें विवाहासारखा जीवनव्यापी संबंध जुळणार किंवा टिकणार नाहीं; आणि कसाबसा टिकलाच, तर अशा विवाहाच्या अपत्यांना तो पोषक होणार नाहीं.

असें असलें तरी जर आज समाजांत असला अेकादा विवाह झालाच, तर समाजानें चिडून न जातां स्वतःचा तात्त्विक निषेध व्यक्त करून स्वस्थ असावें. सामाजिक बहिष्काराच्या भानगडींत पडूंच नये. रोटीव्यवहाराचें धोरण वर लिहिल्याप्रमाणें जर ठेवलें, तर भोजन–बहिष्कार ही वस्तूच निघून जाते. लग्नसंबंधाच्या बहिष्काराचा प्रश्न मुलें होऊन लग्नाच्या वयाचीं होतील तेव्हांच उठावयाचा. त्यावेळेचा समाज त्यांचें निराकरण करील; आणि तेंहि आअी-बापांच्या आचार–अनाचाराचा विचार करून नव्हे, पण अपत्यांच्या संस्कारितेचा विचार करून.

अेकाच धर्मांत भिन्नवर्णीयांमध्यें लग्न होणें फायदेशीर नाहीं; पण याहि बाबतींत बहिष्काराचें शस्त्र उचलूं नये. वर्णव्यवस्था ही रहाणी–करणी–विचार-सरणीची समानता आणि उपजीविकेचा धंदा यांसाठीं आहे. विवाहसंबंधांत वर्णांचा विचार करणें प्राप्त होतें खरें; पण तो विचार जबरदस्तीनें लोकांवर न लादतां सामाजिक शिक्षणानेंच तो टिकविला पाहिजे. ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्य स्वतः वातुळ किंवा पित्तकर आहार स्वतःच्या प्रकृतीचा विचार करून टाळण्याचें ठरवितो, ज्याप्रमाणें रूढ धर्माची आडकाठी नसूनहि श्रीमंत–गरिबांमध्यें फारसे विवाह होत नाहींत, ज्याप्रमाणें केवळ सामाजिक मताच्या जोरावर वृद्ध–बालिकाविवाहाची आणि बहुपत्नीकत्वाची चाल आपण जवळ-जवळ नामशेष केली आहे, त्याचप्रमाणें विवाह सवर्णांतच व्हावेत हा नियम देखील सामाजिक समजुतीवरच टिकावा.

पोटजातींच्या विवाहासंबंधानें येथें थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्या-प्रमाणें अेकाच गोत्रांत विवाह होत नाहींत, भिन्न गोत्रच पहावें लागतें, त्या-प्रमाणें विवाह अेका पोटजातींत होऊं नयेत. विवाह म्हटला म्हणजे तो दुसऱ्या पोटजातीशींच झाला पाहिजे, हा सिद्धांत धर्मनिष्ठ समाजाग्रणींनीं लोकांना उत्तम रीतीनें समजावून दिला पाहिजे.

आज हिंदु समाजांत जशा जाती जिवंत आहेत, तसे वर्ण जिवंत नाहींत. तेव्हां वर्ण ठरविणें तो जुना अैतिहासिक पुरावा शोधीत न बसतां संबंध जातीची हल्लींची रहाणी–करणी व मुख्य व्यवसाय पाहूनच त्यावरून ठरविला

पाहिजे. अशा रीतीचा वर्णनिर्णय शहरी समाजांत कदाचित् कठिण जाअील; परंतु खेडेगांवांत हें काम फार सोपें आहे.

भिन्नवर्णी विवाह अनिष्ट असले, तरी ते पापमूलक आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. आअीबापांच्या किंवा पालकांच्या संमतीनें उघडपणें निर्मळ संबंध भिन्नवर्णीयांमध्यें झाला, तर तो अेक सामाजिक प्रयोग होत आहे असें समजून त्याचा विरोध किंवा प्रचार न करतां निरीक्षणदृष्टीच ठेवावी.

भिन्नधर्मीयांमध्यें आज सलोखा जवळजवळ नाहींच म्हटला तरी चालेल. अेकमेकांच्या घरीं जाणें व बसणें–उठणें, अेकमेकांच्या सुखदुःखांच्या वेळीं हजर असणें, मदत करणें, अेकमेकांच्या उत्सवांत भाग घेणें, अेकमेकांच्या धर्मांचे व सामाजिक रूढीचे सिद्धांत सहानुभूतिपूर्वक समजून घेणें, स्वतःच्या दृष्टीनें जें चांगलें दिसेल त्याचा स्वतःच्या समाजांत स्वीकार करणें, हें अखंड चाललें पाहिजे. आज संकुचित संघटनानें आणि परस्पर–अविश्वासानें याच्या अगदीं उलट प्रकार सुरू झाला आहे. परस्पर–सहिष्णुता आणि धार्मिक रूढींना झेपेल अितका सलोखा, या दोन गोष्टी खेडेगांवांतील लोकांच्या हाडीं-मासीं खिळलेल्या आहेत. पण हल्लीं याचा अेकसारखा ध्वंस सुरू झाला आहे. उदारतेवर अविश्वास आणि 'मुत्सद्देगिरी'वर अलोट विश्वास हें सामाजिक अधःपाताचें मुख्य लक्षण आहे. समाज विस्कळित करावयास या-व्यतिरिक्त दुसरें कांहीं साधन नसलें तरी चालेल!

हा जातीजातींमधील आणि भिन्न समाजांतील घरोबा केवळ पुरुषांचा नसून बायकामुलांतहि दिसून आला पाहिजे.

असा घरोबा प्रथम सुरू करून मगच त्याला अनुरूप असें वातावरण मिळविणें शक्य आहे. पांढरपेशा जातींतील बायकांमध्यें शिवाशिवीचें प्रस्थ अतिशय असे. त्याचा उद्देश अनिष्ट घरोबा टाळण्याचाच असण्याचा संभव बराच आहे. पण आतां ही अनिष्टता राहिली नाहीं. उलट, घरोबा नसणें हेंच अेक अनिष्ट अथवा अरिष्ट आहे. ही शिवाशिव प्रथम काढून टाकिली पाहिजे. घरोबा सुरू झाला म्हणजे मग खालच्या जातींतून स्वच्छता, नीटनेटकेपणा, शुचिर्भूतता हीं यावयास लागतील. पांढरपेशा राहाणींतील अेक गोष्ट सर्व

जातींच्या व धर्मांच्या लोकांनीं घेतली पाहिजे व ती म्हणजे उच्छिष्टसेवन न करणें ही होय. भांडीं, पाणी आणि खाद्यपदार्थ कधींहि उष्टे कोणास देऊं नयेत. वरच्या जाती पुष्कळदां आपलें उष्टें उघडपणें किंवा चोरून खालच्या जातींस देतात आणि म्हणतात कीं, 'त्यांना चालतें.' त्यांना चाललें तरी तें आपणांस चालतां कामा नये. उष्टें असेल तें पुरूनच टाकलें पाहिजे. जमिनीनें दिलेलें अन्न उष्टें झाल्यावर जमिनींत परत खत म्हणून पोहोंचविलेलेंच बरें.

दुसरा प्रश्न मांसाहाराचा. मांसाहारी जातींनीं अन्नाहारी जातींशीं सलोखा वाढण्यासाठीं कांहीं गोष्टींत जपलें पाहिजे. उभयतांच्या सहभोजनाच्या वेळीं मांसाहार नसावा. भांडीं वगैरे सर्व कांहीं शुद्ध केलेलें असावें व घरच्या मुलां-लेकरांना व नोकराचाकरांना सुद्धां या बाबतींत शिक्षण देऊन ठेविलेलें असावें. कांहीं थोर मुसलमान खानदानांमध्यें ही गोष्ट पहावयास मिळते. अशांच्या घरीं जेवण्यांत कांहींच संकोच वाटत नाहीं. युरोपियन मिशनरी कुटुंबांत देखील ही गोष्ट साधणें अशक्य नाहीं. कांहीं ख्रिश्चन कुटुंबांतून ब्राह्मणी पद्धत चांगलीच आंगवळणी पडलेली दिसते; पण याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यांनीं अंडीं कोंबडीं किंवा अितर मांस सोडून दिलेलें असतें. अन्नाहारी लोकांसंबंधाचा प्रेमादर व्यक्त करण्यासाठींच त्यांचेबरोबर ते ब्राह्मणी थाट ठेवतात आणि अेवढें आपणास बस झालें पाहिजे. जर मांसाहार त्याज्य असेल, तर त्या तत्त्वाचा प्रचार झाला पाहिजे; पण मांसाहारी लोकांचा त्याग करून हा प्रचार होणें नाहीं. केवळ अन्नाहाराचे आपण कुशल मिशनरी बनलें पाहिजे.

# शूद्रवर्णाचें ओझें

आपल्या धर्मांत असें सांगितलें आहे कीं, शूद्रांनीं मनांत कोणत्याहि प्रकारची असूया न बाळगतां म्हणजे हेवा न करतां तिन्ही वर्णांची परिचर्या करावी. परिचर्या म्हणजे चाकरी. सामाजिक दृष्टीनें चाकरी आवश्यक असल्यामुळें तिला हीन समजतां येणार नाहीं. तरीपण सर्वच देशांत आणि सर्वच काळीं पोटासाठीं परिचर्येचें काम करणें हीनच गणलें गेलें आहे. याचें कांहीं ना कांहीं कारण असलेंच पाहिजे. प्रत्येक माणसानें आपल्या शारीरिक गरजा

स्वतःच्याच श्रमानें पूर्ण करून घेतल्या पाहिजेत हें स्वाभाविक आहे. स्वतःच्या शरीराचें सुख स्वतःच पहावें, कौटुंबिक कामें कुटुंबी जनांनींच करावींत, त्यासाठीं दासदासी किंवा नोकरचाकर यांची आवश्यकता असतां कामा नये. मनुष्य जर दुःस्थितींत येऊन पडला आणि त्यामुळें त्याला दुसऱ्याकडून सेवा घ्यावी लागली, तर परोपकारी सज्जन लोकांनीं त्याला अितकीच मदत करावी, कीं ज्यामुळें ती अडचण दूर होतांच तो मनुष्य पुन्हां स्वावलंबी बनेल आणि मदत करणारा पुन्हां आपल्या कामीं लागेल. या अैवजीं जर पगारी लोकांना परिचर्येच्या कामासाठीं राखून ठेवण्यांत येअील, तर परावलंबनाची स्थिति कायमचीच होऊन बसेल; आणि सामाजिक बाण साचूं लागेल. धंदा म्हणून परिचर्या करण्यांत दुहेरी परावलंबन असतें. कारण, त्यांत सेवा करणारा आणि सेवा घेणारा असे दोघेहि पंगू व आश्रित बनतात.

जो स्वतः तरेल आणि अितरांना तारील तो आर्यपुरुष, व जो स्वतः पडेल आणि अितरांनाहि पाडील तो हीन पुरुष होय. म्हणूनच समाजांत परिचर्या करणाऱ्या लोकांचा वर्ग जितका लहान असेल तेवढें चांगलें. समाज मुख्यतः त्रैवर्णिकच असावा. जो अज्ञानी असेल, असंस्कारी असेल, तोच शूद्र होय. अशा लोकांचें ओझें जर वाढेल तर समाजनौका बुडावयाचीच. म्हणून शूद्र-वर्ण शक्य तितका कमी ठेवला पाहिजे. जितके धंदेवाअीक लोक आहेत, तितके सगळे त्रैवर्ण्यांत आले पाहिजेत. मग तो धंदा पांढरपेशा असो वा नसो. कृषि, गोरक्षण आणि वाणिज्य यांत सर्व प्रकारचे कारागिरीचे धंदे येतातच. वैश्य-वर्ण ही कांहीं अेकादी स्वतंत्र जात नाहीं. अनेक व्यवसाय करणाऱ्या अनेक जाती मिळून जो सर्वसामान्य जनसमुदाय बनतो, तो सर्व वैश्य होय. जो स्वार्थत्यागपूर्वक राज्य चालवितो, प्रजारक्षण करतो आणि तसें करण्यासाठीं स्वतःवर कठिण अंकुश चालवितो तो क्षत्रिय.

जो वित्त आणि सत्ता यांच्या बाबतींत अत्यंत बेफिकीर राहून समाजाच्या दयेवर स्वतःचा चरितार्थ चालवील, आणि विद्या, संस्कारिता, कला, कारागिरी, थोडक्यांत म्हणजे समाजाचें धारण करणाऱ्या विशाल आणि सार्वभौम धर्माच्या बाबतींत जो संशोधन करील, प्रयोग करील, आणि त्याचा सर्वत्र प्रचार करील असा तपस्वीवर्ग म्हणजे ब्राह्मणवर्ण होय. हे दोन परोपकारपरायण वर्ग

वगळले म्हणजे आर्यांचा संस्कारक्षम मुख्य जनसमुदाय तो विराट् वैश्यवर्ण होय. जे कोणत्याहि प्रकारचा संस्कार ग्रहण करूं शकणार नाहींत, ज्यांच्यांत स्वतंत्र पुरुषार्थ नाहीं, अशा दुर्दैवी लोकांचा वर्ग तेवढाच शूद्रवर्ण समजला गेला पाहिजे.

अपंग अशा मुलांना शिक्षण देऊन संस्कारी बनविण्यासाठीं ज्याप्रमाणें आधुनिक मोठे शिक्षणतज्ज्ञ प्रयत्न करीत आहेत, त्याप्रमाणें शूद्रांनाहि हळुहळू शौचादि गोष्टींचें शिक्षण देऊन द्विजांप्रमाणें बनविणें हा हिन्दुधर्माचा मुख्य प्रयत्न झाला पाहिजे. जो समाज स्वतःच हळुहळू संस्कार सोडून देत असेल, आणि नैतिक असंस्कारिता अंगीं बाणवीत असेल, तो अितरांना काय सुधारणार? आपल्या लोकांनीं त्वरेनें जागृत होण्याची वेळ आतां येऊन ठेपलेली आहे.

# तीन वर्ग

सामाजिक प्रवृत्त्यनुसार ज्याप्रमाणें आपण संस्कारी असे तीन वर्ण कल्पिले आहेत, त्याप्रमाणें आपल्या येथें निसर्गानें देखील तीन वर्ण कायमचे बनविले आहेत. लंकेपासून गुजरातेंतील घोघा बंदरापर्यंत जो समुद्रकिनारा पसरलेला आहे, त्याचे प्राकृतिकदृष्ट्या तीन विभाग पडतातः (१) अगदीं समुद्राचा किनारा. (२) किनाऱ्याच्या पूर्वेकडील डोंगरी मुलूख आणि (३) या दोहोंमधील कोठें रुंद तर कोठें अरुंद असणारा असा सपाट प्रदेश.

या तीन विभागांत राहणाऱ्या जनतेची आजीविका वेगवेगळी आहे. यामुळें तिचा व्यवसायहि वेगवेगळा आहे. याचा परिणाम म्हणून तिच्या स्वभावांतहि भिन्नता आलेली आहे. समुद्राच्या काठीं वसणाऱ्या जाती दर्या नांगरतात, समुद्राच्या द्वारें आपली उपजीविका प्राप्त करतात आणि जिकडे समुद्र खेंचून घेऊन जाअील तिकडे जातात. होडी हा त्यांचा जीवनसाथी. मधल्या विभागांतील जनता आपला उदरनिर्वाह मुख्यत्वें शेतीवर करते. धान्य, कापूस, ऊस, तंबाखू आणि नाना प्रकारचीं फळझाडें हें त्यांच्या उपजीविकेचें मुख्य साधन असतें. आणि म्हणून गुरें—गायी, म्हशी, बैल, घोडे, शेळ्यामेंढ्या

वगैरे त्यांच्या जीवनाचे साथी असतात. जंगलांत राहणाऱ्या लोकांच्या आ-जीविकेचें मुख्य साधन शिकार हें असतें. हे लोक शेतीची कांहींशी मदत घेतात खरे पण त्यांचा मुख्य आधार शेतीवर नसतो. या लोकांचा जीवनसाथी फक्त कुत्रा असतो.

जातीपातींच्या भांडणांत रुतलेले आपण लोक निसर्गाचे हे तीन वर्ण लवकर समजूं शकत नाहीं. निसर्गाजवळ हिन्दु, मुसलमान, पारशी, शिद्दी वगैरे भेदभाव नाहीं. पांढरपेशा आणि श्रमजीवी हा भेदहि निसर्गानें केलेला नाहीं. निसर्ग प्रत्येकाकडून मेहनतीची अपेक्षा करीत असतो.

शहरांतच सबंध आयुष्य घालविणारे लोकहि वर सांगितलेले तीन प्राकृतिक विभाग लवकर समजूं शकत नाहींत. त्यांच्या दृष्टीनें जनता म्हणजे ब्राह्मण, वैश्य आणि जमीनदार. या व्यतिरिक्त जर कोणी असेल, तर तें म्हणजे परदेशी किंवा परधर्मी लोक. जिच्यावर सर्व समाजाचा आधार आहे ती श्रमजीवी, अल्पसंतोषी व तितक्या अंशीं निष्पाप अशी जनता त्यांच्या ध्यानांतहि येत नाहीं.

वर सांगितलेल्या तीन वर्गांना आपण सहज तीन नांवें देऊं शकतों. सागरी-वर्ग, कृषिवर्ग आणि वन्यवर्ग. सागरीवर्गांत मुख्यत्वें नौकानयन करणारे व मच्छीमारी करणारे लोक येतात. कृषिवर्गांत कुणाकुणाचा अन्तर्भाव होतो हें सर्वांना माहीत आहेच. वन्यवर्गांत त्याचे मुख्य प्रतिनिधी ते भिल्ल, कातकरी, रामोशी वगैरे जातींचे लोक येतात. आपण आतांपर्यंत फक्त कृषि-वर्गाचाच विचार करीत आलों आहोंत. सागरी व वन्य वर्गांना आपल्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय पुरुषार्थांचा फायदा क्वचितच मिळाला आहे.

आजीविका व व्यवसाय यांच्या अनुसार प्रत्येक वर्गाचा स्वभाव वेगवेगळा असतो. सागरीवर्गांतील लोक साहसी, दीर्घोद्योगी आणि सुसरीसारखे किंवा मुंगळ्यासारखे चिकट असतात. जितक्यांदा जाळें तुटेल तितक्यांदा पुनः पुनः तें जोडण्यांत हे लोक कुशल असतात. साहसप्रेम हा या वर्गाचा विशेष गुण. अर्थात् प्रस्थाना ( प्रवासा ) मुळें ते कांहींसे बेदरकार असतात हें मात्र खरें.

कृषिवर्गाचा मुख्य गुण म्हणजे देशप्रीति. जमिनीसाठीं तो आपले प्राण पणास लावील. वेळ आल्यास तो आपली जात किंवा धर्महि सोडील; पण कांहीं झालें तरी जमिनीला चिकटून रहावयाचेंच असा या वर्गाचा स्वभाव असतो. कृषिवर्गाजवळ दीर्घदृष्टि, धीर, कळकळ व प्रभुता असते. निसर्गावर आणि पशूंवर नेहमीं विजय मिळवावयाचा असल्यामुळें आणि सहकार्यानें अेक-अेकमेकांच्या अडचणी दूर करावयाच्या असल्यामुळें मोठमोठे संघ स्थापणें, व्यवस्था करणें, वगैरे गोष्टी त्याला सहज जुळतात.

वन्यवर्गाचा स्वभाव याहून अगदीं भिन्न असतो. स्वावलंबन, अखंड जागृति, अनोळखी व्यक्तीविषयीं कांहींसा अविश्वास व या सर्वांना दिपवून टाकणारी स्वातंत्र्य–प्रीति हे या वर्गाचे खास गुण होत. वन्यवर्ग ज्याच्यावर विश्वास टाकील, त्याच्या कुशींत डोकें खुपसून निर्धास्तपणें झोपीं जाअील. पण तो सहजासहजीं विश्वास ठेवणार नाहीं. अिमान, विश्वास, आतिथ्य आणि बहादुरी या गुणाची या वर्गात विशेष कदर होत असते.

तिन्ही वर्गांचे म्हणून वर जे गुण सांगितले, ती त्यांना निसर्गाकडून मिळालेली देणगी आहे. त्या त्या जातींत हे गुण असलेच पाहिजेत. जर ते नसतील, तर तें त्या माणसांतील वैगुण्य आहे; समाजरचनेचा दोष आहे; अितिहासाची विकृति आहे. ही स्थिति टिकतां कामा नये.

त्या त्या वर्गाचा हा मूळ स्वभाव पुनः विकसित करणें ही कांहीं अशक्य कोटींतील गोष्ट नाहीं. निसर्गाला थोडीशी अनुकूलता मिळाली कीं पुरे. आपला गुण दाखविल्याशिवाय तो रहावयाचा नाहीं.

आज आपण ज्यांना वन्यजाती असें म्हणतों त्यांच्यांत वर सांगितलेला स्वभाव उरला आहे काय? जर तसा तो उरला नसेल, तर त्याबद्दल जबाबदार कोण? जर आपण वन्यजातींना त्यांच्या आणि आपल्या भल्यासाठीं शेतींत खेंचून आणलें असेल, तर त्यांच्यांत दोन्ही वर्गांतील गुण प्रकट झाले पाहिजेत. यांचे अेक दृश्य फळ म्हणजे हस्तकलेंतील कौशल्य. दोहोंच्या सहकार्यानें व स्वभावमिश्रणानें विशेष सुंदर परिणाम झाला पाहिजे. कृषिवर्ग आणि वन्यवर्ग सहकार्य करतील, तर दोघांचाहि असाधारण फायदा झाला पाहिजे. जर आतापर्यंत तसें झालें नसेल, तर ती आपल्या कौशल्यांतील उणीव आहे.

अजूनहि आपण ही चूक प्रयत्नानें सुधारूं शकूं. कृषिवर्ग आणि वन्यवर्ग यांचीं हिताहितें परस्पर–विरोधी असूच शकणार नाहींत. अेकमेकांच्या विकासांत अेकमेकांचीं हितें सामावलेलीं आहेत, हा निसर्गाचा नियम जर आपण समजून घेऊं, तर समाजजीवनांत खूपच अनुकूल असा फेरफार होओील.

हा सिद्धान्त जनतेच्या गळीं उतरण्यासाठीं या दृष्टीनें लिहिलेला आपल्या प्रान्ताचा भूगोल आपल्याजवळ असला पाहिजे. प्राकृतिक भूरचना, तिचे विभाग, त्या त्या विभागाच्या सोयी–गैरसोयी, तेथील समृद्धि, त्यामुळें पडलेले समाजाचे वर्ग, त्यांचे जीवनप्रवाह आणि त्या सर्वांची परस्परावलंबिता या गोष्टी स्पष्ट करून दाखविणारे ग्रंथ रचले पाहिजेत, व त्यांचा राष्ट्रीय पायावर प्रचार झाला पाहिजे.

# नव्या जाती

जाती असाव्यात किंवा नसाव्यात या बाबतींत अेक मुद्दा नेहमीं मांडण्यांत व तसाच खोडूनहि काढण्यांत येत असतो. ज्या लोकांना जाती ठेवावयाच्या आहेत ते म्हणतात ' जात ही स्वयंभू आहे. मनुष्याच्या स्वभावांतच जातीचें तत्त्व आहे. युरोपांत कुठें जाती नाहींत ? तेथील श्रीमंत लोक गरीब लोकांशीं विवाहसंबंध जोडीत नाहींत. अेका पंगतींत बसून जेवीत देखील नाहींत. तेथें पैशाच्या तत्त्वावर जात बनत असते; आणि तें अगदीं वाअीट तत्त्व आहे. आपल्या येथें जात ही घराण्यावर, जन्मावर आणि रक्तावर अवलंबून असते. संस्कृतीच्या दृष्टीनें हें उच्च तत्त्व आहे. ' हें म्हणणें खोडून काढणारे म्हणतात, ' युरोपांत जाती नसून वर्ग आहेत. आणि मनुष्य अेका वर्गांत जन्मला कीं त्यानें आपला तो जन्मजात वर्ग कधींहि सोडतांच कामा नये, अशा प्रकारचा न्याय किंवा अन्याय तेथें नाहीं. अेकादा चांभार लॉर्डहि होऊं शकतो आणि अिंग्लंडचा मुख्य प्रधानहि होऊं शकतो. कार्डिनल वुल्सी हा खाटिकाचा मुलगा; तो धर्मगुरुहि झाला व मुख्य प्रधानहि झाला. अेका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत जाणें कितीहि कठिण असलें तरी अशक्य मात्र नसतें. '—अशा प्रकारें उत्तर दिलें म्हणजे आपण जातींची बाजू पूर्णपणें खोडून काढली व वर्गांचा पूर्ण बचाव झाला असें त्या लोकांना वाटूं लागतें.

जात ही जरी सनातन असली व वर्ग हा कांहीं विशिष्ट मुदतीपुरताच असला, तरी दोहोंमध्यें जितक्या अंशीं उचनीच भाव आहे तितक्या अंशीं तो अन्यायमूलक आणि क्लेशदायक आहेच. अेक मुलगा अंत्यज आहे म्हणून त्याला शिक्षण मिळूं नये आणि दुसरा मुलगा गिरणी-मजुराच्या घरीं वाढत आहे म्हणून त्याला शिक्षण मिळूं नये, यांत दोघांच्याहि अडचणी व त्रास हीं सारखींच आहेत. जात आणि वर्ग या दोहोंत अेक वृत्ति समान असते. ती ही कीं दोहोंत आपल्या लोकांशीं माणुसकीचें वर्तन किंबहुना पक्षपातहि असतो आणि आपल्या जाती किंवा वर्गाबाहेरील लोकांसंबंधीं जबाबदारीचा स्वीकारहि नसतो; न्यायाचें आचरणहि नसतें. मनुष्य कोणत्याहि नांवानें अेकादी टोळी बनवितो, आंतील लोकांना आपले समजतो, बाहेरच्यांना शत्रू समजतो आणि लढूं लागतो.

क्षणिक किंवा तात्पुरत्या जातीचें उत्तम उदाहरण आपल्याला रेल्वेस्टेशनवर पहावयास मिळतें. डब्यांत बसलेले लोक अेका जातीचे आणि डब्यांत शिरूं पाहणारे लोक दुसऱ्या जातीचे. डब्याच्या दरवाजाच्या सरहद्दीवर या दोघांत युद्ध सुरू होतें. जे सफलतापूर्वक आंत घुसतात ते आपल्या बाहेरच्या जातीचे पक्षपाती न राहतां लागलीच आपली जात फिरवितात; आंतील लोकांना जाऊन मिळतात आणि नवीन येणाऱ्यांना विरोध करतात. श्रीमंत आणि गरीब ही जातहि अशीच आहे. विद्वान् आणि अविद्वान् यांचेंहि असेंच आहे. आणि आतां तर तरुण आणि वृद्ध याहि परस्पर–विरोधी अशा जाती होऊं पहात आहेत असें दिसतें. मनुष्याला संकुचितताच आवडत असेल, भेदच पहावयाचा असेल, तर वाटेल तितक्या जाती पाडतां येतील. जोडे उंच ठेवावेत कीं सपाट ठेवावेत या मुद्यावर अेका देशी संस्थानांतील मुत्सद्यांत दोन तट पडले होते! मूर्तींना कृत्रिम डोळे बसवावेत किंवा बसवूं नयेत या महान् तत्त्वावर जाती पडल्या आहेत! धोतराची निरी डाव्या बाजूस असावी कीं उजव्या बाजूस असावी या तत्त्वावर देखील जाती पडावयाच्या! आणि सदरा विजारीच्या आंत घालावयाचा कीं बाहेर मोकळा सोडावयाचा यावर देखील माणसांमध्यें दोन पक्ष पडावयाचे! सतार वाजवितेवेळीं अंगठा सतारीला चिकटून रहावा कीं सुटा रहावा यावरून देखील

गवयांमध्यें खानदानी आणि बिनखानदानी असे भेद पडतात, हें काय आपल्याला माहीत नाहीं?

जोंपर्यंत माणसांत संकुचितता आहे, क्षुद्र अभिमान आहे, बालिशता आहे आणि आंधळेपणा आहे, तोंपर्यंत तो वाटेल तितक्या जाती पाडण्यास तयार होईल. आपण जेव्हां जुन्या जाती तोडण्याचा प्रयत्न करीत आहोंत त्याच-वेळीं नव्या जाती बनवीत आहोंत—इकडे आपलें लक्ष जात नाहीं. रबीच्या दोरीचें एक टोक एकीकडून सुटत जातें, तर त्याच वेळीं दुसरीकडून दुसरें टोंक गुंडाळलें जात असतें. त्याचप्रमाणें आपण एकीकडून जुन्या जाती तोडीत आहोंत, तर दुसरीकडे नव्या जाती तयार होतच आहेत.

जाती बनविण्याचीं तत्त्वें महत्त्वाचीं असतील तर कांहीं हरकत नाहीं. मांस खाणाऱ्या व न खाणाऱ्या अशा वेगवेगळ्या जाती बनल्या तर त्यांत आश्चर्य नाहीं. दारू न पिणाऱ्या लोकांनीं दारू पिणाऱ्या लोकांना समजाविण्यासाठीं त्यांच्यावर मर्यादित बहिष्कार घातला असेल, तर तें ध्यानांत येण्यासारखें आहे. पण जे नव्या जाती उत्पन्न करतात त्यांनीं दोन गोष्टींकडे लक्ष दिलेंच पाहिजे. (१) महत्त्वाच्या तत्त्वानुसार जात बनवावी, आणि (२) क्षुल्लक कारणा-वरून जाती किंवा पोटजाती पडल्या असतील तर त्या नाहींशा करून टाकाव्यात. कांहीं कारणें मुळांत महत्त्वाचीं असतात परन्तु कालान्तरानें तीं तत्त्वें निष्प्राण होऊन जातात. अशा तत्त्वांवर पडलेल्या जाती वेळेवर मोडावयासहि हव्यात.

आजकाल पाडूं नयेत अशा जातीहि पाडण्यांत येत आहेत, व सनातन भांडणें निर्माण केलीं जात आहेत. स्त्रियांनीं आपल्या हक्कांसाठीं पुरुषांशीं लढण्याकरितां एक वेगळीच जात बनविण्याचा प्रयत्न केला असल्यास तें किती विचित्र दिसत असेल! तरुण आणि वृद्ध हा भेद सनातन आहे; पण त्यामुळें जर दोन जाती पडतील आणि हिन्दु-मुसलमानांप्रमाणें त्यांच्यांत विरोध उत्पन्न होईल तर त्यांचा शेवट कधींकाळीं लागेल काय? जितके भेद तितके वर्ग अथवा तितक्या जाती, असें केल्यास समाजाची दशा वाळूसारखी होऊन जाईल. ज्यांना 'कलापी'ची (एक सुप्रसिद्ध गुर्जर कवि) कविता आवडते त्यांची एक जात आणि ज्यांना ती आवडत नाहीं त्यांची दुसरी जात,

गृहपतींची जात वेगळी, विद्यार्थ्यांची जात वेगळी, पालकांची जात वेगळी नि पालथांची जात वेगळी, उजव्या हाताची वेगळी नि डाव्या हाताची वेगळी, अडकित्याची वेगळी नि सुपारीची वेगळी—जितके हितसंबंध वेगळे तितक्या वेगळ्या जाती—असा भेद आपण कुठवर करणार ? भेदांकडे जास्त ध्यान देणें हें तत्त्वनिष्ठेचेंहि लक्षण होऊं शकतें आणि दुर्बलतेचेंहि लक्षण होऊं शकतें.

जाती किंवा वर्ग पाडल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण ते शक्य तितके कमी व्हावेत, त्यांच्या मागें जीवनव्यापी किंवा समाजव्यापी दीर्घजीवी तत्त्वें असावींत आणि अितर लोकांशीं लढण्याच्या वृत्तीनें नव्हे, तर समान लोकांना अेकमेकांस मदत करणें शक्य व्हावें म्हणून वर्ग पडले असतील तर तें अिष्ट आहे. जे जुन्या जाती मोडूं अिच्छितात त्यांनीं तरी नव्या जाती बनविण्यापूर्वी हजार वेळां विचार केला पाहिजे. आणि जाती विनाकारण वाढूं नयेत हें पाहणें जितकें जरुरीचें आहे तितकेंच जरुरीचें हेंहि आहे कीं, कारण नाहींसें झाल्यानतर भेदहि वेळच्या वेळीं नाहींसा झालाच पाहिजे. नाहींतर मंदिराचे भग्नावशेष उरले असले तरीहि ते आपणहून पाडावयाचे नाहींत या नियमाप्रमाणें अेकदां बनविलेली जात कधीं मोडतांच येत नाहीं असा स्वभाव होऊन बसावयाचा. माणसागणिक जाती बनवून चालेल काय ?

# अठरा आणि अैंशी

गुजरातमधील आजच्या लोकवस्तीसंबंधीं जशी हवी तशी तपशीलवार माहिती मिळत नाहीं. सरकारी अहवालांत गुजरातला स्थानच नाहीं. त्यांत फक्त उत्तर विभागांतील पांच जिल्हे आहेत. देशी राज्यांसंबंधीं आवश्यक तेवढी विस्तृत माहिती त्यांत मिळत नाहीं. यामुळें सुमारें तीस वर्षांपूर्वी श्री. भीमभाअी किरपाराम यांनीं तयार केलेल्या पुस्तकांत १८९१ च्या गुजरातच्या लोकवस्तीसंबंधीं तपशीलवार आंकडे दिले आहेत, त्यांवरच विसंबून रहावें लागतें. ४० वर्षांपूर्वीचे हे जुने आंकडे आजहि उपयोगी आहेतच. गेल्या

चाळीस वर्षांत वस्ती वाढली असणारच. पण गुजरातेंत राहणाऱ्या वेगवेगळ्या जातींचें प्रमाण फारसें बदललें असेल, असें समजण्याचें कारण नाहीं. आणि आपण तर या जातींचेहि दोन मोठे विभाग पाडूनच विचार करणार आहोंत. तेव्हां जुने रस्ते आपल्याला चुकीच्या मार्गानें घेऊन जातील हें भय उरत नाहीं.

प्रश्न हा आहे कीं, गुजरातेंत पांढरपेशा, बैठ्या किंवा बुद्धिजीवी वर्गाचे लोक किती आहेत ? आणि मजूरपेशा, कारागीर, स्वावलंबी, श्रमजीवी लोकांची संख्या किती आहे ? भीमभाअींच्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत मुसलमान, पारशी, खिस्ती, वगैरे जातींचे आंकडे दिले आहेत. पण त्या जाती धंद्यांनुसार नसल्यामुळें आपल्याला हवें असलेलें प्रमाण त्यामधून मिळत नाहीं. शिवाय गुजरातेंत हिन्दूंचें प्रमाण जवळजवळ शेंकडा नव्वद असल्यामुळें त्यांचेच आंकडे घेऊन आपण चालूं तर आपल्या तपासणींत अडचण येणार नाहीं.

वाणी-उदीम ( त्यांत जैन येतात ), ब्राह्मण, ब्रह्मक्षत्री, अिनामदार, काठी ( काठीयावाडमधील अेक मूळ जात ), आणि भाटचारण, या जाती श्रमजीवी नसल्यामुळें त्या बुद्धिजीवी आहेत असें म्हणतां येअील. ते देखरेख करतील, हिशेब ठेवतील, लेखणी चालवितील, जबाबदारी घेतील, कारभार पाहतील, शिक्षण देतील आणि अितरहि कितीतरी महत्त्वाची समाजसेवा करतील. पण घाम गाळण्याचें काम त्यांचें नव्हे. सांवलींत बसून जीवन कंठणें हेंच त्यांना पसंत असतें.

श्रमजीवी लोकांना सारखे हातपाय हालवावे लागतात. ते धान्य उत्पन्न करतील, नाना प्रकारच्या वस्तू तयार करतील, मनुष्यजातीला खाद्यपदार्थ पुरवितील, पांढरपेशा लोकांची सेवा करतील आणि पुष्कळ अंशीं स्वतः स्वावलंबी राहतील. हे लोक धोक्यांत उडी घेतात असें म्हणण्यापेक्षां यांची जीवनयात्राच अशी असते, कीं त्यांच्या शिरावर धोक्याची नंगी तरवार नेहमीं टांगलेली असते असें म्हटल्यास जास्त बरोबर होअील. मेघराज रुष्ट झाले कीं पहिल्या प्रथम यांनाच फटकारा बसतो. मानवी राजाला संभाळण्याचें ओझेंहि

यांच्या शिरावर कांहीं कमी असत नाहीं. सुखोपभोगाचीं साधनें यांना सर्वांत शेवटीं मिळावयाचीं. जेव्हां देशासाठीं लढावयाचा प्रसंग येतो तेव्हां मात्र अधिकांशानें यांच्यावरच आशा केन्द्रित केली जाते.

हा वर्ग किती सुखी आहे, किती सज्ञान आहे, किती सावध आहे, यावरूनच आपल्या पुरुषार्थाची कसोटी ठरणार आहे. आपलें शिक्षण जर फक्त बुद्धिजीवी लोकांसाठींच असेल, तर त्याला सार्वजनिक म्हणा नाहींतर राष्ट्रीय म्हणा, तें जातीय शिक्षणच आहे. छात्रालयाची सोय जर बुद्धिजीवी लोकांपुरतीच असेल तर तीहि सामाजिक जबाबदारी न समजतांच केली गेलेली आहे असें म्हणावें लागेल. हे बुद्धिजीवी लोकहि जर आपल्या चारचार किंवा दहादहा हजार लोकांच्या वसत्या ( कॉलनीज ) बांधून आपापले सवते सुभे निर्माण करतील, तर ती आंधळेपणाची अगदीं कमालच म्हणावी लागेल. अशा स्थिति आपल्या येथें वर्षानुवर्षें चालत आली नसती, तर अदूरदृष्टि आणि आत्मघाती समाजाचें वर्णन करण्यासाठीं अशा स्थितीचें काल्पनिक चित्र आपण तयार केलें असतें. पण ही आपल्या रोजच्या अनुभवांतीलच गोष्ट असल्यामुळें हिच्याबद्दलचें आश्चर्य किंवा अस्वाभाविकत्व आपल्याला जाणवत नाहीं. तिचा भयानकपणा आपल्याला अस्वस्थ करून सोडीत नाहीं.

लोकवस्तीचें प्रमाण खालील रकान्यांवरून ध्यानांत येअील:—

| बुद्धिजीवी | संख्या | अेकूण हिंदु वस्तीशीं शेंकडा प्रमाण |
|---|---|---|
| व्यापारी ( वाणी वगैरे ) | ६०,००,१३ | ६·०६ |
| ब्राह्मण | ५,६८,८६८ | ५·७५ |
| ब्रह्मक्षत्री, कायस्थ, प्रभु | ९,०८७ | ·०९१ |
| अिनामदार | ४,९८,०६३ | ५·०३ |
| भाटचारण वगैरे | १,१२,८७३ | १·१४ |
| काठी | २८,५०० | ·२९ |
| | १८,१७,४०४ | १८·२६१ |

| श्रमजीवी | संख्या | अेकूण हिन्दु वस्तीशीं शेंकडा प्रमाण |
|---|---|---|
| कारागीरवर्ग | ९,९३,६७६ | ९·०४ |
| पाटीदार, कुणबी, काछिया | १५,४४,४८६ | १५·६२ |
| कोळी, धाराळा | २२,७६,६३३ | २३·०२ |
| भिल्ल, रानीपरज, दुबळे | १०,९४,७९८ | ११·०७ |
| धेबा, न्हावा, हुजरे | २,१२,१७६ | २·१४ |
| धनगर, गुराखी | ४,७८,१७६ | ४·८३ |
| अंत्यज | ८,६०,६५५ | ८·७ |
| दरियापरज वगैरे | ७,०९,८१० | ७·०२ |
| | ८०,७०,४१० | ८१·४४ |

गुजरातेंतील अेकूण हिन्दू ९८,८७,८१४ ( १८९१ मध्यें ).

वरील रकान्यांचें सार हें कीं जेथें बुद्धिजीवी अठरा आहेत, तेथें श्रमजीवी अैंशी आहेत. या अैंशी लोकांसाठीं आपण अठरा लोक काय करीत आहोंत? आपण अेकत्र अेकाच समाजांत राहात आहोंत, यामुळें आपल्या परिश्रमाचा कांहींसा फायदा या लोकांना अप्रत्यक्षपणें मिळत असतो यांत शंका नाहीं. पण जेव्हां जेव्हां सामाजिक जबाबदारी समजून आपण अेकादा लोकहिताची प्रवृत्ति अंगीकारतों, तेव्हां तेव्हां हे श्रमजीवी लोक आपल्या दृष्टीसमोर कितीसे असतात, आणि मध्यम वर्गांतील बुद्धिजीवी लोकांचाच आपण किती विचार करीत असतों, हें आपण आपल्या हृदयांत खोलवर शिरून तपासून पाहिलें पाहिजे. आणि जर आतांपर्यंतच्या जीवनांत आपण समाजघाती चूक केली आहे असें प्रत्ययास येत असेल, तर पश्चात्तापपूर्वक आपण हृदयपरिवर्तन केलें पाहिजे, आणि प्रवृत्तीची दिशाहि बदलली पाहिजे.

प्रथम कारागीरवर्गच घेऊं. गुजरातची कारागिरी प्राचीन काळापासून प्रख्यात आहे. त्या लोकांना उत्तेजन देणें, सुशिक्षित करणें, नवी दिशा दाखविणें, संघटित करणें, हें ब्राह्मणांचें व वैश्यांचें काम आहे. तें करण्याअैवजीं आपण परदेशी फॅशनींत वाहून गेलों, सुलभतेच्या मागें लागलों आणि कारागिरांना उपाशी मारून कमिशनच्या लोभानें आपण परदेशी माल घरांत भरला.

कारागीरवर्ग हुशार असल्यामुळें त्यानें जगण्यासाठीं शेवटपर्यंत खूप धडपड केली. पण जगाची किंवा देशाची परिस्थिति पाहूं शकेल अशी दृष्टि देणारें शिक्षण त्याच्याजवळ नव्हतें. त्याचें मार्गदर्शन करणारे त्याचे स्वाभाविक पुढारी जे पांढरपेशे लोक ते स्वार्थी बनले आणि कारागीरवर्ग मुका राहिल्यानें त्या बिचाऱ्याला निमूटपणें सर्व कांहीं सहन करावें लागलें. दिवसाढवळ्या चोर घरांत घुसला आणि घरांतील पुढारी लोक त्या चोराचे कमिशन अजंट बनले! मग तें घर कसें टिकणार? १८ लोक ८० लोकांशीं प्रामाणिक राहिले नाहींत याचा परिणाम काय झाला तें आपण पहातच आहोंत. कारागिरां-तील मुख्य वर्ग विणकरांचा तो तर नष्टप्राय झाला होता अर्थात् विणकरां-मध्यें कांतणारे, पिंजणारे, विणणारे, भावसार (खडी काढणारे) वगैरे सर्व लोक येतात.

दुसरा क्रमांक सुतार, लोहार व गवंडी यांचा. त्यांचा धंदा कसा सुधारेल याचा आपण विचार दखल केलेला नाहीं. त्यांचीं हत्यारें येथें बनेनातशीं झालीं. तीं परदेशांतून येऊं लागलीं. व आपण त्यांच्यावर कमिशन मिळवून संतोष मानला. आतां तर त्यांच्या कामासाठीं परदेशी यंत्रेच आणून आपण काम चालवूं इच्छीत आहोंत किंवा पत्रे वगैरे सामानच परदेशांतून आणणें सोयीचें समजतों. असें करण्यानें त्या वर्गाचें काय होईल याचा विचार करण्याची जबाबदारी आपला आहेच कुठें मुळीं? गुजरातेंत खडीकाम फार सुंदर होत असे. पण आपण आपली फॅशनच बदलून टाकली! यामुळें रंग, कपडे, खडीकाम सर्वच परदेशी आलें. आपल्या नव्या चित्रकारांच्या व कलावंतांच्या स्वप्नांतहि आज हा विचार येत नाहीं, कीं आपल्या कारागिरांना हरतऱ्हेच्या वेलबुट्ट्यांचे नमुने तयार करून देणें हें आपलें प्रथमकर्तव्य आहे.

आतां भांडीं बनविण्याचा धंदा घेऊं. भांडीं मातीचींहि असतात आणि तांबें, पितळ, लोखंड वगैरे धातूंचींहि असतात. आपले लोक कोणत्या प्रकार-चीं भांडीं जास्त तयार करतात व वापरतात याची कल्पना पुढील आंकड्यां-वरून येईल; व त्याचबरोबर देशाच्या समृद्धीचीहि कांहींशी कल्पना येईल.

आपल्या येथें जेव्हां कासार १४,१२८ होते, तेव्हां कुंभारांची संख्या २,४८;४१० होती.

श्रमजीवी वर्गांत सर्वांत मोठी संख्या पाटीदार, कुणबी, धाराळा, धनगर, गुराखी, दुबळे, भिल्ल, रानीपरज (वन्यजाती) व दरियापरज (सागरी जाती) यांची आहे. या लोकांची संख्या चांगली ६१ लाख आहे. त्यांच्याजवळ सबंध वर्षभर काम असतें कीं नाहीं हें आतांपर्यंत आपण पाहिलेंच नव्हतें. सरकारी जोखडाचें ओझें त्यांच्याच खांद्यांवर जास्तींतजास्त असतें. जमीनमहसूल, दारूताडीवरील कर, परदेशी कापडाचा खर्च, मिठावरील कर, वगैरे जीव घेणारीं ओझीं त्यांच्याच डोक्यावर असतात. आणि अितकें असूनहि लुटारूंपासून त्यांना पुरेसें रक्षणहि मिळत नाहीं. दररोजच्या डुकरावानरांच्या त्रासापासून संरक्षण मिळत नाहीं; तर मग लांचलुचपतीपासून त्यांना कोण वांचविणार? शिक्षणाच्या दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे त्यांना उष्टया पत्रावळीहि चाटावयास मिळत नाहींत. औषधाची सोय नसते हा अेक उपकारच समजला पाहिजे. दुष्काळ, कर्ज, लोकभ्रम आणि मलेरिया हे त्यांचे खरे राजे! या वर्गासाठीं आतांपर्यंत आपण कांहींच केलें नव्हतें!

देशरक्षणाचें काम अिनामदार आणि धाराळा (ठाकूर) लोकांच्या शिरावर असलें पाहिजे. त्यांना आपण कधीं विचारलेंहि नाहीं कीं तुमचें कसें काय चाललें आहे? अिनामदारांचे राजे दोन: अफू आणि कुसुंबा! या राजभक्तींतून ते मुक्त होतील तेव्हां कुठें धाराळांचा विचार करूं शकतील. भिल्ल वगैरे वन्यजाती रामकृष्णांच्या वेळेपासून समाजबाह्य समजण्यांत येत आहेत. त्यांना जंगलांत राहून जसें उपाशी मरावयाचें असेल तसें त्यांनीं खुशाल मरावें! त्याचें आपल्याला काय होय? आणि सागरी जाती हिंसा करून जगत असतात. त्यांना आपण आपल्या शेजारीं राहूं देतों हेंच मुळीं जास्त म्हणावयाचें! आणि शेवटचे अंत्यज! त्यांना भगवानहि दर्शन देत नाहीं, तर मग पांढरपेशा वर्गांतील मनुष्य त्यांची सांवली आपल्या अंगावर कशी पडूं देअील? त्याचा हात हातीं घेतांच यावयाचा नाहीं!

आपली सामाजिक जबाबदारी ही अशी आहे. व्यापार करून करोडों रुपये मिळवावेत, जातींचे फंड जमा करून जातवाल्यांना सरकारी शिक्षण द्यावें, त्यांच्यासाठीं छात्रालयें उघडावीत मंदिरांच्या पुजाऱ्यांना दक्षिणा द्याव्यात, मंदिरांत दिवे जाळावेत आणि अन्नकेट करावेत; व आपल्या मनाची अशी

समजूत करून घ्यावी कीं अीश्वर आणि मनुष्य यांचें आपल्यावरील ऋण आपण पूर्णपणें चुकतें केलें. अेवढें पुरेसें वाटलें नाहीं तर हिन्दुधर्माच्या रक्षणासाठीं खास संस्था उघडाव्यात म्हणजे झालें !

आपल्या जागृतीच्या दिवसांत ही अशी स्थिति आहे. १८ लोकांच्या हातांत ८० लोकांचें हिताहित येऊन पडलें आहे. या १८ मध्यें १० तर बिचाऱ्या स्त्रिया आहेत. त्या स्वतः दबलेल्या असतात आणि दबल्या गेलेल्या जातींच्या उद्धराच्या प्रयत्नास विरोध करीत असतात ! हा आहे आपला हिन्दु संसार ! गुलामांचा घाम गाळून ग्रीक लोकांनीं भव्य संस्कृति उभी केली. पण चुकीच्या पायामुळें ती खालीं आली. आपण जगामध्यें जो सर्वश्रेष्ठ धर्म स्थापन केला, त्याच्या पायांत ही अितकी निर्दयता, अज्ञान आणि बेजबाबदारी आहे. त्याला 'सनातन' म्हटल्यानें कांहीं तो चिरकाल टिकणार नाहीं. जर आपण आपली जबाबदारी ओळखूं, प्राचीन ऋषींचें अनुकरण करूं, विचारमग्न आणि सेवामग्न जीवन घालवूं, तरच देश आणि धर्म वांचणार आहेत. नाहीं तर जगाच्या पदार्थसंग्रहालयांत ( म्यूझियम्‌मध्यें )च त्यास स्थान मिळेल !

# ज्ञाति-परिषदा

कोण म्हणतो कीं आपल्या जाती मरून गेल्या आहेत ? आणि असेंहि कोण म्हणतो कीं आपल्या जाती जिवंत आहेत ? जाति हा घटक अितका स्वाभाविक आहे कीं तो कधींहि नष्ट होणार नाहीं; व आजचें जातिजीवन, जातिव्यवस्था आणि जातींच्या आकांक्षा हें सर्व अितकें कांहीं अस्वाभाविक झालें आहे कीं जातिजीवनांत फारच थोडा जीव उरलेला दिसत आहे.

समान राहणी–करणी, सारखे कुलधर्म आणि समान रोजगारधंदे, असणाऱ्या कुटुंबांचे समूह म्हणजे ज्ञाति, असें म्हणतां येअील. ज्यांच्यामध्यें खानपान व शरीरसंबंध होऊं शकेल अशा लोकांचा समुदाय म्हणजे ज्ञाति. ही व्याख्या जितकी संकुचित तितकीच निश्चितहि आहे. लग्नाची सोय आणि मर्यादा व संकुचित क्षेत्रांत परस्पर–सहकार्य, अेवढी दृष्टि ठेवूनच सध्यांच्या जाती बनलेल्या दिसतात. या दोन गोष्टींव्यतिरिक्त अितर अेकाददुसऱ्या

विशाल सामाजिक प्रवृत्तीच्या बाबतींत जर अेकाद्या जातींत अेकमत अगर जागृति असेल, तर तें आम्हांस माहीत नाहीं. खाणेंपिणें आणि लग्न करणें यांतच ज्ञातिजीवन समाप्त होतें. बुवाबैराग्यांना किंवा कुत्र्यावानरांना जेऊंखाऊं घालण्याचें काम जाती करतात. तितक्या अशीं त्यांची दृष्टि विशाळ समजतां येअील खरी. अनेक जातींचा बनलेला संघ हें परोपकाराचें कार्य करीत असतो, यामुळें तें श्रेयहि जातींना सहजासहजीं घेतां येणार नाहीं. स्वार्थी सहकार्यांत आजकाल जातींच्या शिष्यवृत्त्या आणि जातींचीं वसतिगृहें या गोष्टी नव्यानें दाखल झाल्या आहेत हें कबूल केलें पाहिजे.

जेव्हां प्रतिष्ठेसाठीं उमेदवारी करणारा अेकादा मनुष्य जातीला जेवण घालतो किंवा अेकादी बंडखोर व्यक्ति राजरोसपणें जातीचें बंधन तोडून जातीला भडकाविते, तेव्हांच जात आपल्या झोपेमधून जागृत होते. मंदिरांत घंटा वाजली कीं मगच महादेव जागा होतो म्हणतात. तशांतलीच ही जातींची गत आहे. आणि या जागृतीच्या वेळीं कांहीं सात्त्विक कार्य केल्याचीं उदाहरणें किती जातींच्या अितिहासांत दिसून येतील? जात अेकत्र येऊन ती जास्त संघटित झाली आहे, तिनें खरी समाजशुद्धि केली आहे, आचारधर्मांत सुधारणा केली आहे, परोपकाराचें अेकादें विशाल कार्य आरंभिलें आहे, दुसऱ्या अेकाद्या गरीब जातीला मदत केली आहे, अशा प्रकारचीं उदाहरणें गेल्या पन्नास वर्षांत किती आढळतील?

अलीकडे जातींना जागविण्याची अेक नवीन घंटा आपल्या हातीं आली आहे. ती म्हणजे ज्ञातिपरिषद्. ज्ञातिपरिषदा कोणा अेका व्यक्तीच्या खर्चानें भरत नाहींत आणि अेका दिवसांत संपतहि नाहींत. गेल्या तीस वर्षांतील अनेक ज्ञातिपरिषदांच्या अहवालांत सर्वसाधारणपणें कोणकोणत्या गोष्टी दिसून येतात? कांहीं प्रथा मोडण्याचे निष्फळ ठराव, आपल्या जातीचीं मुलें सरकारी नोकरींत जास्त जास्त घुसावींत म्हणून त्यांना देशांत किंवा परदेशात सरकारी शिक्षण मिळवून देणाऱ्या शिष्यवृत्त्या, जातीचीं वसतिगृहें व जातीचें मासिक! बस! जातीचें हृदय कसें उन्नत होअील, देशोद्धारामध्यें, स्वराज्य-प्राप्तीमध्यें जात कशी मदत करूं शकेल, याचा विचार ज्ञातिपरिषदांत झाला असेल असें दिसत नाहीं. आपली जात जास्त श्रीमंत व वशिलेबाज कशी

होईल आणि जर चुकीच्या किंवा वाईट सामाजिक रिवाजामुळें जात बदनाम होत असेल, तर ती बदनामी कशी थांबवितां येईल याच गोष्टींचा विचार ज्ञातिपरिषदा करीत आल्या आहेत.

आणि या ज्ञातींत किंवा ज्ञातिपरिषदांत पुढारी कोण असतात? उत्तम चारित्र्यवान्, शुद्ध देशभक्त, राष्ट्रधुरीण किंवा असाधारण विद्वान् अशा माणसाला जात आपलें पुढारीपण बहाल करते, असा कांहीं सार्वत्रिक अनुभव नाहीं. आणि जेव्हां अशा एकाद्या माणसाला आपल्या परिषदेचा अध्यक्ष बनविण्याची कल्पना जातीच्या डोक्यांत येते, तेव्हां त्याचें नेतृत्व स्वीकारण्याची दृष्टि तिच्यांत असत नाहीं जातीचे खरे पुढारी वेगळेच असतात. राष्ट्रमान्य अथवा प्रांतमान्य व्यक्तीला ज्ञातिपरिषदेंत बोलावून प्रसंगाचें महत्त्व वाढविण्यापुरताच लोभ त्यांच्या ठिकाणीं असतो. एक प्रकारें हें अपरिहार्यहि आहे. आजकालच्या क्रान्तिकालांत आदर्शपरत्वें, राजकीय आन्दोलनाच्या पद्धतिपरत्वें व शिक्षणपरत्वें समाजाचे नवे विभाग पडूं लागले आहेत. जात जर अगदींच मागासलेली नसेल, तर तिच्यांत अशा प्रकारच्या सर्व पक्षांची भेसळ झालेली असते. जातीचे तुकडे करावयाचे नसतील, तर या सर्व विभागांच्या बाबतींत सद्भावमूलक उदासीनता ठेवून मान बाळगणें हेंच योग्य असतें. आतां राहिला समाजसुधारणेचा व शिक्षणाचा मुद्दा. निदान या क्षेत्रांत तरी जर जात धर्मनिष्ठ, राष्ट्रहितैषी व तेजस्वी अशा लोकांचें नेतृत्व स्वीकारील तर बरेंच काम होईल. पण जातीला जीवनकलहांत आपण सरस ठरावें असेंच शिक्षण हवें असल्यामुळें जीवनकलहप्रवीण आणि राष्ट्रहितपराङ्मुख अशा लोकांचेंच नेतृत्व पत्करावें लागतें.

भिल्ल, धाराळा, रानीपरज वगैरे (गुजरातेंतील) मागासलेल्या जातींच्या परिषदांचा अनुभव कांहींसा वेगळा आहे. त्यांच्यांत आत्मशुद्धीची तळमळ स्पष्ट दिसून येते. दारू सोडण्याचे ठराव, खादी तयार करून वापरण्याचे ठराव, आणि असेच दुसरे सामाजिक उन्नतीचे ठराव ते लोक सद्भावनेनें स्वीकारतात. आणि ते मागासलेले असल्यामुळें त्यांच्यांत अशी श्रद्धा असते कीं ठराव हे अमलांत आणण्यासाठीं असतात. नैतिक उन्नतीची तळमळ आणि केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्याची संकल्पशक्ति हेंच जर चारित्र्याचें

लक्षण असेल, तर उच्च समजल्या जाणाऱ्या जातींची तुलना व मागासलेल्या समजल्या जाणाऱ्या जातींची तुलना कांहींशी विषम होईल यांत शंका नाहीं.

* * *

राष्ट्रसभा, हिन्दुसभा, मुस्लिमलीग, औद्योगिक परिषद वगैरे देशव्यापी संस्थांत अनेक प्रकारच्या लोकांचा समुदाय गोळा झालेला असतो. तेथें समरसता येणें कठिण असतें. जात ही अेकरूप आणि समान कोटीच्या लोकांची संस्था आहे. तिचें कार्यक्षेत्र मर्यादित आहे. परस्पर–विरोधी शक्तींचा मेळ घालण्याचें काम तिच्या शिरावर नसतें. अशा संस्थेंत बलवान् सहकार्य स्वाभाविक असलें पाहिजे. परन्तु परिषदांचें स्वरूपच आपण कृत्रिम, दिखाऊ आणि वाक्प्रचुर करून टाकलें आहे. जर आपण त्यांना घरगुती स्वरूप देऊं, तर ज्ञातिपरिषदा पुष्कळच काम करूं शकतील. ज्ञातिपरिषदेचें काम म्हणजे अेकमेकांशीं जोडल्या गेलेल्या कुटुंबांचें काम. त्यांतील व्याख्यान–महोत्सवाचा लोभ जर आपण सोडून देऊं, तर स्त्रिया व पुरुष दोघेहि त्यांत सहज भाग घेऊं शकतील.

'अशिक्षित स्त्रियांनीं परिषदेंत येऊन काय करावयाचें ? त्यांना सभेंत धड बसतांहि येत नाहीं, काय चाललें आहे त्यांतलें अेक अक्षरहि कळत नाहीं' असा आक्षेप सहज घेण्यांत येईल. पण आपण असा विचार केला पाहिजे कीं, आजच्या स्थितींतहि कुटुंबाचें चारित्र्य टिकवून धरण्याची जबाबदारी, कुटुंबाची प्रतिष्ठा टिकविण्याची उत्कटता आणि काटकसरीनें जीवन सुशोभित करण्याचें चातुर्य स्त्रियांतच असतें. मुलांमुलींसाठीं अनुकूल वधु–वरें शोधून काढण्याची जबाबदारीहि पुष्कळ अंशीं त्यांच्यावरच असते. गृहजीवनाचा, कौटुंबिक जीवनाचा, आणि म्हणून ज्ञातिजीवनाचा मोठा भार स्त्रियांवरच असतो. त्या ज्या परिषदेंत भाग घेऊं शकणार नाहींत, अशी परिषद काय कामाची ? परिषदेच्या कामांत भाग घेऊं शकतील अशा स्त्रिया जातींत नाहींत अशी हाकाटी करण्याअैवजीं जातीचें हिताहित नेहमीं ज्यांच्या हातांत असतें आणि ज्यांच्या शक्त्यनुसारच अखेर परिषदांच्या ठरावांची अंमलबजावणी व्हावयाची असते, त्यांच्या स्वभावाला अनुसरूनच आपण परिषदा कां भरवूं नयेत ? तसें केल्यास परिषदेचें सर्व स्वरूप बदलावें लागेल आणि कदाचित्

मगच आपलें सामाजिक जीवन किती क्षीण आहे, व किती असभ्य नि असह्य दौर्बल्य आपल्या ठिकाणीं वास करून राहिलेलें आहे, याचें पूर्ण दर्शन आपल्याला होईल.

आणि तसें झालें तर त्यांत वाईट तें काय? जेव्हां दोष उघडे पडतील, उणीवा जाहीर होतील, तेव्हांच त्यांना उपायहि सांपडेल. जातीविरुद्ध नेहमीं नेहमीं तक्रार करणारे, परन्तु बंड करण्याची हिम्मत नसणारे तरुण जर या दिशेने कांहीं प्रयत्न करून पाहतील, तर त्यांना आपल्या शक्तीची आणि पुढील दिशेची स्पष्ट कल्पना येईल. प्रारंभ लहान झाला तरी हरकत नाहीं. सुरवातीस कांहींहि फळ दिसून आलें नाहीं तरी हरकत नाहीं, पण हीच दिशा खरी आहे एवढा अनुभव जर त्यांना येईल, तर थोड्याच दिवसांत ते पुष्कळसें कार्य करूं शकतील. प्रत्येक जातींत कांहीं सुशिक्षित स्त्रिया सार्वजनिक काम करण्याची हिम्मत बाळगून आहेत. त्यांना या दिशेनें जर कांहीं सुचेल तर पुष्कळच काम होईल. कांहीं नाहीं तरी निदान कुटुंबांत व जातींत स्त्रीजीवन व पुरुषजीवन यांत जें अत्यंत अंतर पडलेलें आहे आणि ज्यामुळें आपली प्रगति अडून राहिलेली आहे, तें तरी दूर होईलच. गाडीचें एक चाक खूपच मोठें आणि दुसरें खूपच लहान असेल, तर गाडी वाटोळीच फिरेल आणि आंत बसणारे आंत टिकणार नाहींत.

# जातिभेदाचा प्रश्न

हिंदुस्थान म्हणजे जातींचें माहेरघर. जगांत जितक्या म्हणून जाती आहेत त्यांचा कोणी ना कोणी प्रतिनिधि हिन्दुस्थानांत असावयाचाच. म्हणूनच युरोपियन लोक हिन्दुस्थानला 'कास्ट रिडन् कंट्री' (जातींनीं दबला गेलेला देश) असें म्हणतात. अगदीं वेदकाळापासून तो थेट पटेल–त्रिलापर्यंत हिन्दुस्थानांतील लोक जातींचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आले आहेत. त्यामुळें जातींच्या प्रश्नावर बोलण्याचा हिन्दुस्थानला एक प्रकारचा अधिकार प्राप्त झालेला आहे. इंग्रज लोक जेव्हां येथें आले, तेव्हां सांगत असत कीं, जातींची भानगड तुमच्याच देशांत आहे. आमच्याकडे ती नांवाला सुद्धां नाहीं. आपण त्यावेळीं जगाच्या इतिहासाशीं अपरिचित होतों. इंग्रजांनीं

जें सांगितलें तें आपण खरें मानलें. आतां स्थिति बदललेली आहे. आपल्याला हें माहीत झालें आहे कीं, जातिभेद जगांतील सर्वच देशांत आहे आणि प्रत्येक देशानें आपापल्या परीनें हा जातींचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. आज जो अितिहास मिळतो तो फक्त युरोपियन राष्ट्रें, आशियांतील राष्ट्रें आणि अमेरिका, अितक्याच देशांचा आहे. आफ्रिका, ऑस्ट्रेलेशिया अथवा प्रशान्त महासागरांतील असंख्य द्वीपें यांचा अितिहास आपल्याजवळ उपलब्ध नाहीं. यामुळें त्या देशांविषयीं विचार करणें शक्य नाहीं. युरोपांतील खिस्ती राष्ट्रें, त्रिखंडांत व्यापून राहिलेलीं मुसलमान राष्ट्रें, नव्या खंडांपैकीं अमेरिका व हिन्दुस्थान यांचाच आपण येथें विचार करूं.

युरोपांत अनेक जाती आहेत. औद्योगिक युगामुळें धनवान् आणि धनहीन, मजूर व भांडवलदार वगैरे जे वर्ग उत्पन्न झाले आहेत त्यांना उद्देशून मीं हें म्हटलेलें नाहीं; तर सॅक्सन व केल्ट, टयूटन व लॅटिन, स्लॅव्हॉनिक व सर्बियन वगैरे ज्या अनेक जाती युरोपांत प्राचीन काळीं होत्या, त्या आजहि आहेत. आज अेकादा यहुदी खिश्चन झाला तरी त्याची 'ज्यू' ही जात कायम रहातेच. युरोपांत रोटीबेटी–व्यवहारास कसलाच प्रतिबंध नाहीं. तरीहि हा जातिभेद तेथें कांहीं कमी तीव्र नाहीं. गेल्या महायुद्धांत हा जातिभेदाचा प्रश्न थोडाबहुत उपस्थित झालाच होता आणि महायुद्धानंतर प्रदेशाची जी कांहीं वांटणी झाली, ती देखील कांहीं अंशीं या जातिभेदाच्या तत्त्वाला अनुसरूनच झाली. युरोपच्या आंतरिक अितिहासाचें निरीक्षण केल्यास असें दिसून येअील कीं, तेथें जातींचा झगडा पुष्कळ अंशीं भौगालिक तत्त्वानुसारच मिटविण्यांत आलेला आहे. अमुक प्रदेशांत अमुक जात वसावी, अमुक देशावर अमक्या जातीची मालकी रहावी, अशी कांहींशी व्यवस्था करण्यांत आलेली दिसते. या व्यवस्थेस भाषाविस्ताराचीहि मदत झालेली दिसून येते. अेका जातीच्या प्रदेशांत दुसऱ्या जातीचें श्रेष्ठत्व सहन केलें जात नाहीं. थोडक्यांत म्हणजे, युरोपांतील प्रत्येक जातीनें अेकमेकांपासून वेगळें होऊन हा जातिभेदाचा प्रश्न निकालांत काढला आहे. युरोपबाहेरील जातींना युरोपांत पाऊल ठेवूं द्यावयाचें नाहीं याविषयीं सगळ्या युरोपियनांचें अेकमत आहे असें दिसतें. युरोपियन लोक आपापसांत कितीहि भांडत असले, रक्त वाहवीत

असले, तरी वृद्ध तुर्कस्तानचें युरोपांतून उच्चाटन करण्याची गोष्ट निघतांच सगळे अेक व्हावयाचेच ! ही झाली युरोपची पद्धत.

मुसलमानी राष्ट्रांपुढें जातींचा हा प्रश्न प्रथमपासून उभा आहे. पण मुसलमानी धर्म समानतेच्या म्हणजे ' डेमोक्रॅटिक ' तत्त्वाच्या पायावर उभारलेला असल्यामुळें मुसलमानांनीं जातिभेदाचा प्रश्न वेगळ्याच पद्धतीनें सोडविला आहे. धर्माच्या बाबतींत, धार्मिक हक्कांच्या बाबतींत व सामाजिक प्रतिष्ठेच्या बाबतींतहि मुसलमान तेवढे सारखे, हें तत्त्व मुसलमानांनीं स्वीकारलें व अमलांत आणलें आहे. रोटीबेटीचा प्रश्न मुसलमानांत उपस्थित होतच नाहीं. आणि भौगोलिक व्यवस्था प्रत्येक जातीनें आपापल्या मनगटाच्या जोरावर ठरवून घ्यावी असें नक्की करून मुसलमानांनीं जातीय प्रश्न सोडविलेला दिसतो.

आतां अमेरिकेकडे वळूं. अमेरिकेनें आपला सवता सुभा निर्माण करून आपलीच अेक जात बनविलेली दिसते. युरोपांतील कोणताहि मनुष्य अमेरिकेस गेला कीं त्यानें आपली जात सोडून अमेरिकन जात स्वीकारलीच पाहिजे. किंबहुना, अमेरिकेचें वातावरणच असें आहे कीं अमेरिकेस गेलेला मनुष्य अमेरिकन बनल्यावांचून राहातच नाहीं. देशाभिमान अमेरिकेचा, राहणी व सामाजिक आदर्श अमेरिकन पद्धतीचे व भाषाहि अमेरिकन ! या तत्त्वांच्या आधारें सगळ्या जातींना गिळून अमेरिकन जात निर्माण झालेली आहे. पण तेथें सुद्धां अेवढ्यानेंच हा प्रश्न निकालांत निघालेला नाहीं. काळ्या हबशी लोकांना त्यांनीं गुलाम म्हणून नेलें असल्यामुळें तेथें गोरे तेवढे उच्च आणि काळे तेवढे नीच, असा द्वैतभाव उत्पन्न झालेला आहे. प्राचीन काळीं युरोपांत हा भेद नव्हता. म्हणूनच ऑथेल्लोसारखा काळ्या कांतडीचा मनुष्य डेस्डिमोनासारख्या गोऱ्या कांतडीच्या युवतीशीं रंगभूमीवर लग्न करीत असलेला पाहून युरोपियन प्रेक्षकांचें रक्त उसळून उठत नसे. पण आज निग्रो जातीचा पुढारी अमेरिकन राष्ट्राध्यक्षाबरोबर अेका पंगतींत बसून भोजन करूं लागला, तर त्यांतहि सभ्यतेचा अत्यंत भंग झाला असें समजलें जातें. अितकेंच काय, पण गोरा टांगेवाला काळ्या डॉक्टराला देखील आपल्या टांग्यांत बसवून घेण्याचें नाकारतो. म्हणजे अमेरिकेंत जातिभेदाचा प्रश्न सुटलेला नाहीं हें निश्चित आहे.

चीनमध्यें तार्तर, मांचू व मंगोलियन या जातींत अप्रतिबंध रोटीबेटी-व्यवहार चालू असूनहि व सर्वांचा मुख्य धर्म अेक असूनहि तेथें जातिद्वेषाचा अभाव आहे अशांतला भाग नाहीं.

हिन्दुस्थान तर काय, बोलून चालून जातींचें माहेरघर! तेव्हां त्याची गोष्ट काय विचारावी? येथें सर्व प्रकारच्या जाती गोळा झाल्या आहेत. अितकेंच काय, पण जातिभेदाचा प्रश्न सोडविण्याचे सगळे उपायहि येथें अजमावून पहाण्यांत आले आहेत. जातीजातींमध्यें युद्धें करून पाहिलीं, अनेक जातींचीं मिश्रणें करून पाहिलीं, अेका जातींत अनेक विभाग पाडून पाहिले, जातवार भाषा आणि लिपि ठरवून पाहिली, जातींचे रंग नक्की केले, धंदावार जात ठरविली, धार्मिक मतांनुसार जातींची व्यवस्था केली, खाण्यापिण्याच्या व पेहेरावाच्या भेदाप्रमाणें जाती पाडून पाहिल्या, जातिभेदाचा विरोध करून पाहिला, जातीविषयीं उदासीनता बाळगून पाहिली, अनुलोम–प्रतिलोम विवाह करून पाहिले, राज्यव्यवस्थेच्या जोरावर जातिव्यवस्था रचून पाहिली, जातींचा उच्चनीच क्रम नक्की केला, परस्पर–बहिष्कार व प्रायश्चित्त–विधी ठरवून आणि ते अखंड चालू ठेवून पाहिले, बाहेरून आलेल्या लोकांना कधीं आपल्या गोटांत सामिल करून घेतलें, तर कधीं त्यांच्या स्वतंत्र जाती बनविल्या. कांहीं जातींना हिन्दुधर्मांत ठेवूनसुद्धां त्यांचेशीं परकेपणाचा संबंध बाळगला, तर कित्येक परधर्मांत गेलेल्या जातींनाहि आपल्या समजून त्यांच्याशीं रोटीबेटी-व्यवहार कायम राखला. अितकेंच काय, पण कांहीं जातींच्या बाबतींत असे विचित्र प्रयोगहि करून पाहिले कीं जोंपर्यंत त्या हिन्दुधर्मांत आहेत, तोंपर्यंत त्यांना अस्पृश्य समजावयाचें आणि त्या परधर्मांत प्रविष्ट झाल्या कीं लगलीच त्यांना स्पर्शयोग्य समजावयाचें! हिन्दुस्थाननें अेकहि प्रयोग करून पहावयाचें बाकी ठेवलेलें नाहीं. जातिभेदाचा प्रश्न हा असा विराट् आहे.

आजपर्यंत हा प्रश्न वेगवेगळ्या देशांत आपापसांत चर्चिला जाअी. त्यावर भांडणें होत किंवा तो सोडविला जाअी. आज तो विश्वव्यापी बनून राहिला आहे. सर्वत्र जीवनकलहाचें साम्राज्य पसरलेलें आहे. बलवान् जाती दुर्बल जातींना गिळून टाकूं अिच्छीत आहेत. आणि या मेजवानींत मोठा भाग आपल्याला मिळावा यासाठीं त्या यादवी माजवून राहिल्या आहेत. याचा

परिणाम काय होईल व शेवटीं काय स्थिति होईल याचा अंदाज कोण करूं शकेल? ईश्वराला हें सर्व आवडत असेल काय? ईश्वरानें दीनदुबळ्यांचा वालीच उत्पन्न केला नसेल काय? कीं जगाचें चाक आजपर्यंत फिरवीत राहिल्यामुळें थकून जाऊन तो झोपीं गेला असेल? पूर्वीप्रमाणें आतां तो अवतार कां बरें घेत नाहीं? हा जीवनकलह शांत करून सर्वत्र शांतता व व्यवस्था राखणाऱ्या धर्माची संस्थापना करण्यासाठीं तो कां बरें धांवून येत नाहीं?—अशा प्रकारचा एकच आर्तनाद सहाहि खंडांतील दीन—दुबळ्यांच्या तोंडून निघूं लागला आहे. या जगांत सत्तेच्या सहाय्याशिवाय सद्गुणांचें चालूच शकणार नाहीं काय? संघ करण्याचा प्रयत्न करण्यांत पापच आहे काय? बहुमतापुढें न्यायबुद्धीनें मस्तक तुकविलेंच पाहिजे काय?—अशा प्रकारचे प्रश्न विचारशील हृदयांत खळबळ निर्माण करीत आहेत. सत्याचाच जय होतो, न्यायाचेंच साम्राज्य टिकूं शकतें वगैरे सिद्धान्तांचें प्रतिपादन करण्यासाठीं ऐतिहासिक दृष्टान्त देऊन व्यास वगैरेनीं पुराणें लिहिलीं. आजच्या इतिहासावरून हे सिद्धान्त काढून दाखविणें शक्य आहे काय, हा प्रश्न प्रत्येक इतिहासभक्तासमोर उभा रहात आहे. या प्रश्नाचें उत्तर काय? या लोकीं झालेल्या अन्यायाची परतफेड परलोकांत होईल, या आशेनें कोणालाहि संतोष होणार नाहीं. ' निश्चयाचें ऐसें बळ। तुका म्हणे तेंचि फळ ॥ ' या तत्त्वाप्रमाणें सद्वर्तन हेंच सद्वर्तनाचें फळ आहे एवढें सांगितलें, कीं समाजाची समस्या सुटली ही गोष्ट, आधुनिक संस्कारांनीं घडलेलें मन मानणार नाहीं. तर मग पुढें काय?

* * *

प्राचीन काळीं ग्रीक तत्त्ववेत्त्यांनीं मनुष्यत्वाच्या अनेक व्याख्या केल्या. पण सरते शेवटीं विश्वविद्याप्रवीण ॲरिस्टॉट्लची व्याख्याच सर्वमान्य झाली. ती व्याख्या ही कीं ' मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. ' संघ करून राहणें हें मनुष्यमात्राचें मुख्य लक्षण आहे. अन्य प्राण्यांपैकीं कांहीं एकएकटे राहतात तर कांहीं टोळ्यांनीं राहतात. पण त्यांच्यांत संघ असत नाहींत. मुंग्यांचें आणि मधमाशांचें जीवन कांहीं अंशीं सामाजिक असतें खरें. पण त्या जीवनाची प्रगति झालेली दिसून येत नाहीं. बुद्धिपूर्वक संघ बनविणें हा मनुष्याचा

अनन्यसाधारण धर्म आहे. या धर्मास अनुसरून मनुष्यप्राणी प्रारंभापासून आजपर्यंत समाज बनवून रहात आला आहे. यालाच आपण व्यापक अर्थानें ‘जाति’ असें म्हणतों. अनेक कुटुंबें अेकाद्या विशिष्ट साधर्म्यानें प्रेरित होऊन अेकमेकांच्या जीवनाला जें संघटित स्वरूप देतात त्याचें नांव जाति. मनुष्याची ही विशेषता आहे कीं हें साधर्म्य कांहीं अंशीं तो स्वतःच नक्की करतो. अितर प्राण्यांप्रमाणें नदीच्या अेका कांटावर राहणारे लोक तेवढे सगळे अेका जातीचे हा भेद सर्व देशांत दिसून येतो. युरोपांत पहिल्यापासूनच या तत्त्वाला प्राधान्य मिळालें आहे. या साधर्म्यांत स्वाभाविकपणें समान हित-संबंध वा समान सुखदुःखें व भयाचीं तत्त्वें राहिलेलीं असतात. यालाच अिंग्रजींत ‘लोकल पॅट्रिऑटिझम्’ ( स्थानिक देशभक्ति ) असें म्हणतात.

अितिहासकार प्राचीन काळच्या समाजाचे दोन विभाग कल्पितातः भटक्या जाती आणि अेका जागीं स्थिर राहणाऱ्या जाती. स्थिर अथवा स्थायी जातीं-मध्यें जसें देशाचें किंवा मातृभूमीचें साधर्म्य असतें, तसें भटक्या जातींमध्यें स्वाभाविकपणें रक्ताचें, राहणीचें आणि धंद्यांचें साधर्म्य असतें. या दोन्ही प्रकारांनीं बनलेल्या अनेक जाती अेकत्र आल्या कीं त्यांच्यांत विरोध, कलह आणि युद्धें हीं सुरू व्हावयाचींच. जाति ही वर्तुळासारखी असते. वर्तुळ ज्या-प्रमाणें आन्तरिक क्षेत्रफळाच्या दृष्टीनें अन्तर्वृत्त आणि बाह्य क्षेत्रफळाच्या दृष्टीनें बहिर्वृत्त असतें, त्याप्रमाणें जात ही देखील स्वजातीयांच्या बाबतींत अन्तर्वृत्त म्हणजे प्रेमळ असते, आणि विजातीयांच्या बाबतींत बहिर्वृत्त म्हणजे उदासीन किंवा साशंक असते. त्यामुळें जातीजातींमध्यें भांडणें झाल्याशिवाय रहात नाहींत. पण जाती लढून लढून थकल्या कीं मग आपल्यांतील विरोधा-च्या कारणांचा त्या खोल विचार करूं लागतात; आणि लढाअी केल्या-शिवाय अमुक अटीवर अेकत्र राहतां येअील अितकें सामर्थ्य आपल्यामध्यें आहे कीं नाहीं याचा शोध करूं लागतात. ‘आम्ही ज्या देवांची पूजा करतों त्यांची तुम्हीदेखील पूजा करा, नाहींतर या असे समरांगणांत !’—अशा प्रकारें प्राचीनकाळीं अनेक भीषण संग्राम झाले आहेत. शिया व सुन्नी, शैव आणि वैष्णव वगैरे मतभेदापायीं देखील रक्त सांडलें आहे. पण नंतर जसजसा अधिकाधिक अनुभव येत गेला, तसतसें ध्यानांत येऊं लागलें कीं मनुष्यजातींत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३३८० निःत्रि
क्रमांक ९८५५ नों. दि. २५-२-७९


हे भेद रहावयाचेच. भिन्न रुचिर्हि लोकः। अनुभवानें असें शिकविलें आहे कीं हे भेद काढून टाकणें शक्यहि नाहीं व आवश्यकहि नाहीं. यामुळें अशा तुच्छ भेदांसाठीं लढाया करण्याचें सोडून देऊन या जातींनीं मोठमोठे संघ निर्माण केले.

अशा संघांत अनेक साधर्म्यांचें मिश्रण असणें स्वाभाविक आहे, आणि म्हणूनच स्थिर जातींमध्यें देखील स्थानिक अथवा हितसंबंधांच्या तत्त्वावर पोटजाती उत्पन्न झाल्या आहेत. अशा प्रकारें जाती उत्पन्न होण्यांत अनेक तत्त्वांचें मिश्रण झालेलें आहे. पण विवेचनाच्या सुलभतेसाठीं हीं तत्त्वें वेगवेगळीं घेऊन प्रत्येकाचा स्वतंत्रपणें विचार करूं.

( १ ) अेका रक्ताचे लोक ( २ ) अेक राहणी असलेले लोक ( ३ ) अेका धर्माचे लोक ( ४ ) अेका धंद्यांतील लोक ( ५ ) अेका देशांतील लोक, आणि ( ६ ) अेक भाषा असलेले लोक अेकत्र येतात असें दिसून येतें. म्हणजे रक्त-भेद, संस्कृतिभेद, धर्मभेद, व्यवसायभेद, देशभेद आणि भाषाभेद यांमुळें माणसांत जातिभेद उत्पन्न होतात. हे भेद पुष्कळ अंशीं कायमचे असतात असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. समान हितसंबंधासाठीं अथवा समान संकटाच्या वेळीं वरील सर्व भेद झुगारून देऊन भिन्न भिन्न जाती कधीं कधीं अेक होतात हें खरें; पण हें अैक्य करविणारीं तत्त्वें चिरस्थायी असतातच असें नाहीं. या तत्त्वांमध्यें अनेक जातींना कायमचें अेक करण्याअितकें आकर्षण किंवा स्नेह ( Cohesion ) हीं क्वचितच असतात.

आतां जातीजातीमधील विरोध समूळ नाहींसा करण्यासाठीं मनुष्यानें काय काय प्रयत्न केले आहेत तें पाहूं. जर्मन तत्त्ववेत्ता नित्शे याचा असा सिद्धान्त आहे कीं अन्य जातींनीं मरावें आणि आपली जात सर्वत्र पसरावी, ही वृत्ति वनस्पतींत, पशुपक्ष्यांत आणि सुशिक्षित–अशिक्षित सर्व मनुष्यांत अत्यंत प्रबळ असते. या वृत्तीला तो 'विल टु पॉवर' असें नांव देतो. आपण हिला विजिगीषा म्हणूं. विजिगीषेचा हा सिद्धांत जर खरा मानला, तर जगांतील अितर सगळ्या भाषा मरून जाऊन सर्वत्र अिंग्रजी भाषेचें साम्राज्य पसरावें असें अिंग्रजांना वाटत असलें पाहिजे. अितर सर्व धर्म नष्ट होऊन फक्त मुसलमानी

६७२९

धर्माचाच विजयडंका वाजावा असें मुसलमान लोक अिच्छीत असले पाहिजेत; सगळ्या जगानें हिन्दु-आचारविचार मान्य करावेत आणि पाळावेत अशी हिन्दूंची आकांक्षा असली पाहिजे. आणि या सगळ्या जातींच्या मनांत अशी महत्त्वाकांक्षा नाहीं, असें कांहीं म्हणतां येणार नाहीं !

जातीजातींमधील विरोध नाहींसा करण्याचा दुसरा प्रयत्न म्हणजे सर्व जातींचीं वैशिष्ट्यें बाजूस ठेवून त्यांची खिचडी बनविणें हा होय. युरोपमधील सर्व भाषांचा संकर करून ‘ अेस्परँटो ’ सारखी भाषा निर्माण करावयाची, सर्व धर्मांचा दृढभाजक काढून अेकाद्या ‘ थीअिस्टिक ’ किंवा ‘ ब्राह्मो ’ धर्माची स्थापना करावयाची, आम्ही कोणत्याहि अेका राष्ट्राचे रहिवाशी नसून सर्वच मानवजातीचे हितचिंतक आहोंत असें म्हणून आन्तरराष्ट्रीय अथवा ‘ कॉस्मॉपॉलिटन ’ संप्रदाय निर्माण करावयाचा—हीं सर्व या प्रयत्नाचीं उदाहरणें होत.

विरोध मिटविण्याच्या दिशेनें झालेला तिसरा प्रयत्न म्हणजे वरील सर्व भेदच खोटे आहेत असें म्हणणें हा होय. रक्ताचा, कांतडीचा किंवा वर्णाचा भेद हें नुसतें अेक खूळ आहे, संस्कृतिभेदांत कांहींच अर्थ नाहीं, भाषाभिमान हा निव्वळ मूर्खपणा आहे, धंदा वंशपरंपरा कायम ठेवण्याचा प्रयत्न मानवी उन्नतीस विघातक आहे—वगैरे वगैरे तत्त्वें या संप्रदायांत प्रतिष्ठित मानलीं जातात.

विरोध नष्ट करून संघटन करण्याचा चौथा पण अत्यंत जोरदार प्रयत्न म्हणजे वर सांगितलेला समान स्वार्थ आणि समान संकट यांचा. चालू युगांत याच तत्त्वाचा जोर जास्त आहे. पण स्वार्थ आणि संकट या दोन्ही तत्त्वांत शत्रुत्वामुळें उत्पन्न झालेलें मूळचेंच द्वैत असतें. तेथें अैक्य कोठून उत्पन्न होणार? या तत्त्वानें बांधले गेलेले संघ जितके मोठे, तितकीं त्यांचीं युद्धें जास्त तीव्र, जास्त व्यापक आणि जास्त संहारक ठरतात हा अनुभव अजून ताजाच आहे.

पांचवा व आमच्या मतें खरा प्रयत्न म्हणजे स्वार्थ व द्वेष यांच्या प्रवाहांस धर्मबुद्धीचा बांध घालून सर्व भेदांना आपापल्या स्थानीं सुखासमाधानानें

राहूं देणें हा होय. युद्धें केल्यानें, नाना प्रकारचे कायदे केल्यानें, वर्णसंकर केल्यानें, किंवा अराजकतेची वावटळ उठविल्यानें जगांतील भेदभाव नाहींसे होणार नाहींत. लोकव्यवहारांत भेद हा सत्य आहे नि सनातनहि आहे. या भेदाचें भय दूर करण्याचा अेकच उपाय आहे. तो म्हणजे भेदाचें स्वरूप ओळखून आणि प्रेम, औदार्य व दया या गुणांचा परिपोष करून मनोवृत्तीमध्यें 'भेद असूनहि अभेदबुद्धि' जागृत ठेवावयाची. विरोधाचें व कलहमात्राचें मूळ वासना, द्वेष व लोभ यांत आहे. म्हणूनच भगवानांनीं सांगितलें आहे कीं, 'त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः। कामः क्रोधस्तथा लोभः—' व आत्मघात न व्हावा अशी आपली अिच्छा असेल तर—'तस्मात् अेतत्त्रयं त्यजेत्.' आणि हें साध्य करून घेण्यासाठीं वैराग्य, क्षमा व त्याग या अमृततत्त्वांचेंच आपण सेवन केलें पाहिजे हें उघड आहे.

**अेष पन्थाः। अेतत्कर्म। नान्यः पन्था विद्यतेऽयनाय॥**

खरें म्हटलें असतां दोन जातींमध्यें भाषाभेद, धर्मभेद किंवा संस्कृतिभेद आहे, अेवढ्यासाठीं त्यांनीं लढण्याचें कांहींच कारण नाहीं. प्रत्येक जाति आपापल्या स्थानीं सुखासमाधानानें राहूं शकते. असें असूनहि प्राचीन काळीं याच भेदांमुळें विकारवश होऊन मनुष्यांनीं अनेक युद्धें केलीं आहेत. कांहीं तरी सबब काढून आपापसांत लढणें हा मनुष्यस्वभावांतील पशुवृत्तीचा स्वाभाविक धर्म आहे. तरीहि प्रत्येक धर्मातील खरी धार्मिक वृत्ति असणाऱ्या महापुरुषांनीं या वृत्तीस प्रतिबंध करून थोड्याबहुत प्रमाणांत विश्वबंधुत्व स्थापन करण्याचा प्रयास केलेला आहे. अशा तऱ्हेचा प्रयत्न मनुष्यवृत्तीच्या विरुद्ध दिशेस जाणारा असल्यामुळें अेकदम सफळ होण्यासारखा नाहीं हें उघड आहे. 'आरोहणं तु सायासम्।' यामुळें उतावळ्या माणसांची या मार्गावरील श्रद्धा उडाली. प्रत्येक धर्मांत विकारप्रधान धर्मच्युत लोक हे असावयाचेच. त्यांनीं धर्माच्या नांवें अनेक युद्धें केलीं. त्यामुळें या निराशेंत भर पडली; आणि लोकांना असें वाटूं लागलें कीं, धर्मानें माणसामाणसांमधील कलह शांत न होतां उलट धर्मामुळेंच भयंकर युद्धें होतात.

अशा परिस्थितींतच युरोपांत प्रॉटेस्टंट धर्म आणि औद्योगिक युग या युग्माचा अवतार झाला. धार्मिक वृत्तीनें उपदेशिलेला संयम त्याज्य ठरला

आणि स्वार्थाचें साम्राज्य मोठ्या भपक्यांत सुरू झालें. लोक म्हणूं लागले कीं धर्माचीं व संस्कृतीचीं भांडणें जर थांबावयाचीं असतील, तर लोकांतील विलासिता वाढली पाहिजे. विलासिता वाढली कीं धर्माचा कडवटपणा आपो-आप नाहींसा होईल, लोकांवर पैशाची मोहिनी जास्त जास्त पडूं लागेल; त्यामुळें व्यापार वाढेल आणि लोकांत वणिकवृत्ति आली कीं क्षात्रवृत्तीचा लोप झालाच म्हणून समजावें. कांहीं लोकांना असें वाटूं लागलें कीं, जें सुवर्ण-युग संयमाच्या द्वारें स्थापन करणें धर्मास अशक्य होतें, तेंच सुवर्णयुग सुवर्णो-पासनेच्या द्वारें या पृथ्वीवर स्थापण्याची अजब युक्ति आपल्याला सांप-डली आहे!

पण असें कांहींच झालें नाहीं. वणिकवृत्तीनें क्षात्रवृत्तीला वश करून घेतलें आणि सर्वत्र व्यापार व राजकारण यांचें युग सुरू झालें. जुन्या जाती नष्ट झाल्या अथवा निष्प्रभ झाल्या, आणि जागजागीं राष्ट्रें निर्माण झालीं. या राष्ट्रांना आत्मा आहे असें म्हणतां येणार नाहीं. अलंकारिक भाषेंत आत्मा कल्पावयाचाच असेल, तर व्यापार आणि राजकारण हाच या राष्ट्रांचा आत्मा आहे. जगांत जें कांहीं उच्च, उदात्त व उज्ज्वल होतें आणि आहे तें सर्व राज्य-लोभ आणि धनलोभ यांच्याखालीं चिरडून जाऊं पहात आहे. जाती मेल्या, पण द्वेष मेला नाहीं. उलट तो वाढतच गेला. स्वार्थामध्यें संघ बनविण्याची शक्ति नसतें असें नाहीं. या संघशक्तीचा उपयोग करून राष्ट्रें आत्मसंघ बनवि-ण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण वर सांगितल्याप्रमाणें स्वार्थाच्या गर्भांत द्वैत हें असावयाचेंच. तेव्हां राष्ट्रसंघ निर्माण करून मानवजातींत ऐक्य किंवा अद्वैत यांचा संचार करविण्याची इच्छा बाळगणें म्हणजे अरण्यांत भडक-लेल्या दावानलास वारा घालून विझविण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे.

या विवेकभ्रष्ट पाश्चात्य राष्ट्रधर्माचा विनिपात कोण थांबवूं शकेल? राष्ट्रांचें सामर्थ्य जातींत नाहीं. उलट, जाती राष्ट्रांचें भक्ष्यच बनल्या आहेत. महायुद्धांत लाखों लोकांचा संहार झाला तरी या आसुरी राष्ट्रधर्मरूपी मदिरेचा नशा उतरतच नाहीं. बलवान् राष्ट्रांनीं आपले संघ बनविले. तेव्हां दुर्बळांनीं काय करावें? या दुर्बळांनीं अथवा पीडित राष्ट्रांनीं आपापले संघ बनवून सामर्थ्य प्राप्त करावें अशी एक कल्पना नुकतीच बाहेर आली आहे. पण या सूचनेनें

काय होणार ? जे अनेक झगडे सध्यां चालू आहेत, त्यांत आणखी अेका नव्या झगड्याची भर पडली म्हणजे कांहीं प्रश्न सुटला असें होणार नाहीं. कांहीं लोक म्हणतात कीं 'या बेसुमार वाढलेल्या राष्ट्रांत वर्गावर्गांमधील कटुता वाढून अंतःकलह किंवा यादवी माजणार हें निश्चित. म्हणून तसें होअीपर्यंत आपण स्वस्थ बसून त्या क्षणाची वाट पहात रहावें.' ही कल्पना—या प्रचंड राष्ट्रांतील कोट्यवधि लोकांचा संहार केव्हां होअील याची वाट पहात बसण्याची कल्पना—जितकी राक्षसी तितकी पौरुषहीनहि आहे. खरा उपाय हा आहे कीं, व्यक्तींत व समुदायांत जातींनीं व पंथांनीं द्वेषाचा व विकाराचा त्याग करून भ्रातृभाव जागृत केला पाहिजे. व्यक्तीमध्यें लोभ आणि भय हे दोष असल्यामुळेंच तिच्यावर राष्ट्रधर्माचा परिणाम होत असतो. ज्यानें या दोन दोषांचा त्याग केला आहे, त्याच्यावर जरी सगळ्या राष्ट्रांचा अेकदम मारा सुरू झाला तरी तो शरण जाणार नाहीं. अितकेंच काय, पण तो थोडाहि डगमगणार सुद्धां नाहीं. आसुरी संपत्तीचें बळ कितीहि प्रचंड असलें, तरी अत्यंत अल्प अशा दैवी बळावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं दैवी संपत्ति असणाऱ्या महात्म्यांना आसुरी राष्ट्रें लुटणार नाहींत, किंवा यमसदनीं धाडणार नाहींत. मोहान्ध राष्ट्रें कांहींहि करण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत. पण आत्मबळाला नमविण्यास तीं असमर्थ ठरतील. आसुरी राष्ट्रांचीं पापें धुऊन काढण्यासाठीं निर्दोष व्यक्तींनीं आसुरी राष्ट्रनिष्ठेचा त्याग करून व वेळ आल्यास निर्भयतापूर्वक प्राणार्पण करूनहि धर्माचें साम्राज्य दृढ करणें हा त्यांचा धर्म आहे. जगामध्यें ही पवित्र वृत्ति जितकी वाढेल, तितकें आसुरी संपत्तीचें बळ कमी होअील आणि सत्ययुग अवतरेल. भगवान् व्यासांनीं जें सांगितलें होतें तेंच खरें कीं 'धर्म अेव हतो-हन्ति धर्मो रक्षति रक्षितः'। धर्माच्या त्यागानेंच समाजाचा नाश होतो, धर्म-पालन हाच समाजाच्या उन्नतीचा अेकमात्र उपाय आहे. सात्त्विक आणि तेजस्वी वृत्तीच्या द्वारें राष्ट्रज्वर उतरविला गेल्यानंतर दबल्या गेलेल्या जाती पुन्हां डोकें वर काढतील. परंतु हें उत्थान पूर्वीप्रमाणें लढाया करण्यासाठीं किंवा अेकमेकांविषयीं अक्षम्य उदासीनता बाळगण्यासाठींहि असणार नाहीं; तर अीश्वरनिर्मित वैचित्र्यांत अैक्य अनुभविण्यासाठीं व स्वधर्माचें पालन करून संसिद्धि प्राप्त करण्यासाठीं असेल. जोंपर्यंत जग आहे तोंपर्यंत भेद हे

राहावयाचेच. पण धर्माचरणानें व प्रेमाच्या पावित्र्यानें भेदांत अभेदाची स्थापना करणें शक्य आहे. याच मार्गानें याच अभेदाची स्थापना करणें हें आर्यसंस्कृतीचें ध्येय आहे आणि तें सफळ होईल अशी आमची दृढ श्रद्धा आहे.

# पंक्तिभेद

माझ्या अेका मित्रांनीं स्वतःला ग्रामसेवेस वाहून घेतलें आहे. त्यांनीं कॉलेजचें शिक्षण पूर्ण केलें असलें, तरी ते अगदीं ग्रामीण दिसतात. आणि ग्रामीणाप्रमाणें राहतात. जातीनें ते ब्राह्मण आहेत; पण शेतकऱ्यांबरोबर राहून शेतकरी बनले आहेत. स्वतः शेती करण्यांत आणि खादीकार्यांतच ते आपला वेळ खर्च करीत असतात. ते मला विचारतातः

" आम्ही जेव्हां बाहेरगांवीं जातों तेव्हां तेथील ओळखीचे सनातनी ब्राह्मण आम्हांला प्रेमादरानें जेवावयास बोलावतात. त्यांचें प्रेम अगदीं अपार असतें; पण ते रूढिचुस्त असल्यामुळें आम्हांला आपल्या पंगतींत बसवीत नाहींत. कारण आम्ही आमच्या आश्रमांत सर्व जातींच्या लोकांना बरोबर घेऊन जेवत असतों, हरिजनांना शिवून घेण्यास मागेंपुढें पहात नाहीं, वगैरे. आतां अशा ठिकाणीं आम्हीं काय करावें ? उदार मनानें त्यांच्या संकुचिततेची कींव करून त्यांचें प्रेमाचें आमंत्रण स्वीकारावें, कीं या मोठेपणाच्या कल्पनेला उत्तेजन न देण्यासाठीं आभारपूर्वक नकार द्यावा ? "

या प्रश्नाची चर्चा करण्यापूर्वी अेक सामान्य नियम ध्यानांत ठेवला पाहिजे कीं, जेव्हां अशा बाबतींत शंका असेल तेव्हां आपला निर्णय संयमाकडे, कष्ट झेलण्याकडे झुकला पाहिजे; त्या दिशेनेंच आपण कौल दिला पाहिजे. म्हणजे मग चूक झाली तरी धर्महानि होणार नाहीं. स्वाभिमानाच्या दृष्टीनें, तेजस्वितेच्या दृष्टीनेंहि अशा ठिकाणीं आभार मानून जेवावयाचें आमंत्रण नाकारलेंच पाहिजे. रूढिचुस्त मित्रांचें आपल्यावरील प्रेम ही वैयक्तिक भावना असते; तर उच्चनीच भाव हा त्यांच्या हाडींमाशीं खिळलेला आणि सार्वत्रिक असा दोष असतो. अशा वेळीं त्यांच्या प्रेमाच्या मोबदल्यांत त्यांचा पाहुणाचार

स्वीकारण्याअैवजीं त्यांची आपण जास्त सेवा करावी, त्यांच्या संगतींत रहावें, पण जेवणाच्या बाबतींत मात्र नकारच द्यावा. नीच समजल्या जाणाऱ्या लोकांच्या मनांत काय भावना असतात, अपमानाचा बाण त्यांच्या हृदयाला आरपार वेधून कसा बेचैन करतो, याची कल्पना स्वतःला उच्च समजणाऱ्या या लोकांना आणून देणें हें आपलें कर्तव्य आहे.

पंक्तिभेदाचा दोष सहन करूनहि कांहीं विशिष्ट कारणांमुळें कधीं कधीं अशा ठिकाणीं जेवावयाचा प्रसंग आपल्यावर येत असतो ही गोष्ट आपल्या नजरेआड असतां कामा नये. असा मित्र आजारी असेल, त्याच्या सेवा-शुश्रूषे-साठीं आपण त्याच्या घरीं राहात असूं आणि स्वतःच्या हातांनीं स्वयंपाक करण्याअितकी सवड आपल्याला नसेल, तर तशा स्थितींत पंक्तिभेद सहन करूनहि त्याच्यायेथें जेवतां येअील. कारण अशा स्थितींत आपल्याबद्दल हीन भाव दाखविण्याचा संभव नसतो. खेडेगांवांतील अेकाद्या आजाऱ्याला जर आपण शहरांत घेऊन गेलों आणि त्याला अेकाद्या रूढिचुस्त मित्राच्या घरीं ठेवावें लागलें, तर तेव्हांदेखील पंक्तिभेद सहन करून जेवावें लागेल.

अेकाद्या समाजांत भेदभाव दृढमूल असेल, पण जर उच्चनीच-भाव नसेल, तर अशा वेळींहि पंक्तिभेद सहन करावा लागेल. अशा ठिकाणीं रूढिचुस्त लोकं आपल्याला आपल्या पंगतींत घेणार नाहींत, पण उच्चस्थानीं बसवितील अथवा आपल्याला आदरपूर्वक आधीं जेवावयास घालून नंतर त्याच स्वयं-पाकांतून स्वतः जेवतील; असें जेथें स्पष्ट दिसेल तेथें विशिष्ट प्रसंगीं पंक्तिभेद सहन करावा लागेल. रूढिचुस्त लोकांना आपण निदानपक्षीं अितकें तरी अवश्य सांगूं शकतों कीं, आपण सर्वजण अेका पंगतींत बसून खाऊं शकूं असेच पदार्थ तुम्ही जेवणांत ठेवा म्हणजे झालें. पण सर्वसाधारण नियम असा कीं, जो आपल्याबरोबर अेका पंगतींत बसून जेवण्यांत प्रतिष्ठेची हानि समजतो, त्याच्या-येथें स्वतः हीनपणा स्वीकारून जेवावयास जाण्यांत आपण आपल्या स्वाभि-मानाचा खून करीत असतों, आणि त्या दुसऱ्या माणसाला योग्य धडा देण्याची अेक संधि गमावीत असतों. यामुळें समाजद्रोहच होतो.

---

# अस्पृश्यता-निवारण

शहरांतून गायी बाळगणें जितकें कठिण आहे, तितकेंच सोवळ्याओवळ्याचे आणि शिवाशिवीचे जुने नियम पाळणें कठिण आहे. लोकांची रहाणी जसजशी बदलत गेली तसतसे जुने सामाजिक रिवाज मावळत गेले. अस्पृश्यतानिवारणाची चळवळ खेडेगांवांपेक्षां शहरांत अधिक झाली असल्याकारणानें वर सांगितलेल्या शहरी वळणाला स्वाभाविक उत्तेजन मिळालें. जेथें जेथें अस्पृश्यता नाहींशी झाली आहे, तेथें तेथें ती न्यायाच्या आग्रहानें झाली आहे असें म्हणतां येत नाहीं; तरी अस्पृश्यता अन्यायमूलक आहे, त्यांत धर्म नसून अधर्म आहे हें लोकांना आतां चांगलेंच पटूं लागलें आहे. आणि म्हणून जेथें अस्पृश्यता पाळण्यांत येते, तेथेंहि तिचा बचाव आतां पूर्वीसारखा जोरानें होत नाहीं. धर्माभिमानी हिंदु म्हटला म्हणजे तो अस्पृश्यतेचा बचाव करावयाचाच, ही स्थिति आतां राहिली नसून बरेचसे सनातनी लोक असेंच म्हणतांना आढळतात कीं, हजारों वर्षे चालत आलेली रूढि—आणि तीहि धर्माच्या नांवानें चालत आलेली रूढि—अेकाअेकी मोडणार नाहीं, जरा दमानेंच घेतलें पाहिजे. अस्पृश्यता पापमूलक आहे याविषयीं आतां कोणी डंवचल्यावांचून चर्चा अथवा विरोध करीत नाहीं.

परंतु विरोध अेक वेळ पत्करला, पण हें दमानें घेण्याचें तत्त्वज्ञान मोठें भयंकर आहे. अमेरिकेंतील स्वातंत्र्यवीर वुअिल्यम लॉइड गॅरीझन जेव्हां गुलामीचा विरोध निकरानें करूं लागला तेव्हां 'व्यवहारदक्ष' लोक त्याला म्हणूं लागले, 'असे जहाल होऊं नका, जरा बेतानें घ्या, दमानें घ्या; हळुहळू पाऊल टाका.' तेव्हां तो चिडून जाऊन म्हणतो : 'हळुहळू पाऊल कसें टाकावयाचें तें मला समजत नाहीं. तुमच्या घरास आग लागली असली आणि तुम्हांस कोणी सांगितलें कीं, आगीचा बंब जरा दमानें चालवा, पाणी थोडें थोडें शिंपा, तर तुम्ही त्याचें अैकाल काय? तुमचें घर कोणी लुटीत आहे, तर त्या चोराचा विरोध धीरे धीरे कसा करावयाचा? तुमच्या आअीवर कोणी अत्याचार करीत आहे, अशा नराधमाचा प्रतिकार सावकाश कसा

करावयाचा ?' सुधारणा व प्रगति हीं वाटल्यास सावकाश चालोत; पण अन्यायनिर्मूलन तत्काळच झालें पाहिजे. निदान आपला प्रयत्न तरी तसा असला पाहिजे. शुद्ध अन्याय, धडधडीत पाप, महान् अधर्म, मानवी स्वातंत्र्याची पायमल्ली, यांच्याशीं देवाण–घेवाण तें काय करावयाचें ? शरीरांत गरम रक्ताचा अेक थेंब उरला असेल तोंवर या अनाचाराचा तीव्रातितीव्र निषेधच केला पाहिजे. अेक तर अस्पृश्यतेचा नायनाट व्हावा, किंवा उघड्या डोळ्यांनीं तिला पहाणाऱ्या आपला नायनाट व्हावा.

धनवान्, विद्वान्, हिकमती, कल्पक, हिंमतवान् आणि महत्त्वाकांक्षी अशा सर्वच लोकांनीं खेडेगांवांचा त्याग करून खेडेगांवांचा आणि मनुष्य-समाजाचा द्रोह केला आहे. किराणा माल ज्याप्रमाणें खेडेगांवांतील लोकांना जुना, शिळा, किडका मिळावयाचा, त्याचप्रमाणें धर्माच्या, सामाजिक कल्याणाच्या, आर्थिक हिताच्या, तरुण पिढीच्या शिक्षणाच्या, सर्वच कल्पना तेथें सडक्या रूपांत नांदावयाच्या ! जुनें तेवढें वाअीट असें म्हणण्याचा आमचा आशय नाहीं. घरांत जुनीं भांडीं असूं नयेत असें आम्ही म्हणत नाहीं. जुनीं भांडीं घरंदाजपणाचें, प्राचीन वैभवाचें आणि संस्कारितेचें द्योतक आहेत; पण जुनीं भांडीं देखील रोजच्या रोज घांसूनच वापरलीं पाहिजेत. जुन्या कळकटलेल्या भांड्यांवरील हिरवा जहर मोरचूद–गंज–देखील संभाळून ठेविला पाहिजे, आणि स्वयंपाकाबरोबर तो पोटांत गेला पाहिजे, असें म्हणणाऱ्या भूतकालाच्या उपासकांनीं मरून भूतच झालें पाहिजे. जगण्यांत, जिवंत राहण्यांतहि भूतकाळाचा द्रोह होतो हें त्यांना पटलें पाहिजे.

आधुनिक समाजांत धर्मजागृति करून नवीन छाप पाडणारे बहुतेक सत्पुरुष आणि महात्मे शहरांतच संचार करितात. प्रवासाच्या सुखसोयींचीं साधनें जेथवर पोहोंचतात, तेथवरच यांचीं चरणकमलें पोहोंचावयाचीं ! अशी स्थिति असल्यानें खेडेगांवांतून अस्पृश्यतानिवारणाची चळवळ फार थोडी झाली आहे. हरिदास, पुराणिक, कथेकरी वगैरे लोक वैराग्याच्या रसाळ गोष्टी आशाळभूतपणें सांगत असतांना लोकांना काय रुचेल याचाच विचार करीत असतात. लोकांच्या हिताचें काय आहे याचा विचार करण्याची त्यांना संवय किंवा हिंमत नाहीं. आपल्या वाणींत आधुनिकता आणण्याची जरूर त्यांना भासू

लागली आहे. पण धर्मतेजाची त्यांना जरूर भासेल, तेव्हांच ते समाजाचे सेवक व नेते बनतील. तोंवर समाजरंजक म्हणून त्यांचा उपयोग आहे तेवढाच असणार !

येथवर जी टीका केली त्यांत अप्रत्यक्ष रीतीनें विधायक सूचनाच केलेल्या आहेत.

अस्पृश्यतानिवारण करण्याची जबाबदारी धर्मनिष्ठ, प्रजाहितैषी, निःस्पृह, आणि नीतिधैर्याच्या लोकांचीच आहे. स्वतःच्या मनांतून अस्पृश्यतेचें भूत काढून टाकिलें म्हणजे बस झालें नाहीं. धर्म म्हणून, रूढि म्हणून, अथवा संस्था म्हणून जें पाप समाजांत घुसतें, तें कालांतरानें अपौरुषेय होऊन बसतें; म्हणजे त्याची जबाबदारी अेका विशिष्ठ व्यक्तीवर असल्याचें दिसून येत नाहीं. अशा रूढीचा निर्दयपणा, घातकीपणा, असह्य अन्याय, हीं सर्व बिचाऱ्या अंत्यजासारख्यांना सहन करावीं लागतात. पण ती रूढि चालविणाऱ्या व्यक्ती स्वभावानें निर्दय, घातकी अथवा अन्यायी असतातच असें म्हणतां येत नाहीं. रूढीची निंदा केली तर व्यक्तींना वाटतें कीं, आमच्यावर हा नाहक ताशेरा आहे. पण दोषमुक्त ठरविल्यानें पापमूलक रूढीला बळी पडलेल्या वर्गांचा जाच कांहीं कमी होत नाहीं. जे लोक व्यक्तींवर चिडतात, जशास तसें या न्यायानें स्पृश्य समाजांतील व्यक्तींचें शासन करूं पहातात, ते रूढीचें कंबरडें मोडण्याच्या अैवजीं मजबूतच करतात. कोणतीहि समाजसुधारणा करितांना ही गोष्ट कधींहि विसरतां कामा नये. प्राचीन काळापासून आजवर ही गोष्ट विसरून जाऊन समाजानें पापी रूढींविषयींचा स्वतःचा पुण्यप्रकोप, रूढि अंधपणें चालविणाऱ्या व्यक्तींवर काढून नवे अन्याय व नवे घोंटाळे उत्पन्न केले आहेत. अितिहासाचें प्रत्येक पान या गोष्टीचें साक्षी आहे.

अस्पृश्यतानिवारणाची जबाबदारी दोन वर्गांवर येऊन पडते. अस्पृश्यता ज्यांनीं चालू केली, त्यांचे वारस असे उच्चवर्णीय स्पृश्य लोक, आणि ज्यांना आज अस्पृश्यता भोंवत आहे असे दलित ' अस्पृश्य ' लोक.

या दलितांचें शिक्षण, त्यांच्या धार्मिक समजुती व समाजांत आज त्यांना असलेलें स्थान, या गोष्टींचा विचार करितां अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न

त्यांनीं कसून करावा अशी जबाबदारी त्यांच्यावर टाकतां येत नाहीं. त्यांना रोज अन्याय आणि अपमान सहन करावा लागत असल्यानें स्पृश्यांविरुद्ध सर्व न्याय्य मार्गांनीं बंड करण्याचा त्यांना हक्क आहे, हें नाकबूल करितां येत नाहीं. अशा बंडामुळें सर्वच समाजाला नुकसान सोसावें लागेल हें खरें असलें, तरी तेवढ्यासाठीं तुम्ही अन्याय सहन करीत रहा असें अस्पृश्यांना कोणीं सांगावें ?

पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, अस्पृश्य अितके दलित आहेत कीं, त्यांच्यांत बंडाची अिच्छा उत्पन्न करण्यांतहि बराच काळ जाअील; बंडाची शक्ति उत्पन्न करणें ही त्याच्या पुढची गोष्ट ! आणि अितकें करूनहि अशा बंडामुळें सुरवातीला अस्पृश्यांचेंच नुकसान अधिक होणार आहे. प्रजाहितैषी लोकांनीं त्या बिचाऱ्यांवर अेवढें ओझें घालूं नये. पण अस्पृश्यांमध्यें अस्मिता जागृत होण्यापूर्वींच त्यांची अस्पृश्यता दूर करण्याचे निकराचे प्रयत्न स्पृश्यांनीं केले पाहिजेत.

तोंवर अस्पृश्यांमध्यें करण्याजोग्या गोष्टी म्हणजे त्यांच्यांतील प्रधान व्यसनें दूर केलीं पाहिजेत. तीं व्यसनें म्हणजे ( १ ) मृत जनावरांचें मुडदार मांस खाणें; ( २ ) व्यसन म्हणून अथवा जातीचा रिवाज म्हणून दारू पिणें; ( ३ ) लोकांचें उष्टें अन्न मागून आणून खाणें; ( ४ ) कर्जांत नेहमीं बुडालेलें असणें; ( ५ ) शिक्षण जेथें मिळणें शक्य आहे तेथेंहि शिक्षणाविषयीं अत्यंत उदास असणें, किंबहुना, शिक्षणाचा विरोध करणें; ( ६ ) शहरें आणि गांवें रोज साफ करूनहि स्वतः साफ न राहणें; आणि ( ७ ) व्यसन जरी म्हणतां येत नाहीं तरी हिंदुसमाजांत स्वाभाविक स्थान मिळविण्याच्या बाबतींत जबरदस्त अडचणीची अशी गोष्ट म्हणजे गोमांसभक्षण.

मेलेलीं गुरें सोलून त्यांचें कातडें कमावण्याचें काम अंत्यजांना आपल्या रहात्या जागेच्या आसपासच करावें लागतें. हें अत्यंत अमंगळ आणि आरोग्यास अहितकर असें आहे. या बाबतींत सुधारणा अेकदम झाली पाहिजे. चामडीं सोलून कमावण्याचें काम मनुष्यवस्तीपासून दूर आणि वाऱ्याची दिशा व पावसाळ्यांतील पाण्याचे ओहोळ यांचा विचार करून नक्की करावी;

आणि श्वापदांकडून चामड्याला नुकसान पोहोंचूं नये अशीहि तेथें काळजी घेतलेली असावी.

[ चामडीं कमावून त्यांचे निरानिराळे पदार्थ करून विकणें हा मोठा व किफायतशीर धंदा गोरक्षकांच्या हातींच असला पाहिजे, ही गोष्ट अंत्यजांना समजावून देऊन तसें घडण्यास त्यांना व्यावहारिक मदतहि केली पाहिजे.]

अस्पृश्यतानिवारणाची दुसरी बाजू–पापमूलक रूढीवर चढाओी करण्याची, अर्थात् हृदयपरिवर्तन करण्याची बाजू–स्पृश्य समाजांतील प्रतिष्ठित अग्रणी लोकांनीं आपल्या हातीं घेतली पाहिजे. आणि आळीला आग लागली असतां ज्या आक्रांतानें आपण आगीचा बंब चालवितों, तितक्याच निकरानें हें काम चालविलें पाहिजे. लोकांचा विरोध होता तोंवर विरोधाचा नाटनाट करण्याचें काम सोपें होतें. आतां बौद्धिक विरोध जवळजवळ शमला आहे. आतां अस्पृश्यतेचा मुडदा अनास्थेच्या रूपानें कुजत पडून सर्वत्र दुर्गंधी आणि रोगराओी पसरवीत आहे, त्याला वेळींच मूठमाती दिली पाहिजे.

अस्पृश्यांना आम्ही न्यायानें वागवूं, त्यांच्या प्रगतीच्या आड कोठेंहि येणार नाहीं, असला मिंगा न्याय देऊन आतां भागावयाचें नाहीं. शेंकडों अथवा हजारों वर्षांच्या अन्यायाचें प्रायश्चित्त करण्यासाठीं अर्थात् पापकृत्यें पासून स्वतःचें रक्षण करण्याच्या स्वार्थाच्या दृष्टीनें अस्पृश्यांना मदत करण्याचे प्रसंग मुद्दाम शोधले पाहिजेत. आजवर त्यांच्याविरुद्ध पक्षपात झाला याचें स्मरण ठेवून आज स्वार्थत्यागपूर्वक त्यांच्या फायद्याचा पक्षपात केला पाहिजे; आणि हें सर्व हृदय कळवळून झालें पाहिजे.

अस्पृश्यतानिवारणांत खालील गोष्टी प्रमुखत्वानें येतातः ( १ ) दुकानांत, शेतीच्या कामांत, देवळांत, विहिरीवर वगैरे जेथें जेथें अस्पृश्यांशीं संबंध येतो, तेथें तेथें त्यांना दूर ठेवतां कामा नये, त्यांच्यांशीं कसलाच भेदभाव असतां कामा नये. ( २ ) सार्वजनिक असो अथवा खाजगी असो, सर्व विहिरींवर पाणी ओढून घेण्याची वगैरे मुभा अस्पृश्यांना अितर जातींअितकीच असावी. ही सुधारणा सर्वांत अगोदर झाली पाहिजे. ( ३ ) ज्यांचा मूर्तिपूजेस विरोध नाहीं, देवदर्शनाची ज्यांना आस्था आहे, अशा स्पृश्य आणि अस्पृश्य लोकांना–

मग ते कोणत्याहि जातीचे अथवा धर्मांचे असोत—मंदिरप्रवेशाची मोकळीक सारखीच असावी. ( ४ ) शिवणसंस्थांतून, तालमीच्या आखाड्यांतून, वाचनालयें, ग्रंथालयें, रुग्णालयें वगैरे समाजसेवेच्या संस्थांतून अस्पृश्यांना आदरानें वागविण्यांत आलें पाहिजे. कोणतीहि सामाजिक सेवा त्यांना अितर जातीं-अितकीच आस्थेनें व सहज मिळाली पाहिजे. ( ५ ) लग्नाच्या वराती, जातींच्या मिरवणुकी, वगैरे बाबतींत अंत्यजांना हीनताद्योतक जे प्रतिबंध पाळावे लागतात ते दूर झाले पाहिजेत. ( ६ ) अस्पृश्यतानिवारणाचें अेक अंग म्हणूनहि शौचकूपांची व्यवस्था सुधारून ती माणसांना शोभेशी केली पाहिजे. शौचकूपाशेजारीं जेवावयास बसलें तरी कोणालाहि कंटाळा येअूं नये अितकी सफाअी ठेवणें शक्य आहे व तोच आदर्श असावा. ( शौचकूप साफ करण्याचें काम अंत्यज जातीच्या हातीं न ठेवतां अितर जातींनीं करावें हें अिष्ट आहे; पण आज शौचकूप साफ करणाऱ्या अस्पृश्य कुटुंबांच्या आजीविकेची अन्य रीतीनें तरतूद लावूनच ही सुधारणा केली पाहिजे. ) ( ७ ) अंत्यज मुलांमुलींना सामान्य शिक्षणसंस्थांतून प्रवेश मिळवून देऊनहि खास अस्पृश्यांसाठीं म्हणून कांहीं आश्रम काढावे लागतील; आणि त्यांतहि मुलांच्या शिक्षणापेक्षां मुलींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष दिलें गेलें पाहिजे. असें न केल्यास समाजाचें स्वास्थ्य बिघडेल आणि अस्पृश्य कुटुंबें दुःखी होतील. ( ८ ) लोकलबोर्ड, म्युनिसिपॅलिटी, सरकारी कौन्सिलें वगैरे संस्थांतून जेथें जेथें लोकप्रतिनिधी पाठवावयाचे असतात, तेथें तेथें आपण मागासलेले अल्पसंख्यांक, आपली हेटाळणीच होणार अशी जी शंका अस्पृश्यांमध्यें असते ती दूर होण्याअितका अंत्यजांचा पुरस्कार केला पाहिजे; व त्यांचें व्यक्तिस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य संभाळून हीं नवीन प्रकारचीं कामें मोठ्या हुषारीनें पार पाडण्यास त्यांना मदत केली पाहिजे. ( ९ ) अंत्यजांपैकीं हुषार व सात्त्विक तरुणांना संस्कृत भाषा व हिंदुधर्मशास्त्र शिकण्यास पुष्कळ उत्तेजन दिलें पाहिजे; व हिंदुधर्माच्या बऱ्यावाअीट दोन्ही बाजू स्वतंत्रपणें पाहून हिंदुधर्माच्या भव्य मिशनची त्यांना कल्पना येअील, अशी सोय करून दिली पाहिजे.

---

# पंक्तिप्रपंच

पंक्तिप्रपंच करणें ही आपल्या येथें अेक अत्यंत अशिष्ट अशी गोष्ट समजली जाते. जे अेका पंगतींत जेवावयास बसले असतील, त्या सर्वांना सारखें वाढणें, प्रत्येकजण मागेल तेवढें वाढणें, हा आपल्या गृहस्थाश्रमाचा सार्वत्रिक शिष्टाचार आहे. घरांतील अमका अेक मनुष्य जास्त पैसे मिळवतो, अमका कमी मिळवतो, अमका सर्वांचा लाडका आहे, अमक्याचा सर्वजण तिरस्कार करतात, वगैरे कारणांमुळें वाढण्याच्या बाबतींत कांहींहि भेद करण्यांत येत नाहीं. जो नियम घरच्या माणसांविषयीं तोच नियम पंक्तिमान्य पाहुण्यांविषयीं! पाहुणा गरीब असो कीं श्रीमंत असो, विद्वान् असो कीं मंद असो, लहान असो कीं मोठा असो, सर्वांना सारखेंच वाढलें पाहिजे. आला अपवाद फक्त व्रतस्थ आणि आजारी. जीवनांतील मुख्य गरज जो आहार त्याच्या बाबतींतील ही समानता उच्च संस्कृतीची द्योतक आहे. घरांतील पुरुषांच्या व स्त्रियांच्या आहारांतहि जर ही समानता राखली गेली असती, तर संस्कृतीस पूर्णता प्राप्त झाली असती. पण दुर्दैवानें तसें झालें नाहीं. ज्यांच्यावर घर चालविण्याची जबाबदारी आहे, त्यांनीं स्वतः अधिक संयम पाळावा आणि सर्वांना जेवूं घातल्यानंतर जें कांहीं उरेल तेवढेंच खावें ही वृत्ति आर्यत्वसूचक आहे. यांत स्त्रियांची हानि नाहीं, अपमान नाहीं. पण जेव्हां अशा प्रकारचा स्त्रियांचा स्वार्थत्याग हा आपला हक्क आहे असें पुरुष समजतात, किंवा स्वतःच तो गाजवूं अिच्छितात, तेव्हां त्या साऱ्या रचनेस घाण येऊं लागते. अथवा जेव्हां घरांतील प्रौढ स्त्रिया वाढण्याच्यावेळीं मुलगा आणि मुलगी यांच्यांत भेदभाव करतात आणि मुलींना दटावून म्हणतात, 'तुला कुठें मिळवायला जायचंय? तुझे लाड कशासाठीं?' तेव्हांहि हा भेदभाव असह्य होतो.

आधुनिक समाजशास्त्राचे नवे आदर्श देखील हीच गोष्ट व्यापक स्वरूपांत अमलांत आणूं अिच्छितात. प्रत्येकाला जोंपर्यंत भाकरी मिळालेली नाहीं, तोंपर्यंत कुणालाहि पोळी खाण्याचा हक्क नाहीं, हें बोल्शेविक मत आतां सर्वांच्या परिचयाचें झालें आहे. गरिबांना साखर कमी गोड लागते, कमी पचते किंवा

ती खाण्याचा त्यांना कमी हक्क आहे असें मुळींच नाहीं. अमुक लोक जास्त धूर्त असल्यामुळें अथवा प्रसंगवशात् चांगल्या स्थितींत पडल्यामुळें त्यांनीं चांगलें खावेंप्यावें आणि अितर दुर्दैवी लोकांनीं मनांतील जळफळाट मनांतच दाबून ठेवून समाधानी रहावें हें टाळतां येण्याजोगें नसलें, तरी तें अनुकरणीय किंवा स्वागतार्ह नाहीं. विलासाच्या साधनांत किंवा व्यसनांच्या सोयींत भेद-भाव खुशाल राहो, पण अन्नवस्त्राच्या बाबतींत मात्र कोणीहि दुःखी राहतांच कामा नये अशी मागणी प्रत्येक हृदय अवश्य करील.

अशा प्रकारें जुन्या भावना आणि नवे आदर्श अेकच गोष्ट पसंत करतात आणि तरीहि कांहीं विशिष्ट परिस्थितींत पंक्तिप्रपंचाची मोकळीक द्यावी लागते. ती कशी तें येथें पाहूं.

छात्रालयांत घरचें वातावरण ठेवण्याचा आपण कितीहि प्रयत्न केला, तरी वस्तुस्थितीकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. छात्रालयांत जर जातीतर्फे किंवा अेकूण समाजातर्फे विद्यार्थ्यांना मोफत जेवण देण्यांत येत असेल, तर पंक्ति-प्रपंच करूं नये हा नियम बरोबर आहे. पण जेथें प्रत्येकजण आपापल्या अैपती-प्रमाणें घरून आणून खात असेल, तेथें सर्वांना समान ठेवणें कठिण आहे. ज्या लोकांची राहणी जवळजवळ सारखी आहे, ते परस्पर–व्यवहारांत काटेकोर हिशेब ठेवीत नाहींत. मीं माझ्या मित्राची सायकल कितीदां वापरावी, व त्यानें माझी सायकल कितीदां वापरावी याचा हिशेब आम्ही ठेवीत नाहीं. समान दर्जाचे मित्र कार्डें–पाकिटें किंवा कागद–पेन्सिली वगैरे वस्तू कसलाहि हिशेब न करतां मुक्त हस्तानें देतघेत असतात. कारण सरासरीनें पाहिल्यास त्यांत कुणाचें विशेष नुकसानहि नसतें किंवा त्यामुळें कुणाला कांहीं मिळावयाचेंहि नसतें; आणि जरी असलें कांहीं असलें, तरी तें फारसें लक्ष देण्यासारखें नसतें. पण अगदीं गरिबींत आणि अगदीं श्रीमंतींत वाढलेल्या लोकांच्या बाबतींत असा मेळ बसत नाहीं. जर अेकाद्या छात्रालयांत प्रत्येक विद्यार्थ्यानें आपल्या सोयीप्रमाणें स्वतंत्रपणें स्वयंपाक करून जेवावें असा नियम असेल, तर तेथें पंक्तिप्रपंचाचा प्रश्न येत नाहीं. पण त्यामुळें सर्वांनीं सारखाच आहार घ्यावा हें साधत नाहीं. याचा अर्थ अेवढाच होतो कीं अेकमेकांच्या देखत जेवत असतां असमानता दिसून येतां कामा नये. आणि यांत कांहीं मोठें तत्त्व आहे

असें म्हणतां येणार नाहीं. किंवा अेकाद्या छात्रालयांत आपल्या शक्ती व वृत्ती-प्रमाणें राहूं अिच्छिणाऱ्या भिन्नभिन्न परिस्थितींतील विद्यार्थ्यांचीं वेगवेगळीं चारपांच भोजनगृहें असतील—अेकांत गरिबीचें अन्न असेल, दुसऱ्यांत विशेष मोकळीक असेल, तिसऱ्यांत उधळेपणा असेल, चौथ्यांत चमचमीतपणा असेल, आणि पांचव्यांत दररोज नवीन नवीन प्रयोग करणारे गोळा झाले असतील—तर तेथें असमानता आहे असें म्हणतां येणार नाहीं; आणि तरीहि ही स्थिति कुणाच्या डोळ्यांत खुपणार नाहीं.

जास्त खोलांत शिरल्यास असें दिसून येअील कीं पंक्तिप्रपंचासंबंधींची नापसंती ही पंगतींत गरीब अन्न खाणाऱ्या व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होत नाहीं; तर जे जास्त मोकळीक अनुभवतात म्हणजे विशेष उच्च प्रकारचें अन्न खातात—त्यांना निःसंकोचपणें खातां यावें म्हणून हा नियम समाजाच्या मनांत ठोकून ठोकून बसविण्यांत आला आहे. विवाहप्रसंगीं जर विधवा स्त्री हजर असेल, तर तिला वाअीट वाटण्याअैवजीं लग्न करणाऱ्या लोकांनाच आपल्यांतील समभावाच्या अभावामुळें लाजल्यासारखें होतें आणि म्हणून त्याठिकाणीं विधवेनें असूं नये असें ते अिच्छितात व म्हणूनच विधवेचें दर्शन अशुभ असतें, ही समजूत त्यांनीं रूढ केलेली असते. धर्माच्या कोणत्याहि सिद्धान्ता-प्रमाणें पाहिल्यास शुद्ध विधवेचें जीवन अत्यंत पवित्र समजलें गेलें पाहिजे.

जर अशा प्रकारें नजरेआड चालणारी कसलीहि असमानता आपण चालूं देतों, तर तीच गोष्ट अेकत्र बसून खाण्याच्या वेळीं चालूं देण्यास काय हरकत आहे? जर संस्था ही यजमान असेल आणि सर्व विद्यार्थी अतिथी असतील, तर पंक्तिप्रपंच करणें यजमानाला शोभणार नाहीं. पण अिथें तर प्रत्येकजण आपापलें आणून खात असतो. अेकत्र खाण्यांत खर्च पुष्कळ कमी येतो आणि तें खूप सोयीचेंहि असतें. तेव्हां हा लाभ निव्वळ शिष्टाचारासाठीं आपण कां सोडून द्यावा?

आणि आहारांतील असमानता ही पुष्कळ वेळां टाळतांच येत नाहीं. अमुक मनुष्याला अमक्या अेका आहाराची संवय असेल आणि जर आपण समानतेच्या नांवावर त्याला असें सांगूं कीं 'अितर लोक जें खातात तेंच

अन्न खाऊन तुला चालवून घेतलें पाहिजे,' तर यांत न्याय नाहीं. आतां त्यानें आपणहून आपल्या जीवनांत बदल करावा आणि त्याला तो मानवावा अशी आपण अवश्य अिच्छा करावी. पण समानतेच्या नांवावर अेकाद्याला वीट येअीपर्यंत त्रास देणें बरोबर होणार नाहीं.

आणि विद्यापीठासारख्या संस्थांमध्यें—जिथें शिकून पैसा कमावण्याचा संभव किंवा आदर्श नसतो, सेवेसाठींच तयारी करावयाची असते, तेथें—या शुभ वृत्तीनें प्रेरित होऊन अतिशय गरिबीची संवय असलेले विद्यार्थीहि येणार आणि चैनीची संवय असलेले विद्यार्थीहि येणार; अशा वेळीं अेकापायीं दुसऱ्याला संस्थेंत राहणें मुश्किल व्हावें ही गोष्ट अगदीं असह्य आहे. अलग अलग भोजनगृहें करण्याचा दुष्परिणाम कांहीं कमी होत नाहीं. त्यापेक्षां सर्वांनीं अेकत्र जेवावें, सर्वांना कमींत कमी अमुक अितका आहार तरी शुद्ध, स्वच्छ आणि ताजा मिळेल अशी व्यवस्था करावी, आणि जेवावयाच्या वेळीं प्रत्येकाला आपल्या गरजेप्रमाणें कमीजास्त पदार्थ घेण्याची मुभा असावी, यांत आक्षेपार्ह असें कांहीं समजण्यांत येऊं नये. पंगतींत बसून जर कोणीं आपल्यापुरती वेगळी जिलबी आणून खाअील तर तें अवश्य वाअीट समजलें जाअील. पण जर अेकाद्याचें जास्त दुधातुपाशिवाय चालत नसेल तर व तो स्वखर्चानें दूधतूप घेऊन खात असेल, तर जवळ बसणाऱ्याला त्यामुळें वाअीट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं, आणि जास्त खाणाऱ्यालाहि लाजण्याचें कारण नाहीं. ज्याप्रमाणें मनुष्य आपल्या भुकेप्रमाणें कमीजास्त खात असतो, आणि त्याबद्दल त्याच्या शेजारीं बसणाऱ्याला त्याचें कांहीं वाटत नाहीं, त्याचप्रमाणें याहि बाबतींत समजलें पाहिजे.

शरीरस्वास्थ्यासाठीं कमींतकमी अमुक दर्जाचा आहार विद्यार्थ्यांनीं घेतलाच पाहिजे, अशा प्रकारचें शास्त्रीय बंधन नक्की करून आवश्यक तो आहार घेण्यास शिक्षणसंस्था विद्यार्थ्यांना भाग पाडूं शकते. पण आपल्या या दुर्दैवी देशांत हीहि अेक मोटी अडचणच ठरावयाची. शाळेंत शिकणाऱ्या भावाला दूधतूप जास्त खावयाचें असतें म्हणून घरीं राहणाऱ्या त्याच्या भावंडांना त्यांचे आअीबाप दुधातुपाशिवाय ठेवतात. या वस्तुस्थितीचा परिणाम जर आपल्या हृदयावर होत नसेल, तर आपल्याला गरिबांचें दुःख कळत नाहीं

असेंच म्हणावें लागेल. शिक्षणानंतर ' करीअर 'ची आशा बाळगणारे विद्यार्थी कालांतरानें आपल्या भावंडांच्या स्वार्थत्यागाचा मोबदला देण्याची खरी किंवा खोटी आशा दाखवूं शकतात. पण सेवेसाठीं शिक्षण घेणारे विद्यार्थी अशी लालूच दाखवूं शकणार नाहींत. त्यांनीं असेंच सांगितलें पाहिजे कीं ' माझ्याकडून तुम्ही फारशी आशा बाळगूं नका. माझ्या कुटुंबांतील लोक विशेष संकटांत सांपडले असतील, तर धांवत जाऊन त्यांना मदत करण्याची अिच्छा मी जरूर बाळगतों; पण मी स्वतः कमावून तुम्हांला सुखांत ठेवीन ही आशा आतांपासूनच मनांतून काढून टाका. मी जी कांहीं सेवा करीन, ती तुम्हीच केलेली असेल; कारण तुमच्या त्यागाचा वाटा तिच्यांत असेल. अेवढेंच समाधान तुम्हांला लाभेल !' अशा स्थितींत मुलानें घरून जास्त पैसा आणणें किंवा सक्तीनें त्याला तो आणावा लागणें, हें त्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें कितीहि हिताचें असलें, तरी कुटुंबाच्या दृष्टीनें ती अेक आपत्तीच समजावी लागेल.

यापेक्षां सर्व विद्यार्थ्यांनीं अेकत्र जेवावें, आणि प्रत्येकानें आपापल्या गरजा आणि शक्यता यांचा विचार करून कमीजास्त प्रमाणांत दूधतूप घ्यावें यांत भलेपणा आहे, परिस्थितीचें यथार्थ दर्शन आहे, आणि अन्तर्मुख मनुष्यासाठीं त्यांत मोठें शिक्षणहि आहे.

अशा कल्पनेनें विद्यापीठांत कुपनांची प्रथा सुरू केली आहे. अमुक अितकें दूध किंवा तूप प्रत्येक विद्यार्थ्याला ठरलेल्या वेळीं मिळतच असतें. त्याशिवाय जितकें दूधतूप जेवणाऱ्याला हवें असेल, तेवढें तो त्याचवेळीं विकत घेऊं शकतो. विद्यार्थी आधींपासूनच तुपाचीं व दुधाचीं कुपन–पुस्तकें विकत घेऊन ठेवतात आणि जेवण्याच्या वेळीं ठरलेल्या नियमाप्रमाणें हवें असेल तेवढं तूपदूध विकत घेतात. या पद्धतीनें सर्व दर्जाचे विद्यार्थी अेकाच भोजनालयांत हव्या असलेल्या सोयी–सवलती प्राप्त करून घेतात. या पद्धतीनें त्यांच्यांतील भ्रातृभाव कमी झाल्याचें दिसून आलेलें नाहीं, किंवा गरीब विद्यार्थ्यांचा स्वाभिमान कमी झाला आहे असाहि अनुभव नाहीं. जर कांहीं परिणाम झाला असेल, तर तो चांगलाच झाला आहे.

# बेजबाबदारी

एकादा मनुष्य कितीहि हुशार असो, जर त्याच्यांत स्वार्थच भरलेला असेल, तर त्याला आपण हीन समजतों. माणसाचें अस्तित्व आणि त्याची प्रगति हीं समाजाच्या पुरुषार्थाचीं आभारी असतात. म्हणून जो समाजाविषयींचें आपलें कर्तव्य ओळखीत नाहीं, त्याच्यासंबंधीं आपण असें म्हणतों कीं, 'हा जरी दोन दिवस पुढें जात असलेला दिसला, तरी त्याच्यासाठीं हा लोकहि नाहीं, आणि परलोकहि नाहीं. याचें भलें होणार नाहीं.' जो फक्त आपलाच विचार करतो, आपल्या आत्मीय जनांचा किंवा शेजाऱ्यापाजाऱ्यांचा विचार करीत नाहीं, तो सर्वांचा द्रोह करतो. तो जरी कायद्याप्रमाणें गुन्हा करीत नसला, तरी आत्यंतिक स्वार्थ हा सामाजिक गुन्हाच आहे. स्वार्थी मनुष्य समाजाचीं बंधनें ढिलीं करतो, सद्‌गुणांचा नाश करतो आणि धर्माचा द्रोही बनतो. स्वार्थी मनुष्य श्रीमंत असेल, हुशार असेल, विद्वान् असेल, किंवा उच्चपदाधिष्ठितहि असेल. तरी पण समाजांत मात्र त्याची प्रतिष्ठा असणार नाहीं. त्याचें जीवन निंद्य आहे व तें समाजावर भाररूपहि आहे. ज्याला मेल्यानंतर चारजणांच्या खांद्यांवर बसावयाचें आहे, त्यानें जिवंतपणीं चारजणांचा भार उचलण्याचें आपलें कर्तव्य मान्य केलेंच पाहिजे. 'मी माझ्या पायांवर उभा आहें, मला कोणाची पर्वा नाहीं' असें जो म्हणतो, तो समाजाचा शत्रु आहे. तो अदूरदृष्टीचा आहे. त्याच्या पायांतील जोर फार वेळ टिकणार नाहीं.

जी गोष्ट व्यक्तीची, तीच मोठमोठ्या राज्यांची व साम्राज्यांची. ब्रिटिश साम्राज्य ही आत्यंतिक स्वार्थाची प्रत्यक्षमूर्ति आहे. त्यानें धूर्तपणानें आतांपर्यंत जगामध्यें आपलें अस्तित्व टिकवून धरिलें. पण आतां जगांतील सर्वच लोक या स्वार्थी आणि अहंमन्य साम्राज्याकडे शंकेच्या, घृणेच्या दृष्टीनें पाहूं लागले आहेत. इंग्रज मुत्सद्यांनाहि ही गोष्ट आतां जाणवूं लागली आहे. आणि म्हणूनच विश्वहिताच्या विचाराचें ढोंग त्यांना करावें लागत आहे. स्वार्थी जीवनच मुळीं लोकनिंद्य असतें.

समूहधर्मांच्या प्रेरणेनें प्रेरित होऊन आपल्या जातीहि स्वार्थी बनूं लागल्या आहेत आणि विदेशी गुलामीमध्यें मिळणाऱ्या सुरक्षिततेमुळें त्या अेकमेकां-विषयीं बेपर्वा झाल्या आहेत. सामाजिक जीवनांत अितक्या ओतप्रोत झाल्या असूनहि जातीय जीवनांत दोन जाती अेकत्र होत नाहींत. परस्पर–मदत किंवा सहकार्य यांचा विचार करीत नाहींत. उच्च स्वार्थानें प्रेरित होऊन आपण 'लीग ऑफ कास्ट्स' (जातिसंघ)हि स्थापन केलेली नाहीं. आपण संघटना करतों त्यांतहि अंत्यज, भिल्ल, वाघरी, धाराळा, कोळी वगैरे बालक जातींचा आपण पुरेसा विचार करीत नाहीं. ज्ञातिपरिषदा भरवून आणि ज्ञातिफंड गोळा करून प्रत्येक जात स्वतःला पुढें कसें जातां येअील, व श्रेष्ठत्वाच्या चढाओढींत आपल्याला दुसऱ्याहून वरचढ कसें होतां येअील याचाच विचार करीत असते. रेसमध्यें कोणता घोडा पुढें येतो अिकडेच लोकांचें लक्ष असतें! धांवतां न आल्यामुळें किती घोड्यांना ठोकर बसली, किती घायाळ होऊन पडले, अथवा मरून गेले याचा कोणी विचारच करीत नाहीं. हीच गोष्ट आपल्या जातींची आहे. जातवाले आपल्या जातीलाच ओळखतात व मदतहि आपल्या जातीपुरतीच करतात. ही वृत्ति आपल्यांत जितकी राहील, तितका आपला नाशच आहे. कांहीं चांगले लोक या संकुचिततेंमधून वर निघाले आहेत, आणि व्यापक दृष्टि ठेवून सगळ्या समाजाची सेवा करीत आहेत. व म्हणूनच आपल्याला हिंदुस्थानांत थोडेंतरी सार्वजनिक जीवन दिसून येत आहे.

'जातवाले' लोक असा विचार करीत नाहींत, कीं ज्याप्रमाणें आपल्या जातीच्या गरीब विद्यार्थ्यांना मदत करणें, त्यांना शिक्षण देणें, त्यांचा हात धरून त्यांना पुढें आणणें हें आपण आपलें कर्तव्य समजतों, त्याचप्रमाणें अेकूण समाजांत ज्या जाती गरीब आहेत, मागासलेल्या आहेत, त्यांच्यासाठीं खास व्यवस्था करणें, त्यांना शिक्षण देणें आणि प्रेमानें त्यांचा हात हातांत घेऊन त्यांना पुढें आणणें हेंहि प्रत्येक जातीचें कर्तव्य आहे. जर अेकाद्या समाजांतील लष्करी लोक फक्त आपलेंच रक्षण करतील, डॉक्टर–वैद्य आपल्या कुटुंबांतील लोकांनाच औषधें देतील आणि प्रोफेसर व शिक्षक आपल्या मुलांनाच शिक्षण देतील, तर त्या समाजाला समाज असें म्हणतां येअील काय?

आणि याच न्यायानें जर शेतकरी आपल्यापुरतेंच धान्य पिकावितील आणि खातील तर समाज टिकेल काय ?

व्यवहारामध्यें या सर्व वर्गांत विनिमय चालू आहे, म्हणूनच लोकयात्रा शक्य आहे. अशाच प्रकारें सामाजिक जबाबदारींतहि जर अेकमेकांसंबंधीं विचार केला जाअील, तरच समाज संस्कारी आणि समर्थ राहील. प्रत्येक जात जेव्हां आपापल्या पुरताच विचार करते, तेव्हां त्याचा परिणाम काय होतो हें आपण तपासलें पाहिजे. सर्वसामान्यपणें आपले अेकमेकांत मिसळण्याचे प्रसंग पुढीलप्रमाणें आहेत: ज्ञातिभोजनें, ज्ञातिपरिषदा, सभा, बाजार, कोर्ट, यात्रा, रेल्वे, शाळा, आणि मंदिरें. शिक्षण हें बहुतांशीं शहरांतच असतें आणि वरील मिसळण्याचीं साधनेंहि अधिकांशीं शहरांत किंवा शहरांच्या आसपासच असतात. यामुळें शहरी पद्धतीच्या बुद्धिजीवी लोकांनाच आपण नेहमीं भेटत असतों, आणि म्हणून त्यांचाच विचार करीत असतों. श्रमजीवी लोकांमुळें आपण जगतों खरे; पण त्यांचा विचार मात्र आपण कमींतकमी करतों. जर आपण ज्ञातिपरिषदा आणि ज्ञातिफंड तपासले, तर ही सगळी प्रवृत्ति बहुतांशीं बुद्धिजीवी लोकांचीच आहे असें दिसून येअील. श्रमजीवी लोकांच्या मेहनतीचें फळ सर्वच बुद्धिजीवी लोक चाखीत असतात. पण बुद्धिजीवी लोकांच्या परिश्रमानें उत्पन्न होणारी संपत्ति, संस्कारिता, बुद्धिमत्ता किंवा रसिकता श्रमजीवी लोकांना कितीशी मिळते ?

गुजरातच्या लोकवस्तींतील श्रमजीवी आणि बुद्धिजीवी लोकांचें प्रमाण जोंपर्यंत आपण काढलेलें नाहीं, तोंपर्यंत सावकाराप्रमाणें आरामांत बसून आपण खाऊं शकतों; आणि निश्चितपणें झोपा काढूं शकतों. हें प्रमाण अेकदां कां आपल्याला माहीत झालें कीं मग धर्मबुद्धि आपल्याला सुखानें बसूं देणार नाहीं. ब्राह्मण, वाणी, ब्रह्मक्षत्री, अिनामदार, भाटचारण वगैरे बुद्धिजीवी लोकांचें शेतकरी, कारागीर, न्हावी, धोबी, कोळी, धाराळा, भिल्ल, दुबळे, अंत्यज वगैरे श्रमजीवी लोकांशीं प्रमाण १८ स ८० आहे, याचा कधीं कोणी विचार केला आहे काय ? आपण जितक्या कांहीं सुखसोयी करतों, त्या फक्त या १८ साठींच असतात. बाकीच्या ८० पैकीं सर्वांत हुशार अशा पांचदहाजणांना आपल्या सवलतींचा फायदा देऊन आपण त्यांना संतुष्ट ठेवतों, व तेंहि नाअिलाजास्तव !

प्रत्येक जात जर आपल्यांतीलच मुलांच्या शिक्षणाची सोय करील, आपल्याचसाठीं चांगलीं घरें बांधील तर त्या बिचाऱ्या श्रमजीवी जातींनीं कुठें जावयाचें ? त्यांना रखडत ठेवण्याचें पाप बुद्धिजीवी लोकांच्या शिरावर आहेच. तें जोंपर्यंत दूर केलें नाहीं, तोंपर्यंत आम्ही प्रामाणिक आहोंत, धर्मनिष्ठ आहोंत, अनुदार आहोंत असें आपल्याला म्हणतां येणार नाहीं.

आपल्या छात्रालयांत जातीय छात्रालयांचीच संख्या जास्त आहे. याचा अर्थ असा कीं, आपल्या सामाजिक जीवनांत संकुचित स्वार्थ सार्वभौम आहे! यामुळेंच आपला समाज अितका घाबरट, दबलेला, पुरुषार्थविहीन आणि विस्कळित झाला आहे. जातीय छात्रालयें बंद करण्याची गोष्ट सगळेजण आज सहजासहजीं मान्य करणार नाहींत हें स्पष्ट दिसत आहे. पण जातीय छात्रालयांची संकुचितता दूर करण्याचा प्रयत्न अवश्य होऊं शकेल. ज्या धर्मांत मालक व मालकीण यांनीं स्वतः जेवण्यापूर्वीं नोकराला जेवूं घालावें असा नियम आहे, आणि मनुष्ययज्ञ व भूतयज्ञ यांच्या नांवानें अतिथिपूजा व काकबलि यासारखी अन्य प्राण्यांची सेवा सांगितली आहे, त्या धर्माच्या समाजांत मागासलेल्या जातींसंबंधीं विचार करण्याची शिफारस केल्यास ती विचित्र वाटण्याचें मुळींच कारण नाहीं.

जर प्रत्येक जातीय छात्रालयांत असा नियम करण्यांत येअील कीं शेंकडा ३० विद्यार्थी अन्य जातींचेच असले पाहिजेत, जर प्रत्येक ज्ञातिफंडासंबंधीं असा नियम करण्यांत येअील कीं शेंकडा ३० रुपये श्रमजीवी जातींतील मुलांना शिष्यवृत्त्या देण्यांतच खर्च केले जावेत, आणि जर दाते लोक दान देण्याच्या वेळीं श्रमजीवी लोकांना उद्योग आणि संस्कार यांचें शिक्षण देवविण्याचा खास विचार करतील, तर आपण प्रायश्चित्त करण्यास सुरवात केली असें म्हणतां येअील.

पण आपल्याला फक्त श्रीमंत लोकांचीच चूक दाखवून स्वस्थ बसावयाचें नाहीं. आज गुजरातेंत समाजसेवेसाठीं सर्वसंगपरित्याग करणार, धर्मनिष्ठ पुरुष मोठ्या प्रमाणावर पुढें येत आहेत. शिक्षण, राजकीय लढ, समाजसुधारणा, वगैरे अनेक समाजव्यापी क्षेत्रांत सेवक पोहोंचले आहेत. त्यांपैकीं

अेक खादी सोडल्यास बाकीची आपली सेवा बहुतांशानें प्रत्यक्षरीत्या बुद्धिजीवी लोकांनाच मदत करीत असते; त्यांनाच ती उत्साहित व मजबूत बनवीत असते. आपला समाज अितका विस्कळित कां झाला आहे, आपल्या हालचालींच्या प्रमाणांत जनतेमध्यें आत्मविश्वास कां उत्पन्न होत नाहीं, याचें उत्तर वरील मीमांसा आपल्याला स्पष्टपणें देते. आपलें शिक्षण जनतेचें नसून बुद्धिजीवी अपंग लोकांचें आहे. यामुळें तें शिक्षणहि अपंगच आहे. राष्ट्रीयतेची ओळख असणारे अेक सोडल्यास बाकीच्या सर्व लोकांचा सामाजिक पुरुषार्थ हीन कोटीच्या जातीय स्वार्थ साधण्यांतच खर्च होत असतो. जातीय छात्रालयांची बाजू घेणारे लोक या सर्व गोष्टींकडे कदाचित् ध्यान देणार नाहींत. पण शिक्षणाची बाजू घेणारे कांहीं आंधळे नाहींत. त्यांनीं समाजाला वेळेवर सावध केलें पाहिजे.

# जातीची कसोटी

ज्ञातिव्यवस्था जर कुठें अत्यंत दृढ असेल तर ती गुजरातेंत! आणि जातींचें वाभाडे जर कुठें जास्तींत जास्त काढले जात असतील तर तेहि गुजरातेंतच! पुष्कळशा लोकांच्यानें जात सोडवतहि नाहीं किंवा तिचीं बंधनेंहि पाळवत नाहींत. मी प्रथमपासूनच ज्ञातिव्यवस्था मानणारा असल्यामुळें पुष्कळ लोक मला म्हणतात कीं, तुम्ही गुजरातचें ज्ञातिदुःख पाहिलेलें नाहीं. तुम्हांला त्याची कल्पना कोठून असणार? तुमच्या महाराष्ट्रांत जात अितकी तापदायक नसल्यामुळें तुम्ही जातींची स्तुति करतां. मी यावर असें उत्तर देतों कीं 'ज्ञातींच्या व्यवस्थेमुळें गुजरातेंत किती कार्यशक्ति बाणली गेली आहे याची कल्पना तुम्ही जेव्हां गुजरातबाहेर जाल, तेव्हांच येअू शकेल. तुम्ही जें जातींचें दुःख आहे असें म्हणतां, तो ज्ञातिव्यवस्थेचा दोष नसून समाजाच्या पतित दशेचा दोष आहे. ज्ञातिबंधन हें सहकार्याचें मोठें साधन आहे. सरकार हें पाशवी राज्य आहे, तर ज्ञातिबंधन हें नैतिक राज्य आहे, प्रेमाचें बंधन आहे. जातींच्या द्वारा लोक जेव्हां अेकमेकांवर जबरदस्ती करूं लागले तेव्हांच सर्व दुःख सुरू झालें. दंडाचा आणि बहिष्काराचा धाक दाखवून प्रत्येक माणसाला लहानमोठ्या सर्वच बाबतींत आपल्या ताब्यांत ठेवण्याचे

प्रयत्न जेव्हां 'ज्ञातिभूषण' लोक करूं लागले, तेव्हांच ज्ञातींविषयीं तिटकारा उत्पन्न होऊं लागला.

ज्ञाति हा अेक परंपरागत सामाजिक 'क्लब' आहे. पण क्लबाहून वेगळेंच असें जीवन तिच्यांत आहे. कुटुंबानंतर जर दुसरी अेकादी सनातन संस्था असेल तर ती जातच होय. जातीमार्फत आपण सामाजिक धर्मांचें पालन करूं शकतों. आणि फक्त धंद्यांतीलच नव्हे, तर सबंध जीवनांतील सहकार्य आपण अंगीं बाणवूं शकतों. जबरदस्तीचें तत्त्व काढून टाकून जर आपण सहकार्याचें तत्त्व स्वीकारूं, तरच जातींचा पुनरुद्धार होअील. आज आपण परतंत्र दशेंत आहोंत याचें अेक कारण हें आहे कीं, हरतऱ्हेची जबरदस्ती सहन करून आपल्याला पारतंत्र्याची संवय झालेली आहे. पण आपल्याला स्वतंत्र व्हावयाचें असलें, तरी जाती मोडून टाकून आपण स्वतंत्र होऊं नये. जर तरुण लोक वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवणार नाहींत, शाहण्यासुरत्या लोकांच्या ताब्यांत राहणार नाहींत, तर समाज टिकणार नाहीं व लहानमोठे दोघेहि निर्बळ होतील. पण लहानांना जेव्हां तो आपला धर्म आहे असें वाटेल, तेव्हांच त्यांनीं मोठ्या माणसांच्या सांगण्याप्रमाणें वागलें पाहिजे. मोठीं माणसें जर आपला हक्क समजून तरुणांना आपल्या ताब्यांत ठेवावयाचा प्रयत्न करतील तर ते त्यावेळीं कदाचित् यशस्वी होतील. पण प्रेम आणि आदर यांचें सूक्ष्म सामाजिक बंधन तुटून जाअील.

ज्ञातिव्यवस्थेंत जर हें तत्त्व बरोबर ध्यानांत ठेवलें जाअील, तरच जाती टिकूं शकतील. जातीच्या मोठेपणाविषयीं शास्त्रवचनें उद्धृत केल्यानें किंवा सुधारकांना शिव्या दिल्यानें जात टिकणार नाहीं. आजच्या काळीं धर्म आणि राजकीय आन्दोलन हीं दोन्ही अेक झालीं आहेत. धर्माला टिकविणें हा ज्याप्रमाणें जातीचा प्रमुख उद्देश आहे, त्याप्रमाणें राष्ट्रीय जीवनाला पोषक होणें हें ज्ञातिव्यवस्थेचें मोठ्यांत मोठें कर्तव्य आहे. खरें पाहतां ही ज्ञातिव्यवस्थेची अखेरची परीक्षा किंवा कसोटी आहे. यांत जर जात सफळ झाली नाहीं, तर सध्यांची ज्ञातिव्यवस्था नामशेष होअील, वर्णसंस्काराची स्थिति प्राप्त होअील आणि मग त्यामधून नव्या तत्त्वावर नवी ज्ञातिव्यवस्था निर्माण होअील. पण मध्यंतरीच्या काळांत महान् अनर्थपरंपरा सहन करावी लागेल. त्यांतून जर

वांचावयाचें असेल, तर आतां ज्ञातींनीं हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे कीं त्यांच्यांत अजूनहि प्राण शिल्लक आहे.

गुजरातेंत लहानमोठ्या जाती पुष्कळ आहेत. बहुतेक जाती अितक्या लहान आहेत कीं मनांत आलेली गोष्ट वाटेल तेव्हां करूं शकतात. या जातींच्या पुढाऱ्यांनीं आपल्या जातींना राष्ट्राच्या या जीवनमरणाच्या संग्रामांत उडी घ्यावयास लावलें पाहिजे. जर राष्ट्रच टिकणार नाहीं, तर जात तरी कशी राहील? अेकाच जहाजांत बसलेले आपण असें म्हणूं शकणार नाहीं, कीं जहाजाला जरी मोठें भगदाड पडलें असलें, तरीहि पंप चालवून पाणी बाहेर काढण्याचें काम आमचें नाहीं.

गुजरातेंतील बहुतेक सगळेच तरुण जातींना गाडून टाकण्यास तयार झाले आहेत. त्यांना माझी अेवढीच विनंति आहे कीं तसें करण्यापूर्वीं तुम्ही राष्ट्रीय आपत्ति दूर करण्यासाठीं जातींचा उपयोग करून पहा. श्रद्धापूर्वक जातींजवळ जा आणि त्यांना असें विनवा कीं, ‘परदेशी कापड काढून टाकण्यास तुम्हीं आम्हांला मदत करा.’ ज्या कुटुंबांत परदेशीचा संपूर्ण त्याग झाला असेल, त्याची कदर जातीनें केली पाहिजे. लग्नमुंजीसारख्या शुभ समारंभांत तर परदेशी कापडासारखी अशुभ वस्तु वापरतांच कामा नये. परदेशी कापडा-मुळें भारतमातेला वैधव्यासारखी दशा प्राप्त झाली आहे, हें ज्यांना कळून चुकलें आहे, त्यांनीं आपल्या जातीच्या लोकांना हें समजावून दिलें पाहिजे कीं, यापुढें लग्नमुंजीसारख्या समारंभांत परदेशी कापड खरेदी करणें अथवा विकणें आणि वापरणें हें अत्यंत अशुभ आहे; परदेशी कापडामुळें देशाचें दुःख वाढत आहे.

जेथें वर्तमानपत्रें जाऊं शकत नाहींत, जेथें वक्त्यांचा आवाज पोहोंचूं शकत नाहीं, तेथें जात पोहोंचूं शकते. जातवाल्यांनीं परदेशी कापडाचा त्याग करविण्याच्या प्रत्येक संधीचा फायदा घेतला पाहिजे. गुजरातचें संघबळ कांहीं अंशीं जातीमुळें आहे. राष्ट्राच्या आणीबाणीच्या प्रसंगीं तें उपयोगी पडतें कीं नाहीं हें आतां पहावयाचें आहे. जर स्वदेशी—धर्मांत जात मदत करणार नाहीं, तर जातींत थोडा देखील प्राण राहिलेला नाहीं, असेंच सिद्ध होअील. धर्मास विरोध करून जात जगूंच शकणार नाहीं.

गुजरातेंतील जातींपेक्षांहि जास्त परिणामकारक आणि लोकप्रिय संस्था म्हणजे गुजरातेंतील संप्रदाय ही होय. वैष्णव संप्रदाय, स्वामीनारायण संप्रदाय, आर्यसमाज, जैन लोकांचे संघ आणि असेच अितरहि अनेक लहानमोठे जुनेनवे पन्थ आणि मार्ग आहेत. या सर्वांमार्फत स्वदेशी–धर्माचें पालन करविण्याची प्रवृत्ति अमलांत येअू शकेल. धर्मनिष्ठ मनुष्य स्वदेशीसच चिकटून राहतो. परदेशी कापड वापरून धर्मद्रोह करूं नये, अितकें आपल्या पंथांतील लोकांना आचरणानें व उपदेशानें समजाविण्याचें काम आतां झालेंच पाहिजे. जर तसें होणार नाहीं, तर धर्माचा ऱ्हास होअील. आणि अेकदां धर्माचा ऱ्हास झाला, कीं मग सर्वनाश व्हावयास कितीसा वेळ लागणार ?

# सामाजिक बहिष्कार

सामाजिक बहिष्कार हा प्रत्येक समाजाचा स्वयंसिद्ध अधिकार आहे; व तो समाजहितासाठींच वापरला गेला पाहिजे, ही त्याची मर्यादा आहे.

सामाजिक बहिष्कार अेकाद्याला शिक्षा करण्यासाठीं म्हणून न वापरतां त्याला जबरदस्तीनें अन्तर्मुख बनवून त्याच्या स्वधर्माकडे त्याचें लक्ष वेधण्यासाठींच उपयोगांत आणला गेला पाहिजे. म्हणजे सामाजिक बहिष्कार हा शिक्षणाचा अेक कडक प्रकार म्हणतां येअील. बहिष्कार जेव्हां शिक्षा म्हणून उपयोजिला जातो, तेव्हां तो समाजविघातक आणि विषारी बनतो.

कोणताहि मनुष्य जोंपर्यंत समाजांत राहूं अिच्छित असेल, तोंपर्यंत त्याच्यावर पूर्णपणें बहिष्कार घालतां कामा नये. पुरेसें प्रायश्चित्त घेअून तो परत समाजांत येअूं शकेल, अशी सोय असलीच पाहिजे. जेथें जीवनसिद्धान्तच वेगळा असेल, अेकूण दृष्टिबिंदूतच मूलभूत फरक असेल, तेथें वेगळें होणें श्रेयस्कर असतें. जर अेक पक्ष जबरदस्तीनें अेकत्र राहूं अिच्छित असेल, तर त्या ठिकाणीं असहकार हें शस्त्र आहे. बहिष्कार किंवा असहकार हे सहजासहजीं अमलांत आणूं नयेत. जालिम अिलाज हा नेहमीं आणीबाणीच्या प्रसंगींच योजावयाचा असतो. शिवाय, ज्याच्यावर आपण बहिष्कार घालतों त्याच्याशीं आपला व्यवहार अितका उदार वृत्तीचा असला पाहिजे, कीं जेव्हां

तडजोड होईल तेव्हां परस्परांशीं बोलणीं करतांना व जुन्या गोष्टींची आठवण करतांना आपल्याला लज्जित व्हावें लागूं नये, किंवा संकोच वाटतां कामा नये.

मनुष्य स्वार्थवश किंवा विकारवश होऊन आपल्या कर्तव्याला व धर्माला विसरतो. अशा माणसाला हें समजावून द्यावयाचें असतें, कीं खराखुरा स्वार्थ संपूर्णपणें धर्मपालनानंच साधतो. बहिष्काराच्या द्वारा माणसाला त्याच्या वाईट आचरणाबद्दल काय काय फळें भोगावीं लागतील, हें आपण अगदीं डोळ्यांत भरेल अशा उग्र पद्धतीनें ताबडतोब दाखवून द्यावयाचें असतें. पण जालिम उपाय हा नेहमीं मूठ नसलेल्या तरवारीसारखा असतो. तो वापणाऱ्यालाहि नडल्याशिवाय रहात नाहीं. सत्याग्रह हें शस्त्रच असें आहे, कीं त्याचा उपयोग करणाऱ्याला क्लेश देऊनच तें विरुद्ध पक्षावर परिणाम करतें. यांतच त्याची सात्त्विकता आहे आणि म्हणूनच त्याचे परिणाम नेहमीं चांगले होतात.

सत्याग्रही व्यक्तीनें आपलें धर्म्य शस्त्र उगारलें कीं विरुद्ध पक्ष आपल्या सर्वच अधार्मिक शक्ती व परून पाहतो. सत्याग्रही निर्द्वेषयुक्त धैर्यानें ते प्रहार झेलतो आणि आपल्या सात्त्विक अिलाजांस चिकटून राहतो. याचा परिणाम असा होतो कीं, जुलूम करणाऱ्याचीं सर्वच शस्त्रें निष्प्रभ ठरतात.

येथें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, सरकारी राज्ययंत्राशीं केलेला असहकार तेव्हांच सफळ होतो, जेव्हां जनतेचा आपापसांतील सहकार सर्वोत्कृष्ट असतो, आणि जनतेचें चारित्र्य चांगलें असतें.

जो अत्यंत दुर्बळ असेल, त्याच्यावर कोणत्याहि कारणास्तव बहिष्कार घालतां कामा नये. उदाहरणार्थ, जर हरिजनांकडून अेकादी चूक झाली, तर तिकडे दुर्लक्ष करून त्यांना प्रेमानें जवळ घेऊन त्यांच्यांत विश्वास उत्पन्न केला पाहिजे. त्या विश्वासानें त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण होअील. अेकदां आत्मविश्वास आला, कीं मग सार्वजनिक जीवनांतील कुलीनता आणि तेजस्विता कशांत असते याची त्यांना कल्पना येअील आणि मगच ते समान भावनेनें आपल्याशीं सहकार्य करतील. या लांबलचक विधींतून पसार झाल्याशिवाय जर आपण सोपेपणाचा विचार करून बहिष्काराचें शस्त्र वापरूं आणि त्यांना 'ताळ्यावर आणूं,' तर दुर्बल अंत्यज जास्त दुर्बल बनतील आणि मग

दुर्बलतेची दुर्जनता त्यांच्या अंगीं येअील. अंत्यजासारख्या जातींची दुर्बलता हें आपल्या सामाजिक पापांचेंच फळ आहे. त्यासाठीं आपण त्यांना शिक्षा करतां कामा नये. आपणच धैर्यानें सर्व सहन करून परिस्थिति सुधारली पाहिजे.

आपण हें नेहमीं ध्यानांत ठेवलें पाहिजे, कीं अगदीं खालच्या पायरीवर पडलेल्या वर्गाला सामाजिक बहिष्काराच्या मार्गानें सुधारतां येणार नाहीं किंवा शिक्षाहि देतां येणार नाहीं. कारण त्यांना अधिक खालीं उतरावयाचें नसतें. सर्वांत खालच्या कोटीस पोहोंचलेल्या लोकांमध्यें आपोआप अीश्वरी बळ येतें. मात्र या वर्गाची अीश्वरावर निष्ठा असली पाहिजे. जर तसें नसेल, तर सैतानी शक्ति जागृत होण्यास वेळ लागणार नाहीं.

जो सर्व प्रकारें पराभूत झालेला आहे, त्याच्या शक्तीविरुद्ध कसलाच अिलाज नसतो.

# ज्ञातिचर्चेंतील गोडी

जेव्हां जेव्हां जातीविषयीं 'नवजीवनां'त लेख आले आहेत, तेव्हां तेव्हां वाचकांकडून आणि विचारकांकडून अनेक चर्चापत्रें आलीं आहेत. कांहीं लोक ज्ञातिसंस्थेस अिष्ट मानतात आणि पुष्कळसे तिला अनिष्ट आणि शाप-रूप मानतात. पण अितकें मात्र खरें कीं, लोक ज्ञातीसंबंधींच्या चर्चेविषयीं उदासीन राहूं शकत नाहींत. प्रत्येकाला तिच्यांत कांहींना कांहीं गोडी ही असतेच. कारण जातीची व्यवस्था आपला प्रभाव प्रत्येक ठिकाणीं दाखविल्या-शिवाय राहात नाहीं.

पुष्कळसे पत्रलेखक असें मानतात कीं, 'जात हा हिन्दुस्थानचा अेक जुना रोग आहे. जातींनीं हिन्दुसमाजाचें कधींहि भलें केलेलें नाहीं; आणि त्यांच्यामुळें यापुढेंहि कधीं हिन्दुसमाजाचें भलें होणार नाहीं; जातींमध्यें प्रगती-चें किंवा सामाजिक कल्याणाचें अेकहि तत्त्व नाहीं.' अशा संस्थेची मी तरफदारी करतों याचें त्यांना आश्चर्य वाटतें. कांहीं लोक माझी कींव करतात आणि म्हणतात कीं 'तुम्हांला गुजरातमधील जातींचा अनुभव नाहीं.'

सध्यांची जातींची स्थिति चांगली आहे किंवा ती चालवून घेण्यासारखी आहे असें मुळीं मी मानीतच नाहीं. आज ज्ञातिसंबंधांत जो दंभ आणि जी हुकूमशाही चालते, तिच्याविरुद्ध जर कोणी व्यवस्थित बंड करील तर मला वाअीट वाटणार नाहीं. अज्ञान, भोळसट समजुती, यांत्रिक धर्मचुस्तपणा, दंभ आणि हृदयाचा संकोच यांचेंच राज्य जर जातींवर चालावयाचें असेल, तर त्यांविरुद्ध बंड करणें हीच जातीची उत्तमांत उत्तम सेवा आहे. पण मला पत्र लिहिणाऱ्या पत्र–लेखकांना मी असें विचारूं अिच्छितों कीं, ज्ञातिव्यवस्थेचा नाश केल्यानंतर तुम्ही तिच्याअैवजीं काय चालू कराल? युरोपांतील निर्वर्णी व्यवस्था आपल्या येथें मुळींच चालणार नाहीं. त्यांत धर्म आणि समाज या दोहोंचाहि नाश आहे. ज्ञातिव्यवस्था शतकानुशतकें आपल्या हाडींमाशीं खिळलेली आहे. तिच्याअैवजीं तिच्यासारखीच पण तिच्याहून जास्त उपयोगी अशी अेकादी व्यवस्था आपल्याला चालू करावी लागेल. जर आपण जुन्यांतच जास्त प्राण ओतूं तर ही क्रान्ति करूं शकूं; कारण जर प्राण प्रबळ असेल, तर तो आपल्याला आधारभूत असलेल्या शरीरास स्वतःला अनुकूल असें रूप दिल्याशिवाय राहात नाहीं.

जातीच्या मुळाशीं असलेल्या आदर्श तत्त्वांचें चित्र आपल्या दृष्टीसमोर प्रत्यक्ष पाहण्याचा मी प्रयत्न करीत असतों. माझी अशी श्रद्धा आहे कीं आर्य जातीनें निर्माण केलेली आणि हजारों वर्षेंपर्यंत अनुभविलेली ही अनन्यसाधारण संस्था गाडून टाकण्याच्याच योग्यतेची नाहीं.

पण मला हें दिसत आहे कीं, लोकांमध्यें जातींच्याविषयीं जितका असंतोष आहे, तितक्या प्रमाणांत जाती सुधारण्याचा किंवा नष्ट करण्याचा प्रयत्न कोणी करीत नाहीं. निष्क्रिय असन्तोष हा समाजांतील घाण काढून टाकण्याअैवजीं ती वाढविण्याचेंच काम करीत असतो. जात जितकी मोकळीक देअील किंवा खासगी रीत्या जितकी मोकळीक घेतां येअील तेवढी घेऊन स्वच्छन्दपणें वागणें, हा कांहीं समाजाला सुधारण्याचा मार्ग नव्हे.

आजच ज्ञातिसुधारणेची चर्चा करण्याची ही वेळ नाहीं. आज जनतेचा विचार, जनतेची चिन्ता आणि जनतेचा पराक्रम हीं सर्व परदेशी कापडाचा नाश करण्यावरच केन्द्रित झालीं पाहिजेत. स्वदेशीच्या प्रचाराचें अेकमात्र

कार्यच जनतेनें हातीं घेतलें पाहिजे. ज्ञातिव्यवस्थेंत, जातींच्या संघटनेंत अेक विशिष्ट प्रकारचा सामाजिक प्राण राहिलेला आहे असें समजून ज्ञातिव्यवस्थेवर विश्वास असणाऱ्या आणि जातींचें नेतृत्व करणाऱ्या लोकांना स्वदेशीच्या मदतीस धांवून येण्यासाठीं मीं हांक दिली. जातींत जितका जीव असेल, तितक्या प्रमाणांत माझ्या या हांकेस ओ मिळेल आणि तितक्याच अंशीं जात आपली योग्यता सिद्ध करील.

जोंपर्यंत आपण जातींच्या दोषांना पाठिंबा देत नाहीं, तोंपर्यंत ज्ञातिसंस्थेविषयींची आपली आशा आणि आदर यामुळें समाजाचें नुकसान होणार नाहीं. जातींच्या मुळाशीं असलेला हा आदर्श आपण जसजसा जाहीरपणें जनतेच्या नजरेसमोर अविरतपणें ठेवीत जाऊं, तसतसें जातीच्या नांवावर चालणाऱ्या अयोग्य रीतिरिवाजांना आपली झोटिंगशाही चालविणें अवघड होत जाअील. जातीचें आदर्श चित्रण करणें हीच आजच्या बिघडलेल्या परिस्थितीवरील सर्वोत्कृष्ट टीका आहे; आणि तिच्याविरुद्ध प्रखर शस्त्रहि तेंच आहे.

पण आज मात्र आपल्याला सर्व कांहीं सोडून देऊन अेकच काम करावयाचें आहे. तें हें कीं परदेशीविरुद्ध युद्ध पुकारून स्वदेशीला निर्भय आणि राज्यपदारूढ बनविणें.

# गोरक्षा

अहिंसा म्हणजे ज्यांना सुखदुःख आहे, अशा सर्व सचेतन सत्त्वांविषयीं क्रूरपणाचा अभाव. प्राणिमात्रांस अभयदान देणें, त्यांच्या घातास प्रवृत्त न होणें, ही व्यापक अहिंसा आहे.

( १ )

अेवढ्या उच्च कोटीपर्यंत मनुष्याची धर्मबुद्धि अजून पोहोंचली नाहीं. मनुष्यहृदय अितकें उन्नत झालें नाहीं. तेव्हां सबंध मनुष्यकोटीकडून आजच्या स्थितींत अधिकाधिक अपेक्षा करावयाची ती अितकीच, कीं माणसामाणसांमधील वैर टळावें. कोणीं कोणाचा घातपात करूं नये. अेवढेंच नव्हे, तर कोणीं कोणास नाडूं नये, कोणीं कोणाचा अन्याय करूं नये.

कोणीं अन्याय केला, नाश केला अथवा वैर केलें, तर त्याचें शासन किंवा प्रतिशोधन म्हणूनहि कोणीं कोणास मारूं नये, कोणाचा नाश करूं नये. कारण हिंसेनें हिंसा वाढते, कमी होत नाहीं. उलट, क्षमावृत्तीनें, सहन करण्यानें आणि प्रसंगीं सत्याग्रही सविनय विरोध करण्यानें मनुष्यहृदयांतील सज्जनता वाढते.

धर्मपालन म्हणून, शिक्षणाचा अेक प्रकार म्हणून आणि युद्धाची अेक नवीन पद्धति म्हणून माणसामाणसांमध्यें अहिंसेचेंच जर अवलंबन झालें, तरी आजचें युग कृतार्थ झाल्यासारखें होअील.

(२)

याच्या पुढील पाऊल म्हणजे आपल्या लहानग्या भावंडांसारखी जी प्राणिसृष्टि परमेश्वरानें मनुष्याच्या ताब्यांत सोपविली आहे, तिच्याशीं धर्मानें वागणें हें होय. ज्या प्राण्यांपासून मनुष्यास लाभहानी कांहींच नाहीं, त्यांच्याविषयीं तर तो उदासीनच असणार. केवळ दुष्ट बुद्धीनें अथवा चैनीखातर तो त्यांचा संहार करण्यास कधीं कधीं प्रवृत्त होतो खरा; पण असा संहार थोड्याशा प्रयत्नानें थांबवितां येण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें मनुष्याच्या हातून कचित् न कळत होणारा अनावश्यक संहारहि थांबविणें फारसें अवघड नाहीं.

पण जे प्राणी मनुष्याच्या प्रत्यक्ष नाशास अथवा दुःखास कारणीभूत होतात, त्यांचा संहार किंवा निरोध करणें योग्य आहे, आवश्यक आहे आणि स्वाभाविक आहे, असें मनुष्यास जितक्या उत्कटतेनें वाटतें कीं, त्याच्या या वृत्तीचा निरोध करणें निदान आज तरी फार मुष्किल आहे.

केवळ यंत्राच्या साहाय्यानें पाहतां येण्यासारखे अथवा ज्यांच्या अस्तित्वाची माहिती जन्तुविद्याविशारदांच्या सांगण्यावरूनच आपणांस होते अशा रोगाच्या जन्तूंसारख्या सूक्ष्मातिसूक्ष्म जीवांच्या जीवनमरणाविषयीं, विकासविनाशाविषयीं अथवा सुखदुःखाविषयीं मनुष्यहृदय जागृत नसतें. या जीवांविषयीं अमुक मानवधर्म आहे असा प्रचार करणें कठिण आहे.

(३)

आतां राहिले असे जीव, कीं ज्यांचा मनुष्यजीवनाशीं संबंध नेहमीं येतो. यांपैकीं ज्यांना पकडून मनुष्य स्वतःचे आश्रित करीत नाहीं अथवा ज्यांची

सेवा घेत नाहीं, त्यांचें रक्षण किंवा पालन करण्याचा धर्म त्याच्यावर येऊं शकत नाहीं. त्यांचें जीवन प्रकृतीच्या नियमांना अनुसरूनच व्यतीत होणार. मुंग्या, डोंगळे, जंगली खबुतरें व रानांतील सर्व पशुपक्षी व पाण्यांतील मासे वगैरेंचें पालनपोषण करणें अथवा प्रयत्नपूर्वक रक्षण करणें हें कांहीं मनुष्याचें धर्मप्राप्त कर्तव्य नाहीं. असें करणें ही अेक प्रकारची हौस आहे, विनोद आहे, अथवा दयाधर्माचा अंध अतिरेक आहे.

पण आज ज्या प्राण्यांचा मनुष्याच्या आहारासाठीं वध होतो, तो थांबवितां आल्यास फार उत्तम. पण याला मार्ग एकच : मनुष्यहृदयाला जागृत करणें. अन्य मार्ग नाहीं. जेथें भक्ष्य–भक्षक भाव ठरून गेला आहे, तेथें दयाबुद्धि उत्पन्न करणें फारच कठिण., अशा ठिकाणीं वधासाठीं पशुपक्षी किंवा मासे पाळण्यांत येतात. हें त्यांच्या शिकारीपेक्षांहि जास्त गर्ह्य आहे. ज्यांचें पालन आपण करितों त्यांचाच वध करणें व ज्यांना खाऊं घालतों, त्यांनाच खाऊन टाकणें यांत त्या जीवांची हिंसा आहेच; पण त्याहून भयानक अशी मनुष्यहृदयाची हिंसा आहे.

अशा स्थितींत वधासाठीं ज्यांचें पालनपोषण आपण करितों त्यांचा वध करणें जितकें अनिष्ट आहे, तितकेंच त्यांचा वंशविस्तार होऊं देणेंहि अनिष्ट आहे. वधाच्या हेतूनें पाळण्यांत येणाऱ्या प्राण्यांचा वंशविस्तार बंद करणें अगर मर्यादित करणें ही अहिंसेची अेक पायरीच आहे.

ज्या प्राण्यांना पाळून आपण आपले कायमचे आश्रित केलें आहे, त्यांच्या वंशविस्ताराचें सर्व पाप आपल्या डोक्यावरच आहे. ज्यावेळीं आपणांस त्यांचा उपयोग राहिला नाहीं अशी स्थिति येअील, त्यावेळीं त्यांना जंगलांत नेऊन सोडून देणें व पुनः वन्य करणें हा अेक मार्ग आहे. दुसरा मार्ग म्हणजे त्यांचा वंश वाढूं न देणें हा होय. अनावश्यक प्राण्यांच्या पालनाचा भार उचलणें मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरचें आहे.

(४)

ज्या प्राण्यांपासून आपणांस दूध वगैरे आहार मिळतो, अथवा ज्यांची श्रमरूपी सेवा आपण घेतों, ते आपले कुटुंबी होतात. त्यांचा वध करणें अथवा होऊं देणें अत्यन्त निंद्य आहे. गाय, बैल, म्हैस, रेडा, हत्ती, घोडा, उंट,

गाढव, खेचर वगैरे प्राणी आश्रित दशेंत असतील, तोंपर्यंत त्यांना मनुष्या-कडून अभयदान मिळालें पाहिजे.

आणि हें अभयदान तरच देतां येईल, कीं जर त्या त्या प्राण्याचें पालन-पोषण मनुष्यास लाभकारक होईल; निदान नुकसानीची बाब तरी होऊं नये.

वरील प्राण्यांपैकीं, हत्ती, घोडा व उंट यांचा प्रश्न आपल्या देशांत महत्त्वाचा नाहीं. त्यांचें जीवन कांहीं संशयांत पडलेलें नाहीं. गाढवासाठीं मनुष्य फारसा खर्च करीतच नाहीं. त्याची सेवा तो जवळ जवळ फुकटच उपटतो. म्हणजे त्याचाहि प्रश्न वादाचा नाहीं.

आतां प्रश्न राहिला तो गाय–बैल व म्हैस–रेडे या दोन जातींचा. यांपैकीं गाय–बैलांची, ते जिवंत असेतोंपर्यंत, आपल्याला अमर्याद सेवा मिळते. त्यामुळें त्यांच्या पालनपोषणाची व ते म्हातारे झाल्यावर त्यांच्या संगोपनाची जबाबदारी आपल्यावर राहते. त्यांतून बैलाची सेवा अखंडपणें आपणांस मिळत असल्यानें त्याची उपयोगिता स्वयंसिद्ध आहे. म्हणून त्याचा वध सहसा कोणीं करूं नये. गायीची उपयोगिता तिच्या दुधाच्या मानानें कमीजास्त होते व म्हणूनच तिचें जीवन संकटांत सांपडलें आहे. बैलाप्रमाणेंच जर गायीकडून सर्वकाळ लाभ होऊं लागला तर तिच्या वधासहि कोणी सहसा प्रवृत्त होणार नाहीं.

गायीवर दुसरें अेक संकट ओढवलें आहे. तिला अेक जबरदस्त प्रतिस्पर्धी म्हणून म्हैस उत्पन्न झाली आहे. म्हशीच्या अवलादीचें पालनपोषण व वृद्धावस्थेंत संगोपन मनुष्यधर्माला ओळखून जर आपण करूं गेलों, तर म्हैस आपणांस कधींहि फायद्यांत पडणार नाहीं. गायीपेक्षां म्हशीला दूध जास्त, तिच्या दुधांत चरबीचें प्रमाण अधिक आणि म्हशीची संगोपना जास्त सोपी; त्यामुळें ती गायीचें स्थान हिरावून घेत आहे. पण असें करण्यांत माणुसकी विसरून जाऊन लहान अगर मोठ्या रेड्यांचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें वध केल्यानेंच म्हशीचें दूध स्वस्त पडतें, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. रेडा जातीचा श्रमसहिष्णु नाहीं व बुद्धिवानहि नाहीं. ओलसर व दमट हवेंत तो थोडेंबहुत काम करूं शकतो अेवढेंच. साधारणतः तो मेहनत बिलकुल करूं शकत नाहीं. त्याच्या आहाराच्या मानानें त्याची उपयोगिता फार कमी व फार श्रम पडल्यास तो मरून जातो. म्हणजे रेड्याचें निरर्थक

ओझें स्वीकारल्यास म्हशीचें दूध फारच महाग पडेल. वैद्यकीय दृष्ट्या म्हशीचें दूध गायीच्या दुधाअितकें पथ्यकर नाहीं, ही गोष्टहि विचारणीय आहे. तेव्हां म्हैस मनुष्याच्या सेवेंत सांपडून स्वतःच्या वंशावर व गायीच्याहि जिवावर उठली आहे. मनुष्यानें म्हशीला पाळावयासच नको होतें. जंगलांतच तिचें काय व्हावयाचें तें झालें असतें. आजहि आपला धर्म असेंच सांगतो कीं म्हशीची सेवा व त्यामुळें उत्पन्न होणारी जबाबदारी हीं दोन्ही सोडा; आणि केवळ गायीबैलांच्या सेवेंतच धर्मपालन होऊं शकतें म्हणून त्यांतच संतोष माना.

म्हशीची अधर्म्य प्रतिस्पर्धा बंद करण्याचे मार्ग अनेक आहेत. पण त्या सर्वांच्या मुळांत रामबाण उपाय हा आहे कीं, आपण म्हशीच्या दुधाचा व त्यापासून होणाऱ्या सर्व पदार्थांचा त्याग करावा. म्हैस अगर रेड्याची सेवा घ्यावयाची नाहीं असें अेकदां नक्की केलें, म्हणजे म्हैस स्वस्त पडो अगर महाग पडो, तिचें दूध जास्त पौष्टिक व विपुल असो किंवा नसो, त्याच्याशीं आपल्याला कांहींच कर्तव्य नाहीं. गायीबरोबर असलेला आपला ऋणानुबंध आहे तोच कायम राहील.

गायीला आणि तिच्या वंशाला अेवढें अभयदान दिल्यानंतर तिच्या दुधाचें प्रमाण कसें वाढेल व तें सकस कसें होअील याची काळजी आपणांस आपो-आपच घ्यावी लागणार. याचें शास्त्र आज पुष्कळ वाढलेलें आहे. त्याचा आपण पुरता उपयोग करून घेतला पाहिजे.

दुसरें असें कीं, गायीच्या बाबतींत आजवर आपण जो अन्याय केला आहे तो सरून आदर्श गोपालनापासून होणारा सर्व नफा गायीच्या आणि तिच्या वंशाच्या रक्षणार्थ वापरावा. ज्याप्रमाणें खादीकार्याची शेवटची भिस्त संन्यस्त-वृत्तीनें राहणाऱ्या परोपकारी, त्यागी व निर्लोभ अशा समाजसेवकांवर आहे, त्याप्रमाणेंच गौरक्षेचा आधारहि संन्यस्त वृत्तीच्या गोभक्त समाजसेवक स्त्रीपुरुषांवरच असणार. माणसाचें ओझें गायीवर पडणार नाहीं व गायीचें ओझें माणसावर पडणार नाहीं, अशी स्थिति आणण्याचे सर्व प्रयत्न व्हावयास पाहिजेत. गायीचें दुभतें लोकांना शक्य तितकें स्वस्त मिळालें व गायीची उप-योगिता आणि किंमत तितकी वाढली, तरच गाय निर्भय होअील. आज गाय पोसण्यापेक्षां मारणें फायद्याचें होतें ही किती लाजिरवाणी स्थिति आहे बरें!

ही स्थिति बदललीच पाहिजे, व गायीसारख्या मूल्यवान् प्राण्यास मारण्यांत आर्थिक नुकसानच आहे असें जगाला वाटलें पाहिजे.

गायीची अवलाद सुधारण्याचे प्रयत्न करावयास पाहिजेत. वासरें देण्याची तिची शक्ति शेवटपर्यंत टिकविण्याचे उपाय शोधून काढावयास पाहिजेत. गायीचें दूध न देण्याचे दिवस शक्य तितके कमी होतील असें केलें पाहिजे. भाकड होईतोंपर्यंत तिचें दूध फारसें आटणार नाहीं याबद्दल काळजी घ्यावयास पाहिजे. आणि जे थोडे दिवस गाय दूध देत नाहीं, त्या दिवसांत तिचें पोषण चांगलें व्हावें व खर्च कमी यावा याचीहि काळजी घ्यावयास पाहिजे.

गायीच्या दुधाखेरीज तिचें शेण व मूत ही अत्यंत उपयोगी पैदास आहे. आपण हिंदु लोक गोमय व गोमूत्र यांस फार पवित्र मानतो; पण त्यांच्या उपयोगितेची आपणांस पुरती जाणीव नाहीं. गोमूत्राचा खत म्हणून आपण पुरता उपयोग करीत नाहीं. शेण वाळवून तें आपण जाळून टाकतों, किंवा सारविण्याच्या कामीं वापरतों. हा शेणाचा दुरुपयोग असून शेतीचा द्रोह आहे. खताकरितां शेण सांठविण्याची कला आपण शिकून घेतली पाहिजे.

(शेणानें सारवलेल्या जागेस आपण पवित्र मानतों, तर धर्मचुस्त मुसलमान ती अपवित्र मानतो. शेणानें सारवलेल्या जागेवर मुसलमान कधींहि नमाज पढणार नाहीं. शुद्ध मातीनें सारवलेली जमीन दोघांनाहि सारखीच पवित्र आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.)

गायीचें स्वाभाविक मरण झाल्यानंतरहि तिच्या पाळणाऱ्याला तिचा जास्त उपयोग करून घेतां आला पाहिजे. गायीचा वध करणें हें पाप आहे. पण स्वाभाविक मरणानें मेलेल्या गायीचें कांतडें, तिचीं खुरें, शिंगें, हाडें व आंतडीं आणि मांस या सर्वांचा कांहीं तरी उपयोग आपल्याला करितां आला पाहिजे. मेलेल्या जनावराचें मांस कधींहि खाण्यांत येतां कामा नये. कारण तें शारीरिक व मानसिक आरोग्याचा नाश करतें. त्यामुळें जुगुप्सा उत्पन्न होते. त्यांत अनेक जंतू उत्पन्न झालेले असतात व तें अनेक रोगांचें माहेरघर होऊन बसतें.

स्वाभाविक मरणानें मेलेल्या गायीचें मांस जमिनींत पुरून त्याचा उत्तम खतादाखल उपयोग करितां येतो. शिंगें व खुरांपासून सरस काढतां येईल.

शिंगांचा दुसराहि पुष्कळ उपयोग आहे. सरस काढून घेतल्यानंतर जो चोथा राहतो त्यांपासून उत्तम ब्रश बनतात. स्वाभाविक मरणानें मेलेल्या गायीचें कांतडें अत्यंत पवित्र मानून तेंच वापरण्याचा आग्रह धरला पाहिजे. गायीच्या हाडांचा व कांतड्यांचा व्यापार आज गोभक्षकांच्या ताब्यांत असल्यामुळें गायींची कत्तल वाढत आहे. हा व्यापार गोसेवकांच्या हातीं आल्यास ती तितकीच कमी होओील व या व्यापारांत होणारा मोठा नफा गोसेवेंतच वापरतां येओील. 'हत्याचर्म' कमावणें सोपें आहे. 'मृतिचर्म' कमावण्यास विशेष कला अवगत असली पाहिजे. गोसेवकांनीं ती कला शिकून वाढविली पाहिजे. खऱ्या गोसेवकांनीं 'मृतिचर्म'च वापरण्याचें व्रत घेतलें पाहिजे.

आणि अशा रीतीनें हृदयबळ, बुद्धिबळ, विज्ञानबळ, द्रव्यबळ, व्यापारबळ आणि संघबळाच्या योगानें धर्मनिष्ठ मनुष्यानें मनुष्यकुटुंबांत दाखल झालेल्या असहाय अशा प्राण्याचें—गायीचें व तिच्या वंशाचें—रक्षण व पालन केलें पाहिजे.

हा धर्म केवळ हिंदूंचाच नाहीं; पण ज्यांना तो पटेल अशा प्रत्येक मनुष्याचा आहे. यांत अहिंसाधर्माचा व मनुष्यहृदयाचा विकास आहे व त्यामुळें याला ओीश्वराचा आशीर्वादच आहे.

ज्यांना हा धर्म पटला, त्यांनीं त्यासाठीं पुरती तपस्या केल्यास त्या तपस्येच्या प्रभावानें या गोरक्षाधर्माचा सर्वत्र प्रसार होओील असा अध्यात्मशास्त्राचा कौल ( अभिवचन ) आहे.

# जीवनदृष्टीचीं तीन प्रस्थानें

ओका बाजूनें मानसशास्त्र आणि दुसऱ्या बाजूनें समाजशास्त्र मिळून जीवन आणि जीवनधर्म हीं संपूर्ण होतात. या जीवनाला शुद्ध आणि समृद्ध, समर्थ आणि सफळ करण्याच्या प्रयत्नामुळें जी जीवनपद्धति आणि जो जीवनविस्तार परिणतपणें कमाविला जातो ती आपली संस्कृति होय. प्राचीन काळीं असें समजलें जाओी कीं धर्म हाच सार्वभौम आहे. जीवनाशीं संबंध असलेल्या सगळ्या गोष्टींचा त्याच्यांत अन्तर्भाव होतो. आज जेव्हां अनेक धर्म ओकाच

वेळीं जवळ जवळ येऊं लागले आहेत आणि सर्वांना अेक कौटुंबिक भावना स्वीकारावी लागत आहे, अशा वेळीं सहजच असा प्रश्न उठतो कीं या सर्व धर्मांचा समास करूं शकेल असें व्यापक तत्त्व—असा महत् समन्वय—कोणत्या नांवानें ओळखला जावा ? सिंधु नदीमध्यें जशा उजव्या आणि डाव्या बाजूंनीं पांचसात नद्या ठिकठिकाणीं येऊन मिसळत जातात, तसेंच आपल्या देशांत पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून अनेक धर्मांचे स्रोत येऊन मिसळले आहेत, आणि त्यांमधून अेक विविध रंगांनीं रंगलेलें आणि तरीहि अेकत्वाच्या दिशेनें धांवणारें सार्वभौम वातावरण अनुभवास येतें. त्याला भारतीय धर्म अथवा सार्वभौम धर्मसमन्वय असें म्हणण्याअैवजीं 'भारतीय संस्कृति' हें नांव देणें अधिक समर्पक होअील. यहुदी आणि ख्रिस्ती लोक आपापसांत कितीहि लढले, तरी दोघांच्याहि धर्मांतील व्यापक तत्त्वें संमिश्र होऊन त्यांच्यांतूनच ख्रिस्ती संस्कृति पैदा झाली आहे. यहुदी आणि ख्रिस्ती या दोघांनीं मिळून ज्या संस्कृतींना pagan असें संबोधून त्यांचे वाभाडे काढले, त्या ग्रीक आणि रोमन संस्कृतींच्या संस्कारांमुळेंच ख्रिस्ती संस्कृति व्यवहारकुशल, संस्कारसमृद्ध आणि हृदयाला संतोष देणारी अशी बनली आहे. रोमन, ग्रीक, यहुदी आणि ख्रिस्ती या संस्कृती स्वतःला उज्ज्वल आणि शिष्ट समजून युरोपांतील लोक-संस्कृतीला बार्बर व आशिष्ट समजत; पण लोकसत्तेचा प्रादुर्भाव होतांच युरोपां-तील भिन्नभिन्न देशांत भिन्नभिन्न रीतींनीं विकसित झालेल्या लोकसंस्कृतीं-चीहि प्रतिष्ठा वाढली व आअिसलंडपासून तों थेट ऑस्ट्रिया—हंगेरीपर्यंत आणि स्कॅंडिनेव्हियापासून तो थेट सैबेरियापर्यंत जें लोकजीवन परापूर्व काळा-पासून विकसित होत आलें आहे त्याचा वांटा युरोपीय संस्कृतींत स्वीकारला गेला. अितकेंच नव्हे, तर त्याला ज्येष्ठता प्रदान करण्याची वृत्तीदेखील आतां युरोपियन समाजांत उत्पन्न झाली आहे. धर्म हे आपले आपले संस्थापक आणि प्रमाणग्रंथ यांच्या मागें मागें खुशाल धांवोत; पण संस्कृतीचा स्वभावच समन्वयकारी असतो. संस्कृति ही अनुभव आणि आदर्श, कल्पना आणि परिस्थिति यांच्याशीं अेकनिष्ठ राहून हृदयधर्माचें अनुसरण करते. तिचा विकास स्वयंभू आणि स्वयंप्रेरित असल्यामुळें तिला समन्वय करण्यास कसलीच अडचण पडत नाहीं. धर्मश्रद्धेला निश्चित रूप मिळाल्यामुळें तिच्यांत सामर्थ्य आणि संकुचितता या दोन्ही गोष्टी येतात. संस्कृतीची श्रद्धा जीवनाअितकीच

लवचिक आणि प्राणपूर्ण असल्यामुळें तिची शक्ति वातावरणाप्रमाणें अटळ आणि अकळ असते.

हिंदुस्थानांत जे वेगवेगळे समाज आणि धर्म बाहेरून येऊन बसले आहेत, त्यांनीं हिंदुधर्माचा कितीहि विरोध केला असला, तरी भारतीय संस्कृतीपासून ते मुक्त किंवा अलिप्त मात्र मुळींच राहूं शकले नाहींत.

जेव्हां धर्म जिवंत, वृद्धिंगत होणारा, फुलणारा–फळणारा आणि ताजा असतो, तेव्हां तो संस्कृतीहून भिन्न असत नाहीं. पण जेव्हां अेकांगितेमुळें धर्माचे तुकडे पडतात आणि वेगवेगळ्या निष्ठा व भिन्नभिन्न पंथ स्वतंत्र धर्माचें नांव धारण करतात, तेव्हां धर्माच्या जागीं संस्कृतीला सार्वभौमपद द्यावें लागतें. सम्राट् अशोकानें आपल्या शिलालेखांत 'धर्म' शब्द 'संस्कृति' या व्यापक अर्थानें वापरला आहे. आणि ज्याला आपण आज धर्म किंवा पंथ या नांवानें ओळखतों, त्याला त्यानें 'पाषांड' असें लघुतादर्शक नांव दिलें आहे.

जीवन संकुचित असो कीं व्यापक असो, तें अेकांगीं असूंच शकत नाहीं. फूल जेव्हां उमळतें तेव्हां तें अेका पाकळीमागून दुसरी पाकळी अशा क्रमानें उमलत नसून कळीच्या रूपानें सर्वच पाकळ्यांना सांगातीं घेऊन तें जन्मतें आणि अेकसमयावच्छेदेंकरून उमलतें. जीवनाचेंहि असेंच आहे. आग्रही धर्म केव्हां केव्हां जीवनपुष्पाच्या कांहीं ठराविक पाकळ्यांचा विकास करूं लागतो आणि कांहीं पाकळ्या कठोरपणें खुडूनहि टाकतो. संस्कृतीचें असें नाहीं. जीवनधर्माशीं अेकनिष्ठ राहूनच ती जीवनशुद्धि आणि जीवनसमृद्धि करूं पाहते. म्हणून जीवनाची परिपूर्णता म्हणजे संस्कृति असें म्हणतां येअील.

ज्याप्रमाणें पृथ्वीवर राहणारा प्रत्येक मनुष्य जाणत असतां किंवा अजाणतां आकाशाच्या आंतच सामावलेला राहतो, त्याचप्रमाणें मनुष्य जीवन आणि संस्कृति यांचें अध्ययन करो किंवा न करो, त्याला तीं दोन्ही जगल्यावांचून सुटकाच नसते आणि यामुळें जीवनाविषयीं जें कांहीं सांगितलें व केलें गेलें असेल, त्याचा कमीअधिक अनुभव प्रत्येक माणूस घेऊं शकतो. आणि आपल्या अनुभवावरून त्याच्याविषयीं अस्ति किंवा नास्तिपक्षीं सम्मतीहि देऊं शकतो. सर्व शास्त्रें आणि सगळ्या कळा जिच्यामध्यें सामावून जातात त्या जीवनसंस्कृतीची मीमांसा अेकहि शास्त्र किंवा कला अंगीं न बाणवितांहि

थोड्याबहुत अंशीं मनुष्य समजूं शकतो. मनुष्य जगापासून अलिप्त राहिला किंवा बहिष्कृत झाला, तरीहि जीवनाच्या समृद्धींतून आणि संस्कृतीच्या ओपे-मधून तो अगदींच अस्पृष्ट राहूं शकत नाहीं. जीवन–नाटकाच्या अंकांची भर प्रत्येकाच्या जीवनांत पडत असते. आणि वातावरणामधून त्याला संस्कृतीचा परिष्कार मिळत जातो. म्हणूनच आशा आहे कीं जीवन आणि संस्कृति यांची वेळोवेळीं केलेली ही मीमांसा प्रत्येक वाचकाला पदोपदीं आपल्याकडे खेंचून घेऊं शकेल आणि विचार करावयास लावील. ही मीमांसा जसजशी विचारांना आणि भावनांना प्रेरणा देत जाओील, तसतशी माणसाच्या हृदयांत असंतोष आणि अस्वस्थता हीं वाढत जातील अशी अपेक्षा आहे. असन्तोष हें जितकें जीवनाचें लक्षण आहे, तितकेंच तें संस्कृतीचेंहि लक्षण आहे. असंतोष हें पुरुषार्थाचें प्राथमिक भांडवल आहे. हा असन्तोष दूर करून जर ओकादें लिखाण आत्मप्रौढी, सन्तोष आणि विश्राम उत्पन्न करील, तर तें लिखाण समाजद्रोही आहे असें निःशंकपणें ओळखावें. असलें लिखाण कुणाच्याहि लेखणींतून उतरतांच कामा नये. जो मनुष्य लोकहितचिंतक नसून लोकरंजक व खुशामतखोर असेल, त्याच्याच हातून सन्तोष, तृप्ति आणि विराम यांना पोषक असें लिखाण निर्माण होऊं शकेल. अशा प्रकारचा सन्तोष व कौशल्य ओीश्वरानें कोणाला देऊं नये अशी प्रार्थना आहे. जीवनांत जर ओकाद्या व्यक्तीला किंवा समाजाला कांहीं चांगलें साधावयाचें असेल आणि सफळता मिळवावयाची असेल, तर त्यांतून संतोष आणि विराम उत्पन्न करण्याओैवजीं सामर्थ्य आणि नवी दृष्टि निर्माण केली पाहिजे; आणि उत्तरोत्तर आर्यत्वाचा विकास करणारा असन्तोष त्यामधून उफाळून वर आला पाहिजे.

* * *

जीवन आणि संस्कृति हे दोन शब्द धर्माओितकेच अर्थघन आणि जीवन-समृद्ध आहेत. त्यांत येऊं शकणार नाहीं असें कांहीं नाहीं. माणसाच्या अध्य-यनासाठीं तसे पुष्कळ विषय आहेत; पण जो मनुष्याला सर्वांत व्यापक, सर्वांत रोचक आणि बाळपणापासून म्हातारपणापर्यंत अखंडैकरस असा विषय वाटतो, तो म्हणजे मनुष्यजीवन हाच होय. जीवन उथळ असो कीं सखोल,

प्रसादमय असो कीं विषादमय, कृतार्थ असो कीं व्यर्थ, माणसाला त्यांत गोडी ही वाटावयाचीच.

निसर्ग हा माणसाला जीवन बहाल करतो. त्या जीवनाला शुद्ध, समृद्ध, प्रसन्नगंभीर आणि वैविध्यविपुल बनविण्याचा प्रयत्न करीत असतां माणसानें संस्कृतीचा विकास केला. दगडांतून ज्याप्रमाणें आपण मूर्ति बनवितों, ध्वनी-मधून संगीत निर्माण करतों, घर्षणामधून ज्वाळा प्रज्वलित करतों, त्याचप्रमाणें जीवनामधून संस्कृति विकसित करीत असतों. जीवन ही प्रकृति आहे. संस्कृति ही तिची ओप आहे. जीवन जर संस्कारितेची ओप धारण करणार नाहीं, तर तें परिपुष्ट झालें तरी कृतार्थ मात्र होऊं शकणार नाहीं. आणि संस्कृति जर जीवनाशीं प्रामाणिक राहणार नाहीं, तर तिच्यांत पोकळपणा येईल; अितकेंच नव्हे, तर विकृति उत्पन्न होऊन दुर्गंधच सुटेल. जीवन हें जर धरित्री असेल तर संस्कृति हा तिचा स्वर्ग आहे. या दोहोंमध्यें जर अनुसंधान साधलें नाहीं, तर दोन्ही व्यर्थ होऊन जातील.

जीवन आणि संस्कृति यांवर शास्त्रीय ग्रंथ लिहिण्याची सूचना जर कोणी मला केली तर तसें करण्याची मी हिम्मत करणार नाहीं. मी असेंच सांगेन कीं 'या विषयांची मला गोडी आहे; पण त्यासंबंधीं लिहिण्याअितकी तयारी अजून माझी झालेली नाहीं. गळ्यांत सुंदर राग बसण्यापूर्वी तालीम म्हणून आपण अनेक आलाप घेण्याचा प्रयत्न करीत असतों आणि जरासें यश येतांच पुनः पुनः तेच आलाप आळवून, कंठस्थ करून, आपण पुढील तयारी करतों. अशाच वृत्तीनें हे लेख लिहिले गेले आहेत. या लेखांमागें विशिष्ट वाचन आहे, त्याहून अधिक निरीक्षण आहे. हिंदुस्थानांतील भिन्नभिन्न प्रांतांत आणि भिन्नभिन्न समाजांत मिसळण्याची जी संधि मला लाभली आणि त्या त्या प्रांतांच्या व त्या त्या समाजांच्या प्रकट आणि गूढ प्रश्नांची आत्मीयतेनें चर्चा करण्याचें जें भाग्य मला प्राप्त झालें, त्यायोगें हें निरीक्षण सखोल होत गेलें. आपल्या जुन्या धर्मग्रंथांत जें समाजशास्त्र गुंफलें गेलें आहे त्याचें अध्ययन आणि पाश्चात्य समाजशास्त्राच्या ग्रंथांचें वाचन यांच्यायोगें या निरीक्षणावर प्रकाश पडत गेला, आणि त्याचबरोबर या निरीक्षणाच्या योगें वाचलेल्या ग्रंथांचा भाव अधिकाधिक विशद होत गेला. अशा प्रकारें वाचनाचा

निरीक्षणावर आणि निरीक्षणाचा वाचनावर प्रभाव पडूं लागतांच त्यांतून मनन सुरू झालें. आणि त्या मननांतून समाजरक्षणाचे मंत्र स्फुरूं लागले. [ मननात् त्राणनात् मंत्रः । ] अशा प्रकारें समाजसुधारणेचे, संस्कृति-रक्षणाचे आणि आदर्शसिद्धीचे जे जे मंत्र स्फुरले, ते ते गांधीजींच्या सर्वोदयकारी तत्त्वज्ञानाच्या कसोटीवर कसून पाहिले. आणि त्यानंतर हे मंत्र प्रसंगानुरोधानें आवश्यक समजून गुजराती समाजासमोर मांडले. त्यांचा हा संग्रह आहे.

भिन्नभिन्न काळीं भिन्नभिन्न अनुभवांच्या भूमिकेवर आरूढ होऊन लिहिल्या गेलेल्या या लेखांत कुठें कुठें परस्परविरोध दिसून आल्यास आश्चर्य नाहीं. शाब्दिक विरोध तर अवश्य आढळेल. पण मला स्वतःला हें सारें लिखाण अेकरूप वाटलें आहे. त्याच्यामागें अेक नक्की व निश्चित चित्र आहे. भूतकाळाचें पुष्कळ अंशीं स्पष्ट आणि निश्चित दर्शन आहे; वर्तमानकाळाशीं अेक अव्यभिचारी निष्ठा आहे, आणि भविष्यकाळीं दृढतापूर्वक चालण्यासाठीं अेक निश्चित दिशाहि आहे. हें सर्व भिन्नभिन्न वृत्तींनीं लिहिलें गेलें असलें, तरी तें पूर्णपणें पारमार्थिक आहे. माझ्या अंगीं जी कांहीं उत्कटता आहे ती मीं यांत ओतली आहे आणि शक्यतोंवर सारें वातावरण जिवंत व जागृत बनविलें आहे. यांत जो आदर्श विकसित केला आहे, त्याचीच साधना 'जीवन-विकास ' या माझ्या शिक्षणविषयक गुजराती लेखसंग्रहांत आढळेल. त्याचाच पडसाद ' जीवन–भारती ' या माझ्या साहित्यविषयक गुजराती लेखसंग्रहांत अैकूं येअील आणि त्याच्याच प्रेरणेनें ' जीवनांतील आनंद ' लुटण्यांत मी समर्थ झालों असेन. म्हणून ज्या सेवाभावनेनें मी स्वतःला समाजास अर्पण करीन, त्याच नम्रतेनें मी हा संग्रह समाजसेवकांच्या चरणीं अर्पण करीत आहें.

या सार्‍या विवेचनांत वाचकांना तीन वेगवेगळीं प्रस्थानें दिसून येतील:

प्राचीन काळापासून मनुष्य जातीनें आपले वेगवेगळे वंश ( Races ) कल्पिले आहेत. आणि पुरातन काळापासून प्रत्येक देशांत भिन्नभिन्न प्रकारच्या वंशविद्या Ethnologies घडविल्या गेलेल्या आपल्याला दिसून येतात. हें अेक प्रस्थान होय.

यानंतर आपल्या येथें वर्ण–व्यवस्थेचा विकास झाला. वंश हे स्वतंत्र आणि

स्वयंपूर्ण असे लहानमोठे समाजच आहेत, तर वर्ण हे विराट् समाजाचे घटक किंवा अवयव आहेत. वंश हे रक्ताच्या संबंधांना—लैंगिक संबंधांनाच—ओळखतात, तर वर्णव्यवस्था ही राहणी—करणी आणि विचारसरणी यांच्या सेवाभावी आदर्शावर रचलेली आहे. आपली जातिव्यवस्था म्हणजे या दोहोंचें मिश्रण होय. आणि जशी जातिव्यवस्था तशीच लग्नव्यवस्था. या सिद्धान्तामुळें विवाहाविषयींचे आपले आदर्श, नियम, रिवाज आणि रूढि हीं हें ना तें रूप धारण करीत गेलीं आहेत.

वंश आणि वर्ण हीं ज्याप्रमाणें दोन वेगवेगळीं प्रस्थानें आहेत, त्याप्रमाणें वर्ग—संघटन हेंहि अेक तिसरें आधुनिक प्रस्थान आहे. हें तिसरें प्रस्थान दिवसेंदिवस खूपच उग्र होत चाललें आहे. आणि यापुढेंहि होअील. परन्तु जीवनाच्या सगळ्या तत्त्वांचें आकलन त्याला झालेलें नाहीं आणि संस्कृतीच्या सर्वोच्च आदर्शाविषयीं त्याला स्पष्ट कल्पना आलेली नाहीं; किंवा आदर्शांपर्यंत पोहोंचण्याची साधनाहि त्याच्याजवळ नाहीं. पण आज जें नाहीं तें उद्यां त्याला मिळणारच नाहीं, असें कसें म्हणतां येअील?

प्रत्येक प्रस्थानाजवळ त्याची स्वतःची साधनाहि असते. वंशाच्या दृष्टीनें लग्नव्यवस्था आणि कुटुंब यांचा विकास झाला. वर्णव्यवस्था अमलांत आणण्यासाठीं तिच्याबरोबर आश्रमव्यवस्था जोडून देण्यांत आली. वर्गसंघटनेसाठीं 'संस्था' स्थापिल्या जातात आणि संघ बनविले जातात. या सर्वांचें व्याकरण तपासणें आणि त्यांच्या रचनेंत सुधारणा करणें हें प्रत्येक समाजसेवकाचें काम आहे.

* * *

प्रत्येक सुधारलेल्या समाजाच्या आसपास संस्कारांच्या दृष्टीनें मागासलेल्या आणि जीवनसिद्धींत कांहींशा पराभूत झालेल्या अशा आरण्यक अथवा बहिष्कृत लोकांच्या जमाती असतातच. त्यांना मुख्य समाजांत कसें मिसळून घ्यावयाचें हा अेक मोठा प्रश्न आहे.

भिन्नभिन्न धर्मांत मिलाफ कसा होअील, भिन्नभिन्न संस्कृतींमध्यें कुटुंबभाव कसा निर्माण होअील, पूर्वेच्या आणि पश्चिमेच्या सामाजिक आदर्शांचा समन्वय कसा करतां येअील, शहरें आणि खेडीं हीं अेकमेकांस पोषक कशीं

होतील, श्रमजीवी आणि बुद्धिजीवी असा भेद नाहींसा करून सामाजिक आणि वैयक्तिक उत्कर्ष कसा साधतां येअील, वगैरे कित्येक प्रश्न मनुष्यजातीसमोर आहेत.

आपल्या देशांत अीश्वरानें जणुं समाजशास्त्राची अेक सनातन प्रयोगशाळा उघडलेली आहे. तिच्यांत बुद्धिपुरःसर त्रिकालदर्शी होऊन आपण प्रयोग करूं, तर सगळ्या जगाच्या अडचणींचें निराकरण आपल्याला करतां येअील.

जीवनांत संस्कारिता आणण्यासाठीं दोन प्रकारची तयारी हवी, साधनांची आणि साधनेची अशी ही दुहेरी तयारी असेल, तरच जीवनशुद्धि आणि जीवनसमृद्धि साधतां येअील. बाह्य साधनें योग्य प्रमाणांत प्राप्त करणें, प्रत्येक प्रकारच्या सम्पत्तीच्या योगें अिष्टतम प्रमाणांत सम्पन्न होणें आणि समाजाच्या योगक्षेमासाठीं समाजनियंत्रणाचे अनेक प्रकार प्रस्थापित करणें ही अेक बाजू झाली. हिला अिंग्रजींत सिव्हिलिझेशन म्हणतात.

याच्याबरोबरच आहारविहारादि बाबतींत शास्त्रशुद्ध सुधारणा करणें, वासनांची घाण धुऊन काढून त्यांमध्यें सामंजस्य प्रस्थापित करून जीवन शुद्ध बनविणें आणि सगळ्या शक्ती आत्मसात् करून तें समृद्ध करणें, सामाजिक सद्गुण अंगीं बाणवून धर्मसम्पन्न होणें आणि जीवनांत चारी पुरुषार्थ योग्य प्रकारें विकसित करणें याला साधना असें म्हणतात. ही आंतरिक वस्तु आहे. सांसारिक बाह्य सम्पत्ति व भूतसर्गाची आंतरिक सम्पत् या दोहोंचा मेळ घालणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. पुष्कळ वेळां साधन आणि साधना यांच्या विकासांत व्यस्त प्रमाण दिसून येतें असा अनुभव आल्यामुळें रोमा रोलॅं अेक मंत्र सांगून गेला : **The less I have, the more I am.** याचें रूपान्तर करतां "जसजशी माझी मत्ता कमी होते, तसतशी माझी सत्ता वाढते" अशा प्रकारचें सूत्र बनविण्याचा मोह होतो. अथवा असेंहि म्हणतां येअील कीं जसजसा 'परिग्रह' कमी होअील, तसतसें 'अध्यात्म' परिपुष्ट होत जातें.

जीवन आणि संस्कृति यांत काय येत नाहीं ? शौचाचार आणि आहारविहार यांपासून तों सामाजिक क्रान्तीपर्यंत सर्वच गोष्टी त्यांत यावयाच्या. भोजनांत आणि समाजांत प्रामाणिकतेचें (न्यायवृत्तीचें) पालन होअील,

उत्तरोत्तर अहिंसा वाढेल, कृत्रिम उच्चनीच भाव दूर होतील आणि हृदयधर्म ठरवील त्याप्रमाणें शारीरिक व सामाजिक आरोग्य वाढेल, अशा सुधारणा झाल्या पाहिजेत.

मनुष्यजातीनें जीवन संस्कारी बनविण्याचें अनेक प्रयोग केले आहेत; आणि अजूनहि ते चालू आहेत. आतां अेकूण मनुष्यजातीचा विचार करून सर्वत्र पसरलेल्या अबुद्धीचा नाश प्रथम केला पाहिजे. जीवनांत अद्यतन शास्त्रीयता आणली पाहिजे. धार्मिक संस्करण साधून सर्व धर्मांचा समन्वय सिद्ध केला पाहिजे. सर्व राजकीय अडचणी दूर करून शिक्षणाच्या बळावर आदर्श सामाजिक व्यवस्था आणि अिष्टतम आर्थिक संघटण हीं साधलीं पाहिजेत. आणि सर्वोच्च संस्कारिता ही कायद्याच्या किंवा शिष्टाचाराच्या जोरावर न चालवितां लोकांच्या जीवनांतच ती स्वाभाविक होअील असें केलें पाहिजे.

तसें करतांना पुढारलेल्या आणि मागासलेल्या अशा सर्वच समाजांचा कौटुंबिक भावनेनें विचार झाला पाहिजे. अेवढेंच नव्हे, तर गायी, घोडे, उंट, मेंढ्या, बकऱ्या, मधमाशा, पक्षी वगैरे आपल्या भावंडांचाहि त्यांत समभावपूर्वक विचार झाला पाहिजे. आणि अखेर दैवी संपत्तीच्या विकासाच्या बळावर माणसांमधून अहिंसापरायण देवांची सृष्टि ( निर्मिति ) झाली पाहिजे.

हें सर्व सिद्ध करण्यासाठीं प्रथम अेका समग्र आदर्शाचें ध्यान धरलें पाहिजे. त्याचबरोबर त्यासाठीं उग्र साधना केली पाहिजे. ज्ञानप्रचार आणि सेवा यांच्या द्वारें त्याचें दर्शन अखिल मानवजातीला घडविलें पाहिजे आणि सर्वोच्च आदर्श व्यवहारांत आणण्यासाठीं जें अेकमात्र साधन समजलें जातें, अशा त्या बलिदानासाठीं श्रेष्ठ लोकांनीं तयार झालें पाहिजे.

अशा साधनक्रमाच्या योगें ध्यानांत आणि चिंतनांत, सेवेच्या प्रयोगांत आणि शिक्षणाच्या प्रयोगांत जीं चित्रें पाहिलीं, तींच यथामति—यथाशक्ति येथें चित्रित केलीं आहेत. वाचकांना तीं पसंत पडोत किंवा न पडोत; तीं वाचून जर त्यांना स्वतंत्र प्रेरणा मिळेल, तर हे सगळे प्रयास सफळच आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८३३८८ वि: ...
... ९८५७ नों. दि: ...

REFBK-0006729